23-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही )



**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा गांभीर्यपूर्वक दृथकथन करण्याच्या नमुन्यात करण्यात आलेला बदल

**मु. शी.** : राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा गांभीर्यपूर्वक दृथकथन करण्याच्या नमुन्यात करण्यात आलेला बदल या संबंधी सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, भाई जगताप, हेमंत टकले, संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.शरद रणपिसे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा तसे गांभीर्यपूर्वक दृढकथन करण्यासंबधी तरतूद करण्यासंदर्भात तत्कालीन पॉलिटिकल व सोशल डिपार्टमेंटच्या क्रमांक 1642/46, दिनांक 15 सप्टेंबर 1952 च्या आदेशान्वये विहीत करण्यात येणे, या शपथेच्या नमुना व त्यासंबधीची नोंद घेण्याच्या कार्यपध्दतीत बराच कालावधी उलटल्यामुळे नवीन बदल करण्यात येऊन त्याबाबत सामान्य प्रशासन विभाग यांनी दिनांक 11 नोव्हेंबर 2014 रोजी नवीन शासन परिपत्रक क्रमांक सीडीआर-1010/प्र.क्र.54/पुनर्बांधणी 70/11 च्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांना नवीन शपथेचा/दृढकथनाचा नमुना देणे, त्यात निष्ठेची शपथ घेताना शेवटी कर्तव्ये निष्ठेने, प्रामाणिकपणे व नि:पक्षपातीपणे पार पाडीन यासाठी ईश्वर मला साह्य करो, असा उल्लेख करण्यात येणे, यामुळे भारतीय संविधानाच्या उद्देशिकेमध्ये व मूलभूत स्वांतत्र्यात नमुद केल्याप्रमाणे विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना यासाठी दिलेल्या स्वातंत्र्याचे उल्लंघन झालेले असून, धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाला तडा गेला असणे, अशाप्रकारच्या नवीन शपथेच्या नमुन्यामुळे राज्यातील जनतेमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करुन अशाप्रकारे जातीयतेढ निर्माण करणाऱ्या शपथेच्या नमुन्यात बदल करण्याची नितांत आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात काही सुधारणा करावयाची आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना काही बदल सूचवावयाचा असेल तर तो त्यांनी सूचवावा.

श्री.शरण रणपिसे : सभापती महोदय, ठीक आहे, आपले संघ राज्य आहे, यामध्ये भारत सरकारचा व राज्य सरकारचा कारभार कसा चालावा, या संदर्भातील सर्व तरतूदी घटनेत नमूद केल्या आहेत. त्यानुसार परिपत्रके काढली जातात, नियम तयार केले जातात, ते सर्व राज्य सरकारला बंधनकारक असत नाहीत. राज्य सरकारचा कारभार भारतीय संविधानाप्रमाणे चालला पाहिजे. संविधानाच्या तिसऱ्या अनुसूचिमध्ये शपथ आणि प्रतिज्ञा घेण्याचे नमुने देण्यात आले आहेत. त्यामध्ये असे नमूद करण्यात आलेले नाही की, ईश्वर मला शक्ती देवो, कारण आपला देश विविध जाती धर्माचा विविधतेमध्ये एकात्मतेचा आहे, मग ईश्वर मला शक्ती देवो, अल्ला मला शक्ती देवो, येशू ख्रिस्त मला शक्ती देवो, असेसंविधानात नमूद केले नाही, त्यामुळे असे होऊ शकत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना का स्वीकारली असा माझा पहिला हरकतीचा मुद्दा आहे, घटनेच्या कलम 153,154 आणि 155 यामध्ये धार्मिकतेसाठी पूर्ण संरक्षण देण्यात आले आहे. ही बाब घटनाविरोधी आहे. सर्व देशात हे चालत आहे. घटना निर्माण करणाऱ्याला घटनेचे संरक्षण...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे बोलणे आक्षेपार्ह आहे, हे घटनाविरोधी आहे असे ते म्हणत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी तसे म्हणालो नाही, लक्षवेधी सूचना घटनाबाह्य आहे असे मी म्हणालो आहे. सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आपली सवय पराचा कावळा करण्याची आहे ती माझ्या बाबतीत कधीही करु नका.

**उप सभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक एक नंतर घेण्यात येईल कारण माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांना विधानसभा सभागृहात तातडीने जावयाचे असल्यामुळे त्यांनी मला विनंती केली आहे की, माझी लक्षवेधी सूचना अगोदर चर्चेला घेण्यात यावी. पंरतु सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांची मी वाट पहात होतो. आता या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा मी थांबवितो व लक्षवेधी सूचना क्रमांक पाच चर्चेला घेतो.

----------

**पृ. शी.** : भुदान चळवळीतून मिळालेल्या जमिनीचा व शासकीय जमिनीचा होत असेलला गैरव्यवहार

**मु. शी.** : भुदान चळवळीतून मिळालेल्या जमिनीचा व शासकीय जमिनीचा होत असेलला गैरव्यवहार या संबंधी सर्वश्री माणिकराव ठाकरे, भाई जगताप, हरिसिंग राठोड, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री.रामहरी रुपनवर वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.माणिकराव ठाकरे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"भुदान चळवळीचे जनक विनोबाजी भावे यांनी गोरगरीब शेतकरी, शेतमजूर, दलित, दिनदुबळे यांच्यासाठी यवतमाळ जिल्ह्यात भुदान जमिन संपादित करणे, सदर संपादित केलेली जमिन शासनाच्या ताब्यात देणे, जमिन गोरगरीबांना वाटप न करता अवैध धंदे करणाऱ्या बिल्डरांच्या ताब्यात देणे, सदर जमिनीवर घरे न बांधता सिंचनाच्या धरणाकरीता धरणग्रस्त पुर्नवसित गावांकरीता पुन्हा त्याच जमिनी शासनाच्या ताब्यात देणे, त्यामोबदल्यात शासनाकडून करोडो रुपये वसूल करणे, अधिकारी व बिल्डरांच्या संगनमताने अशाप्रकारे करोडो रुपयांचा गैरव्यवहार होणे, ज्या विनोबा भावे यांनी गोरगरीबाच्या प्रगतीसाठी आयुष्य घालविले आणि देशाच्या स्वातंत्र्यासाठी लढले त्यांच्या या चांगल्या योजनेला अधिकारी व बिल्डरांनी करोडो रुपयांचे घोटाळे करुन अवैधरित्या पैसा कमविल्याचे निदर्शनास येणे, तसेच यवतमाळ शहर व लगतच्या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये शासकीय व वन जमिनी मोठ्या प्रमाणात असणे, त्यावर बिल्डरांनी शासकीय व वन जमिनी अवैधरित्या बळकावून ले-आऊट टाकणे, त्यावरील वृक्ष व गौण खनिज अवैधरित्या नष्ट करुन त्यातही लाखो रुपये कमविणे, सदर जमिनीच्या लगत असलेल्या नैसर्गिक नाले/कालवे बुजवून बेकायदेशीररित्या ले-आऊट टाकून विकणे, सदर प्रकार राजरोसपणे होत असताना त्याकडे अधिकाऱ्यांचे अक्षम्य दुर्लक्ष होणे, तसेच यवतमाळ जिल्ह्यात अनेक कंपन्या स्थापन करणे, या कंपन्यांसाठी दलालांच्यामार्फत शेतकऱ्यांना रोजगाराचे अमिष दाखवून शेतकऱ्यांकडून कमी दराने जमिनी विकत घेणे, यवतमाळ जिल्ह्यातील आदिवासी कुक्कुटपालन सहकारी संस्थेच्या

..5..



VVK/ AKN/ MMP/ 10:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे..

जमिनीवर शासनाचे कोट्यावधीचे कर्ज असताना बनावट दस्तावेज तयार करुन परस्पर अधिकाऱ्यांच्या संगनमताने जमिनीची विल्हेवाट लावून करोडो रुपये कमविणे, यामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात महसूलात नुकसान होणे, याबाबत नागरिकांनी वारंवार तक्रार करुनसुध्दा अद्यापही चौकशी होत नसल्याने नागरिकांत पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, परिणामी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

------

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेमध्ये जे प्रश्न विचारण्यात आले आहेत, त्यामध्ये यवतमाळ जिल्हा व यवतमाळ शहरातील ज्या जमिनी भुदानात शासनाला देण्यात आल्या आहेत. त्या जमिनी शासनाच्या ताब्यात होत्या. त्यावर भोगवटादार क्रमांक 2 म्हणून शेतकऱ्यांची नावे होती. भुदानात शेतकऱ्यांनी ज्या जमिनी दिल्या, तेथे बेंबळा नदीवर बेंबळा प्रकल्प तयार करण्यात आला. त्यासाठी संपादित केलेल्या जमिनी भूदानाच्या आहेत. बिल्डर व काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने या जमिनी परत शासनाला दिल्या व त्यातून करोडो रुपये बिल्डरांनी व काही लोकांनी हस्तगत केले. महसूल विभागाच्या काही जमिनी आहेत तसेच वन विभागाच्या काही जमिनी आहेत त्या पुनर्वसनाच्या कामासाठी शासनाला परत केल्या आहेत. यातून करोडो रुपयांचा अपहार झाला आहे. याबाबत शासन चौकशी करणार आहे काय ? तेथील परिस्थिती काय आहे याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या जमिनी भुदान चळवळीतील असल्या तरी बेंबळा प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी घेण्यात आल्या आहेत. काही जमिनी खाजगी खरेदी करुन घेण्यात आल्या आहेत. काही जमिनी भूसंपादन करुन घेण्यात आल्या आहेत. या जमिनीचा पूर्ण उपयोग पुनर्वसनाच्या कामासाठी करण्यात येणार आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, त्या ठिकाणी जमिनीचा जो गैरव्यवहार होत आहे, त्याबाबत चौकशी व्हावी अशी मागणी वारंवार तेथील जनतेकडून करण्यात आली आहे. तेथील काही लोकांना संरक्षण देण्याची गरज आहे. तेथील भुदानाच्या जमिनी भोगवटदार क्रमांक दोन मध्ये येतात. या जमिनीत अधिकाऱ्यांच्या संगनमताने गैरव्यवहार करण्यात आला आहे. त्या जमिनी पुन्हा शासनाला दिल्या किंवा नाही ते शासनाने सांगावे. जमिनी शासनाला दिल्या असतील तर त्या का दिल्या याबाबत शासन चौकशी करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विनोबाजी भावे यांनी भूदान चळवळ राबविली होती. त्या चळवळीत शेतकऱ्यांनी दान केलेल्या या जमिनी आहेत. त्या ठिकाणी कुळ लागले होते, भोगवटदार क्रमांक दोनच्या त्या जमिनी होत्या. बेंबळा धरणातील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करीत असताना त्यांच्यासाठी जागा शोधावयाची होती. या जमिनी तेथील क्षेत्रात येतात, तेथील शेतकऱ्यांनी

..7..



श्री.एकनाथराव खडसे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या जमिनी पुनर्वसनासाठी मिळाल्या तर त्या घेण्यास आम्ही तयार आहोत, असे सांगितल्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे या जमिनी होत्या त्या जमिनी शासनाने खरेदी करुन विकत घेतल्या. काही लोकांनी खरेदी करण्यास नकार दिल्यामुळे त्या जमिनी भूसंपादन करुन संपादित करण्यात आल्या आहेत. अन्य प्रयोजनासाठी या जमिनींचा वापर करण्यात आला नाही. प्रकल्पग्रस्तांच्या पुर्वसनासाठी या जमिनी वापरण्यात आल्या आहेत. विनोबाजी भावे यांचा उद्देश उदात्त होता. परंतु यातील काही जमीन धरणाखाली गेली आहे. धरणाखाली बुडीत क्षेत्रात जमीन गेली तर या कारणासाठी धरणाचे काम थांबविता येणार नाही. शासनाच्या भूमिकेनुसार या जमिनी प्रकल्पग्रस्तांसाठी घेण्यात आल्या आहेत.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 10:10

श्री. एकनाथराव खडसे..

या प्रकरणी अनियमितता झालेली आहे किंवा दुरुपयोग झालेला आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर या प्रकणी तेथील विभागीय आयुक्तांच्या मार्फत चौकशी करण्यात येईल. हे ग्रामीण भागाचे क्षेत्र आहे. त्या ठिकाणी बिल्डर वैगरे येऊ शकणार नाही. तरीही या संदर्भात चौकशी करण्यात येईल. याप्रकरणी अनियमितता किंवा दुरुपयोग झाल्याचे आढळून आले तर संबंधितावर कारवाई करण्यात येईल.

श्री. हरिभाऊ राठोड : एका उदात्त हेतूने विनोबा भावेंनी भूदान चळवळ सुरु केली होती. या भूदान चळवळीतील यवतमाळ जिल्हयातील 1 लाख 4 हजार एकर जमिनीचे अजून वाटप झ ालेले नाही. माझ्या आजोबांनी 5 एकर जमीन दिली होती ती अजूनही आमच्याच नावे आहे. या भूदान चळवळी अंतर्गत किती जमीन प्राप्त झाली, किती जमिनीचे वाटप करण्यात आले ? अद्यापही अनेक जमीनदारांकडे जमिनी पडून आहेत. माझ्या आजोबांनी दिलेली 5 एकर जमीन एका गरिबाने नाकारली, ती जमीन आमच्याच नावे आहे. ही जमीन गरिबांना का वाटण्यात आली नाही याची चौकशी केली जाईल काय ? या जमिनीच्या संदर्भातील समितीवर नव्याने अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु त्यांनी कोणतेही काम केलेले नाही. पैसे देऊन या जमिनींचे वाटप करण्यात आले अशा तक्रारी आहेत. भूदानाअंतर्गत प्राप्त झालेल्या सर्व जमिनीचे रेकॉर्ड उपलब्ध करण्यात येईल काय, ही जमीन किती आहे, किती जमिनीचे वाटप करण्यात आले, उर्वरित जमिनीचे वाटप करण्यात येणार आहे काय ?

श्री. एकनाथराव खडसे : मूळ प्रश्नाशी या प्रश्नाचा काही संबंध नाही. त्यासाठी सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देण्यात येईल. हा केवळ पुनर्वसनासाठी घेतलेल्या जमिनींचा विषय आहे. त्यामुळे किती जमीन संपादित केली, ती कुणाच्या नावे आहे इत्यादी माहितीसाठी वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देता येईल.

प्रा. जोगेंद्र कवाडे : आदरणीय विनोबा भावे यांनी देशात भूदान चळवळ सुरु केली. देशामध्ये भूमिहीन शेतमजूर आणि भूमिहीन शेतकरी यांचा देशामध्ये उठाव होणार होता. तो उठाव थांबविण्याचा प्रयत्न विनोबाजींनी केला. भूमिहीन शेतकऱ्यांची देशामध्ये क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न होता त्याला शांत करण्यासाठी ही भूदान चळवळ झाली. बेंबळा प्रकल्प असो

..2..

प्रा. जोगेंद्र कवाडे..

किंवा कोणताही प्रकल्प असो. ही जमीन संपादित केलेली आहे. त्यामुळे सहाजिकच महाराष्ट्रामध्ये भूदानामध्ये किती जमीन मिळाली, किती जमिनीचे वाटपन भूमिहीन शेतमजुरांना करण्यात आले, किती जमिनीचे वाटप प्रकल्पग्रस्तांना करण्यात आले, ही जमीन ज्यांना मिळाली नाही त्यांचे पुनर्वसन करण्यात आलेले आहे काय ?

श्री. एकनाथ खडसे : मी मघाशी सांगितले की, हा प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही. जी बेंबळा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी जमीन घेण्यात आली त्याबाबत सन्माननीय सदस्यांचा आक्षेप आहे. ही जमीन बिल्डर्सनी घेतली काय, वन जमिनीचे हस्तांतर झालेले आहे काय, त्या जमिनीचा दुरुपयोग झालेला आहे काय असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेले आहेत. भूदान चळवळ ही केवळ चळवळ नव्हती तर तो यज्ञ होता. या यज्ञामध्ये जमिनीची आहुती द्या, जमीन दान करा असे विनाभाजींचे आवाहन होते. देशभर अशा प्रकारचा यज्ञ, चळवळ सुरु होती. या चळवळीमध्ये किती जमीन प्राप्त झाली, किती जमीन शिल्लक आहे हे आताच सांगणे कठीण आहे. परंतु सन्माननीय सदस्यांचा आग्रहच असेल तर ही माहिती पटलावर ठेवण्याची माझी तयारी आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : यवतमाळ जिल्हा सहकारी कुक्कुट पालन संस्थेची जमीन मॉर्गेज होती. या संस्थेकडे बँकेचे किती कर्ज होते, शासनाचे भागभांडवल किती होते, या जमिनीचे हस्तांतरण कोणत्या कायद्याने करण्यात आले ?

श्री. एकनाराव खडसे :मौजा किन्ही, ता. जि. यवतमाळ येथील कुक्कुटपालन सहकारी संस्थेला देण्यात आलेली जमीन ही आदिवासींची जमीन आहे अशी तक्रार प्राप्त झाली होती. त्याबाबत चौकशी करण्यात आली. या संस्थेला राज्य शासनाचे कोणतेही भागभांडवल देण्यात आले नाही. संस्थेच्या सदस्यांनी स्वत: भागभांडवल उभे केले होते.

श्री. माणिकराव ठाकरे : तेथील वन विभागाच्या जमिनी बिल्डरांनी बळकावलेल्या आहेत. अशा प्रकारे शासनाच्या जमिनी बिल्डरांनी बळकावल्या असतील तर त्याची चौकशी झाली पाहिजे. या संदर्भात विभागीय आयुक्तांची चौकशी करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, मी लक्षवेधी सूचनेमध्ये जेवढे मुद्दे उपस्थितीत केलेले आहेत त्या सर्व मुद्यांची चौकशी करण्यात येईल काय ?

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे : जेवढे आक्षेप या लक्षवेधी सूचनेमध्ये नोंदविलेले आहेत त्या सर्व आक्षेपांची चौकशी विभागीय आयुक्त करतील.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही


MSS/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 10:10

**पृ. शी.** : राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा गांभीर्यपूर्वक दृथकथन करण्याच्या नमुन्यात करण्यात आलेला बदल

**मु. शी.** : राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा गांभीर्यपूर्वक दृथकथन करण्याच्या नमुन्यात करण्यात आलेला बदल या संबंधी सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, भाई जगताप, हेमंत टकले, संजय दत्त वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरू...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ही लक्षवेधी स्वीकारण्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे. विषय घटनाबाह्य असेल तर त्याबाबत कामकाज करता येणार नाही.

श्री. कपिल पाटील : ही लक्षवेधी सूचना सभागृहाची प्रॉपर्टी झालेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. भारतीय संविधानाप्रमाणे काम करण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे. एखादी गोष्ट संविधानाच्या तरतुदीमध्ये बसत नसेल तर ती स्वीकारता कामा नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. जी लक्षवेधी सूचना जाणीवपूर्वक किंवा अनावधानाने आलेली आहे किंवा त्याबाबत कोणी आपल्या लक्षात आणून दिले नसेल तर ते आपल्या लक्षात आणून देणे हे सदस्य म्हणून माझे काम आहे. मी घटना हातामध्ये घेऊन उभा आहे, मला या गोष्टीचे गांभीर्य आहे. ही लक्षवेधी सूचना सभागृहाची प्रापर्टी झालेली आहे असे सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले. ही लक्षवेधी सूचना सभागृहाची प्रॉपर्टी आहे म्हणून मला हे कळले आणि कळले म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो, ते कळले नसते तर प्रश्न नव्हता. या लक्षवेधी सूचनेमध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, "राज्यातील शासकीय कर्मचा-यांना भारतीय संविधानाशी निष्ठा बाळगण्याची शपथ घेणे अथवा तसे गांभीर्यपूर्वक दृढकथन करण्यासंसबंधी तरतूद करण्यासंदर्भात तत्कालीन पॉलिटिकल व सासेशल डिपार्टमेंटच्या क्रमांक 1641/46, दिनांक 15 सप्टेंबर, 1952 च्या आदेशान्वये विहीत करण्यात येणे, या शपथेचा नमुना व त्यासंबंधीची नोंद घेण्याच्या कार्यपध्दतीत बराच कालावधी उलटल्यामुळे याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

...नंतर श्री. भोगले

अस्वाक्षरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ AKN/ MMP/ 10:20

लक्षवेधी सूचना क्रमांक-1..... श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, शपथ कशी घ्यावी हे घटनेमध्ये नमूद केले आहे. सर्वोच्च न्यायालयापासून संसदेच्या सर्वोच्च सदनाचे अध्यक्ष, सभापती, राज्यातील विधानसभा आणि विधानपरिषदेचे अध्यक्ष व सभापती यांच्यासह लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी तसेच निवडणुकीला उभे रहात असताना सामान्य नागरिकाला संविधानाच्या अंतर्गत शपथ कशी घ्यावी हे घटनेमध्ये स्पष्ट म्हटले आहे. शपथेच्या संदर्भात संविधानाने निश्चित स्वरुपात मार्गदर्शन केलेले असून प्रत्येक ठिकाणी हा शब्द आहे. ईश्वर साक्ष शपथ घेतो की असे म्हणावयाचे नसेल तर गांभीर्यपूर्वक शपथ धेतो असे म्हणता येईल. हे या ठिकाणी नमूद केले असेल तर लक्षवेधी सूचनेत म्हटल्याप्रमाणे 'ईश्वर मला सहाय्य करो' या वाक्याबाबत आक्षेप घेणे योग्य नाही.

**उप सभापती** : माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, ही लक्षवेधी सूचना मांडणाऱ्या माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घेऊ.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्यांनी अल्लाह, येशू आदी सगळे देव उभे करायचा प्रयत्न केला आहे......(अडथळा).....माननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे नास्तिक आहेत म्हणजे त्यांनी ते सभागृहाला दाखवून दिले पाहिजे असे आहे का?......(अडथळा).....

**उप सभापती** : मी पुढील लक्षवेधी सूचना पुकारु का, मला हे असह्य होत आहे.

श्री.दिवाकर रावते : देव यांनी उभे करायचे. या संदर्भात घटनेने प्रत्येकाला संरक्षण दिले आहे. प्रत्येकाला आपल्या धर्माचे संरक्षण दिले आहे. देव आहे की नाही, येशू आहे की नाही, अल्लाह आहे की नाही?........

**उप सभापती** : ही लक्षवेधी सूचना मी बाजूला ठेवतो आणि पुढील लक्षवेधी सूचना पुकारतो. सभागृहात कोणी माझे ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नाही. या गोष्टीवर किती वादविवाद करायचा याला मर्यादा आहे. विशेष बैठकीमध्ये 12 लक्षवेधी सूचना चर्चेला घ्यावयाच्या आहेत. या लक्षवेधी सूचनेवर प्रत्येक माननीय सदस्याला स्वत:चे म्हणणे मांडावयाचे आहे.

श्री.दिवाकर रावते : समजून घ्या. मी घटनात्मक विषय मांडतो आहे. माझा मुद्दा ऐकून घ्यायला तयार नसाल तर........

**उप सभापती** : मी आपला मुद्दा ऐकला आहे. जवळजवळ 7 ते 8 मिनिटे झाली आहेत.

...2...

श्री.दिवाकर रावते : मी माझा विषय मांडला आहे. लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि ॲडव्होकेट जनरल यांचे मत घ्यावे. माझा मूळ मुद्दा आहे त्यावर मात करणार असाल तर ठीक आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, शपथेच्या नमुन्यामध्ये सुरुवातीला ईश्वर मला सहाय्य करो, अल्लाह किंवा इतर कोणत्याही देवाचे नाव घेऊन शपथ घेता येते, त्याला ऑब्जेक्शन नाही. परंतु तिसऱ्या अनुसूचीमध्ये कोणतेही वाक्य लिहिलेले नाही, ते शासनाच्या जीआरमध्ये नमूद केलेले आहे. ते वाक्य असे आहे की, "प्रामाणिकपणे आणि नि:पक्षपातीपणे पार पाडताना ईश्वर मला सहाय्य करो." God help me हे वाक्य कुठेही नाही. आपण नीट समजून घ्यावे. ईश्वर, प्रतिज्ञापूर्वक, दृढकथन याबद्दल आमची हरकत नाही. खाली जे वाक्य आहे ते अन कॉन्स्टिट्यूशनल आहे. आपण विरोधी बाकावर असताना अभ्यास करुन येत होता. आता सत्ताधारी बाकावर असल्यामुळे किमान लक्षवेधी सूचना वाचणे आवश्यक होते. शपथेच्या नमुन्यातील अन कॉन्स्टिट्यूशनल वाक्य काढण्यात येईल काय?

डॉ.रणजित पाटील : So help me god असे जीआरमध्ये आहे, ते मला मान्य आहे. So help me god असे सरतेशेवटी लिहिले आहे त्याचे रुपांतर मराठी भाषेत केले गेले. त्यामुळे ही चर्चा सुरु झाली. या सर्व प्रकरणाचा सखोल विचार करुन प्रकरण विधी व न्याय विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवू.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, काल या सभागृहात मराठी भाषेच्या संदर्भात मी चर्चा उपस्थित केली होती. इंग्रजी वाक्याचे मराठी भाषेत रुपांतर केल्यामुळे 'ईश्वर' हा शब्द आला असे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. हा शब्द कुठेही अभिप्रेत नसताना, वाक्य अभिप्रेत नसताना शपथेतून ते काढणे आवश्यक आहे. त्यासाठी विधी व न्याय विभागाच्या परवानगीची गरज नाही. हे वाक्य काढण्यामध्ये शासनाला काय अडचण आहे?

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

...3...

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये स्पष्ट केले आहे की, विधी व न्याय विभागाकडून बाब तपासून घेतली जाईल. त्यामुळे या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा मी थांबवित आहे..... (गोंधळ)....मी तुमचे ऑर्ग्युमेंट ऐकून घेणार नाही........(अडथळा).....मी माझा निर्णय दिला आहे. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना मी सांगू इच्छितो की, पीठासीन अधिकाऱ्यांचे आपण काहीच ऐकणार नाही का? प्रत्येक वेळी आपलाच हट्ट पूर्ण करणार का? ही बाब विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात येईल असे मंत्री महोदयांनी म्हटले आहे. त्यांचे अभिप्राय येऊ द्यावेत.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

**उप सभापती** : ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

--------

...4...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक-2 संबंधी**

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेसंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात उपस्थित असणे आवश्यक आहे, त्यामुळे हेरिटेज इमारतीमधील रहिवाशांच्या या विषयाला न्याय मिळू शकतो. माझी आपल्याला विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित झाल्यानंतर ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी.

श्री.किरण पावसकर : हेरिटेजचा विषय ही धोरणात्मक बाब असल्यामुळे माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये योग्य प्रकारे निवेदन करु शकतील.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्री खालच्या सभागृहातील कामकाजामध्ये व्यस्त आहेत.

श्री.किरण पावसकर : माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्री सभागृहात येणे दुरापास्त असेल तर माननीय राज्यमंत्री उत्तर देतील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विनंती केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात येऊ द्यावे, तरच हा विषय मार्गी लागेल. खालच्या सभागृहात अर्धातास चर्चा सुरु आहे.

**उप सभापती** : माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील तेव्हा ही लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येईल, अन्यथा शेवटी चर्चेला घेण्यात येईल. मी आता पुढील लक्षवेधी सूचना पुकारतो.

----------

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पुणे शहरातील आयटी इंडस्ट्रीकरिता असलेल्या सवलतींचा होत असलेला गैरवापर

**मु. शी.** : पुणे शहरातील आयटी इंडस्ट्रीकरिता असलेल्या सवलतींचा होत असलेला गैरवापर यासंबंधी श्रीमती दिप्ती चवधरी, वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरात आय.टी. (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी) कंपन्यांचा विस्तार झाल्याने अनेक तरूणांना रोजगार उपलब्ध होणे, त्यासाठी महाराष्ट्र शासन तसेच पुणे महानगरपालिका यांच्याकडून आय.टी.कंपन्यांसाठी अनेक सुविधा पुरविणे, परवानग्या देणे, जादा एफ.एस.आय. देणे, अनेक कंपन्यांनी सदर सुविधांचा लाभ घेणे, मात्र प्रत्यक्षात आय.टी.कंपन्यांच्या नावाखाली हॉटेल, मॉल इत्यादींसारखे व्यवसाय उभे होत असणे, यामुळे शासनाचे तसेच पुणे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान थांबविण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3..........

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, हा विषय नगरविकास विभागाशी संबंधित आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिले तरी हरकत नाही. पुणे शहर झपाट्याने वाढत आहे. मी पुणे शहराची महापौर असताना पुणे शहरात आयटी इंडस्ट्रीला प्रोत्साहन देण्यासाठी 2 एफएसआय देण्याचा निर्णय घेतला होता. परिणामी मोठया प्रमाणात आयटी इंडस्ट्रीची वाढ झाली. पुणे शहराची वाढ होत असताना अनेक ठिकाणी आयटी इंडस्ट्रीकरिता असलेल्या सवलती घेऊन सर्रासपणे त्या जागेवर मॉलची उभारणी करणे, रेस्टॉरन्ट उभारुन ती भाड्याने देणे असे प्रकार सुरु आहेत.

नंतर डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी .........

सामान्य माणसाने स्वत:च्या घरात कार्यालय सुरु केल्यास त्यालाही 10 टक्के कर वसूल केला जातो परंतु मोठमोठ्या बांधकाम व्यावसायिकांनी 2 चटई क्षेत्र निर्देशांक लाटून मोठमोठे मॉल्स आणि रेस्टॉरंट बांधले आणि ते भाड्याने दिले आणि नियमाप्रमाणे देय असलेला कर न देता महापालिकेचे आर्थिक नुकसान करण्याचे काम केले. वास्तविक या व्यावसायिकांना आय.टी. क्षेत्रासाठी लागू असलेल्या सवलती दिल्यानंतर दर सहा महिन्यांनी त्याचा आढावा घेतला जातो व त्यानंतर पुन्हा रिन्यू करावे अशा सूचना दिल्या पण तसे होताना दिसत नाही म्हणून शासन या सर्व बाबींची चौकशी करण्याचे आदेश देणार आहे काय, तसेच पुणे शहरात दिवसेंदिवस जागांचे भाव वाढतच आहेत. विशेष करुन हिंजेवाडी येथे आय.टी. इंडस्ट्रीज मोठ्या प्रमाणात असल्याने तेथे इंजिनिअर्स व इतर स्टाफ मोठ्या प्रमाणात आहे. ज्याप्रमाणे बंगलोर शहराला आय.टी. हब म्हणून जाहीर केले त्याच धर्तीवर पुणे शहराला देखील आय.टी. हब म्हणून शासन मान्यता देणार काय ?

डॉ. रणजित पाटील : महोदय, हे खरे आहे की, पुणे शहरात आय.टी. आणि पूरक सेवा म्हणून 20 टक्के सवलती देण्याचा निर्णय घेतला आणि त्यांना तसा एफएसआय वापरण्याची परवानगी दिली. यात प्रामुख्याने 10 सेवांचा अंतर्भाव आहे. मग त्यात बँकिंग, ॲडिशनल व किरकोळ विक्री, दळणवळण, कॉन्फरन्स हॉल अशा या 10 बाबी मिळून हे 20 टक्के प्रमाण मेंटेन केले आहे. त्यासोबतच 50 टक्के अजून ॲडिशनल आणि आय.टी. इनॅबल सर्व्हिसेससाठी आपण देतो. याही पुढे पुन्हा 30 टक्के बँकिंग फायनान्शियल सर्विसेस इ. साठी 1 एफएसआय देतो अशा प्रकारे एकूण 2 इतका एफएसआय मिळतो. सहा महिन्यांनी उद्योग खात्याचे अधिकारी जाऊन या सर्व बाबींचा रिव्ह्यू घेतात आणि अटींचे पालन केले नसेल तर तसे महानगर पालिकेला कळवावे अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार उद्योग विभागामार्फत ज्या एकूण 63 परवानग्या दिल्या त्यापैकी केवळ एक आस्थापना दोषी आढळली आणि त्यानुसार लोहगांव सर्व्हे क्र. 230-अ, ब व क या आस्थापनेला दिलेले इरादा पत्र रद्द करण्यात आले. तसेच त्यांसोबत त्यांचे नकाशेही रद्द केले आणि "बी" व "सी" वरील नकाशेही रद्द करण्यात आले. सन्माननीय सदस्या यांनी सांगितलेली परिस्थिती खरी आहे की केवळ एकच प्रकरण यात दोषी आढळून आले त्यामुळे

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील ........

आार्थिक नुकसान झाले परंतु आणखी उर्वरित 67 प्रकरणांचा आढावा घेऊन जर त्यात महानगर पालिकेचे आर्थिक नुकसान झाले असेल तर त्यानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. तसेच बंगलोर शहराप्रमाणे आपल्या राज्यात सुध्दा पुणे शहराला आपण आय.टी. पंढरी मानतो व त्याबाबतीत सुध्दा मा. मुख्यमंत्र्यांसोबत बसून सकारात्मक विचार करण्यात येईल.

श्रीमती दिप्ती चवधरी : महोदय, जे एक प्रकरण आढळून आले तशी प्रत्येक एरियात अनेक प्रकरणे आढळून येतील या सर्वच आस्थापनांच्या चौकशीचे निदेश शासन देणार काय, तसेच यासंदर्भात बैठक घेऊन पुण्यातील लोक प्रतिनिधींनाही त्या बैठकीचे निमंत्रण देणार काय ?

डॉ. रणजित पाटील : महोदय, होय, यासंबंधी बैठक आयोजित करण्यात येईल व त्या बैठकीसाठी पुणे शहरातील लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात येईल.

---------------------

.........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: 26/11 च्या मुंबई हल्ल्यानंतर सुरक्षेसंबंधीच्या विविध उपाययोजना अद्यापही न करणे

**मु.शी.**: 26/11 च्या मुंबई हल्ल्यानंतर सुरक्षेसंबंधीच्या विविध उपाययोजना अद्यापही न करणे या विषयावर ॲड.अनिल परब, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

-------------

3.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यातील कामगार कल्याण वर्गणीचे दर अद्यापही निश्चित न होणे

**मु.शी.**: राज्यातील कामगार कल्याण वर्गणीचे दर अद्यापही निश्चित न होणे या विषयावर श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना नंतर चर्चेला घेण्यात येईल.

-------------

........5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. भोगले 10:30

**पृ.शी.**: मुंबई-गोवा महामार्गावरील वाढते अपघातांचे प्रमाण लक्षात घेता आवश्यक दुरुस्तीची कामे अद्यापही न होणे

**मु.शी.**: मुंबई-गोवा महामार्गावरील वाढते अपघातांचे प्रमाण लक्षात घेता आवश्यक दुरुस्तीची कामे अद्यापही न होणे या विषयावर ॲड. हुस्नबानू खलिफे, सर्वश्री शरद रणपिसे, अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. हुस्नबानु खलिफे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते व याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करते.

"मुंबई-गोवा या राष्ट्रीय महामार्ग-66 वर मोठ्या प्रमाणात लहान मोठे अपघात होऊन अनेक प्रवासी मृत्युमुखी पडणे व गंभीर जखमी होणे, जखमींपैकी काही प्रवासी कायमचे अपंगत्वाचे जीवन जगत असून या महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम दोन वर्षापासून सुरु असूनही ते काम पूर्ण झालेले नसणे, वाहनाच्या संख्येत दिवसेंदिवस मोठ्याप्रमाणात वाढ होत असल्याने या वाहतुकीसाठी हा महामार्ग अपुरा पडत असणे, प्रवाशांना या महामार्गवर प्रवास करण्यास धोकादायक वाटत असणे, या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण करण्यासाठी कमी पडणारा निधी मंजूर करण्याची आवश्यकता, महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम जलदगतीने करण्यात येऊन ते लवकरात लवकर पूर्ण करण्याची तसेच वाहनचालकांना नियमाचे पालन करण्यास सक्ती करुन त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची असलेली नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. चंद्रकांत पाटील (सार्वजनिक बांधकाम मंत्री (उपक्रम वगळून) :महोदय, निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित करण्यात आलेल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, मुंबई-गोवा महामार्ग दिवसेदिवस मृत्यूचा मार्ग बनत चालला असून या महामार्गावर गेल्या 6 महिन्यात 2800 जणांचे बळी गेले आहेत. मागील वर्षी सुध्दा पुलावरुन एक बस कोसळून 37 जणांना प्राण गमवावे लागले. त्याच मार्गावर कशेळी घाट दिवसेंदिवस खचत चालता असून मंत्री महोदयांनी छापिल उत्तरात मात्र विसंगत स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. या महामार्गावरुन प्रवास करणे अत्यंत धोक्याचे झालेले आहे. मंत्रिमहोदयांना मी विचारु इच्छिते की, रत्नागिरी जिल्ह्यात याच महामार्गावर जे 11 डेथ स्पॉट दिलेले आहेत, त्यांची सुधारणा केव्हा करण्यात येणार आहे, तसेच कशेळी घाटाच्या संदर्भात मध्यंतरीच्या काळात रायगड पत्रकार संघाने दुरुस्ती करण्यासाठी उपोषण केले होते त्याची अद्यापही दुरुस्ती करण्यात आली नाही, ती केव्हा व किती दिवसात करणार आहे ?

श्री. चंद्रकांत पाटील : महोदय, गेली अनेक वर्षे या विषयाला धरुन सभागृहात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना अशा अनेक माध्यमातून चर्चा होत आहे. प्रामुख्याने राष्ट्रीय महामार्ग असल्याने या रस्त्याच्या बाबतीतील मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे. याचे कारण हा राष्ट्रीय महामार्ग असून त्यासाठी केंद्र शासनाकडून निधी येत असतो आणि तो देण्याची केंद्राची तयारी देखील आहे. प्रामुख्याने पनवेल ते इंदापूर या भागावरील काम सुरु झाले. मधल्या टप्प्यात कर्नाळा अभयारण्याच्या ठिकाणी वन विभागाच्या परवानगीची अडचण आली होती पण ती दूर होऊन तसा शेवटचा प्रस्ताव केंद्राकडे पाठविलेला आहे त्यामुळे कर्नाळा अभयारण्याच्या ठिकाणचे काम आता पूर्ण होईल. पनवेल भागात सिडकोची पाईपलाईन बदलण्याची अडचण निर्माण झाली होती तसेच वडखळ नाक्याजवळ मिठागराच्या जमिनीचा विषय होता, हे दोन्ही टप्पे पार करुन आता निधी मिळाला व या भागातील कामास देखील सुरुवात झाली आहे पण त्यासाठी कालावधी लागेल. त्यानंतर पुढे झारपपर्यंतच्या मार्गावर जमीन संपादित करण्याची कार्यवाही सुरु आहे. वेगवेगळ्या राष्ट्रीय महामार्गांची कामे करण्यासाठी निधी मंजूर होतो, निविदा प्रक्रिया पूर्ण होते, कार्यारंभाचे आदेश निघतात पण जमीन संपादनाची कार्यवाही पूर्ण होत नसल्याने कामे अडून राहतात. याचे कारण मागील काळात शासनानेच निर्णय घेतला आहे की, 80 टक्के भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण झाल्याशिवाय काम सुरु करता येणार नाही. कालच आम्ही शिरवळ ते बारामती रस्त्याच्या संदर्भात एक बैठक आयोजित केली होती. तेथे दोन वर्षांपासून जमीन संपादनाचे काम होत नाही. पण

......7



PFK/ AKN/ MMP/ पूर्वी श्री. भोगले 10:30

श्री. चंद्रकांत पाटील .. ..

मुंबई गोवा महामार्गाच्या बाबतीत ही प्रक्रिया सुरु असून संपादनासाठी 2 वर्षांचा काळ लागेल, तोपर्यंत आपल्याला हे काम हाती घेता येणार नाही. तरी देखील या रस्त्यावरील जी 13 अपघात स्थळे आपण निवडलेली आहेत त्या त्या ठिकाणी अपधात झाल्यानंतर काही गोष्टी लक्षात येतात. त्या म्हणजे नशा-पाणी करुन गाडी चालविणे अशी प्रामुख्याने अपघाताची कारणे असतात. अशी 13 ठिकाणे आयडेंटिफाय केली असून त्या भागात अपघात होऊ नये म्हणून कामे करावीत व त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन ही कामे सुरु केली आहेत. त्यातील 8 कामे पूर्ण झाली असून 2 कामे निविदा स्तरावर आहेत, उर्वरित 3 कामे चौपदरीकरण स्तरावर आहेत. इंदापूर ते झारप तसेच रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या भागातील भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत पुढील कामे करता येत नाहीत. तसेच अपघात स्थळांच्या ठिकाणी सूचना फलक लावणे, झाडांची छाटणी करणे, वळणदर्शक फलक लावणे अशी कामे 13 अपघात स्थळांच्या ठिकाणी करण्यात आली त्यापैकी 8 कामे पूर्ण झाली व सदस्यांची इच्छा असल्यास ती वाचतो अन्यथा पटलावर ठेवतो.

यानंतर श्री. भारवि .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आताच मंत्री महोदयांनी सांगितले की, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांची परवानगी मिळत नाही. येथे गेल्या दीड दोन वर्षात खूप चांगल्या प्रकारे कामे सुरू झाली होती. परंतु, 8-10 महिन्यांमध्ये ही कामे बंद पडलेली आहेत. आज कोकणामध्ये जाण्यासाठी भयंकर परिस्थिती आहे. मुंबईहून निघाल्यानंतर वडखळ येथे अडकावयास होते. कर्नाळा येथील कामे देखील बंद पडली आहेत. महाड ते पोलादपूर घाट अत्यंत धोकादायक झाला आहे. येथे काही ठिकाणी रूंदीकरणाची कामे झाली आहेत, तर काही ठप्प आहेत. निधी अभावी ही सर्व कामे बंद पडलेली आहेत. नवी मुंबई येथे विमानतळ करण्यासाठी शेतकऱ्यांना भरपूर मोबदला दिला आहे. देशात कुठल्याही राज्याने दिला नाही एवढा मोबदला शेतकऱ्यांना देण्यात आलेला आहे. तेव्हा येथील शेतकऱ्यांना आपण चांगला मोबदला दिला तर जमीन संपादनाचा प्रश्न देखील सुटू शकेल. तेव्हा तशा प्रकारची कार्यवाही आपण करणार आहात काय ? सदर कामे ही कुठल्या कारणांमुळे बंद पडली आहेत हे मला जाणून घ्यायचे आहे. तसेच कोकणात छोट्या नद्यांवर अनेक पूल आहेत. मागे या पुलावरून एस.टी.कोसळून अनेकजण मृत पावले होते. आज कोकणात अशा प्रकारचे अपघात खूप मोठ्या प्रमाणावर होत आहेत. कोकणातील पूल हे 80 ते 100 वर्षांचे जुने आहेत. ते कधीही कोसळतील अशा स्थितीत आहेत. तेव्हा येथील पुलांचे बांधकाम आपण तातडीने करणार आहात काय व सुरू असलेले बांधकाम बंद होण्याचे कारण काय आहे तसेच वडखळ नाका येथे ट्रॅफिक जाम होत आहे, त्याबाबत तातडीने उपाययोजना करण्यात येणार आहे काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी आपल्याला सांगितले आहे की, पनवेल ते इंदापूर पर्यंतच्या रस्त्याच्या कामाचे अंदारजपत्रक देखील निघाले होते. या कामासाठी निधी मिळाला होता. कार्यारंभ आदेश देऊन काम देखील सुरू झले होते. केंद्राच्या परवानगीचा प्रश्न कर्नाळा येथे आला. त्यानंतर सिडको पाईप लाईनचा विषय आला. वडखळ येथे मिठागराचा विषय आला. आम्ही विरोधी बाकावर असताना सरकारला अडचणीत आण्ण्यासाठी प्रश्न विचारत होतो. पर्याय नसलेल्या गोष्टींना वेळ लागतो आहे. भूसंपादनासाठी अधिक निधी देण्यात यावा अशा

श्री.चंद्रकांत पाटील...

प्रकारची मागणी करण्यात आली आहे. केद्राच्या नवीन नियमाप्रमाणे भूमिसंपादनासाठी सव्वा दोन टक्के रक्कम देण्याची तरतूद देखील करण्यात आली नियमांच्या अधीन राहूनच आपण भूसंपादन करू शकतो. त्यामुळे मी मघाशी म्हटले की, या तीन जिल्ह्यांमध्ये भूसंपादनाची कार्यवाही सुरू झालेली आहे. पण यासाठी देखील टप्पे आहेत. सर्व प्रथम नोटीस द्यावी लागते. त्यानंतर मग उत्तर मागविले जाते. दरम्यानच्या काळात एक जण कोर्टात जातो. यात जेवढे काही करता येईल तेवढे आपण करीत आहोत. पनवेल-महाड-पणजी या राष्ट्रीय महामार्ग क्र. 66 वर 13 कामे ही गुणवत्ता सुधारणेची असून ती आपण हाती घेतली आहेत. ही कामे होतील तेव्हा होतील. पनवेल ते इंदापूर आणि इंदापूर ते झाराप या सर्व भागांमध्ये भूसंपादनाच्या अडचणी खूप आहेत.

श्री.जयंत प्र,पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांनी अत्यंत महत्त्वपूर्ण असा प्रश्न विचारलेला आहे. पण तो प्रश्न त्यांनी लांबविला. माझे यात प्रामुख्याने तीनच प्रश्न आहेत. निवडणुकीपूर्वी या रस्त्याचे काम केंद्र शासनाने मोठ्या धडाक्यात केले होते. ते आज स्लो का झालेले आहे ? निवडणुकीपूर्वी पाच ठिकाणी काम सुरू करण्यात आले होते. गणेश चतुर्थीच्या वेळी पनवेल ते वडखळ नाक्यावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात येते. तशाच पद्धतीचे ट्राफिक हा रस्ता पूर्ण होई पर्यंत ठेवण्यात येणार आहे काय ? आपण 80 टक्के भूसपांदन झाल्यानंतर काम घेण्यात येईल असे सांगितले आहे. माझी अशी मागणी आहे की, 100 टक्के भूसंपादन झाल्यानंतर कामाला सुरूवात करावी. माझी अशी सूचना आहे की, 20 टक्के जमीन ही कंत्राटदार घेतो व त्यासाठी एक्स्ट्रा क्लेम देखील केला जातो. तेव्हा 100 टक्के भूसंपादन झाल्याशिवाय टेंडर न काढण्याचे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ? मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देतो की, इंदापूर ते पळस्पे या मार्गाचे काम सुरू आहे. त्या रस्त्याच्या दुरूस्तीचे काम देखील कंत्राटदाराने करावयाचे आहे. असे असताना देखील खराब झालेल्या रस्त्याचे 10 टक्के काम तो कंत्राटदार करीत नाही. यासंबंधी मी गेल्याच आठवड्यामध्ये प्रश्न विचारला होता. त्यासंबंधी राज्य शासन कारवाई करणार आहे काय व संबंधित ठेकेदाराचा समावेश राज्य शासन काळ्या यादीत करणार आहे काय ?

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, वडखळ नाक्याजवळ वाहतुकीची कोंडी होते असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. गणपतीच्या वेळी जशी व्यवस्था करण्यात येते तशी व्यवस्था आपल्याला पुढे देखील सुरू ठेवता येईल काय असा देखील सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या विषयी मी तातडीने लक्ष घालतो. येथे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी 100 टक्के जमिनीचे भूसंपादन झाल्यानंतर रस्त्याच्या कामाला सुरूवात करावी अशा प्रकारची सूचना केली आहे. असे जर केले तर कुठल्याच रस्त्याचे काम होणार नाही. आपण कामाला सुरूवात केली तर थोडे प्रेशर तरी राहते. भूसंपादनामुळे, एस्टीमेटमुळे सर्व कामे प्रलंबित आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी 80 टक्के मोबदल्याचा विषय उपस्थित केला आहे. अनेक ठिकाणी कंत्राटदार कामे घेतात. ते काम वेगवेगळ्या कारणांमुळे कसे काय रखडेल हे बघतात जेणे करून त्याला एस्टीमेट वाढवून मिळते. कालच माननीय श्री.अजितदादा पवार यांच्या आग्रहामुळे शिरवळ ते बारामती रस्त्याच्या कामकाजासंबंधी बैठक घेण्यात आली. मूळ काम 384 कोटी रूपयांचे होते. हे काम दोन वर्षापासून भूसंपादनामुळे ढेपाळले आहे. आता त्या कंत्राटदाला 250 कोटी रूपये वाढवून पाहिजे आहेत. या गोष्टींचा आपण सगळ्यांनी विचार केला नाही तर मग प्रश्न विचारले जातील, त्याला उत्तरे दिली जातील. त्यामुळे यातील मूळ अडचण कोणती आहे हे समजून घेतले पाहिजे असे मला वाटते.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माझे तीन प्रश्न आहेत. वडखळ येथील रस्ता कंत्राटदाराला कधी देण्यात आला होता, अद्यापि रस्ता आहे त्याच स्थितीत आहे. त्यामुळे ट्रॅफिक जाम होते. त्यामुळे सदर रस्त्याचे काम कधी देण्यात आले होते व ते काम कंत्राटदाराने का केले नाही व त्याने काम पूर्ण केले नसल्यामुळे त्याच्या विरूद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे असे माझे प्रश्न आहेत. केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांनी संगमेश्वर ते झाराप या चार पदरी मार्गाच्या कामाचे उद्‌घाटन केले आहे. हा रस्ता सिमेंट क्रॉंकीटचा होणार आहे. सदर रस्त्याचे काम कधी पूर्ण होणार आहे तसेच संगमेश्वर ते इंदापूर या रस्त्याचे काम कधी पूर्ण होणार आहे ? त्यापुढील रस्त्याचे काम हे होणारच आहे. या मार्गावर ब्रिटीशांनी पूल बांधले असून त्याला 100 वर्षे पूर्ण झाली आहेत. हे पूल अरूंद असल्यामुळे तेथे अपघात होतात. या पुलाची दुरूस्ती करून आपण कोकणच्या जनतेला न्याय देणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. पनवेल ते झाराप या मार्गाची वेगळी चर्चा होऊ शकते. या रस्त्याचे काम पूर्ण का होत नाही असा मुद्दा सन्माननीय सदस्यांचा आहे. हा राष्ट्रीय महामार्ग आहे. त्यामुळे या कंत्राटदाराविरुद्ध आपण कोणतीही कारवाई करू शकत नाही. आपण केंद्र शासनाकडे फक्त पाठपुरावा करू शकतो. आता त्या कंत्राटदाराविरुद्ध आपण 20 कोटी रुपयांची दंडात्मक कारवाई करीत आहोत. या महामार्गावर राज्य शासनाने ज्या ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या आपण करीत आहोत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, हा दोन राज्यांना जोडणारा रस्ता आहे. यासंबंधी सभागृहात अनेक वेळा प्रश्न आलेले आहेत. अपघात झाला की, आपण प्रश्न उपस्थित करतो आणि मग त्याच्यावर आम्हाला उत्तर मिळते. गणेश चतुर्थी आल्यावर गणपतीचे दिवस संपेपर्यंत तरी तेथे उपाययोजना करण्यात यावी अशा प्रकारची मागणी सभागृहात करण्यात येते. हा प्रश्न मागील 4-5 वर्षांपासून मांडला जात आहे. या रस्त्याचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण करीत आहे. केंद्र शासनाचे जे नियम आपल्याला लागू आहेत तेच नियम गोवा राज्याला देखील लागू आहेत. दोन मंत्री आणि मी एकत्रपणे गाडीत प्रवास करीत होतो. त्यांनी मला विचारले की, बॉर्डर कुठ पर्यंत आली आहे. मी त्यांना सांगितले की, बॉर्डर आपल्याला विचारावी लागणार नाही. ते आपल्याला आपोआपच कळणार आहे. आम्ही गोवा एअरपोर्टवरून व्यवस्थित आलो. सांगावे देखील लागले नाही. जेव्हा गाडी भरपूर हलायला लागली तेव्हा सांगितले की, आता महाराष्ट्र राज्याची हद्द सुरू झाली. गोवा शासन त्यांच्या बॉर्डरपर्यंत चांगला रस्ता ठेवू शकत असेल तर मग आपल्याला अडचण कुठे येते ? आपल्या पेक्षा जास्त पाऊस गोव्यामध्ये पडतो. त्यांच्यावर कधीही खड्डे बुजविण्याची पाळी आली नाही. मी सातत्याने 20 वर्षापासून त्या मार्गावर जात आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ......

गोवा सरकारची असलेली रोडची क्वॉलीटी आणि आपल्या रोडच्या क्वॉलीटीमध्ये जमीन अस्मानचे अंतर आहे. गोवा ते पात्रादेवी पर्यंतचे रोड चांगले आहेत परंतु त्यापुढे सर्व रस्ता खराब आहे. गोव्याला जे प्राधिकरण काम करते तेच प्राधिकरण आपल्याकडे सुध्दा काम करीत आहे. असे असताना महाराष्ट्र राज्याला रस्त्याच्या संदर्भात एवढया अडचण्ी का येत आहेत ? आपल्याला ज्या प्रकारे वन जमिनींची परवानगी घ्यावी लागते तशीच परवानगी गोवा राज्याला सुध्दा घ्यावी लागते. पनवेल ते इंदापूर चे काम ज्या ठेकेदाराला दिले आहे त्याच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये काही तरी असेल. बांधा, वापरा व हस्तांतर करा अशी बाब असेल तर पनवेल ते इंदापूर चे काम ज्या ठेकेदाराला दिले आहे ते काम तो किती वर्षात पूर्ण करणार आहे ? सदर ठेकेदाराने ज्या कालावधीत काम पूर्ण करावयास पाहिजे ते काम त्या कालावधीत त्याने पूर्ण केले नसेल तर त्याचे कॉन्ट्रॅक्ट आपण का कॅन्सल करीत नाही ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, इंदापूर ते झारप 366 रोडचे काम हे सार्वजनिक बांधकाम खात्याकडे असून पावसाळयात डांबरीकरण व खड्डे भरण्यात आलेले आहे. माझे म्हणणे एवढेच आहे की, गोवा राज्य त्यांच्या बॉर्डर पर्यंत रस्ता चांगला ठेवत असेल तर त्यांचे अनुकरण केंद्राची परवानगी घेऊन करणार आहात काय ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी राजकीय उत्तर देणार नाही. परंतु आधीच्या सरकारने या रस्त्याच्या संदर्भात अनेक बैठका घेतल्या असताना सुध्दा हा प्रश्न मार्गी लागला नव्हता. माननीय श्री. सुनील तटकरे हे रायगड जिल्हयाचे पालक मंत्री असताना त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली होती, माननीय उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक झाली होती, माननीय नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखालीही बैठक झाली होती. राष्ट्रीय महामार्ग ज्यांच्या अंतर्गत येतो ते माननीय केंद्रीय मंत्री श्री. नितीनजी गडकरी साहेबांच्या अध्यक्षतेखाली 12 डिसेंबर, 2014 रोजी रत्नागिरी येथे बैठक झाली होती तसेच माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस व माननीय केंद्रीय मंत्री श्री. अंनत गिते साहेबांच्या अध्यक्षतेखालीही या विषयाच्या संदर्भात बैठक घेण्यात आली होती. या बैठकांमध्ये हा विषय अधिकाधिक कसा गतीमान करता येईल याबाबतच चर्चा झालेली आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील मर्यादा सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्याव्यात एवढी विनंती आहे.

----

**पृ. शी.** :बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तसेच सीआरझेड नियमावलीमध्ये वेळोवेळी सुधारणा केल्यामुळे मुंबई शहरातील चाळी व इमारती तसेच म्हाडाच्या उपकर प्राप्त इमारतीचा पुनर्विकास करणे अशक्य होणे.

**मु. शी.** : बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तसेच सीआरझेड नियमावलीमध्ये वेळोवेळी सुधारणा केल्यामुळे मुंबई शहरातील चाळी व इमारती तसेच म्हाडाच्या उपकर प्राप्त इमारतीचा पुनर्विकास करणे अशक्य होणे यासंबंधी श्री. नरेंद्र पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहरातील सन १९४० पूर्वी बांधण्यात आलेल्या चाळी व इमारती तसेच म्हाडाच्या उपकर प्राप्त चाळी व इमारतींचे पुनर्विकास करणे या करिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मध्ये कलम ३३(६), ३३(७) व ३३(९) अंतर्भूत करणे, शासनामार्फत वेळोवेळी सुधारणा करणे, सी.आर.झेड अंतर्गत येणाऱ्या इमारतींचा पुनर्विकास करण्याकरिता केंद्र शासनामार्फत सी.आर.झेड नियमावली मध्ये सुधारणा करणे, मुंबई महानगरपालिकेच्या अ, ब, क व ड प्रभागांमध्ये असलेल्या या मोडकळीस आलेल्या बहुसंख्य इमारतींमध्ये काही शासकीय कार्यालयांचा सुध्दा समावेश असणे, या प्रभागांमधील बहुसंख्य क्षेत्र हेरीटेज क्षेत्र म्हणून घोषित करण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने शासनास प्रस्ताव सादर केलेला असणे, सदरहू प्रस्तावामुळे पुनर्विकासित इमारतींच्या उंची व इतर बाबींवर निर्बंध आल्यामुळे विकासकास अथवा रहिवाशांना पुनर्विकास करणे अशक्य असणे, मुंबई शहरातील अनेक इमारतींना महानगरपालिकेने धोकादायक इमारती म्हणून घोषित करणे, परंतु यातील रहिवाशांची वा शासकीय कार्यालयांची इतरत्र कोठेही पर्यायी व्यवस्था करण्यात न येणे, परिणामी त्यांना जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींमध्येच जीविताला धोका पत्करुन नाईलाजाने रहावे अथवा काम करावे लागणे, यामुळे विकास नियंत्रण नियमावली, १९९१ चे कलम ६७ मध्ये योग्य सुधारणा करुन कलम ३३(७), ३३(९) व ३३(१०) अंतर्गत येणारे पुनर्विकास प्रस्ताव हेरीटेज नियमावलीतून वगळणेबाबत त्या परिसरातील रहिवासी व कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी शासनाकडे अनेकदा निवेदने सादर करुनही त्याप्रकरणी कार्यवाही करण्यात येत असलेली टाळाटाळ व दुर्लक्ष, परिणामी शासनाप्रती रहिवाशांच्या तसेच शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मनात निर्माण झालेला असंतोष तसेच भिती व असुरक्षिततेची भावना, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

डॉ. रणजित पाटील ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मुंबईतील हिस्टॉरिकलचा फार महत्वाचा मुद्दा मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे. लक्षवेधी सूचनेचे उत्तर वाचले तर आपल्याला दिसून येईल की, कायद्याच्या चौकटीमध्ये वेगवेगळे कलम दिल्यानंतरच समाधान करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबईला हिस्टॉरिकलचा दर्जा देण्याचे काम काही वर्षापूर्वी झाले असून हिस्टॉरिकलचे काही नियम ठरविण्यात आलेले आहेत. मुंबईमध्ये हिस्टॉरिकलच्या गोष्टी जाहीर होत असतांना मग त्या गोष्टी इंग्रजांच्या काळातील असतील किंवा नावाजलेल्या किल्ल्यांचे वर्णन इतिहासात असेल त्यांचा असेल. हिस्टॉरिकलचे संरक्षण आपल्या सर्वांनी केले पाहिजे या विषयी मी सहमत आहे. परंतु काही रहिवाशांच्या इमारतींचा समावेश हिस्टॉरिकलमध्ये करण्यात आलेला आहे. काही कार्यालये हिस्टॉरिकलमध्ये आले असून तेथे आता धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. हिस्टॉरिकलच्या नावाखाली पुनर्बांधणी किंवा उंची वाढविता येत नाही. त्यामुळे हा विभाग हिस्टॉरिकलच्या नावाखाली या ठिकाणच्या जनतेला छळतो की, काय असे प्रश्न या ठिकाणी निर्माण झालेले आहेत. हेरिटेजच्या संदर्भात माझा पहिला प्रश्न असा आहे की, मुंबई सारख्या शहरात हेरिटेज म्हणून डिक्लेअर केलेल्या इमारती आहेत व त्यामध्ये जे रहिवाशी राहत आहेत त्यासंदर्भात शासनाने जो काही निकष ठरवलेला आहे तो निकष आपण बदलणार आहात काय, यासंदर्भात एफएसआयचा जो निकष ठरवण्यात आलेला आहे त्यामध्ये बदल केला जाणार आहे काय ? आपण एसआरए योजनेत काही निकष लावले असून त्यातील काही निकष आपण बदलले आहेत. म्हणून एसआरए योजनेत जे निकष लावले आहेत तसेच निकष हेरिटेजच्या इमारतीमध्ये जे रहिवाशी राहतात त्या ठिकाणी हे निकष बदलले जाणार आहेत काय ? मुंबईमध्ये रहिवाशांची सुरक्षा पाहण्याचे काम महानगरपालिकेचे तसेच राज्य सरकारचे आहे. त्यामुळे ज्या इमारती हेरिटेज म्हणून डिक्लेअर झालेल्या आहेत त्या इमारतीमधील रहिवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी शासनाने घेण्याची आवश्यकता आहे. जे लोक हेरिटेजच्या समितीवर आहेत त्या समितीवर लोकप्रतिनिधी, नगरसेवकांचा समावेश करण्यात आलेला आहे काय ? जे प्रतिनिधी या समितीवर आहेत, त्या प्रतिनिधींचे हेरिटेजच्या संदर्भात काही योगदान आहे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मुंबईतील हेरिटेजच्या संदर्भात गेल्या अनेक दिवसापासून चर्चा सुरु आहे. वेगवेगळया प्रकारचे जे रि-डेव्हलपमेंट आहे त्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ......

रि-डेव्हलपमेंटवर खूप मोठया प्रमाणात हेरिटेजमुळे बंधने आलेली आहेत. अनेक मोडकळीला आलेल्या इमारती आहेत परंतु त्या केवळ हेरिटेजमध्ये आल्यामुळे त्यांचे रि-डेव्हलपमेंट होऊ शकत नसल्यामुळे त्या ठिकाणच्या नागरिकांमध्ये मोठया प्रमाणात रोष आहे. हेरिटेज कमिटीने काम करीत असतांना दोन गोष्टी केलेल्या आहेत. काही एरिया हेरिटेज म्हणून घोषित केले होते. त्यासोबत 948 प्रॉपर्टीजला हेरिटेज प्रॉपर्टीज म्हणून घोषित करण्यात आले होते. यामुळे त्या ठिकाणी डेव्हलपमेंटचा खूप मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. हेरिटेजचे जे प्रीसिंक्ट आहेत त्यासंदर्भात आपण काही गाईडलाईन्स तयार करण्याची आवश्यकता आहे. हेरिटेजच्या प्रत्येक प्रिसेंटमधील प्रत्येक केस हेरिटेज कमिटीकडे गेली तर हेरिटेज कमिटी त्या विषयाला वेळ देऊ न शकल्यामुळे या ठिकाणचा सर्व विकास थांबेल. त्यामुळे हेरिटेजच्या संदर्भात तातडीने गाईडलाईन्स तयार करण्याची आवश्यकता आहे. हेरिटेज प्रीसिंक्ट असेल किंवा ग्रेड थ्री हेरिटेज असेल यासंदर्भात रि-डेव्हलपमेंटची कार्यवाही करण्याचे अधिकार महानगरपालिकेलाच देण्यात यावेत व त्यांनीच त्या गाईडलाईन्सच्या अधीन राहून मान्यता द्यावी व गाईड लाईन्स करतांना रि- डेव्हलपमेंटमध्ये जे काही निकष समाविष्ट आहेत त्या निकषांची पूर्तता करण्याची आवश्यकता आहे. समजा आपण हाईट रिस्ट्रक्शन्स ठेवले, एफएसआयचे रिस्ट्रीक्शन ठेवले तर रि-डेव्हलपमेंट होऊच शकणार नाही. त्यामुळे हा एरिया रि-डेव्हलपमेंट होऊ शकेल अशा प्रकारच्या गाईडलाईन्स तातडीने तयार करण्यास सांगण्यात आलेले आहे. आमचा प्रयत्न असा राहणार आहे की, कोणत्याही परिस्थितीत 31 जानेवारी, 2015 पूर्वी गाईडलाईन्स तयार झाल्याच पाहिजेत. या गाईडलाईन्स महानगरपालिकेला मिळाल्यानंतर महानगरपालिकेला मान्यता देतांना त्यातील अडचणी दूर करता येतील.

सभापती महोदय, 948 वास्तू हेरिटेज यादीमध्ये दाखवण्यात आलेल्या आहेत. खरे म्हणजे एवढया 948 वास्तूंची आवश्यकता आहे काय ?अनेक ठिकाणी असे लक्षात येते की, जे ग्रेड थ्री मध्ये असावयास पाहिजे होते ते ग्रेड 2 मध्ये टाकलेले आहेत. जे ग्रेड टू मध्ये टाकावयास पाहिजे होते ते ग्रेड 1 मध्ये टाकले आहे. या विषयाच्या संदर्भात सर्व आक्षेप नोंदवून घेण्यात आलेले आहेत. यासंदर्भात श्री. अफझलपूरकर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती तयार करण्यात आली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस ......

असून त्यांना सांगण्यात आले आहे की, या विषयाच्या संदर्भात तातडीने सुनावणी करुन यादी योग्य कशी करता येईल, कमीतकमी कशी करता येईल हे पहावे. ही यादी अकारण मोठी करण्यात आलेली आहे असे निदर्शनास आलेले आहे. याठिकाणच्या बऱ्याच प्रॉपर्टीज ग्रेड थ्री मध्ये टाकता येऊ शकतात. त्यामुळे या विषयाच्या संदर्भातील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. अफझलपूरकर समितीने काही प्रीसिंक्टच्या संदर्भात शासनाकडे प्लॅन सबमिट केले होते व त्यातील चेंबूरच्या एका प्लॅनच्या संदर्भात शासनाने याच महिन्यात म्हणजे दि. 5/12/2014 रोजी मान्यता देखील दिलेली आहे. या कामास थोडा वेळ लागत आहे परंतु हे काम तातडीने कसे होईल यासंदर्भात आदेश दिले असून या विषयाच्या समितीला रि-डेव्हलपमेंट थांबवू नये असे सांगितले आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात अफझलपूरकर समितीला ए,बी,सी,डी आणि इ चे रि-डेव्हलपमेंटचे वॉर्ड आहेत, ज्या ठिकाणी रि-डेव्हलपमेंटची सर्वात जास्त मागणी आहे अशा ठिकाणी किमान संपूर्ण योजना गाईडलाईन्ससहित 31 मार्च पर्यंत दिलीच पाहिजे अशा प्रकारचे आदेश देण्यात येतील.

यानंतर श्री. अजित........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस...

उर्वरित कामे दोन महिन्यात केली पाहिजेत अशाप्रकारच्या सूचनाही त्यांना देण्यात येतील. 31 जानेवारीपर्यंत गाईड लाईन्स तयार करुन त्याबाबत महानगरपालिकेला अधिकार देऊन प्रिसिंक्ट आणि ग्रेड-3 संदर्भातील जे काही मुद्दे झाले असतील ते पूर्ण करणे, इतर प्रॉपर्टीची संख्या कमी करणे, ही संख्या कमी केल्यानंतर अ, ब, क, ड आणि ई प्रभाग 31 मार्चपर्यंत पूर्ण निकाली काढणे अशा प्रकारचा कार्यक्रम सरकारने तयार केलेला आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय,मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आपण काल या ठिकाणी जे निवेदन केले त्याचा देखील आपणास उपयोग होईल. माझा प्रश्न आहे की, हेरिटेज संवर्धन समिती कशासाठी स्थापन केलेली आहे ? आपण या समितीचा बागुलबुवा करुन ठेवला आहे. छत्रपती शिवाजी टर्मिनस स्टेशन,ा मुंबई महानगरपालिकेची इमारत या इमारती हेरिटेज म्हणून समजू शकतो. पण सायन, चेंबूर व वरळी येथे किल्ला आहे म्हणून तो परिसर हेरिटेज म्हणून घोषित करता. आपण किल्ल्याचे जतन करु शकलो नाही परंतु तेथील परिसर हेरिटेज म्हणून घोषित केला आहे. माझा प्रश्न आहे की, या हेरिटेज समितीचे निकष काय आहेत, ती समिती किती कालावधीकरिता गठीत झालेली आहे ? निवेदनात नमूद केलेले आहे की, जनतेकडून हरकती व सूचना मागवून त्या विचारात घ्यावयाच्या आहेत. शिवाजी पार्कसाठी अफझलपूरकर समितीने काम केले. मी या सदनामध्ये सांगू इच्छितो की, आपण एज्युकेटेड माणसे पाहिजेत म्हणून वयाने जास्त असलेली माणसे त्या समितीवर घेतली आहेत. पण जनतेसमोर ज्युनिअर आर्किटेक्ट जात आहेत. ते घरोघरी फिरुन माहिती घेत आहेत. आपण जशी जनगणना करतो त्याप्रमाणे ते प्रत्येकाच्या घरी जाऊन लोकांची मते जाणून घेत आहेत आणि त्या मतांच्या आधारे समिती निर्णय घेत आहे. माझी शासनाला विनंती आहे की, शासनाने हेरिटेज समितीवर काही नियंत्रण आणले पाहिजे. मुंबई शहरात काही अशा इमारती आहेत की, त्या केव्हाही कोसळतील. त्या ठिकाणी काही मुनष्यहानी झाली तर ती जबाबदारी हेरिटेज समितीवर टाकणार काय , किंवा ती समिती ही जबाबदारी घेणार आहे काय ? मुंबई हे सात बेटांचे शहर असल्यामुळे जागा सीमित आहे. त्यामुळे आपणास उंचीवर जावे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

लागणार आहे. हेरिटेज समितीचे निकष आहेत की, 24 मीटरपेक्षा जास्त उंचीची इमारत, तळ मजल्यावरील स्टील्ट वगळता अनुज्ञेय आहे. मुंबई शहरात ते प्रॅक्टीकल आहे काय ? हेरिटेजचे बोर्ड लागल्यानंतर त्या ठिकाणी उंची वाढविण्यास परवानगी देणार नसाल तर तेथे विकासकाने पुनर्विकास कसा करायचा ? जुन्या इमारती हेरिटेज म्हणून घोषित करुन तेथे पुनर्विकास करु द्यायचा नाही. म्हणजे आपण भाडेकरुंना त्रास देत आहात, पुनर्विकास करणाऱ्याला त्रास देत आहात. माझा प्रश्न आहे की, हेरिटेज समितीला काही कालावधी देणार काय ? मुंबई महानगरपालिकेने असे काही प्रस्ताव पाठविले आहेत. पण त्यावर शासनास निर्णय घ्यावयाचा आहे. हे निर्णय जनतेच्या हिताचे आणि हेरिटेज समिती सांगते म्हणून घेऊ नयेत. माझे प्रश्न आहेत की, हेरिटेज समितीचे निकष काय आहेत, पुनर्विकासाला खीळ बसण्यासाठी हेरिटेज समितीची स्थापना केली आहे का, या संदर्भातील निर्णय शासन तातडीने घेईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, दिनांक 19 जुलै, 2012 च्या शासन निर्णयानुसार हेरिटेज समिती स्थापन झालेली आहे. या समितीचा कालावधी तीन वर्षे आहे. माजी मुख्य सचिव श्री.रंगनाथन या समितीचे अध्यक्ष आहेत. या समितीमध्ये शासनाचे मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, संचालक, प्रिन्स ऑफ म्युझियम, पर्यावरण विभागाचे अधिकारी अशांचा समावेश आहे. त्या व्यतिरिक्त या समितीमध्ये काही खाजगी सभासद देखील आहेत जसे की, जे.जे स्कूल ऑफ आर्टचे प्रिन्सिपल, व्ही.जे.टी.आय.चे. एचओडी. आयआयटी पवई,स्ट्रक्चरल विभागाचे एचओडी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या समितीवर लोकप्रतिनिधी नाहीत. ही समिती पूर्णपणे ऑफीशिअल आहे. या समितीचे काम अतिशय संथ गतीने सुरु आहे. हेरिटेज म्हणून पूर्ण एरिया घोषित केल्यामुळे मोठा वाद निर्माण झालेला आहे. या संदर्भात मी अभ्यास केला असता माझ्या असे लक्षात आले की, आपण या संदर्भात तातडीने गाईड लाईन्स तयार करुन त्या महानगरपालिकेला दिल्या पाहिजेत. गाईड लाईन्स तयार करण्याचे काम हेरिटेज समिती करीत नाही. त्यासाठी अफझलपूरकर समिती नेमलेली आहे. शासनामार्फत हेरिटेज





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस...

समिती गठीत करण्यात आली आहे. हेरिटेज समितीने जे अडथळे निर्माण करुन ठेवले आहेत ते कशाप्रकारे दूर करता येतील आणि हेरिटेज सांभाळून योग्य शाश्वत विकास कसा करता येईल यासाठी ती समिती गठीत केली आहे. या समितीने चेंबूर विभागाचा दिलेला आराखडा अतिशय चांगला आहे.शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे चेंबूर भागातील प्रश्न सुटत आहेत. पण त्यामध्ये काही हेरिटेज प्रॉपर्टीचे प्रश्न शिल्लक आहेत. त्याकरिता आपाणास पुन्हा नवीन गाईड लाईन्स तयार कराव्या लागतील. आपण कितीही घाई केली तरी त्यासाठी प्रोसेस करावी लागते. हिअरींग घेऊन त्यावर निर्णय द्यावा लागतो. अ, ब, क, ड आणि ई या वॉर्डमध्ये सर्वात जास्त हेरिटेज प्रॉपर्टीज आहेत आणि त्यामुळे पुनर्विकास थांबलेला आहे. तीन महिन्यात तेथील प्रश्न सोडवावेत अशी मी संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. कारण तेथील मेजर प्रश्न सुटतील. आपण हेरिटेजमध्ये खूप रिस्ट्रक्शन टाकले तर त्या भागात पुनर्विकास होणार नाही. आता अस्तित्वात असलेले पुनर्विकासाचे कायदे किंवा आपण ज्या सूट दिलेल्या आहेत त्या त्यांना लागू केल्या पहिजेत आणि तसा शासनाचा मानस आहे. आपण त्यातून मार्ग काढण्याची विनंती केलेली आहे.

सभापती महोदय, जगामध्ये हेरिटेजचा कायदा आहे. काही युरोपियन देशांमध्ये 700-800 वर्षापूर्वीची बांधकामे आहेत. इमारतीच्या मुख्य दर्शनी भागाला कोणत्याही प्रकाचा धक्का न लावता आतमध्ये फेरफार करण्यास तेथे परवानगी दिली जाते. आपण ग्रेड-1 म्हणत नाही, आपण छत्रपती शिवाजी टर्मिनस स्टेशनमध्ये बदल करा असे म्हणत नाही. जगाने हेरिटेज बाबत जे स्वीकारले आहे ते आपण नाकारण्याचे कारण नाही. रिडेव्हपमेंटला फ्रेन्डली पण त्यासोबत हेरिटेज स्ट्रक्चर वाचविण्याच्या दृष्टीने सरकार तातडीने निर्णय घेईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपण हेरिटेज भागात काही सवलत दिल्याशिवाय त्या भागामध्ये विकास होऊ शकत नाही. साऊथ मुंबईमध्ये टीडीआर घेण्यास बंदी आहे. पण मुंबईमध्ये हेरिटेज भागात मोडकळीस आलेल्या चाळी आहेत, त्या ठिकाणी हेरिटेजचा दर्जा असल्यामुळे पुनर्विकास होऊ शकत नाही. माझा प्रश्न आहे की, अशा ठिकाणी शासन पुनर्विकास करण्यासाठी आणि उंची वाढविण्यासाठी परवानगी द्यायला सांगणार आहे काय ?

..4..



AJIT/ AKN/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.जुन्नरे... 11:00

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण टीडीआर संदर्भात साऊथ टू नॉथ असा कन्सेप्ट मांडलेला आहे. जे मूळ शहर आहे ते शहर विकसित करता येत नाही म्हणून तेथे जो टीडीआर जनरेट होतो, जो अनयुज्ड एफ.एस.आय. आहे तो नॉर्थला वापरायचा असे त्याचे तत्व आहे. आपण एकूण एफ.एस.आय.च्या तत्वाचा विचार केला तर मूळ जमीन तेवढीच ठेवून इकडचा भाग तिकडे वापरता आला पाहिजे असे त्याचे तत्व आहे. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जी सूचना मांडलेली आहे ती तपासून त्यावर उचित निर्णय घेण्यात येईल. आपण हेरिटेजमधील आर्किटेक्चरल फीचरमध्ये फार बदल न करता त्यामध्ये अधिकची उंची पाहिजे असेल, तर ती देता येईल अशाप्रकारचे आदेश अनुज्ञेय करीत आहोत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

अफझलपूरकर समिती ही मूळात महानगरपालिकेने स्थापन केलेली आहे. त्यामुळे त्यांना सांगून तातडीने या संदर्भातील कार्यवाही पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या प्रकरणी तातडीने निर्णय घ्यायला लावणार असल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. त्यांनी असेही सांगितले की, अशा प्रकरणांच्या आड सुनावणी वगैरे अनेक गोष्टी येण्याची शक्यता असल्यामुळे या अनुषंगाने कार्यवाही करण्यास काही कालावधी लागणार आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, नाशिक येथील त्र्यंबकेश्वर मंदिरावर झाड उगवले आहे. ते झाड तोडण्याची स्थानिक प्रशासनाला परवानगी नाही. त्यामुळे कार्यवाही करण्यास दिरंगाई होते. महोदय, ही लक्षवेधी सूचना विचारण्याचा उद्देश आहे की, जीवित आणि वित्तीय हानी होता कामा नये. त्यामुळे त्र्यंबकेश्वर मंदिरावरील झाड वेळीच काढले नाही तर दरम्यानच्या काळात त्या भागात जीवित आणि वित्तीय हानी होण्याची शक्यता आहे. सभापती महोदय, मी विचारु इच्छितो की, या सर्व गोष्टी टाळण्यासाठी आपण शासनाला काही निदेश देणार काय ?

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या लक्षवेधी सूचनेवर सविस्तरपणे उत्तर दिल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, हेरिटेज समितीच्या काही सदस्यांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर जर त्यास शासन किंवा महापालिका ओव्हररुल करीत असेल तर, काही एनजीओंना हाताशी धरुन ही प्रकरणे न्यायालयात पाठविली जातात आणि न्यायालयाकडून पुनर्विकासास आळा बसतो. त्यामुळे अशा प्रकरणी शासनाची भूमिका काय राहणार आहे ? हेरिटेज समिती ही महापालिकेने केलेली आहे. ती समिती शासनाला सूचना देते व त्या अनुषंगाने शासन निर्णय घेते. एकीकडे शासन निर्णय घेत असताना दुसऱ्या बाजूला एनजीओ न्यायालयात जातात. त्यामुळे पुनर्विकासाचे प्रश्न प्रलंबित राहतात. त्यामुळे शासन या बाबतीत ठोस काय कार्यवाही करणार आहे ?

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, शासनाने तातडीने निर्णय घेतले आणि ते उच्च न्यायालयाच्या निदर्शनास प्रभावीपणे आणून दिले तर मला वाटते उच्च न्यायालय सुध्दा त्यास उचित प्रतिसाद देईल. त्यामुळे मी सांगू इच्छितो की, अशा प्रकरणी जलद गतीने निर्णय घेण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.देवेंद्र फडणवीस....

येतील. निर्णय घेतल्यानंतर एखादी पीआयएल दाखल झाली तर त्या बाबतीत शासनाकडून प्रभावीपणे आणि ठामपणे भूमिका मांडण्यात येईल. जेणेकरुन यामध्ये विलंब होणार नाही.

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सर्व चर्चा ऐकल्यानंतर मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास पुढील बाब आणून देतो. मी ठाणे येथे राहतो. त्या भागात सुध्दा अशा काही गोष्टी घडलेल्यो आहेत. उदाहरणार्थ त्या भागात प्रभाकरराव हेगडे यांचा बंगला आहे. हा बंगला सुध्दा आश्चर्यकारकरित्या हेरिटेज प्रॉपर्टीमध्ये टाकला आहे. हा बंगला कोठे आहे हे आपल्या लक्षात आले असेल. या प्रकरणी मी स्वत: लक्ष घातले आहे. मला वाटते राज्य सरकारने या बाबतीत गांभीर्याने लक्ष घातले आहे. हा उपक्रम नक्कीच स्तुत्य आहे.

हा प्रश्न गुंतागुंतीचा वाटत असला तरी राज्य शासनाने या संदर्भात गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. यामध्ये मुंबई शहरातील अत्यंत जुन्या व धोकादायक इमारतींमधील भाडेकरुंच्या जीविताचा प्रश्न असल्याने शासनाने अशा इमारतींचा पुनर्विकास हेरिटेज नियमावलीतून वगळण्याबाबत एमआरटीपी कायद्यांतर्गत आपले अधिकार वापरुन महानगरपालिकेला योग्य ते निर्देश द्यावेत, अशी माझी स्वत:ची धारणा आहे. तसेच मुंबई महानगरपालिकेने दिनांक 31 जुलै, 2012 रोजी काही इमारती व स्थळे ऐतिहासिक वारसा म्हणून घोषित करण्याबाबत अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे. मात्र या अधिसूचनेविरुध्द सर्वसामान्य नागरिकांच्या मनामध्ये मोठा असंतोष असल्यामुळे या अधिसूचनेचा शासनाने फेरविचार करावा आणि अशा प्रकारच्या असंतोषाला व नाराजीच्या भावनेच्या उद्रेकाला आळा घालण्यासाठी भविष्यकाळात हेरिटेज संवर्धन समितीमध्ये राज्य शासनाने पुरातत्त्व विभागाचे प्रतिनिधी, महाराष्ट्राच्या इतिहासाचे जाणकार व तज्ज्ञ सदस्यांची नियुक्ती करण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री या प्रश्नाला प्रांजळपणे न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण समजता तितके हे सोपे नाही. मी वॉर्ड क्रमांक ई, सी, व डी विभागाचा आमदार राहिलो आहे. त्या कालखंडात आम्ही पाच वर्षे सातत्याने एकच गोष्ट लावून धरली होती. त्या भागात मोठे इमले बांधू नका, पण चाळीत राहणारी माणसे आपला जीव मुठीत धरुन राहत असल्यामुळे त्या प्रकरणी नेमके काय करणार,

..3..



SJB/ AKN/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 11:10

अशी आमची त्यामागील भावना होती. त्या भागातील थिएटर, टॉवर यामध्ये काय झाले हे मला माहीत नाही. त्यामुळे या प्रकरणी कार्यवाही करीत असताना आपण सर्व गोष्टी बघितल्या पाहिजेत. पावसाळ्यात याच भागात जास्तीत जास्त इमारती कोलॅप्स होतात. हेरिटेजमुळे प्रचंड अडचणी व अडथळे येत आहेत. चेंबूर भागातील हेरिटेजच्या बाबतीत काही गाईडलाईन शासनाने तयार केली असून त्यातून बरेच प्रश्न निकाली निघाल्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. परंतु चेंबूर आणि दक्षिण मुंबई हे दोन वेगळे विषय आहेत. मी पूर्णत: दक्षिण मुंबईच्या बाबतीत विचारतो. कारण त्या ठिकाणी सर्वात जास्त हेरिटेज बाधित भाग आहे. त्यामुळे दक्षिण मुंबई किंवा शिवाजी पार्कच्या ठिकाणी राहणाऱ्या मध्यमवर्गीय किंवा चाळीतील लोकांना न्याय देण्यासाठी चेंबूरच्या पार्श्वभूमीवर गाईडलाईन देऊन व त्या अनुषंगाने टाईमबाऊंड कार्यक्रम आखून त्यानुसार त्या भागाचा विकास करण्यात येईल काय ? महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, युरोपीयन देशात हेरिटेज वास्तूच्याय मुख्य दर्शनी भागाला अडथळा न आणता त्या वास्तूचा विकास केला जातो. परंतु हा नियम चाळींच्या बाबतीत मुळीच लावता येणार नाही. कारण चाळीच्या ठिकाणी पूर्वी वाड्या होत्या. मग ती गायवाडी असेल, खेतवाडी असेल. त्या वाड्यांची मोठी अडचणी निर्माण होते. त्यामुळे सरकारला स्वत:ची गाईडलाईन तयार करावी लागेल. त्यानंतर त्या गाईडलानचा समावेश कायदा व डी.सी. रूलमध्ये केला तरच ही प्रकरणे न्यायालयात टिकतील. नाही तर मालक या कामी स्टे मिळवतील. म्हणून मी स्पेसिफिक विचारतो की, या अनुषंगाने वेगळी गाईडलाईन तयार करण्यात येईल काय ?

श्री.देवेंद्र फडणवीस : उप सभापती महोदय, आपण स्वत: या संदर्भात काही निदेश दिलेले आहेत. मी सांगू इच्छितो की, या अनुषंगाने जे योग्य फेरबदल करण्याची आवश्यकता आहे ते जरूर करण्यात येतील.

महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने सांगतो की, अफझलपूरकर समितीला प्रामुख्याने दक्षिण मुंबईच्या संदर्भात गाईडलाईन तयार करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. आपले म्हणणे खरे आहे की, हेरिटेजच्या बाबतीत जास्त प्रॉपर्टी दक्षिण मुंबईमध्ये आहे. त्यामुळेच हा पुनर्विकास अडकलेला. त्यांना दिलेल्या गाईडलाईनप्रमाणे दिनांक 31 मार्च, 2015 पूर्वी ए ते ई वार्ड येथील ज्या हेरिटेज प्रॉपर्टी यादीतून

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वगळण्याची आवश्यकता आहे त्या वगळल्या पाहिजेत. काही ठिकाणी हेरिटेजचा ग्रेड बदलण्याची गरज असेल तर तो सुध्दा बदलावा. उदाहरणार्थ 1 असलेला ग्रेड 2 करणे आणि 2 असलेला ग्रेड 3 करणे होय. यासाठी पुनर्विकास नियंत्रण नियमावलीतील 33 (6), 33 (7), 33 (8), 33 (9) या बाबतीत पुनर्विकासासाठी परवानगी देणाऱ्या गाईडलाईन त्यांनी तयार करुन द्यावयाच्या आहेत. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत त्या दोन्ही गोष्टी त्यामध्ये कव्हर करणार आहोत.. समितीने दिनांक 31 मार्च पर्यंत सर्व काम संपवावे असे अपेक्षित होते. परंतु या बाबतीत माहिती घेतली असता त्यांनी सांगितले की, हे काम मोठ्या प्रमाणावरील असल्यामुळे त्यासाठी किमान सहा महिने लागतील. त्यामुळे ज्या भागात पुनर्विकासाची जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत, त्या ठिकाणी फर्स्ट फेजमध्ये काम करावे अशी प्रायोयरिटी ठरवून दिली आहे. त्यामुळे त्यांना दिनांक 31 मार्च पर्यंत हे काम करण्यास सांगितले आहे. त्यामुळे हा प्रश्न निकाली निघेल. युरोपीयन देशातील हेरिटेज वास्तूच्या दर्शनी भागाचे मी केवळ उदाहरण म्हणून सांगितले होते. त्या देशात हेरिटेजच्या ग्रेड-1 प्रॉपर्टी बाबत सुध्दा असेच होते. परंतु आपण ग्रेड-1 प्रॉपर्टीला हात लावत नाही. शासनाचे मत आहे की, हेरिटेज प्रोटेक्ट केले पाहिजे. पण हे करीत असताना वस्तुनिष्ठ प्रकारच्या प्रोटेक्शनचे कायदे तयार केले तर त्यातून योग्य विकास करु शकू आणि हेरिटेज सुध्दा नीट ठेवू शकू. अशाच प्रकारचा निर्णय राज्य सरकार घेणार आहे. तसेच दुसरी बाब अशी की, महापालिकेने हेरिटेज प्रॉपर्टीच्या बाबतीत जी यादी तयार केली आहे ती अंतिम नाही. अफझलपूरकर समितीच्या माध्यमातून या प्रकरणी कार्यवाही झाल्यानंतर 948 वास्तूंचा समावेश असलेली यादी कमी होईल असा मला विश्वास आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबईमध्ये अनेक ब्रिटिशकालीन वास्तू आहेत. उदाहरणार्थ छत्रपती शिवाजी टर्मिनस, महात्मा फुले मंडई, मुंबई महानगरपालिकेची इमारत, एस्प्लेनेड कोर्ट, गेटवे ऑफ इंडिया अशा अनेक वास्तू आहेत. महोदय, मुंबईतील गिरण्या बंद झाल्या असून त्या ठिकाणी केवळ भोंगे ठेवले आहेत.

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ....

अंधेरीच्या पूर्वेला महाकाली गुंफा आहे. ती गुंफा अतिशय सुंदर असून तो देशाचा ऐतिहासिक ठेवा आहे. आपण तो जपून ठेवला पाहिजे. परंतु, त्या संपूर्ण गुंफेवर सर्वत्र मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. हे महापालिकेच्या संमतीने झाले आहे. महापालिकेने याकडे पुर्णपणे दुर्लक्ष केले आहे. ऐतिहासिक वास्तुचे कुठेतरी काहीतरी थोडेसे शिल्लक राहिले की त्या वास्तूला तसेच ठेवायचे, ते डेव्हलप करू नका, असे सांगायचे चुकीचे आहे. कारण ते कधीही कोसळेल आणि त्यामध्ये लोक मरण पावतील. माझा प्रश्न असा आहे की, अंधेरी पूर्वेला असणाऱ्या महाकाली गुंफेवर अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. त्यामुळे आपण संबंधित महापलिकेवर कारवाई करणार का ?

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सदर बाब आताच माझ्या लक्षात आणून देण्यात आली आहे. माझ्याकडेग त्या संदर्भातील पूर्ण माहिती उपलब्ध नाही. ही बाब तपासून घेण्यात येईल. सदर बाब तपासून घेताना, कुठेही काही नियमबाह्य कार्यवाही झाली असल्याचे आढळले तर संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुंबई शहराच्या दृष्टीकोनातून अत्यंत महत्तवाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. हेरिटेज बिल्डिंगच्या स्ट्रक्चरच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर सकारात्मक आहे. त्यांची या संदर्भातील भूमिका सकारात्मक आहे. प्रत्येकाचे वेगवेगळे प्रश्न, प्रत्येक वेळी वेगवेगळी भूमिका असते. माननीय मुख्यमंत्री बाहेरच्या देशात जाऊन आले आहेत, त्यांना सुध्दा या संदर्भात माहीत आहे. सदर बाबतीत काही तज्ज्ञांना किंवा लोकप्रतिनिधींना घेऊन वेगळी पॉलिसी किंवा तशा प्रकारचा ढाचा तयार केला तर वारंवार हा प्रश्न उपस्थित होणार नाही. मुंबई शहरात अनेक इमारती कारण नसताना विकासाशिवाय थांबवून ठेवल्या आहेत. चाळींचे उदाहरण आहे. अशा अनेक गोष्टी आहेत, ज्या भविष्यात हेरिटेज म्हणून उपयोगाच्या नाहीत, अशा इमारतींच्या संदर्भातील विकास थांबला आहे. सदर बाबतीत एक बैठक बोलावून निर्णय घेतला तर योग्य राहील. माननीय मुख्यमंत्र्यांकडून या संदर्भात बैठक बोलाविण्यात येईल का ?

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सदर बाबतीत जवळपास सर्व निर्णय आपण घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी बैठकीच्या संदर्भात सांगितले आहे. मला वाटते की, अगोदर अहवाल येऊ द्यावा. एकदा आपला अहवाल आल्यानंतर त्या संदर्भात बैठक घेऊन निर्णय घेण्याची आवश्यकता असेल तर निश्चित बैठक आयोजित करण्यात येईल. अहवाल येण्याअगोदर बैठक घेऊन त्यामध्ये फार काही करता येणार नाही, असे मला वाटते. अहवाल आल्यानंतर अशा बैठकीची मागणी मान्य करण्यात येईल.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी मांडलेल्या मुद्याप्रमाणेच वाळकेश्वर येथील बाणगंगेचा मुद्दा आहे. तेथे देखील असाच प्रकार आहे. परशुरामाने बाण मारला आणि तेथून पाण्याचा उगम झाला, त्याही बाणगंगा परिसरात अशा प्रकारच्या झोपडपट्ट्या वाढत आहेत. आपण याची खबरदारी घ्यावी. आपण या लक्षवेधी सूचनेला चांगला न्याय दिला. मुंबापुरीमध्ये सर्व हेरिटेजमध्ये राहणाऱ्या रहिवाशांतर्फे मी आपले मनापासून आभार मानतो. आपण सदैव अशा गोरगरीब लोकांच्या पाठीशी उभे रहावे, एवढेच मी आपल्याला नम्र विनंती करतो.

----

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : जिल्हा औरंगाबाद येथील वैजापूर तालुक्यातील बंद असलेली श्रीरामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना शासनाने ताब्यात घेणे आवश्यक असणे.

**मु.शी.** : जिल्हा औरंगाबाद येथील वैजापूर तालुक्यातील बंद असलेली श्रीरामकृष्ण गोदावरी उपसा जलसिंचन योजना शासनाने ताब्यात घेणे आवश्यक असणे यासंबंधी श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वैजापूर तालुक्यातील (जि.औरंगाबाद) श्रीरामकृष्ण गोदावरी सहकारी उपसा जलसिंचन योजना ही सहकारी कायद्यानुसार नोंदणीकृत संस्था असून 14 गावांच्या शेतीसाठी पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने सन 1987 मध्ये स्थापन झालेली असणे, 2117 सभासद असलेल्या या योजनेचे लाभक्षेत्र 16000 एकरचे असून संस्था उभारणी काळात औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने 35 कोटी रुपये कर्ज सभासदांना देऊन योजना कार्यान्वित करणे, सदर योजना जेमतेम सन 1991-1995 व सन 1998-2000 या काळातच कार्यान्वित राहणे, वेळोवेळी येणाऱ्या अडचणींमुळे योजना सन 2000 साली बंद होणे, या योजनेवर 164 कोटीचे कर्ज झाले असून सभासद शेतकऱ्यांच्या जमिनीवर प्रती एकर एक लक्ष रूपये कर्ज होणे, त्यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत आलेले असणे, या संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांची कर्जे माफ करुन ही योजना शासनाने ताब्यात घेण्याची आवश्यकता, तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामार्फत योजना चालविल्यास 16000 एकर जमीन पुन्हा ओलिताखाली येऊन सिंचन करण्यास व 25 गावासह वैजापूर शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागेल, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..4

श्री. विजय शिवतारे (जलसंपदा व जलसंधारण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(निवेदनानंतर)

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर व गंगापूर येथील 14 गावांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. 16 हजार एकर जमीन ओलिताखाली आली होती. सन 1995 ला ही योजना बंद पडली. 16 हजार एकर जमिनीला या योजनेचा फायदा मिळतो. वैजापूर शहराच्या पिण्याचा पाण्याचा प्रश्न या योजनेमुळे सुटू शकेल. दरवर्षी उन्हाळ्यात नाशिक जिल्ह्यातून पाणी येते. माझा प्रश्न असा आहे की, आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यामुळे शासनाने ताब्यात घेतल्या आहेत अशा किती योजना आहेत आणि ही योजना शासन ताब्यात घेणार आहे का ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, शासनाने ताब्यात घेतलेल्या अशा किती योजना आहेत, याबद्दलची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. एक निश्चित आहे की, ही योजना ताब्यात घेण्यासाठी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने एक प्रस्ताव दिला होता. सन 1986-87 मध्ये 34.75 कोटी एवढे कर्ज घेतले होते. सदर योजना विद्युत देयके न भरणे, पाण्याची उपलब्धता या सर्व प्रकारांमुळे बंद पडत होती. लोकांनी पाणीपट्टी भरलेली नव्हती. त्यामुळे पुन्हा योजनेच्या कर्जाचे पुनर्नियोजन देखील करण्यात आले. 65 कोटी रूपयांची योजना होती. त्यावेळी ती मान्य करण्यात येऊन सन 2000 च्या दरम्यान ती सुरू करण्यात आली. परंतु, पुन्हा थकीत वीज बिल, या सर्व प्रकारामुळे ही योजना बंद पडली. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 14 गावांचा पाणीपुरवठा या योजनेमुळे होत आहे. ही योजना बेसिकली 14 गावांच्या 16 हजार एकर सिंचनासाठीची व्यवस्था म्हणून होती. यामध्ये पाणीपुरवठ्याचा समावेश नव्हता. सदर बाबतीतील पाणीपुरवठ्याच्या संदर्भात माननीय जलसंपदा मंत्री यांच्याकडे दिनांक 05.08.2014 रोजी बैठक घेण्यात आली होती. त्या बैठकीमध्ये माननीय जलसंपदा मंत्र्यांनी स्पष्ट सांगितले होते की, पाणीपुरवठ्यासाठी ही योजना चालवावी, असे आपले ईप्सित असेल तर माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांच्या माध्यमातून ही बाब मंत्रिमंडळासमोर यावी. सदर योजना सरकारने ताब्यात घ्यावी आणि गोदावरी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे द्यावी असा प्रस्ताव त्यांनी दिला होता परंतु, योजनेची सध्याची किंमत आणि आता असलेले कर्ज या प्रकारामुळे ही योजना किफायतशीर नाही, अशा प्रकारचा निर्णय त्यावेळी झ ाला होता. आदरणीय मुख्यमंत्र्यांकडे पुन्हा त्यांनी तशा प्रकारची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय शिवतारे ....

विनंती केली होती. नोव्हेंबर, 2014 च्या दरम्यान माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील श्रीरामकृष्ण गोदावरी उपसा सिंचन योजना, वैजापुर ही गोदावरी खोरे महामंडळाकडे वर्ग करणे शक्य नाही, असे उत्तर देखील दिले होते.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे सन 1994-95, सन 1995-96 मध्ये या योजनेद्वारे साधारणत: 1887 एकर जमिनीवर सिंचन झाले आहे. ही गोष्ट मान्य आहे. परंतु, सर्वात महत्त्वाचा भाग आहे की, ज्या भागात ही योजना आहे, तो अतिशय दुष्काळी भाग आहे. त्या दुष्काळी भागातील लोकांना न्याय देण्याच्या हेतूने त्यावेळी ही उपसा जलसिंचन योजना उभी करण्यात आली होती. परंतु, लाईट बिल न भरणे यामुळे त्याचे गणित जुळत नाही. त्यामुळे ती योजना फेल गेली, असा प्रकार नाही. केवळ लाईट बिल न देऊ शकल्यामुळे ती योजना सध्या बंद आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात दिले आहे की, सदरील योजनेची सद्य:स्थिती लक्षात घेता योजना शासनाकडे वर्ग करून घेणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नाही. अनेक वर्षांपासून वापरात नसलेली ती योजना असून ती उपयोगी नाही, असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. मराठवाड्यात मागासलेला भाग आहे. मराठवाड्यातील मागासलेल्या भागातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने त्यावेळी उभारण्यात आलेली सिंचन योजना ती होती. मोठ्या प्रमाणात दुष्काळ होता, त्यावेळी पश्चिम महाराष्ट्र व उत्तर महाराष्ट्र येथील काही योजनांमध्ये राज्य शासनाने त्याची विद्युत देयके टंचाईच्या निधीतून दिली आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील दोन योजना राज्य सरकारने ताब्यात देखील घेतल्या आहेत. सभापती महोदय, त्या 2 योजना ताब्यात घेतल्या नाहीत तर ताब्यात दिल्या आहेत. आम्ही वर्तमानपत्रात सातत्याने वाचत आहोत. परवाच वर्तमानपत्रात वाचले की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, विदर्भाच्या संदर्भात अनेक निर्णय करीत आहोत. आमच्या मनात काही क्लेष नाही. पण मराठवाड्याच्या संदर्भात हा दुजाभाव का येत आहे ? उत्तर महाराष्ट्रात मुक्ताईनगरमधील एका योजनेचे विद्युत देयक भरले. मग या योजनेच्या संदर्भात आपण सकारात्मक निर्णय घेण्यासाठी का कमी पडत आहात ? माननीय मंत्र्यांना माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, एकदम निर्णयाला येण्याऐवजी दुष्काळी भागातील योजनांच्या अजून

..7



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित ....

काही नेमक्या अडचणी आहेत का हे जाणून घेण्याच्या हेतूने शेतकऱ्यांच्या एका प्रतिनिधी मंडळाला औरंगबादच्या विश्रामगृहावर येऊन त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यातून मार्ग काढण्यासाठी आपण सकारात्मक प्रयत्न करणार आहात का ?

श्री. विजय शिवतारे : सभापती महोदय, या योजनेचे संपूर्ण आरेखन खाजगीरित्या केले होते. योजनेची आजची थकीत बाकी आहे. सद्य:स्थितीत योजनेचे पंप चालतात की नाही, हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. बाकीच्या दुरूस्तीमध्ये किती खर्च होईल हे सांगता येत नाही. त्यांचे 65 कोटी रूपयांचे मुद्दल मागितले आहे, ते देणे आणि पुन्हा ती योजना कार्यान्वित करणे यासाठी अतिरिक्त खर्च आहे, या दृष्टीने ती योजना किफायतशीर होत नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे.......

ही योजना जायकवाडी धरणाच्या बॅक वॉटरवर कायगावटोका येथे आहे. जायकवाडीची परिस्थिती आपल्याला सर्वांना माहीत आहे. एवढा निधी देऊन देखील ती योजना कशी चालवायची, पाण्याची उपलब्धता होणार की नाही, असा हा सर्व प्रश्न आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले, ते खरे आहे. पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळग्रस्त भागात टंचाई निवारण कार्यक्रमांअंतर्गत विजेची बिले भरण्यात आली होती. ही योजना देखील कार्यान्वीत असती आणि या योजनेचे वीज बिल थकित असते तर ते भरण्याचे काम सरकारने केले असते. त्यामध्ये काही अडचण आली नसती. परंतु, ही योजना सन 2000 पासून पूर्णपणे बंद आहे. या योजनेच्या देखभाल व दुरूस्ती, कार्यान्वियन यासाठी साधारणपणे 65 कोटी रुपयांची आवश्यकता आहे. त्यामुळे ही योजना शासनाने घेणे किफायतशीर नाही.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी बैठकीची मागणी केली आहे. ती आपण मान्य करावी.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे एक बैठक घेऊ व योजनेची प्रत्यक्ष पहाणी देखील करता येईल.

--------------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्पाच्या जमीन भूसंपादन

**मु. शी.** :निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्पाच्या जमीन भूसंपादन यासंबंधी श्री.पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"खामगांव जि.बुलडाणा येथील निमकवळा शिवारात ज्ञानगंगा नदीवर निम्न ज्ञानगंगा लघु प्रकल्प नावाचे छोटे धरण बांधण्यात येणे, या धरणासाठी निमकवळा, काळेगांव, दिवठाणा व वर्णा येथील शेतकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली असून आतापर्यंत प्रकल्पासाठी बाधित क्षेत्रापैकी १२७ हेक्टर जमीन पाटबंधारे विभागाने सरळ खरेदी करुन संपादित केलेली असणे, या प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या ४ गावांपैकी ३ गावांतील शेतजमीनी बाजारभावाप्रमाणे (सुमारे १० लाख रूपये) सरळ खरेदी व्यवहाराने संपादित करण्यात येणे, दिवठाणा येथील शेतकऱ्यांना शेतजमीनीचे भूसंपादन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजूरी देवूनही अद्यापर्यन्त या गावांतील शेतजमीन शासनाने संपादित न करणे, या गावांतील शेतजमीनीचे संपादन जुन्या भूसंपादन कायद्याप्रमाणे संपादित करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे सादर केल्यामुळे या गावांतील भूसंपादनाची प्रक्रिया बंद असल्यामुळे प्रकल्पाचे कामही बंद असणे, तरी या प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देवून मौजे दिवठाणा या गावांतील शेतजमीन बाजारभावाप्रमाणे सरळ खरेदी करण्याबाबत शासनाने मंजूरी दिलेल्या आदेशाची त्वरीत अंमलबजावणी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका." "

श्री.विजय शिवतारे (जलसंपदा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

...3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------------

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील निम्न ज्ञानगंगा-2, बृहत लघु पाटबंधारे प्रकल्पाला सन 2010 मध्ये सुरु झाली आहे. तसेच, या प्रकल्पाचा समावेश वेगवर्धीत सिंचन लाभ योजनेमध्ये (अे.आय.बी.पी.) करण्यात आला आहे. साधारणपणे 3 गावातील जमिनी या प्रकल्पासाठी संपादित करण्यात आल्या आहेत. परंतु, दोन गावे अशी आहेत की, त्या गावातील शेतकऱ्यांनी त्यांच्या जमिनी सरळ खरेदी पध्दतीने संपादित कराव्यात, अशी मागणी केलेली आहे. ही मागणी अद्याप पूर्ण झाली नसल्यामुळे प्रकल्पाचे काम रखडलेले आहे. जोपर्यंत भूसंपादन होत नाही तोपर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकणार नाही. हा प्रकल्प अे.आय.बी.पी. अंतर्गत असल्यामुळे नियोजित वेळेत या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले पाहिजे, अशी अट आहे.

सभापती महोदय, लक्षवेधीच्या निवेदनात असे नमूद केले आहे की, भूसंपादनाअभावी प्रकल्पाचे कामात अडथळा येऊ नये, यासाठी उर्वरीत जमिनीचे भूसंपादन, भूसंपादन अधिनियमांतर्गत करता यावे, यासाठी भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले आहेत." माझा प्रश्न असा आहे की, हे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाला कधी सादर करण्यात आले आहेत, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या प्रस्तावांना कधी पर्यंत मान्यता दिली जाणार आहे, शासन स्तरावर प्रलंबित असलेल्या सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीच्या प्रस्तावांना कधी पर्यंत मान्यता मिळणार आहे, या प्रकल्पासाठी किती निधी उपलब्ध आहे आणि शेतकऱ्यांच्या जमिनी कधीपर्यंत संपादित केल्या जाणार आहेत ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले, ते खरे आहे. सरळ खरेदी पध्दतीने जमीन संपादित करण्याबाबतचे आश्वासन शेतकऱ्यांना देण्यात आले होते.

सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, केंद्र शासनाने भूसंपादन व पुनर्वसन हा नवीन कायदा सन 2013 मध्ये मंजूर केला आहे. या कायद्यान्वये जमिनीचा मोबदला मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. आता शेतकऱ्यांना रेडिरेकनर दराच्या चार पट मोबदला देण्याचे प्रस्तावित झाले आहे. या प्रकल्पातील शेतकऱ्यांनी पूर्वी सरळ खरेदी पध्दतीने जमिनी संपादित कराव्यात व

...5....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय शिवतारे...........

मोबदला द्यावा, अशा प्रकारची विनंती केली होती, हेही खरे आहे. परंतु, हा नवीन कायदा आल्यानंतर या सर्व जमिनी नवीन कायद्यानुसार संपादित कराव्यात, अशा प्रकारची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

सभापती महोदय, शासन राजपत्र दिनांक 13/08/2014 रोजी प्राप्त झाल्यामुळे सरळ खरेदी पध्दतीने या जमिनी संपादित करता आल्या नाहीत. नवीन भूसंपादन व पुनर्वसन कायद्याप्रमाणे अंतिम मोबदला देण्याचे आदेश राजपत्र दिनांक 13/08/2014 रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे सरळ पध्दतीने या जमिनी संपादित करता येत नाहीत. भूसंपादनाची पुढील कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रश्न देखील विचारला आहे. त्याबाबत मी तारीखवार माहिती देतो. दिनांक 21/11/2012 रोजी महामंडळाकडून राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांना प्रस्ताव सादर झाला होता. दिनांक 29/4/2013 रोजी समितीकडून शेरेपूर्ततेसाठी प्रस्ताव परत आला होता. दिनांक 22/08/2013 रोजी प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाकडून समितीला फेरसादर झाला. दिनांक 11/10/2013 रोजी समितीकडून शेरापूर्ततेसाठी पुन्हा पाठविण्यात आला. दिनांक 22/11/2013 रोजी मंडळ कार्यालयाकडून शेरेपूर्ततेनंतर प्रस्ताव प्रादेशिक कार्यालयाला सादर झाला. दिनांक 19/12/2013 रोजी प्रदेशिक कार्यालयाकडून समितीला प्रस्ताव सादर करण्यात आला. दिनांक 4/1/2014 रोजी प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या 29 व्या बैठकीत चर्चा झाली. दिनांक 13/01/2014 रोजी समितीकडून सुप्रमा प्रस्ताव महामंडळास पुढील कार्यवाहीस्तव पाठविण्यात आला.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी एवढी सविस्तर आकडेवारी सभागृहात सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांनी ती पटलावर ठेवावी.

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना तारखा हव्या होत्या. विलंब का झाला, याची माहिती त्यांना हवी होती. म्हणून मी ही माहिती देत आहे. हा प्रकल्प अेआयबीपी

...6......



SRR/ AKN/ KTG/ प्रथम श्री.मंगेश........ 11:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मधील आहे.  आता दिनांक 13/10/2014 रोजी हा प्रस्ताव महामंडळाने राज्य शासनास फेरसादर केलेला आहे.  लवकरच याबाबत निर्णय घेतला जाईल.  निधी उपलब्ध असल्यामुळे त्यास परवानगी देखील देण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, किती गावच्या जमिनी सरळ खरेदी पध्दतीने संपादित करावयाच्या आहेत व त्या किती दिवसात संपादित होतील ?

श्री.विजय शिवतारे : सभापती महोदय, सरळ खरेदी पध्दतीने जमिनी देण्यास शेतकऱ्यांनी विरोध केला असून नवीन कायद्यानुसार जमिनी संपादित कराव्यात व मोबदला द्यावा, अशी मागणी केली आहे. त्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात आले आहेत.

------------------

...7.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : जैतापूर प्रकल्पाबाबत निर्माण झालेले संभ्रमाची स्थिती

**मु. शी.** : जैतापूर प्रकल्पाबाबत निर्माण झालेले संभ्रमाची स्थिती

यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, रामहरी रुपनवर, अशोक ऊर्फ भाई जगताप, जनार्दन चांदूरकर, शरद रणपिसे, मुझफ्फर हुसेन सय्यद, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.माणिकराव ठाकरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री आनंदराव पाटील, राजेंद्र मुळक, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"देशाच्या व राज्याच्या दुरोगामी विकासाला चालना देणाऱ्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला केंद्र सरकार व राज्य शासनाची मंजूरी असून हा प्रकल्प सुरू करण्यासाठी तत्कालीन शासन अग्रेसर असणे, अणुऊर्जा निर्मिती करुन देशात ऊर्जा निर्मितीबाबत महाराष्ट्र राज्य हे विकासाचे पाऊल टाकणार असताना "जैतापूर हा प्रकल्प होऊच देणार नाही" असे व्यक्ताव्य राज्याचे मा.पर्यावरण मंत्री यांनी दिनांक १६ डिसेंबर, २०१४ रोजी नागपूर येथील एका वृत्तपत्र समूहाला भेट दिली असताना करणे व तशा बातम्या वृत्तपत्रामध्ये छापून आलेल्या असणे, जैतापूर प्रकल्पाबाबतची राज्य शासनाची नेमकी कोणती भूमिका असल्याचे सध्याच्या शासनाकडून स्पष्ट करण्यात आले नसताना मा.पर्यावरण मंत्री यांनी जाहिरपणे असे व्यक्तव्य केल्यामुळे संभ्रमाची परिस्थिती निर्माण झालेली असणे, जागतिक पातळीवरील असलेल्या या प्रकल्पासंदर्भात शासनाचे दुटप्पी धोरण असल्याचे या विधानातून स्पष्ट झाल्याने राज्यातील जनतेमध्येही पसरलेली तीव्र असंतोषाची व संभ्रमाची भावना, यासाठी जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाबद्दल राज्य शासनाने नेमकी भूमिका स्पष्ट करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

...८.....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------------

...9....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, देशाच्या आणि राज्याच्या दुरगामी विकासाला चालना देणाऱ्या जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पाला केंद्र व राज्य शासनाची मंजुरी असून या प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे. या प्रकल्पाबाबतची सर्व कार्यवाही सुरु असताना दिनांक 16 डिसेंबर, 2014 रोजी राज्याच्या माननीय पर्यावरण मंत्र्यांनी नागपूर येथील एका वृत्तपत्र समुहाला भेट दिली असताना "जैतापूर हा प्रकल्प होऊच देणार नाही," अशा प्रकारचे वक्तव्य केले आहे. त्यामुळे लोकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ? मंत्री महोदयांनी केलेले वक्तव्य वर्तमानपत्रात छापून आले आहे. त्यामुळे यापूर्वी शासनाने दिलेली मंजुरी आणि शासनाच्या एका मंत्री महोदयांचे आताचे वक्तव्य, यामध्ये तफावत आहे. त्यामुळे या प्रकल्पाबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, वर्तमानपत्रात छापून आलेली बातमी मी तपासून पहातो आहे. आजमितीला केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका तीच आहे. पर्यावरण मंत्री महोदय काय बोलले, हा सभागृहाचा भाग होऊ शकत नाही. आजपर्यंत राज्य शासनाची भूमिका बदललेली नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेदरम्यान जैतापूर प्रकल्पाबाबत राज्य शासनाची नेमकी भूमिका स्पष्ट करण्याची मागणी मी माझ्या भाषणात केली होती. दुर्दैवाने, मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तरामध्ये त्याची दखल घेतली गेली नाही.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पासाठी राज्य शासन भूसंपादनाची कार्यवाही करीत आहे. पर्यावरण विभागाचा दाखलाही या प्रकल्पासाठी लागणार आहे. नवीन पर्यावरण मंत्री महोदयांनी परवाच हे स्पष्ट केले की, कोणत्याही परिस्थितीत जैतापूर प्रकल्पाला पर्यावरणाचा दाखला दिला जाणार नाही. हे त्यांचे वक्तव्य वर्तमानपत्रात छापून आले आहे. त्यामुळे या प्रकल्प कामाच्या गतीबद्दल आणि तो साकार होण्याबाबत, अनेक शंका निर्माण झाल्या आहेत. पर्यावरण मंत्री महोदय हे सुध्दा या शासनाचा एक भाग आहेत. ही सामुहिक जबाबदारी आहे. सत्तारुढ पक्षातील एक पक्ष स्पष्टपणे भूमिका घेतो, त्यावेळी या प्रकल्पाचे नेमके काय होणार आहे, असा प्रश्न उपस्थित होतो. ऊर्जा मंत्री महोदयांनी आता सांगितले की, ते वर्तमानपत्रातील बातमी तपासणार

...10.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे..........

आहेत. ही लक्षवेधी सूचना देऊन तीन दिवस झाले आहेत आणि वर्तमानपत्रातील बातमीला सुध्दा तीन दिवस झाले आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांचे उत्तर ठामपणाचे असले पाहिजे. छाननी करतो, तपासणी करतो, असे उत्तर चालणार नाही. अन्यथा, ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली पाहिजे. शासन या प्रकल्पाबाबतची आपली भूमिका जाहीर करणार आहे का ?

यानंतर श्री.वि.खर्चे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी अगोदर देखील सांगितले आहे की, जैतापूर प्रकल्पाबाबत मंत्रिमंडळात व सभागृहात विषय उपस्थित करण्यात आलेला नाही. आजपर्यंत केंद्र व राज्य सरकारची जी जुनी भूमिका होती, त्यामध्ये बदल झालेला नाही.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, जैतापूर प्रकल्प पूर्ण होणार किंवा नाही याचे उत्तर मंत्री महोदय देतील काय ?

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी आपला आभारी आहे, हे शासन शिवसेना व भाजप युतीचे आहे, शिवसेनेशिवाय हे शासन पूर्ण होऊ शकत नाही. शिवसेना पक्ष प्रमुख माननीय श्री.उदध्व ठाकरे यांनी आम्ही जैतापूर प्रकल्प होऊ देणार नाही अशी भूमिका मांडली आहे. हा राजकीय व वर्तमानपत्राचा विषय नाही. या प्रकल्पात महाराष्ट्र शासनाचा पैसा गुंतला आहे, केंद्र शासनाने या प्रकल्पाला निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. अर्धवट व प्राथमिक अवस्थेत असणारा प्रकल्प शासन पूर्ण करणार आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, या प्रकल्पाचे कोणतेही काम शासनाने आतापर्यंत थांबविलेले नाही. भूसंपादनाची कार्यवाही राज्य शासनाने केलेली आहे. या प्रकल्पासाठी केंद्र सरकारने निधी दिलेला आहे, त्यामुळे भूसंपादनाची कामे झाली आहेत. शासनाकडून कोणतेही काम थांबविण्यात आले नसून राज्य व केंद्र सरकाची भूमिका बदललेली नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, हा प्रकल्प मर्यादित कालावधीत शासन पूर्णत्वास नेणार आहे काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, हा प्रकल्प केंद्र सरकारचा असल्यामुळे या प्रकल्पा संदर्भातील सर्व निर्णय केंद्र सरकारला घ्यावयाचे आहेत.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, एकाच सन्माननीय सदस्यांनी एका वेळी प्रश्न विचारावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, वारंवार हा प्रश्न आम्ही विचारित आहोत की, माननीय मंत्री महोदय खाली बसून दुसऱ्या मंत्री महोदयांना सांगत आहेत. हा प्रकल्प केंद्र व राज्य सरकारचा संयुक्त प्रकल्प आहे. राज्य सरकारचा सहभाग असल्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही राज्य सरकारच्या माध्यमातून होत आहे. प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी राज्य सरकार शेवटपर्यंत ठाम भूमिका घेणार काय ? हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य सरकार सहकार्य करणार काय ?

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, केंद्र सरकारचा हा प्रकल्प आहे, राज्य सरकारकडे या प्रकल्पासाठी जमीन संपादन करण्याचे काम देण्यात आले होते ते काम राज्य सरकारने केले आहे. संपूर्ण नियोजन, संपूर्ण निधी केंद्र सरकारचा या प्रकल्पासाठी असणार आहे, हा प्रकल्प पूर्ण करायचा किंवा नाही हा विषय केंद्र सरकारचा आहे. याबाबत राज्य सरकारने आजपर्यंत कोणतीही भूमिका बदललेली नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना माननीय मंत्री वारंवार स्पष्ट करीत आहेत की, हा प्रकल्प केंद्र सरकारचा आहे, राज्य सरकारने हा प्रकल्प करणार नाही असे कोणतेही धोरण जाहीर केले नाही. एकाच प्रश्नाला वारंवार उत्तर देण्यात आले आहे. मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर सन्माननीय सभासदांचे समाधान व्हायला पाहिजे. यामध्ये राजकीय मतभेद वेगळे असू शकतात. आताचा प्रश्न विषयाला न्याय देण्यासंदर्भातील आहे. ऊर्जा हा महत्वाचा विषय आहे. मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे, या प्रश्नाला राजकीय रंग देऊन चर्चा करायची असेल तर ती चर्चा संपणार नाही. सभापती महोदयांना माझी विनंती आहे की, वारंवार प्रश्न विचारुन मंत्री महोदयांनी योग्य उत्तर दिलेले आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल असे मला वाटते. सरकार म्हणून मंत्री महोदयांनी योग्य उत्तर दिलेले आहे, सरकारच्या धोरणात बदल झालेला नाही. हा प्रकल्प पूर्ण करण्याचे वारंवार सांगण्यात आले आहे. या प्रकल्पाचे काम थांबविण्याच्या सूचना देण्यात आलेल्या नाहीत.

**उप सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे, मला असे वाटते की, सभागृहाचे समाधान झाले आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VVK/ AKN/ KTG/ 11:40

**पृ. शी.** : नाशिक जिल्ह्यात महावितरणाच्या पायाभूत सोयी नसणे तसेच रोहित्र जळाल्यामुळे वीज पुरवठ्यामध्ये निर्माण झालेली अडचण

**मु. शी.** : नाशिक जिल्ह्यात महावितरणाच्या पायाभूत सोयी नसणे तसेच रोहित्र जळाल्यामुळे वीज पुरवठ्यामध्ये निर्माण झालेली अडचण या संबंधी सर्वश्री जयंतराव जाधव, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नाशिक जिल्ह्यातील महावितरणाच्या पायाभुत आराखडा योजना क्र.२ मधील कामे अनेक ठिकाणी सुरु झालेली नसणे, काही कामे संथगतीने सुरू असल्याचे माहे नोव्हेंबर २०१४ मध्ये निदर्शनास येणे, नाशिक जिल्ह्यात महावितरणाच्या कारभाराचा बोजवारा उडाल्याचे दिसून येत असणे, पायाभूत सुविधेच्या कामाअभावी रोहित्र जळण्याच्या तसेच वीज पुरवठ्यातील अडचणींमध्ये सातत्याने वाढ होत असणे, जळालेली रोहित्र बदलण्यासाठी शेतकऱ्यांना वर्गणी काढून आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणे, नागपूर (ता.नांदगांव) येथील चार वर्षापूर्वी जळालेले रोहित्र अद्यापही बदलून दिलेले नसल्याचे नोव्हेंबर २०१४ मध्ये उघडकीस येणे, जळणारी रोहित्रे विहीत कालावधीत बदलून देण्यास महावितरण विभाग असमर्थ ठरत असल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होणे, शासनाकडून कार्यवाही करण्यासाठी होत असलेली दिरंगाई व टाळाटाळ, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, राज्यासह नाशिक जिल्ह्यात महावितरणाच्या विविध पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत लक्षवेधी सूचना देण्यात आली आहे. संपूर्ण राज्याला रोहित्राचा प्रश्न भेडसावत आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात ठाम उत्तर देण्यात आले आहे. जळालले रोहित्र विविध कालावधीत बदलण्याची क्षमता महावितरण कंपनीकडे आहे. महावितरण कंपनी सक्षम असेल तर राज्यातील प्रत्येक गावात रोहित्राबाबत अडचणी का वाढत आहेत. मंत्री महोदयांनी असे सांगितले आहे की, विहित कालावधीत रोहित्र बदलण्यात येतील. एखादे रोहित्र बंद असेल तर तो बदलण्यासाठी निश्चित विहित कालावधी किती आहे. माझ्या मतदारसंघातील रोहित्र बंद पडले असेल तर ते तातडीने सुरु करण्याकरिता शासनाचा विहित कार्यकाळ किती आहे. मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, नांदगांव तालुक्यात एकही रोहित्र बंद नाही. हे उत्तर जबाबदारीने दिलेले आहे काय ? सभापती महोदय, मी आपल्या निर्देशास आणून देऊ इच्छितो की, नांदगांव तालुक्यातील पिंपरखेड, सोनार आणि आमरी येथील तीन रोहित्रे आजही बंद आहेत, प्रिंपाळा येथील पीरबाबा येथील रोहित्र आजही बंद आहे. मंत्री महोदय उत्तरात सांगतात तसे काहीही नाही. जळालेली रोहित्र बदलण्याकरिता तीन ते चार दिवसांत कार्यवाही करावी असे आदेश काढण्यात येतील काय ? ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे उत्तरे दिली आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना नाशिक जिल्ह्याकरिता विचारण्यात आलेली आहे. नाशिक जिल्ह्यात एकही रोहित्र बदलण्याचे शिल्लक नाही. सन्माननीय सदस्यांनी राज्याचे धोरण विचारल्यामुळे मी ते सांगत आहे. राज्यात मोठ्या प्रमाणात रोहित्र नादुरुस्त झाली आहेत. रोहित्र बदलण्याची कार्यवाही सुरु आहे. विभागाकडे रोहित्र उपलब्ध असेल तर सात दिवसात बदली करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. 80 टक्के पैसे भरल्याशिवाय रोहित्र बदलू नये असे महावितरण कंपनीचे परिपत्रक होते ते मागे घेण्यात आले आहे. ज्या ठिकाणी रोहित्र नसतील व ती दुरुस्त करुन घ्यावयाची असतील तर त्या ठिकाणी 15 दिवसात रोहित्र बदलून देण्याची कार्यवाही करण्यात येईल. कोणत्याही ठिकाणचे रोहित्र बदलण्यासाठी 15 दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही. नांदगांव येथील रोहित्र दोन वेळा नादुरुस्त झाले होते.

..5..



श्री.चंद्रशेखर बावनकुळे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दिनांक 2/8/2011 व दिनांक 18/8/2011 आणि आता दिनांक 6/12/2014 ला तेथील रोहित्र बदलण्यात आली आहेत.. नाशिक जिल्ह्यात 3787 रोहित्रे जळाली होती. ती संपूर्ण रोहित्रे बदलण्यात आली आहेत.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना परत प्रामाणिकपणे विचारतो की, आपण नाशिक जिल्ह्याची माहिती ठामपणे सांगत आहात काय ? मी फक्त नांदगांव तालुक्याबाबत विचारित आहे. मंत्री महोदयांनी विचारपूर्वक उत्तर दिले पाहिजे. मी अत्यंत जबाबदारीने सांगतो की, नांदगांव तालुक्यात तीन ठिकाणी रोहित्रे बंद आहेत. तेथील माहिती मी आता घेतलेली आहे. मंत्री महोदय, सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. साडेचार वर्षापासून नागापूर येथील रोहित्र बंद होते. अनेक ठिकाणच्या लोकांनी 100 टक्के विजेची देयके भरली आहेत त्याबाबत शासन काय विचार करणार आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, तेथील रोहित्रे आजही बंद आहेत, मंत्री महोदय म्हणतात की, सुरु आहेत, या संदर्भातील खुलासा तातडीने मंत्री महोदय करतील काय ?

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ AKN/ KTG/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 11:50

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सन्माननीय सदस्यांकडे आजच्या तारखेला जी माहिती उपलब्ध आहे त्यासंदर्भात सभागृहाची बैठक संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांबरोबर बसून चर्चा करण्यात येईल आणि जळालेल्या डीपी बदलून देण्याचा निर्णय घेण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : माननीय मंत्री महोदयांनी स्पष्टपणे असे उत्तर दिलेले आहे की, रोहित्र बदलण्याचे शिल्लक नाही. सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती अधिकृत असते. मंत्री महोदयांना चुकीची माहिती दिली गेली असेल तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : नाशिक जिल्ह्यामध्ये 3787 तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तेथील रोहित्र बदलण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांनी सांगितल्या प्रमाणे सभागृहासमोर आलेली माहिती मी तपासून घेतो, तसेच सन्माननीय सदस्यांबरोबर बसून चर्चा करतो. अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर.... रेकॉर्ड प्रमाणे 3787 रोहित्र बदलण्यात आलेले आहेत. कधी कधी रोहित्र ग्राऊंडवर बदलल्यानंतर त्याची माहिती यावसास आठ आठ दिवस लागतात. सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहिती नुसार मी रोहित्र बदल्याच्या सूचना देतो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य शासनाने कामगार कल्याण मंडळाची थकविलेली रक्कम

**मु. शी.** : राज्य शासनाने कामगार कल्याण मंडळाची थकविलेली रक्कम यासंबंधी श्री अशोक उर्फ भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कामगार कल्याण वर्गणीचे दर प्रत्येक तीन वर्षानी ३० टक्के निश्चित करण्याची आवश्यकता असताना सन २००० पासून ते आजपर्यंत निश्चित करण्यात न येणे, राज्य शासनाने कामगार कल्याण मंडळाचे ४६.७२ कोटी रुपये थकविणे, त्रिपक्षीय अंशदानाच्या हिश्श्यातील १०.८० कोटी रुपयांच्या केलेल्या तरतुदीत वाढ करुन ती ४०.०० कोटी रुपये इतकी वाढ करण्याची आवश्यकता असूनही मागणी मान्य करण्यात न येणे, मंडळावर अधिकृत संघटनेचा प्रतिनिधी शासनातर्फे नेमण्यात न येणे, मंडळावर सदस्य संख्या कमाल ११ ठेवण्याची मागणी करण्यात येऊनही त्यासबंधी कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, उपरोक्त सर्व प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजय देशमुख (कामगार राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..



MSS/ AKN/ KTG/ पूर्वी श्री. व्ही.खर्चे 11:50

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : माननीय राज्यमंत्री महोदय हे नवीन आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेसंबंधी जे निवेदन देण्यात आलेले आहे ते पूर्णपणे चुकीचे आहे. या पूर्वी देखील या विषयासंबंधी या सदनामध्ये लक्षवेधी सूचना आणि अन्य आयुधांच्या मार्फत चर्चा झालेली आहे. या निवेदनामध्ये सरकारच्या प्रोसेस विषयी सांगितलेले आहे. त्या बाबतीत दोन निर्णय झाले होते. 2012 मध्ये 10 कोटी रुपयाची तरतूद झाली होती. ती आतापर्यंत वर्ग करण्यात आलेली नव्हती. जेव्हा 10 कोटी रुपयाची तरतूद झाली होती त्यावेळी ही अंशदानाची रक्कम 26 कोटी रुपये होती. ही रक्कम आता 46.72 कोटी रुपये इतकी झालेली आहे. अंशदानाचा दर प्रत्येक तीन वर्षातून एकदा अशा रीतीने वाढविता येईल की, अशी वाढ अंशदानाच्या दराच्या तीस टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही. 3 वर्षात ही प्रक्रिया व्हायला पाहिजे. जवळ जवळ 14 वर्षापासून ही प्रक्रिया झालेली नाही. कामगारांना न्याय मिळाला पाहिजे म्हणून शासनाने दिशाभूल करणारे जे निवेदन दिलेले आहे त्याबाबत मला सभागृहामध्ये गोंधळ घालावयाचा नाही. निवेदनामध्ये शेवटी असे नमूद करण्यात आलेले आहे की, 10 कोटी रुपयाची तरतूद पुरवणी मागण्यामध्ये मान्य झालेली आहे. माझे म्हणणे असे आहे की, सरकारकडे 46 कोटी 72 लाख रुपये शिल्लक आहेत. शासनाने निवेदनामध्ये अंशदानाची प्रक्रिया नमूद केलेली असून ती प्रक्रिया मागील 14 वर्षापासून अंमलात आणलेली नाही. सरकारकडे कामगारांचे जे 46 कोटी 72 लाख रुपये बाकी आहेत त्यातील 10 कोटी रुपयाची तरतूद शासनाने केलेली आहे. उर्वरित 30 कोटी रुपये शासन केव्हा वर्ग करणार आहे ?

श्री. विजय देशमुख : सन्माननीय सदस्यांनी सांगितले ते खरे आहे. 2004 सालापासून अंशदानाच्या दरात वाढ करण्याचा प्रस्ताव कामगार विभागाकडून वेळोवेळी करण्यात आलेला आहे.

श्री. भाई जगताप : आम्ही सरकारकडे सरकारच्या पैशाची मागणी केलेली आहे. माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिलेले आहे की, सरकारच्या वित्त विभागाने 10 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. हे 10 कोटी रुपये अद्याप मिळालेले नाहीत. हे 10 कोटी रुपये अधिक 30 कोटी रुपये असे एकूण 40 कोटी रुपये शासन केव्हा देणार ? या प्रश्नाकडे वित्त विभागाने जाणीवपूर्वक

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दुर्लक्ष केलेले आहे. हा सरकारचा विषय आहे. सभागृहामध्ये ज्येष्ठ मंत्री महोदय बसलेले आहेत. कामगारांच्या प्रश्नामध्ये सरकारने इतके सुस्त असता कामा नये. सरकारने 10 कोटी रुपयाची तरतूद पुरवणी मागण्यांद्वारे केलेली आहे. उर्वरित 30 कोटी रुपयाची तरतूद केव्हा करणार ?

श्री. विजय देशमुख : उर्वरित रक्कम वित्त विभागाकडे पाठपुरावा करून प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : कलम 6 ब ब चा उल्लेख निवेदनामध्ये करण्यात आलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "शासनास मंडळाकडे प्रस्ताव प्राप्त होताच राजपत्रातील अधिसूचनेन्वये कर्मचाऱ्यांच्या अंशदानाचा दर प्रत्येक तीन वर्षातून एकदा अशा रीतीने वाढविता येईल की अशी वाढ अंशदानाच्या दराच्या तीन टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही." बदलत्या आर्थिक परिस्थितीमध्ये याची उपयुक्तता किती आहे की यामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे यासंबंधी विचार करण्यात येईल काय ?

श्री. विजय देशमुख : सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : हा स्टॅण्डर्ड फॉर्म्युला आहे. तो कोणाला बदला येणार नाही. कामगारांचे 6 ते 12 रुपये असतील तर मालकाचे अंशदान तिप्पट आणि सरकारचे अंशदान दुप्पट असते. याच फॉर्म्युल्याप्रमाणे शासनाकडे 46.72 कोटी रुपये बाकी आहेत. हे पैसे वळते करा असे माझे म्हणणे आहे.

श्री. विजय देशमुख : सन्माननीय सदस्यांच्या मुद्याची नोंद घेतलेली आहे.

----

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी./मु.शी.**: लक्षवेधी सूचनेसंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री. चंद्रकांत पाटील (सहकार व पणन मंत्री ) : सभापती महोदय, "बीड व गेवराई येथे सुरु केलेल्या खरेदी केंद्रांवर झालेल्या उडीद खरेदीच्या संदर्भातील तक्रारींकडे शासनाने केलेले दुर्लक्ष" या विषयावरील सर्वश्री. अमरसिंह पंडित व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 2 एप्रिल , 2013 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे कृपया सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी)

---

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**उप सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 11.59 ते 12.15 पर्यंत स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तळगाव येथील शालेय पोषण आहार योजनेतंर्गत स्वयंपाकघराचे निकृष्ट दर्जाचे झालेले काम**

**(१) * १६७७ श्री.जयंत पाटील : ता.प्र.क्र. ५०३३९ ला दिनांक ५ जून, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तळगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजनेतंर्गत स्वयंपाकगृहाच्या चौथऱ्याचे कामकाजास प्रशासकीय मान्यता कोणी व केव्हा दिली,

(२) सदर कामाचे अंदाजपत्रक किती रकमेचे होते,

(३) सदर कामाचा ठेका कोणास व किती तारखेला देण्यात आला आहे,

(४) बांधकाम निकृष्ट दर्जाचे आढळून आल्याने सदरची कामे थांबविण्यात आली त्यावेळी बांधकामाची स्थिती काय होती,

(५) निकृष्ट दर्जाचे काम आढळून येवून ते थांबविण्यापर्यंत कामावर किती खर्च झाला, ठेकेदारास रक्कम अदा करण्यात आली होती काय,

(६) नव्याने काम व चांगल्या दर्जाचे काम करण्याच्या सूचना कोणत्या विभागास व केव्हा देण्यात आल्या,

(७) निकृष्ट दर्जाचे काम झाल्याबद्दल कोणाला जबाबदार धरण्यात आले आहे ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२) व (३) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत प्री-फॅब्रीकेटेड स्वयंपाकगृह बांधकामासाठी शिक्षण संचालनालय स्तरावर निविदा प्रक्रिया राबवून मे.सिन्टेक्स इंडस्ट्रिज लि. या कंपनीची नियुक्ती करण्यात आलेली आहे. यासाठी प्रती स्वयंपाकगृह रु. ७४९००/- इतका न्युनत्तम दर आलेला असुन यानुसार ३८०४८ प्री-फॅब्रीकेटेड स्वयंपाकगृह बांधकामासाठीचे आदेश दि. १५/३/२०१२ रोजी देण्यात आलेले आहेत.

(४) व (५) स्वयंपाकगृहाच्या चौथऱ्याचे बांधकाम सुरु असतांना बांधकाम निकृष्ट दर्जाचे आढळून आल्याने बांधकाम थांबविण्यात आले आहे. तोपर्यंत बांधकामावर रु. १०,०००/- इतका खर्च झालेला होता. सदर रक्कम कंत्राटदारास अदा करण्यात आलेली नाही.

(६) व (७) निकृष्ट दर्जाची जबाबदारी बांधकाम करणाऱ्या मे.सिंन्टेक्स इंडस्ट्रिज लि. यांची असुन सदर स्वयंपाकगृह बांधकाम नव्याने करण्याचे आदेश दि.११/०४/२०१४ रोजी संबंधित कंपनीस देण्यात आलेले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1677.........

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हे काम सिन्टेक्स कंपनीला देण्यात आल्यानंतर ते चांगल्या दर्जाचे नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यानंतरही पुन्हा त्याच कंपनीला काम देण्यात आले हे खरे आहे काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सिन्टेक्स कंपनीला प्रि-फॅब्रिकेटेड स्वयंपाकगृहाचे काम काम दिले होते. त्या कामासाठी जो बेस खणायचा होता ते काम स्थानिक कंत्राटदाराच्या माध्यमातून करावयाचे होते. हे काम निकृष्ट दर्जाचे झाले. खोली 3 फूट पाहिजे की 1 फूट पाहिजे याबद्दल स्थानिक वाद होता. प्रॉजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सीच्या ही बाब लक्षात आली. आवश्यक तेवढे खोल न खणल्यामुळे पुन्हा एकदा नव्याने बांधण्याचे काम केले. प्रत्यक्ष सिन्टेक्स कंपनी प्रि-फॅब्रिकेटेड स्वयंपाकगृह तयार करते, त्यात कंपनीचा दोष नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, प्रि-फॅब्रिकेटेड स्वयंपाकगृहाचे काम ज्या सिन्टेक्स कंपनीला देण्यात आले त्यांच्याकडे फक्त राजापूर येथील काम दिले होते की संपूर्ण राज्यभराचे काम दिले होते? संपूर्ण राज्यभराचे काम दिले असेल तर त्या कामाची एकूण रक्कम किती आणि या कामामध्ये जो काही दोष आढळला त्या संदर्भात त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे का?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी प्रि-फॅब्रिकेटेड ही नवीन पध्दत सुरु झाली त्यावेळी नियमाप्रमाणे टेंडर प्रक्रिया पूर्ण करुन संपूर्ण राज्यभराच्या कामाचे टार्गेट 71783 इतके होते, त्यापैकी पूर्ण झालेल्या कामांची संख्या जवळपास 50000 असून 15 ते 16 हजार कामे सुरु व्हावयाची किंवा सुरु न झालेली आहेत. ही सर्व कामे सिन्टेक्स कंपनीला दिलेली आहेत. केंद्र शासनाकडून प्रत्येक कामासाठी 60,000 रुपये मंजूर झालेले असून त्याप्रमाणे निधी दिला गेला आहे. या टेंडरच्या अटीमध्ये निकृष्ट दर्जाचे काम आढळून आले तर कारवाई करण्याविषयी क्लॉज आहेत. त्यात पिनल दंड लावला तरी काम पूर्ण होत नाही. टेंडरच्या अटीमध्ये निकृष्ट दर्जाचे काम प्रॉजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टन्सीच्या लक्षात आल्यानंतर ते व्यवस्थित करुन देणे, विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेणे याचा अंतर्भाव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर एन.1...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1677 ........

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, या योजनेच्या माध्यमातून शिक्षक वर्गाला अतिरिक्त काम देण्यात आले असून त्यातून धान्य वेळेवर मिळत नाही आणि मिळाले तरी ते निकृष्ट दर्जाचे असते असे प्रकार होतात. त्याऐवजी प्रत्येक विद्यार्थ्यामागे पालकांच्या नावावर ठराविक रक्कम देऊन हे उपद्व्याप बंद करुन शिक्षकांचा त्रास कमी करण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. विनोद तावडे : महोदय, ही योजना केंद्र शासनाची असून तिचे निकष ठरलेले आहेत. तसेच या योजनेचा उद्देश मुळात असाच आहे की, मुलांनी शाळेत प्रत्यक्ष हजर रहावे म्हणून प्रोत्साहनाच्या रुपाने सुरु केलेले आहे. त्यांचा दुसरा प्रश्न शिक्षक आणि मुख्याध्यापकांना अतिरिक्त कामाचा बोजा वाढला असल्याबाबत असून त्याऐवजी पूरक कसे करता येईल याचा शासन स्तरावर विचार करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जी कामे या माध्यमातून करण्यात आली त्यातील एका कामाची किंमत किती आहे, राज्यातील किती जिल्ह्यांमध्ये ही कामे करण्यात आली आणि एकाच कंपनीला या कामाचे कंत्राट देण्यात आलेले आहे काय ?

श्री. विनोद तावडे : महोदय, मी मघाशीच सांगितले की, सिंटेक्स इंडस्ट्रीज लि. या कंपनीला संपूर्ण राज्यातील काम देण्यात आले असून प्रत्येक कामासाठी 74 हजार 900 एवढी किमत ठरविण्यात आली आहे. त्यात केंद्र शासनाकडून रुपये 60 हजार प्रत्येकी मिळाले असून उर्वरित 14 हजार 900 पैकी 9 हजार 900 एवढी रक्कम राज्याच्या हिश्श्यातून खर्च करण्याचा निर्णय सन 2012 मध्ये घेण्यात आला. तसेच या योजनेअंतर्गत सन 2008-09 मध्ये एकूण 38 हजार बांधकामे करण्यात आली असून त्यासाठी केंद्र शासनाकडून 228 कोटी रुपये एवढी रक्कम मंजूर करण्यात आली आहे. मघाशी मी मंजूर बांधकामांची आकडेवारी सांगितली त्यात 27 हजार 736 एवढी बांधकामे पूर्ण झाली असून 12 हजार 480 एवढी बांधकामे प्रि-फॅब्रिकेशन इंडस्ट्रीज लि. या कंपनीकडे आल्यामुळे ती अद्याप पूर्ण व्हावयाची आहेत. अशा प्रकारे एकूण पूर्ण व प्रगती पथावर असलेल्या कामांची विगतवारी आहे. यात काही ठिकाणी बांधकाम कामगार स्थानिक असल्याने अडचणी निर्माण झाल्या असून पुढील काळात ती पूर्ण करण्याचा शासनाचा मनोदय आहे.

.........2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1677 ........

श्री. सुनील तटकरे : महोदय, मंत्री महोदयांनी दिलेली माहिती बेसिक स्वरुपाची असून त्या अनुषंगाने माझा प्रश्न आहे की, एकंदरित सिंटेक्स इंडस्ट्रीज या कंपनीला किती रकमेचा ठेका देण्यात आला ?

श्री. विनोद तावडे : या सर्व प्रकल्पासाठी एकूण 228 कोटी 28 लाख इतका निधी केंद्राकडून मंजूर झालेला आहे. तसेच या संपूर्ण कामासाठी राज्य शासनाचा हिस्सा आणि व्याजावरील हिस्सा ही वेगळी रक्कम आहे. प्रि-फॅब्रिकेटेड कंपनीकडून बांधल्या जाणाऱ्या कामाची एकूण संख्या 38 हजार 48 एवढी असून या कामाची एकूण रक्कम 330 कोटी रुपये इतकी आहे.

श्री. सुनील तटकरे : एकूण 330 कोटी रुपये एवढ्या रकमेचे कंत्राट या एकाच कंपनीला देण्यात आलेले आहे काय, असल्यास स्पर्धात्मक पध्दतीने या निविदा मंजूर केल्या आहेत काय ?

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगानेच मी सुध्दा माहिती घेत असताना विचार केला व ती माहिती घेतली आहे. त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, सन 2011 मध्ये या कामांची निविदा प्रक्रिया सुरु झाल्यानंतर ॲक्मे, एमएसएसआयडीसी, टेक्नो प्लास्ट, ॲस्टर, पाटील कंन्स्ट्रक्शन आणि सिंटेक्स इंडस्ट्रीज अशा अनेक कंपन्या समोर आल्या होत्या. त्यातील प्रत्यक्ष चार म्हणजेच ॲक्मे, एमएसएसआयडीसी, सिंटेक्स आणि ॲस्टर अशा चार कंपन्या क्वॉलिफाय झाल्यानंतर सिंटेक्स इंडस्ट्रीज ही कंपनी मुल्यमापनात पात्र ठरली. त्यानंतर यात एक शंका निर्माण झाल्यामुळे पुन्हा रिकॉलिंग करण्यात आले त्यात ॲक्मे, एमएसएसआयडीसी आणि सिंटेक्स इंडस्ट्रीज अशा तीन कंपन्या आल्या व त्यानंतरच सिंटेक्स इंडस्ट्रीजला हे काम देण्यात आले.

श्री. विक्रम काळे : महोदय, संपूर्ण राज्यातील शाळांमध्ये सर्व शिक्षण केंद्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून तसेच शिक्षक व कर्मचाऱ्यांमार्फत वारंवार मागणी करण्यात येत आहे की, शालेय पोषण आहार योजनेच्या अंमलबजावणीचा पुनर्विचार करण्यात यावा, ही योजना केंद्राची असली तरी यापूर्वी ज्याप्रमाणे आपण प्रत्येक विद्यार्थ्याला 3 किलो पॅक तांदळाची बॅग देत होते त्यामागे सुध्दा विद्यार्थी शाळेत यावेत असाच उद्देश होता त्याचा पुनर्विचार शासन करणार काय, आणि जे 330 कोटीचे शेड्स बांधण्याचे काम आपण सुरु केले आहे ते केवळ 10 बाय 10 एवढ्या छोट्या

........3



PFK/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 12:20

ता.प्र.क्र.1677 .......                                                                   श्री. विक्रम काळे ........

जागांवर आहेत. हे बांधकाम निकृष्ट दर्जाचे असल्याने तसेच त्यात प्लास्टिक कोटेड असल्याने अन्न शिजविण्यामुळे गरम होऊन आगी लागण्याचा संभव आहे. माझा प्रश्न असा आहे की, हे शेड्स टीन पत्र्याचे बनविले तर ते दीर्घ काळ टिकू शकतील याचाही पुनर्विचार शासन करणार काय ?

श्री. विनोद तावडे : महोदय, या कामाचे डिझाईन आयआयटी सारख्या नामांकित संस्थेने केली किंवा कसे अशी शंका सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली ........

o-1 .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1677

श्री.विनोद तावडे...

हे सर्व डिझाईन टेक्निकल इन्स्टीटयूटच्या माध्यमातून पूर्णपणे कन्फर्म करून घेतलेले आहे. त्याला बऱ्या पैकी व्हेंटीलेशन आहे. त्यामुळे आगीची शक्यता कमी होते. अशा प्रकारे ते टेक्निकली पूर्ण ॲप्रुव्ह झालेले आहे. हे शाळेच्या आवारात आहे. आगीची भीती असता कामा नये म्हणून सगळी माहिती घेण्यात आली आहे. मुलांना देण्यात येणारे अन्न हे शाळेतच शिजविले जाणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या मनात जे प्रश्न आले होते ते माझ्या मनात आले होते. त्या प्रश्नांची खात्री करून घेतली असल्यामुळे आता त्यासाठी वेगळी काही गरज भासणार नाही.

...........

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या रिक्त जागा भरतांना मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याबाबत**

**(२)** * **१७७८ श्री.किरण पावसकर**, **श्री.नरेंद्र पाटील**, **ॲड. निरंजन डावखरे**, **श्री.विक्रम काळे**, **श्री.सतिश चव्हाण** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या ४४८ रिक्त जागा भरतांना मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यात येईल व निवृत्तीचे वय ७० वर्ष करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालयाने शासनास माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

मा.उच्च न्यायालयाने दिनांक १०.१०.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेने शिफारस केल्यानुसार आध्यापकांचे सेवानिवृत्तीचे वय ६३ वरून ७० पर्यंत टप्याटप्याने वाढविण्याबाबत शासनाने पावले उचलावीत अशी शिफारस केली आहे.

(२) मराठा आरक्षणास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. तसेच सदरहू प्रकरण अद्यापही न्यायप्रविष्ट आहे. शासनाने सन २०१० मध्ये अध्यापकाचे निवृत्तीचे वय ५८ वरून ६२ केले. तदनंतर भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची शिफारस विचारात घेऊन अध्यापकांचे निवृत्तीचे वय शासन निर्णय, दिनांक २८.०७.२०१४ अन्वये ६२ वरून ६३ वर्ष करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांच्या 448 रिक्त जागा भरताना मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यात येईल व निवृत्तीचे वय 70 वर्षे करण्याची शिफारस मा.उच्च न्यायालयाने मान्य केली आहे, हे खरे आहे काय? असा प्रश्न विचारला असता त्यास "अंशत: खरे आहे" अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे या 448 जागा खरोखरच रिक्त आहेत काय ? पुढे आपण म्हटले आहे की, मराठा आरक्षणास मा.उच्च न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. मराठा आरक्षणाला व मुस्लिम समाजाला नोकरी व शिक्षणामध्ये आरक्षण देण्याला देखील न्यायालयाने स्थगिती दिली आहे काय ? आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.1778

श्री.किरण पावसकर...

लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, सन 2010 मध्ये अध्यापकाचे निवृत्तीचे वय 58 वरून 62 करण्यात आले व पुन्हा सन 2014 मध्ये 62 वरून 63 वर्षे करण्यात आले. कौन्सिल ऑफ इंडियाच्या शिफारशीला अध्यापक संघटनेने विरोध केला आहे हे खरे आहे काय, असल्यास यासंबंधी शासनाची भूमिका काय आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी रिक्त पदे कोणकोणती आहेत असा प्रश्न विचारलेला आहे. यात प्राध्यापकांची 95, सहयोगी प्राध्यापकांची 331, सहायक प्राध्यापकांची 228 अशी 654 पदे रिक्त आहेत. पूर्वी सदर रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून भरण्यात येत होती. तथापि, मधल्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये घोटाळा झाला त्यामुळे ही पदे भरण्यास विलंब झाला. पर्यायाने रिक्त पदांची संख्या वाढली. ही पदे रिक्त राहिली असती तर त्याचा परिणाम वैद्यकीय महाविद्यालयांवर होणार होता. एवढेच नव्हे तर आपल्या जागा देखील कमी झाल्या असत्या. त्यामुळे सहायक प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी ती पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेतून माननीय मंत्रिमंडळाच्या मान्यतेने काढून घेण्यात आली. त्यांची निवड आपण निवड मंडळे स्थापून केली. वैद्यकीय महाविद्यालयांच्या प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांच्या 50 टक्के जागा सरळसेवा संवर्गातून भरण्याचे ठरविले. त्यामुळे त्या जागा आता आपण लवकर भरू शकतो. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील 50 टक्के जागा ह्या राज्य पातळीवरील ज्येष्ठता सूची आणि बिंदू नामावली नुसार पदोन्नतीद्वारे भरल्या. आता पर्यंत या समिती मार्फत आपण 50 टक्के अध्यापकांची नियुक्ती केली आहे. मराठा व मुस्लिम आरक्षणासंबंधी अंतरिम आदेश आलेला आहे. अंतरिम आदेश देण्यापूर्वी ज्या जागा भरल्या आहेत त्यांना संरक्षण आहे. पण आता जागा भरायच्या असतील तर पूर्ण आदेश आल्यानंतर कार्यवाही करता येईल. मराठा आणि मुस्लिमांसाठी आरक्षणासंबंधी पूर्ण आदेश आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यासंबंधातील तयारी आम्ही करून ठेवलेली आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्यात शासकीय व खाजगी महाविद्यालये आहेत. अनेक ठिकाणच्या शासकीय महाविद्यालयांचा अनुभव असा आहे की, तेथे अनुभव घेऊन तयार झालेला प्राध्यापक वर्ग हा अधिक पगाराच्या आमिषाने खाजगी वैद्यकीय महाविद्याल्यात सातत्याने जात असतो. वैद्यकीय महाविद्यालयातील एकूण जागांची क्षमता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या जागा याचा विचार करता दरवर्षी शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये वाढ होत असल्याचे दिसून येते. तेव्हा ही 448 पदे केव्हा पर्यंत भरण्यात येणार आहेत, सदर रिक्त पदे भरताना न्यायालयामार्फत येणाऱ्या अडचणी गृहीत धरून वैद्यकीय महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणात कमतरता राहू नये म्हणून अधिकचे प्रशिक्षण बळ निर्माण करण्यासाठी शासन कालबद्ध कार्यक्रम तयार करणार आहे काय ? शिक्षणात कुठल्याही प्रकारची अडचण येऊ नये म्हणून व गुणवत्ता प्राप्त केलेले विद्यार्थी बाहेर पडण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एमपीएससीच्या घोटाळ्यानंतर त्यांच्या मार्फत रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया मधल्या काळात बंद करण्यात आली होती. त्यामुळे रिक्त पदांची संख्या वाढत गेली आहे. सदर पदे रिक्त राहिल्यामुळे गुणवत्तापूर्वक शिक्षण मिळण्यासाठी अडचण निर्माण झाली होती तरी देखील सहायक प्राध्यापक नेमण्याची प्रक्रिया सुरू होती. या महाविद्यालयातील प्राध्यापक, अध्यापक यांच्या नेमणुकीचा विचार करताना काही अडचणी देखील येत होत्या. आपल्या सेवा नियमामध्ये विभागीय संवर्गासाठी नियम होता. त्यात आपण सातत्याने बदल्या करत होतो म्हणून चांगले डॉक्टर सुद्धा येत नव्हते. आम्ही मंत्रिमंडळासमोर जाऊन विभागीय संवर्गासंबंधी जो नियम होता त्यामध्ये दुरूस्ती करून घेतली. जेणे करून त्या प्राध्यापकांना त्यांचा विभाग सोडून बदली करून दुसरीकडे जाता येणे शक्य नव्हते. तेथे अधिकाधिक शिक्षक मिळाले पाहिजेत, राहिले पाहिजत, शिक्षकांची कमतरता त्या महाविद्यालयांमध्ये पडता कामा नये अशी भूमिका आम्ही घेतली. पुढील दोन वर्षामध्ये यात जो बॅकलॉग आहे तो टप्प्याटप्प्याने भरण्यात येईल. त्यासाठी आवश्यक ते बदल आणि अधिकार मंत्रिमंडळामार्फत घेणार आहोत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5

ता.प्र.क्र.1778...

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मूळ विषय हा 448 पदे भरण्यासंबंधातील आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, मराठा आणि मुस्लिम समाजाला आरक्षण देण्यासाठी न्यायालयाने स्थगिती दिली आहे. मराठा आरक्षणाला मुंबई उच्च न्यायालयाने पूर्णत: स्थगिती दिलेली आहे. मुस्लिम समाजाला शिक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे शासन न्यायालयाचे अंतिम आदेश येई पर्यंत थांबणार आहे काय ? मुस्लिमांना शिक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण लागू करण्यात आले आहे. तो अध्यादेश व्यपगत होण्याच्या आधी बिल आणून ही पदे शासन भरणार आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, न्यायालयाच्या अंतरिम आदेशावर कुठल्याही प्रकारचा कायमस्वरूपी निर्णय घेता येणार नाही. मुस्लिमांना शिक्षणामध्ये 5 टक्के आरक्षण द्यावे किंवा कसे यासंबंधी देखील न्यायालयाचे अंतिम आदेश येणार आहेत. मुस्लिम समाजाला 5 टक्के नोकरीमध्ये आरक्षण देण्याला न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मुस्लिम व मराठा समाजाला आरक्षण असे आपण रेकॉर्ड केल आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दोन्ही प्रश्न मिळून एक प्रश्न विचारण्यात आलेला आहे. मी ॲडिशन माहिती अशी देत आहे की, अंतरिम आदेशावर काहीच कार्यवाही करता येत नाही. कार्यवाही करायची ठरवली तर ती शिक्षणासंबंधी करता येईल. नोकरीसाठी करता येणार नाही. त्यामुळे ते येथे लागू होत नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, रिक्त जागांचा प्रश्न महत्त्वाचा असला तरी या प्रश्नाचा खरा रोख हा आरक्षणाशी संबंधित आहे. हा प्रश्न मराठा व मुस्लिम आरक्षणाशी निगडित आहे. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशामध्ये मराठा समाजाला आरक्षण नाकारण्यात आले आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु, मुस्लिम समाजाचे शिक्षणासाठीचे आरक्षण मा.न्यायालयाने कायम ठेवले आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

ता.प्र.क्र. : 1778......

श्री. भाई जगताप.......

आरक्षणाच्या संदर्भात आपला एकूण गाभा मुस्लीम आणि मराठा आरक्षणाला न्याय देण्याच्या संदर्भात होता. मी उपस्थित केलेला मुद्दा या प्रश्नाशी निगडित आहे. माझी माहिती अशी आहे की, अध्यादेशाची कालमर्यादा संपण्याअगोदर आपण जे बिल आणणार आहात त्या बिलामध्ये दोन्ही समाजाच्या आरक्षणाची संकल्पना तशीच ठेवली जाणार आहे काय ? यासंदर्भातील तशा प्रकारचे बिल आणून त्याचे या सभागृहात कायद्यामध्ये रूपांतर केले जाणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय केवळ वैद्यकीय शिक्षणापुरता लागू नसून हा विषय राज्याच्या धोरणाच्या संदर्भातील आहे. त्यामुळे माझ्या विभागाकडून जे बिल येणार आहे त्या बिलामध्ये आपण सांगितलेल्या गोष्टींचा अंतर्भाव राहणार आहे की, नाही यासंदर्भात मी काही सांगितले तर ते अपूर्ण राहण्यासारखे होईल. या प्रश्नाला अनुलक्षून मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भातील तरतुदी आम्ही पूर्णपणे अंमलात आणू एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मराठा आणि मुस्लीम आरक्षणाच्या संदर्भात प्रश्न असला तरी राज्यातील महाविद्यालयांमध्ये फार मोठया प्रमाणात शासकीय अध्यापक आणि प्राध्यापकांची पदे रिक्त आहेत हे आपल्या सर्वांना मान्य करावेच लागेल. माझा मंत्री महोदयांना असा प्रश्न आहे की, आपल्याकडे 364 च्या ऑर्डवर जे प्राध्यापक आणि अध्यापक काम करीत आहेत त्यांना आपण कायम करणार आहात काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सदर अध्यापक आणि प्राध्यापक शासनाच्या निकषात बसत असतील तर त्यांना नक्की कायम करण्यात येईल. अध्यापक आणि प्राध्यापकांनी 10 वर्षे काम केले असले तरी त्यांनी एमपीएससी मार्फत सेवेत यावयास पाहिजे होते. एमपीएससी मध्ये उमेदवार मिळाले नसल्यामुळे ते या पध्दतीने आले आहेत. आम्ही त्यांना कायम केल्यानतर हा विषय पुन्हा कोर्टात गेला तर जास्त नुकसान होईल. त्यामुळे निकषात बसून काम करणे जास्त संयुक्तिक होईल. त्यामुळे हा विषय मंत्रिमंडळासमोर नेऊन त्यात काही बाबी वेगळया करून घेतल्या असून जेणेकरून अशा लोकांना आपण सामावून घेऊ शकू.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 1778......

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी एक बाब स्पष्ट केली आहे की, एमपीएससीमध्ये घोटाळा झाल्यापासून ही पदे रिक्त आहेत. खरे म्हणजे अनेक वर्षापासून ही पदे रिक्त आहेत. मराठा आरक्षणाला तसेच मुस्लीम आरक्षणाला किती पर्सेंटेज द्यावयाचे यासंदर्भात कमाल मर्यादा ठरली आहे. हे दोन्ही पर्सेंटेज अबाधित राखून उरलेले आरक्षण वजा करुन त्या जागेवर पदे भरण्याची प्रक्रिया शासन सुरु करणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आरक्षणाच्या संदर्भातील निकाल 5 जानेवारी, 2015 रोजी येणार आहे. निकाल कसाही आला तरी आम्ही दोन्ही बाजूने तयारी करुन ठेवली आहे. आता फक्त 10 दिवसांचा प्रश्न शिल्लक आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, न्यायालयीन प्रक्रिया सुरुच राहत असते. समजा मराठा समाजाचे आरक्षण 15 टक्के असेल व मुस्लीम समाजाचे आरक्षण 5 टक्के असेल तर एकंदर आरक्षण 20 टक्के होईल त्यामुळे 450 च्या 20 टक्के म्हणजे 90 जागा आणि उरलेल्या जागा अधिक होणारच नाही. वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदे रिक्त राहणे म्हणजे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर अन्याय होतो व हा अन्याय गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. त्यामुळे हा अन्याय दूर होण्यासाठी असलेले आरक्षण कमाल मर्यादेमध्ये ठेवून यासंदर्भातील प्रक्रिया आपण तातडीने सुरु करणार आहात काय ?

श्री. विनोद तावडे : होय.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे जिल्हयातील माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची भरती करणेबाबत**

**(३) * २४६६ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक भरती वरील बंदी राज्य शासनाने उठवली असूनही अद्याप शिक्षकांची भरती होत नसल्याचे बाब माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शिक्षकांची भरती लवकरात लवकर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२), (३) व (४) संचमान्यतेनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांचे समायोजन करण्याची कार्यवाही सुरु आहे. समायोजनानंतर शिल्लक राहिलेली रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येईल.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक भरती संच मान्यतेनुसार करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले आहे. त्यामुळे अद्याप किती शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे, समायोजनानंतर शिल्लक राहिलेली रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय जिव्हाळयाचा असल्यामुळे या अधिवेशनात तो सातत्याने आलेला आहे. पुणे जिल्हयात सन 2013-2014 च्या संच मान्यतेनुसार 1238 शिक्षक अतिरिक्त झाले असून त्यापैकी 1222 शिक्षकांचे समायोजन करण्यात आलेले आहे. उर्वरित 16 अतिरिक्त शिक्षकांचे समायोजनाची कार्यवाही सुरु आहे. हे सर्व झाल्यानंतर रिक्त जागा 340 असणार असून ही पदे नियमित पध्दतीने भरली जातील.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, दि. 2 मे 2012 रोजीच्या शासन निर्णयानुसार भरती प्रक्रियेला बंदी करण्यात आली होती. ही भरती प्रक्रिया मुंबई वगळता सर्व ठिकाणी होती. दि.2 मे,



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2466.....

श्री. रामनाथ मोते .......

2012 पासून मुंबई वगळता राज्यातील सर्व भागातील माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेत शिक्षकांची भरती करण्यास बंदी होती. माझा प्रश्न थोडा वेगळा असला तरी मी विचारु इच्छितो की, एका बाजूला भरती करण्याची बंदी असतांना दुसऱ्या बाजूने या राज्यात शेकडो शिक्षकांना संबंधित शिक्षण अधिकाऱ्यांनी, शिक्षण उपसंचालकांनी संस्था चालकांशी संगनमत करुन लक्ष्मी दर्शन करुन शिक्षकांच्या नियुक्त्यांना मान्यता दिल्या होत्या. त्यामुळे संबंधितांवर शासन काही कारवाई करणार आहे काय ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मोते साहेबांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी निगडित नसला तरी सन्माननीय सदस्य जी काही माहिती देत आहेत ती खरी समजून कार्यवाही करणे आवश्यक असते. त्यामुळे यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, यामध्ये जे दोषी असतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, शिक्षक भरतीवरील बंदी सुरु आहे काय, जर शिक्षक भरतीवरील बंदी उठवली असेल तर शिक्षक भरती करण्यासाठी एवढा विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्यावेळी संच मान्यता झाली त्यावेळी ज्या जागा रिक्त होत्या त्या रिक्त जागांचे समायोजन केल्यानंतर ज्या जागा रिक्त राहतात अशा जागा भरण्याची प्रक्रिया असते. त्यामुळे समायोजन पूर्ण होण्यासाठीचा जो वेळ आहे तो लागणारच आहे. सन्माननीय सदस्य श्री. तटकरे साहेबांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या संदर्भात उल्लेख केला होता तसाच प्रकार या ठिकाणी सुध्दा आहे. मुलांनी प्रवेश घेतल्यानंतर संच मान्यता दिली जाते. संच मान्यता झाल्यानंतर शिक्षक जानेवारीपासून शिकवण्यास सुरुवात करतो. संच मान्यतेलाही प्रक्रिया आहे. त्यामुळे ही बाब द्विवार्षिक केली पाहिजे का यासंदर्भात आमचा विचार सुरु आहे. शिक्षक जर जानेवारीत शिकवण्यास सुरुवात करीत असतील तर एका अर्थाने हे विद्यार्थ्यांचे नुकसानच आहे. त्यामुळे ज्या जागा रिक्त राहतात त्यासंदर्भात आपल्याला उत्तर शोधावे लागणार असून त्यासंदर्भात

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 2466.....

श्री. विनोद तावडे .......

शासन विचार करीत आहे. त्यामुळे संच मान्यता वेळेत कशी होईल व संच मान्यता वेळेत होणार नसेल तर मागच्या वर्षीच्या संच मान्यतेवर जी काही प्लस-मायनस बाब असेल ती पुढील वर्षी दिली पाहिजे काय अशी काही दुरस्ती करावी लागली तर ती आपल्याला करावी लागेल. यामध्ये विद्यार्थ्यांचे एका वर्षाचे नाही तर आयुष्याचे नुकसान होत असते. त्यामुळे शासन या विषयाच्या संदर्भात नक्की विचार करेल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, हा प्रश्न पुणे जिल्हयातील माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक भरतीशी निगडित असला तरी ही परिस्थिती संपूर्ण राज्यात सारखीच आहे. त्यामुळे यासंदर्भात मी मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारु इच्छितो की, संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षक भरती प्रक्रिया आपण लवकरात लवकर सुरु करणार आहात काय ?

यानंतर श्री. अजित ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2466...

प्रा.जोगेंद्र कवाडे...

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान थांबविण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षकांची भरती प्रक्रिया गतिमान करण्याची आावश्यकता आहे अणि त्यांनी सूचना केल्याप्रमाणे ती प्रक्रिया गतिमान करण्यात येईल.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांच्या आगाऊ वेतनवाढीबाबत**

**(४) * ८४० श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य व राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त तसेच जिल्हा स्तरावरील गुणवंत शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांना आगाऊ वेतनवाढी देण्याची तरतूद यापूर्वी होती, हे खरे आहे काय,
(२) राज्य / राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना दोन वाढीव वेतनवाढी ऐवजी १ लाख रुपये एक रकमी देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ४ सप्टेंबर, २०१४ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हा स्तरावरील प्राथमिक शिक्षकांना एक वेतनवाढी ऐवजी रोख रक्कम देण्याबाबत अद्यापही निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, प्राथमिक शिक्षकांसाठी निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,
(५) सन २००९-१० ते २०१२-१३ पर्यंतच्या पुरस्कार प्राप्त शिक्षकांनासुध्दा सुधारित निर्णयाचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे :** (१) होय खरे आहे.
(२) होय खरे आहे.
(३) व (४) कार्यवाही सुरु आहे.
(५) व (६) याबाबतची आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून गुणवंत शिक्षकांना शिक्षक दिनाच्या दिवशी "आदर्श शिक्षक" किंवा "गुणवंत शिक्षक " हा पुरस्कार दिला जातो. या संदर्भात राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेतला होता आणि तो अस्तित्वातही होता. या धोरणानुसार ज्या शिक्षकांना राज्य पुरस्कार आणि राष्ट्रीय पुरस्कार दिला जातो अशा शिक्षकांना दोन आगाऊ वेतनवाढीचा लाभ देण्यात येत होता. सहावा वेतन आयोग लागू झाल्यापासून आदर्श शिक्षक आणि गुणवंत शिक्षक पुरस्कार मिळविणाऱ्या शिक्षकांना या वेतनवाढी देण्याचे बंद केले आहे. मागील चार वर्षापासून हा प्रश्न मी येथे उपस्थित करीत आहे आणि ते आपणास माहीत आहे. आता शासनाने सप्टेंबर, 2014 रोजी धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे की, दोन वेतनवाढी देण्याचे रद्द करुन त्या ऐवजी एक रकमी एक लाख रुपये देण्यात येतील. या आदेशाच्या शेवटच्या

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 840....

श्री.रामनाथ मोते....

परिच्छेदात नमूद केलेले आहे की, हा आदेश, आदेशाच्या दिनांकापासून लागू होईल. सन 2014 मध्ये ज्या शिक्षक्कांना असे पुरस्कार मिळाले त्यांच्यासाठी हा आदेश लागू झाला. माझा प्रश्न आहे की, सन 2009-2010 ते 2012-2013 या कालावधीत ज्या शिक्षकांना पुरस्कार मिळाले त्यांना याचा अजून कोणताही लाभ मिळालेला नाही. शासनाने उत्तर दिलेले आहे की, या संदर्भात कार्यवाही सुरु आहे. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. यामध्ये तांत्रिक बाब अशी आहे की, आपण हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करणे आवश्यक होते. शासनाने सप्टेंबर, 2014 मध्ये जो आदेश काढलेला आहे तो पूर्वलक्षी प्रभावाने सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना लागू करण्यात येईल काय, आणि त्या संदर्भातील निर्णय आठ दिवसांत घेण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, केंद्र शासनाकडून दरवर्षी 29 शिक्षकांना "आदर्श शिक्षक" शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. राज्य स्तरावर 106 शिक्षकांना "आदर्श शिक्षक पुरस्कार" देण्यात येतो. जे शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षणा व्यतिरिक्त वेगळ्या प्रकारचे शिक्षण देतात, विद्यार्थ्यांची अभ्यासामध्ये रुची वाढावी म्हणून आपल्याला दिलेल्या कामापेक्षा अधिकचे काम करतात अशा शिक्षकांना "आदर्श शिक्षक"पुरस्कार देण्यात येतो. अशा आदर्श शिक्षकांना वाढीव वेतनवाढी देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. सहाव्या वेतन आयोगामध्ये अशाप्रकारच्या दोन वेतनवाढी रद्द करण्यात आल्या आहेत आणि हा निर्णय सर्व विभागांसाठी लागू केलेला आहे. सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात हकीम समिती नेमण्यात आली होती, त्या समितीने काही वेगळे पर्याय सुचविले आहेत त्याचा सामान्य प्रशासन विभागामार्फत विचार केला जात आहे. सर्व विभांगासाठी जो निर्णय होईल तो शिक्षण विभागासाठी लागू होईल. सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वाढीव वेतनवाढ दिली नाही. दरम्यानच्या काळात पुरस्कार प्राप्त शिक्षकांना एक लाख रुपये, पन्नास हजार रुपये देण्याचा निर्णय झाला. पण मधल्या काळात ज्या शिक्षकांना "आदर्श शिक्षक" पुरस्कार मिळाला त्यांना याचा लाभ मिळालेला नाही. त्या शिक्षक्कांना देखील हा लाभ देण्यात येईल. जो काही बॅकलॉग आहे तो पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न करु ..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 840....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मागील पाच-सहा वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये शिक्षक प्रतिनिधी हा प्रश्न उपस्थित करीत आहेत. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, मंत्री महोदय सभागृहात आश्वासन देतात, परंतु त्या आश्वासनाची पूर्तता होत नाही. माझा प्रश्न आहे की, हे शैक्षणिक वर्ष संपण्यापूर्वी या संदर्भातील आदेश काढण्यात येतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, यामध्ये कधी देण्याचा, काय देण्याचा प्रश्न नाही तर जे देणे आहे ते स्वाभाविकपणे देण्याची सरकारची जबाबदारी होती. आम्ही ते तातडीने देण्याचा प्रयत्न करु. मी या ठिकाणी सांगू इच्छितो आदर्श शिक्षक पुरस्काराच्या घोषणा 26 जानेवारीला होतात आणि तो पुस्कार 5 सप्टेंबरला दिला जातो. हा पुरस्कार देण्यामध्ये इतका उशीर लागतो तर त्या संदर्भातील लाभ देण्यास थोडा वेळ लागेल की नाही ? 26 जानेवारीला प्रजासत्ताक दिन असतो आणि तेवढे औचित्य सोडले तर बाकी काही नाही. त्या दिवशी राष्ट्रपती पदक दिले जाते, पद्मश्री, पद्मभूषण पुरस्कार दिले जातात म्हणून त्या दिवशी पुरस्कार घोषित केले जात असतील. मला वाटते की, हा पुरस्कार 5 सप्टेंबर रोजी दिला जाणार असेल तर 15 ऑगस्ट रोजी शिक्षक पुरस्कार घोषित करावेत. तेव्हा या वर्षापासून सर्व पुरस्कार 15 ऑगस्टला घोषित करुन ते पुस्कार 5 सप्टेंबरला देण्यात येतील.

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, दिनांक 5 सप्टेंबर, 2006 ते 5 सप्टेंबर, 2013 या कालावधीत ज्या शिक्षकांना राज्य आणि राष्ट्रीय पुरस्कार मिळाले त्यांना दोन आगाऊ वेतनवाढी देण्यापासून वंचित ठेवण्यात आले. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अपील दाखल करण्यात आले आहे. त्यावेळी सरकारी वकिलाने कमिटमेंट केले की, आर्थिक तरतूद करेपर्यंत आम्हाला वेळ द्यावा आणि न्यायालयाने सहा महिन्याचा वेळ दिला. माझा प्रश्न आहे की, या सहा महिन्याच्या कालावधीत निर्णयाच्या दिनांकापासून दोन आगाऊ वेतनवाढी देण्याचा निर्णय शासन घेणार काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी येथे जे सांगितले ते वर्तमानपत्रात आलेल्या बातमीवर सांगितलेले आहे. मला देखील ती माहिती मिळाली असून मी ती माहिती तपासत आहे. आम्ही विभागाला शपथपत्र दाखल करण्यास सांगितले होते त्यामध्ये एक लाखाचा विषय दिला होता. वर्तमानपत्रातील बातमी तपासून पाहण्यात येईल.

---------

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**क्रीडा धोरणातील शिफारशीची अंमलबजावणी होण्याबाबत**

**(५) * २४२१ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने गेल्या चार वर्षापासून जाहिर केलेल्या क्रिडा धोरणानुसार जिल्हास्तरीय आंतरशालेय स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रत्येक खेळा मागे रु.२५०० ऐवजी १५ हजार रुपये तर तालुका स्तरावरील स्पर्धांच्या प्रत्येक खेळासाठी रु.५०० ऐवजी १०,००० देण्याची शिफारस केली असतानाही अद्यापही त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे २५०० रुपयातच पंचाचे मानधन, स्पर्धेची तयारी, क्रिडा सामुग्री व इतर बाबी पूर्ण करणे दुरापास्त झाले आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, व त्या शिफारशीची तातडीने अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) क्रीडा धोरणातील शिफारशींची अंमलबजावणी होण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१), (२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासंदर्भातील प्रचलित अनुदान दरात वाढ करण्याबाबतचे शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, चार वर्षापूर्वी शासनाने क्रीडा धोरण जाहीर केले होते. जिल्हास्तरीय आंतरशालेय स्पर्धांच्या आयोजनासाठी प्रत्येक खेळामागे पाचशे रुपये, हजार रुपये आणि अडीच हजार रुपये देण्यात येत होते. नवीन क्रीडा धोरणामध्ये ही रक्कम 15 हजार रुपयांपर्यंत वाढवावी अशी शिफारस केलेली आहे. या क्रीडा धोरणामध्ये असे अनेक विषय आहेत. माझा प्रश्न आहे की, शासन या क्रीडा धोरणाची अंमलबजावणी केव्हा करणार आहे ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राज्य शासनाने जे क्रीडा धोरण बनविले होते त्यामध्ये एकूण 57 शिफारशी करण्यात आल्या होत्या. या सर्व शिफारशी लागू करण्यासाठी 250 कोटी रुपयांची आवश्यकता होती. आपण 250 कोटी रुपयांची तरतूद केल्यास खऱ्या अर्थाने क्रीडा धोरणाची पूर्तता होऊ शकते. त्या शिफारशींपैकी 25 शिफारशींबाबत निर्णय निर्गमित केलेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 2421....

श्री.विनोद तावडे....

असून 5 शिफारशींबाबत कार्यवाही झालेली आहे. 250 कोटी रुपयांपैकी क्रीडा विभागाकडे 18 ते 20 कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, तालुका स्तरावरील क्रीडा प्रकाराकरिता 500 रुपयांवरुन 10 हजार रुपये, जिल्हा स्तरावर 2500 रुपयांवरुन 15 हजार रुपये केले आहेत.

यानंतर श्री.बोर्डे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.2421....

श्री.विनोद तावडे....

क्रिकेट, फुटबॉल, जलतरण, कबड्डी आणि खो-खो हे क्रीडा प्रकार सोडून, 30 हजारामध्ये कबड्डी व खो-खो हे क्रीडा प्रकार समाविष्ट केले आहेत. तसेच राज्य स्तरावर प्रत्येक वयोगटात संयोजनासाठी विभागीय स्तरावरील स्पर्धांमध्ये अडीच हजार रुपयांवरुन 15 हजार रुपये, नवीन तरतुदीनुसार राष्ट्रीय स्तरावर 10 लाख रुपये, त्यामध्ये गणवेश 150 रुपयांवरुन 500 रुपये, ट्रॅक सूट 500 रुपयांवरुन 1000 रुपये आणि साडीचा खर्च अडीच हजार रुपयांवरुन 10 हजार रुपये इतका वाढविण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला आहे आणि तो लागू करणार आहोत.

श्रीमती दिप्ती चवधरी : माननीय मंत्र्यांनी असे सांगितले की, या कामी तरतूद नाही. या निमित्ताने विचारु इच्छिते की, क्रीडा धोरणाची अंमलबजावणी करावयाची असेल तर येणाऱ्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : महोदय, क्रीडा विभागाच्या बजेटमधून नक्की तरतूद केली आहे आणि पुढेही करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : महोदय, हा अतिशय संवदेनशील प्रश्न आहे. कारण तरुण पिढी शालेय शिक्षणापासून थेट महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेते. क्रीडा धोरणाच्या बाबतीत शासनाने गेल्या अनेक वर्षांपासून अधांतरी असलेल्या विषयाच्या बाबतीत निर्णय घेतला आहे. एके काळी शालेय स्पर्धांसाठी खेळाडूला 500 रुपये देण्यात येत होते. लहान मुलांच्या बाबतीत "catch them young" या संकल्पनेनुसार काम केले जाते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, 500 रुपयात "catch them young" ही संकल्पना कशी पूर्ण होईल ? शासनाच्या उद्दिष्टाबद्दल आमच्या मनात शंका नाही. हे सुध्दा खरे आहे की, धोरणांची अंमलबजावणी करताना आर्थिक प्रक्रिया सुध्दा लक्षात घेतली पाहिजे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, एकंदरीत 57 तरतुदी लागू करण्यासाठी 250 कोटी रुपये लागतील. वास्तविक पाहता हा विषय शालेय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याबातचा आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, शालेय स्तरापासून क्रीडा स्पर्धांची सुरुवात होत असल्यामुळे शासन त्या अनुषंगाने निर्णय घेईल काय ? कारण 20 कोटी

..2..

ता.प्र.क्र.2421....

श्री.भाई जगताप....

रुपये मिळाल्यानंतर 57 पैकी 25 क्रीडा प्रकार लागू केल्याचे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. माझा प्रश्न असा आहे की, शालेय क्रीडा स्पर्धा हा मूलभूत पाया आहे. त्यामुळे या संदर्भात क्रीडा धोरणाच्या संदर्भातील शिफारशी प्रथम लागू करणार काय आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या निधीची तरतूद वित्त विभागाकडून करण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : महोदय, खेळाडू पुढे जाऊन राज्य, राष्ट्रीय, एशियाड किंवा ऑलिम्पिक स्पर्धेमध्ये भाग घेत असेल तर त्यांना प्राधान्य द्यावे लागते. दुसरे म्हणजे शालेय किंवा महाविद्यालयीन खेळाडू अगोदरच आयडेंटीफाय करुन त्यांच्या प्रशिक्षणावर खर्च करावा लागतो. त्यामुळे या दोन्हींचा समतोल साधून क्रीडा धोरणानुसार आर्थिक तरतूद करण्यात येईल.

श्री.श्रीकांत देशपांडे : महोदय, जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर क्रीडा स्पर्धा आयोजित केल्या जातात. परंतु शाळेतील विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धेच्या ठिकाणी जाण्यासाठी पैसाच उपलब्ध नसतो. अक्षरश: शिक्षक स्वत:च्या खिशातून वर्गणी काढून विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांच्या ठिकाणी घेऊन जातात. क्रीडा स्पर्धांना फार महत्त्व आहे. त्यामुळे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेमध्ये ज्या शाळा भाग घेतात त्यांना शिक्षण विभागाकडून आवश्यक तो पैसा उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? तसेच दुसरी बाब अशी की, क्रीडा प्रबोधिनीमध्ये अनेक वर्षापासून अनेक कर्मचारी कंत्राटी पध्दतीने काम करीत आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून त्यांची पुनर्नियुक्ती केलेली नाही. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, क्रीडा प्रबोधिनीमध्ये काम करीत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुन्हा कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या सर्वांच्या मनात स्वाभाविकपणे क्रीडा प्रकारांना आर्थिकदृष्ट्या जेवढे प्राधान्य द्यावयास पाहिजे तेवढे दिले नाही, किंबहुना देऊ शकत नाही, याबद्दल खंत आहे. आताच कशा प्रकारची वाढ करण्यात आली हे मी सांगितले आहे. त्या बाबत आर्थिक तरतूद म्हटल्यानंतर लगेच 7-8 कोटी रुपये द्यावे लागतात. क्रीडा विभागाची माहिती घेत असताना असे निदर्शनास आले की, खेळाडूला दिवसाला 45 रुपये भत्ता मिळतो. कोणताही खेळाडू बालेवाडीला गेला तर तो पुणे स्टेशनहून बालेवाडीपर्यंत रिक्षाने 45 रुपयांमध्ये

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2421....

श्री.विनोद तावडे...

पोहोचू शकत नाही. कारण रिक्षाने पुणे स्टेशनपासून बालेवाडीपर्यंत जाण्यासाठी 125 रुपये लागतात. वास्तविक पाहता 45 रुपयात काही भागू शकत नाही. त्यामुळे या सर्व गोष्टींचा विचार करुन क्रीडा प्रकार थोडे कमी झाले तरी चालतील, पण खेळाडूंना पुरेसा भत्ता मिळण्यासाठी अधिकची तरतूद करण्याचा राज्य सरकारचा नक्कीच प्रयत्न राहील.

-------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई विद्यापीठाने अभियांत्रिकी महाविद्यालयांना संलग्नता देणेबाबत**

**(६) * २५१३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारित्या येणाऱ्या ५० हून अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांनी संलग्नतेसाठी आवश्यक ती फी मुंबई विद्यापीठाकडे सन २०१०-११ पासून जमा करूनही मुंबई विद्यापीठाने संलग्नता समितीची नियुक्त न केल्याने अभियांत्रिकी महाविद्यालयातील सोयीसुविधांची चौकशी करून संलग्नता देण्यात न आलेल्या महाविद्यालयातील प्रवेशापासुन विद्यार्थ्यांना वंचित रहावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुंबई विद्यापीठातील संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) याबाबत संचालक उच्च व तंत्रशिक्षण यांनी कुलगुरू मुंबई विद्यापीठ यांना पाठविलेल्या पत्राचा खुलासा करण्यात आला आहे काय,

(५) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे ?

**श्री. विनोद तावडे :**

(१) विद्यापीठाने अभियांत्रिकी महाविद्यालयांना त्या त्या शैक्षणिक वर्षात संलग्नता दिलेली आहेत. एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उदभवत नाही.

(४) तंत्रशिक्षण संचालनालयाचे निर्देश विचारात घेऊन शैक्षणिक वर्ष २०१४-१५ मध्ये ५६ अभियांत्रिकी महाविद्यालयांना तात्पुरती संलग्नता देण्यात आली आहे.

(५) शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये ५० पेक्षा जास्त महाविद्यालयात स्थानिक चौकशी समिती पाठविण्यात आलेल्या आहेत. उर्वरित महाविद्यालयात तंत्रशिक्षण संचालनालयाच्या निर्देशानुसार स्थानिक चौकशी समित्या वेळेत पाठविण्यात येतील.

ॲड.हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, प्रत्येक विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांना संलग्नता देण्याचे काम हे संबंधित विद्यापीठांचे असते. महाविद्यालयांना संलग्नता देण्यासाठी विद्यापीठाकडून संलग्नता समिती नेमण्यात येते. परंतु मुंबई विद्यापीठामध्ये जवळजवळ 2010 पासून संलग्नता समितीच नेमण्यात आली नाही. त्यामुळे मुंबई विद्यापीठाच्या अखत्यारीत येणाऱ्या 50 पेक्षा अधिक अभियांत्रिकी महाविद्यालयांनी संलग्नता मागितल्यानंतर सुध्दा त्यांना संलग्नता देण्यात आली नाही. तथापि, अशा परिस्थितीत कॅगकडून अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेत या

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ KTG/ पूर्वी श्री.अजित.... 13:00

ता.प्र.क्र.2513....

ॲड.हूस्नबानू खलिफे.....

महाविद्यालयांना स्थान देण्यात आले आणि तद्‌नंतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, 2010 पासून संलग्नता समितीच नेमली नसल्यामुळे या महाविद्यालयांना संलग्नता कोणी व कशाच्या आधारे दिली ? संलग्नता नसलेल्या महाविद्यालयातून मिळालेली पदवी कायदेशीर आहे काय ? तसेच दुसरी बाब अशी की, प्रश्न क्रमांक 1 व 4 च्या लेखी उत्तरामध्ये तफावत असल्याचे दिसून येते. मुंबई विद्यापीठाने 2010 पासून महाविद्यालयांना संलग्नता दिलेली नव्हती. परंतु 2014-2015 मध्ये 56 अभियांत्रिकी महाविद्यालयांना तात्पुरती संलग्नता दिली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, 2010 पासून संलग्नता समिती अस्तित्वात नसताना, 56 महाविद्यालयांना संलग्नता कोणी आणि कशाच्या आधारावर दिली, तसेच संलग्नता नसलेल्या महाविद्यालयातून जे विद्यार्थी परीक्षेला बसले त्या विद्यार्थ्यांची पदवी कायदेशीर आहे काय ?

श्री.विनोद तावडे : महोदय, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बाबतीत एआयसीटीच्या नियमांची विशेषत: महानगरातील महाविद्यालयांना पूर्तता करणे शक्यच नाही. महाविद्यालयात अभ्यासक्रम सुरु केल्यानंतर त्यांना 5 वर्षांनी फायनल ॲफीलेशन मिळते. अशाप्रकारे ही महाविद्यालये सुरु झाली आहेत. एआयसीटीच्या नियमानुसार अनेक महाविद्यालयांकडे स्वत:ची आवश्यक तेवढी जागा नाही. अनेक ठिकाणी क्वॉलिफाईड प्राचार्य नाहीत. तरी सुध्दा ही महाविद्यालये सुरु आहेत. ही महाविद्यालये मोठी असल्यामुळे त्या ठिकाणी शिक्षण चांगले सुरु आहे. तात्पुरती संलग्नता करण्यासाठी स्टॅटयुटनुसार मान्यता असल्यामुळे, त्यानुसार कामकाज चालते. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेच्या वेळी त्रास झाला होता काय ? या बाबतीत सांगू इच्छितो की, संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांनी या बाबतीत हरकत घेतली होती. परंतु तात्पुरत्या संलग्नतेच्या आधारे विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना या बाबतीत कसल्याही प्रकारचा त्रास नाही.

..6..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2513....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.हुस्नबानू खलिफे यांनी पॉईंटेड विचारले की, 2010 पासून मुंबई विद्यापीठामध्ये संलग्नता समितीच अस्तित्वात नव्हती. 2014-15 मध्ये तात्पुरती संलग्नता समिती गठीत केली होती. 2010 ते 2014 या कालावधीत संलग्नता समिती अस्तित्वात नसताना महाविद्यालयांना संलग्नता दिली होती काय, तसेच ज्या कालावधीपर्यंत महाविद्यालयांना संलग्नता नव्हती अशा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जी पदवी मिळाली ती ग्राह्य आहे की नाही ?

श्री.विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्या ॲड.हुस्नबानू खलिफे यांचा पदवी योग्य आहे की, नाही हा मुद्दा नाही.. मी सांगू इच्छितो की,

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महाविद्यालयाच्या संलग्नतेबाबत प्रश्न विचारलेला आहे. माननीय मंत्र्यांनी लेखी उत्तरात नमूद केले आहे की, 2014-15 मध्ये महाविद्यालयांना संलग्नता दिली. या निमित्ताने सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे की, 2010 ते 2014 या कालावधीत त्या महाविद्यालयांना संलग्नता नव्हती काय, महाविद्यालयांना संलग्नता नसल्यामुळे विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेली पदवी शासन ग्राह्य धरणार आहे की नाही ?

नंतर श्री.कांबळे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2513....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे व सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे या दोघांचेही प्रश्न वेगवेगळे आहेत. मी दोन्ही प्रश्नांची उत्तरे देतो. सन्माननीय सदस्या ॲड. हुस्नबानू खलिफे यांनी प्रश्न विचारला होता, त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, त्यातील विषय कोर्टात गेला होता. तो अतिशय योग्य आहे. विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल ॲडमिशनची प्रोसेस चालते. तात्पुरती संलग्न महाविद्यालये आहेत, त्यांना बारावी नंतर अभियांत्रिकीसाठी सेंट्रल ॲडमिशनची प्रोसेस चालते. त्यामध्ये ती महाविद्यालये घेतली जात नव्हती. तंत्र शिक्षण संचालनालय व विद्यापीठाशी चर्चा करून ती सुरू झाली. त्यामुळे विद्यार्थ्यांवर अन्याय झाला नाही. तात्पुरती संलग्न असलेल्या महाविद्यालयांतून प्राप्त झालेली डिग्री अधिकृत असते, त्या विद्यापीठाची असते. अफिलेशन तात्पुरते आहे आणि त्या आधारे डिग्री मिळाली तरी त्या विद्यार्थ्यांच्या डिग्रीवर कोणतीही आच येत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासाला पॉईंट ऑफ ऑर्डर उपस्थित करता येत नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन 2010-11 पासून संलग्नता समितीची नियुक्ती केली नाही, असा प्रश्न आहे. प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, संलग्नता दिलेली आहे. संलग्नता समिती त्यावेळी होती की नाही, हा मूळ प्रश्न आहे. सन 2014-15 मध्ये 56 महाविद्यालयांना संलग्ना दिली आहे. परंतु, सन 2010 ते सन 2014 या चार वर्षांत संलग्नता समिती अस्तित्वात नाही. त्यामुळे संलग्नता देण्यासठी तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सक्षम आहेत की विद्यापीठ सक्षम आहे ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक काऊन्सिल, सिनेट या माध्यमांतून ॲफिलेशन कमिटी अपॉईंट केली जाते. मधल्या काळात मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या, ॲकॅडेमिक काऊन्सिलच्या या समित्या गठीत झाल्या नव्हत्या. त्यातील हा कार्यकाल आहे. त्यावेळी रजिस्ट्रारच्या माध्यमातून डायरेक्ट टेंपररी ॲफिलेशन दिले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2513....

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, चुकीचे उत्तर रेकॉर्डवर येऊ नये. सिनेट, ॲकॅडेमिक काऊन्सिल या ॲक्चुअली वेगवेगळ्या बॉडीज आहेत. सिनेटचा यामध्ये काहीही संबंध येत नाही. माननीय मंत्र्यांनी रजिस्ट्रारचा उल्लेख केला. रजिस्ट्रारचाही यामध्ये संबंध येत नाही. बीसीवुडी डायरेक्टर कॉम्पिटंट ऑथोरिटी आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ॲकॅडेमिक काऊन्सिल, सिनेट या मॅनेजमेंट काऊन्सिलमधून अशा प्रकारची लोकल एन्क्वॉयरी कमिटी अपॉईंट केली जाते.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये. मॅनेजमेंट काऊन्सिलचा देखील यामध्ये काहीही संबंध येत नाही आणि सिनेटचाही काहीही संबंध येत नाही. फक्त ॲक्डेमिक काऊन्सिल व बीसीवुडी डायरेक्क्टर कॉम्पिटंट ऑथोरिटी आहेत.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे की, ॲक्डेमिक काऊन्सिलमधून ही समिती जाते. पण ॲक्डेमिक काऊन्सिल गठीत होण्यासाठी या पध्दतीची सर्व रचना आहे, ती सर्व प्रोसेस मी सांगत होतो. मधल्या काळात ते नसल्यामुळे ती समिती झाली नाही, तरीही तात्पुरती संलग्नता मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांची कुठेही अडचण झालेली नाही.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वैद्यकिय व पॅथॉलॉजी क्षेत्रामधील कट प्रॅक्टीसवर निर्बंध आणण्याबाबत**

**(७) * २४८३ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकिय व पॅथॉलॉजी क्षेत्रामधील कट प्रॅक्टीस बंद करण्यासाठी तज्ञांची समिती नेमून कट प्रॅक्टीसवर निर्बंध आणण्याची राज्यातील लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
तथापि, लोकप्रतिनिधीनी दिनांक २०.११.२०१४ रोजी शासनास या विषयी निवेदन दिले आहे.
(२) वैद्यकिय व्यवसायी विरुध्द कट प्रॅक्टीस संदर्भात तक्रार प्राप्त झाल्यास त्यांचे विरूध्द इंडियन मेडिकल कॉन्सिल (प्रोफेशनल कन्डक्ट एटीकेट ॅन्ड इथिक्स) रेग्युलेशन २००२ मधील प्रकरण ६ चे अनुक्रमांक ४ व ६ व महाराष्ट्र वैद्यकिय परिषद, अधिनियम १९६५ चे कलम २२ अन्वये कारवाई करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, सदर प्रश्नाचे उत्तर माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री देणार की माननीय आरोग्य मंत्री देणार, हा प्रश्न माझ्यासमोर निर्माण झाला आहे. दोन्ही माननीय मंत्री सभागृहात उपस्थित असल्यामुळे प्रश्नाला अधिक न्याय मिळेल, अशी मी आशा व्यक्त करतो. सर्वसामान्य रुग्ण दवाखान्यात ॲडमिट होतो त्यावेळी त्याला बिल अदा केले जाते, त्यामध्ये अनेक गरजेपेक्षा जास्त असलेल्या टेस्टचे देखील बिल असते. आज कट प्रॅक्टिसची परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी, माननीय केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती स्मृती ईराणी यांनी सुध्दा क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट संदर्भातील बिल आणण्याचे नियोजन केले आहे. पूर्वी सुध्दा या ॲक्टची राज्यात कार्यवाही करण्यास सुरुवात झाली होती. माझा प्रश्न आहे की, आपण हा ॲक्ट



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2483....

श्री. जयवंतराव जाधव ....

राज्यात लावणार आहात का, रूग्णांना माफक दरामध्ये सेवा मिळावी याकरिता राज्य शासन काही हॉस्पिटल्सचे ग्रेडिंग करणार आहे का, ज्या पध्दतीने काही हॉटेल्सचे ग्रेडिंग केले जाते त्या पध्दतीने हॉस्पिटल्सचे सुध्दा ग्रेडिंग करण्यात येणार आहे का ? अमुक एका हॉस्पिटलमध्ये गेल्यावर बायपास सर्जरीला अमुक एवढे बिल लागेल, ऑर्थोपेडिक सर्जरीकरिता एवढे बिल लागेल, असे ग्रेडिंग करण्याच्या संदर्भात राज्य शासन पावले उचलणार आहे का ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी समाजातील सामान्य माणसाचा अत्यंत ज्वलंत प्रश्न मांडला आहे. उपलब्ध असणाऱ्या कायद्याच्या आधारे या संदर्भात कारवाई करणे गरजेचे आहे. आरटीईमुळे सीबीएसई, आयसीएसई, अल्पसंख्याक शाळा येथे 25 टक्के प्रवेश देतात. तत्संदर्भात कारवाई करण्याची आयुधे कमी आहेत, तसेच या विषयामध्ये आहे. कट प्रॅक्टिस सर्रासपणे होताना दिसते. आपल्याला ती जाणवते देखील, पण त्या संदर्भात आयुधे कमी आहेत. कट प्रॅक्टिसच्या बाबतीत मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाकडे फक्त 3 तक्रारी आल्या. वैद्यकीय उपचारासाठी रूग्ण जातो, त्यावेळी तो एका वेगळ्या मानसिकतेमध्ये असतो, चिंतेत असतो. डॉक्टर सांगतात, तो ते स्वीकरतो आणि त्या पध्दतीने पुढील टेस्ट करीत असतो. मेडिकल काऊन्सिल ऑफ इंडियाच्या रूल्स नुसार, "A Physician shall not give, solicit, or receive nor shall he offer to give, solicit or receive any gift, gratuity, commission or bonus....." कट प्रॅक्टिस, कमिशन, ग्रॅच्युटी, बोनस या संदर्भात क्लिअर मेन्शन केले आहे. सोनोग्राफी टेस्टच्या संदर्भात रूग्णाला पाठवून संबंधित दोषीला पकडता येऊ शकते. परंतु, यामध्ये या पध्दतीने करायला गेलो तर असणाऱ्या आरोग्य सेवेवर परिणाम होईल. आजारापेक्षा औषध भयंकर होऊ नये. सन्माननीय सदस्यांनी म्हटल्याप्रमाणे कट प्रॅक्टिसला आळा बसला पाहिजे. त्यासाठी कायदेशीर गोष्ट करण्याची गरज आहे. सदर बाबतीत वैद्यकीय शिक्षण विभाग व आरोग्य विभाग मिळून नक्की विचार करेल. लोकांना अतिशय त्रास देणारा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी मांडला आहे. समाजाने 2-3 व्यवसायांना आपल्या नावाच्या अगोदर डिग्री

..5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.2483....

श्री. विनोद तावडे ....

लावण्याची परवानगी दिली आहे, त्यातील एक व्यवसाय डॉक्टरांचा आहे. इंजिनिअरला 90 टक्के मार्क्स मिळाले तरी तो आपल्या नावाच्या अगोदर इंजिनिअर लिहू शकत नाही. समाजाची मान्यता असावी लागते. कट प्रॅक्टिसेस होत असतील तर त्या रोखल्या पाहिजेत. शासनाकडून त्यासाठी आवश्यक आयुधांचा अंतर्भाव करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी हॉस्पिटल्सच्या ग्रेडिंगविषयी प्रश्न विचारला. एनएपीएच ही अमेरिकन संस्था असून त्या संस्थेमार्फत हॉस्पिटल्संना ग्रेडिंग दिले जाते. एनएपीएच संस्थेकडून हॉस्पिटलमध्ये काय पॅरामिटर्स आहेत या दृष्टीने ग्रेडिंग केले जाते. ऑर्थोपेडिक ऑपरेशनसाठी अमुक हॉस्पीटलसाठी एवढा दर किंवा दुसऱ्या सर्जरीसाठी अमुक दर असे काही निश्चित केला जाईल का, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. डॉक्टराच्या फी वर नियंत्रण आणता येईल या संदर्भात अनेक वेळा सभागृहात चर्चा झाली आहे. तशा प्रकारचा विचार केंद्र सरकारच्या पातळीवर सुरूआहे. केंद्र सरकारच्या पातळीवर असा विचार करून तसे राज्य सरकारकडे आले तर निश्चित याची अंमलबजावणी केली जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----

..6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कामकाजपत्रिकेवर 2 अंतिम आठवडा प्रस्ताव असल्याबाबत**

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कामकाजपत्रिकेवरील कामकाज ठरविण्याचा अधिकार आपला आहे, याची मला जाणीव आहे. आम्ही गेली 14-15 वर्षे सभागृहात काम करीत आहोत. आजच्या कामकाजपत्रिकेवर 2 अंतिम आठवडा प्रस्ताव दाखविण्यात आले आहेत. तसेच, आजच्या कामकाजपत्रिकेवर जवळपास 7 चर्चा ठेवण्यात आलेल्या आहेत. मला वाटते की, 2 अंतिम आठवडा प्रस्ताव आणण्याची प्रथा नाही. आपण त्यावर चर्चा करू शकता. कामकाजपत्रिकेवर 1 अंतिम आठवडा प्रस्ताव असला पाहिजे आणि तो सन्माननीय विरोधी पक्षनेते आणतात. कालची परिस्थिती वेगळी होती. आज सन्माननीय विरोधी पक्षनेते नेमण्यात आले आहेत. मी त्या संदर्भात आपला आभारी आहे. मी सभागृहात असतो तर नक्की भाषण केले असते. 2 अंतिम आठवडा प्रस्ताव होऊ शकत नाहीत. आपल्याकडे अशी प्रथा नाही. मी ग्रंथालयात गेलो होतो. हा नवीन नियम कधी झाला, हे आम्हाला समजले पाहिजे, एवढेच माझे म्हणणे आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : अंतिम आठवडा प्रस्ताव एकच असतो, हे खरे आहे. कालपर्यंत विरोधी पक्ष नेत्यांची नियुक्ती झाली नव्हती. या दरम्यानच्या काळात दोन-तीन तास चर्चा केल्यानंतर एक तात्कालिक उपाय म्हणून या ठिकाणी दोन प्रस्ताव दीड तासांचे ठेवले होते. नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाला आपण अडीच तासांचा अवधी देतो. पण या परिस्थितीत आम्ही विचार केला, आज सकाळी देखील यावर फेरविचार केला आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेते व सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांनी असे सांगितले की, हा आमचा दोघांचा एकच प्रस्ताव आहे. तो एकत्र येणार आहे. हा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे मांडतील आणि त्यानंतर सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे हे बोलतील. तथापि, अंतिम आठवडा प्रस्ताव हा एकच असतो, हे बरोबर आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव विरोधी पक्षनेत्यांनी मांडावा.

**सभापती** : अंतिम आठवडा प्रस्ताव स्वत: सन्माननीय विरोधी पक्ष नेते मांडू शकतील किंवा सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे मांडू शकतील किंवा विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्यास सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले देखील मांडू शकतील.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाची सुरुवात सन्माननीय विरोधी पक्षनेते करतील. तत्पूर्वी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी पॉईंट ऑफ प्रोसिजर अन्वये उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे. याचे कारण असे की, विरोधी पक्षनेते पद काल संध्याकाळी जाहीर झाले आणि त्यानंतर आजच्या कामकाजाची कामकाज पत्रिका तयार झाली आहे. काल विरोधी पक्ष नेत्यांची नियुक्ती झाली नसती तरी देखील अंतिम आठवडा प्रस्ताव हा एकच असावयास हवा होता. त्यामुळे यापुढे असे होऊ नये, एवढीच माफक अपेक्षा आहे.

**सभापती** : काल सुध्दा आम्ही या दृष्टीने प्रयत्न केला होता. परंतु, त्या क्षणी त्याबाबत यश मिळू शकले नाही. त्यामुळे तात्पुरता उपाय आम्ही काढला. तरी सुध्दा आज सकाळी आम्ही त्या दृष्टीने प्रयत्न केला. कारण, आमच्याही कॉंशसला तो पटत नव्हता.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपल्या नियमामध्ये तरतूद आहे. सभागृहात विरोधी पक्षात चार किंवा पाच पक्ष असतात. विधान परिषदेच्या नियमात अशी तरतूद आहे की,

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे..........

चार-पाच पक्षांकडून अंतिम आठवडा प्रस्ताव आले तरी सभागृहात एकच प्रस्ताव अंतिम आठवडा प्रस्ताव म्हणून चर्चेला येईल. समजा अशा प्रकारे दोन-चार प्रस्ताव आले तर लॉटरी पध्दतीने एका प्रस्तावाची निवड केली जाईल आणि ज्या पक्षाच्या प्रस्तावाची निवड होईल, त्या पक्षाचा प्रस्ताव अंतिम आठवडा प्रस्ताव म्हणून चर्चेला येईल. अंतिम आठवडा प्रस्तावावर एकमत झाले नाही आणि चार-पाच प्रस्ताव आले असतील तर लॉटरी पध्दतीने एका प्रस्तावाची निवड केली जाईल, अशी नियमात तरतूद आहे. आता सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांची निवड झाली असल्यामुळे हे प्रस्ताव एकत्र करुन एकच प्रस्ताव अंतिम आठवडा प्रस्ताव म्हणून येथे आणावा. यांच्या भानगडीत चुकीची प्रथा पडावयास नको.

**सभापती** : आज अंतिम आठवडा प्रस्ताव एकच आहे. हा प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्ष नेते मांडतील. त्यांनी सांगितले तर तो सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले मांडतील आणि त्यानंतर सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे बोलतील.

-------------

...3.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

<u>**सभागृहाच्या कामकाजाच्या वेळेबाबत**</u>

**सभापती** : मला सभागृहाच्या एक बाब निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, आज कामकाज फार जास्त आहे. म्हणून मी मघाशी माझ्या दालनात सर्व नेत्यांना बोलावून असे सांगितले की, आज किमान 3 तास आपल्याला सभागृहाची वेळ वाढवावी लागेल आणि त्यामध्ये हे कामकाज कसे पूर्ण होईल, या दृष्टीने प्रयत्न करावे लागतील.

------------

...4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.सुधीर मुनगंटीवार (अर्थ व नियोजन मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियोजन विभाग शासन निर्णय दिनांक 31 मे, 2011 अन्वये गठीत करण्यात आलेल्या समतोल प्रादेशिक विकास उच्चस्तरीय समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती महोदय, अहवाल सभागृहाला मांडत असताना एका गोष्टीची सभागृहाने नोंद घ्यावी, अशी विनंतीही मी आपल्या माध्यमातून करीत आहे. हा अहवाल साधारणपणे 571 पानांचा आहे. मी माझ्या विभागाला अशी सूचना केली आहे की, केळकर समितीचा अहवाल सभागृहाच्या माध्यमातून जाहीर केल्यानंतर आज दुपारी 2 वाजून 30 मिनिटांनी विभागाच्या माध्यमातून समिती सदस्यांची एक पत्रकार परिषद आयोजित करावी आणि या 571 पानांच्या अहवालामध्ये असणाऱ्या महत्त्वाची बाबी समितीने पत्रकारांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेपर्यंत पोहोचवाव्यात. हा अहवाल कसा वाचावा, कोणती पाने वाचली पाहिजेत, शिफारशी कोठे आहेत, वगैरे बाबत सर्वांना मार्गदर्शन करावे. ही एक विशेष बाब आपण यावेळी केली आहे. याची नोंद कृपया सभागृहाने घ्यावी, अशी विनंती आहे.

**सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**केळकर समिती सदस्यांच्या आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेसंदर्भात पॉईंट ऑफ प्रोसिजरबाबत**

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, राज्याचे अर्थ व नियोजन मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी केळकर समितीचा अहवाल सभागृहाला सादर करीत असताना एका विशेष बाबीची नोंद घेण्याबाबत सभागृहाला विनंती केली आहे व त्याबाबत माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

सभापती महोदय, केळकर समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. हा अहवाल सादर करीत असताना मंत्री महोदयांनी असे सांगितले की, आज दुपारी 2 वाजून 30 मिनिटांनी त्यांच्या विभागाच्या माध्यमातून समिती सदस्यांना पाचारण करण्यात आले असून ते पत्रकार परिषद घेणार आहेत. त्या पत्रकार परिषदेमध्ये या अहवालासंबंधीची किंवा अहवालामध्ये जी चर्चा उपस्थित केली आहे, त्या संबंधीची किंवा अनुशेषासंबंधी जे प्रश्न उपस्थित केले गेले असतील, त्या संबंधीची माहिती समितीचे सदस्य पत्रकारांना सांगणार आहेत.

सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, Once the Report is tabled in the House, it becomes the property of the House. शासनामार्फत सभागृहाला अहवाल सादर झाल्यानंतर ती सभागृहाची प्रॉपर्टी असते. It is sole property of the House. त्यामुळे हा अहवाल या सभागृहात डिस्कस झाला पाहिजे आणि त्यानंतर त्यावर शासनातर्फे मंत्री महोदयांचे उत्तर आले पाहिजे. त्यानंतरच ज्यांनी कोणी अहवाल लिहिला असेल त्यांनी भाष्य केले पाहिजे. त्यापूर्वी त्यांना या अहवालावर जाहीरपणे भाष्य करण्याची मुभा नाही, असे मला वाटते. कारण, It is sole property of the House. यावर जे भाष्य करावयाचे आहे, ते मंत्री महोदयांना सभागृहात करावे लागेल, त्या पूर्वी या अहवालावर सभागृहात चर्चा करावी लागेल. त्या ऐवजी ज्यांनी अहवाल लिहिला आहे, त्यांनी पत्रकार परिषद घ्यायची आणि अहवालातील बाबी जनतेपर्यंत पोहोचवायच्या आणि तेही हे सभागृह सुरु असताना, हे परंपरेला सोडून आहे आणि देशातील हे पहिलेच उदाहरण आहे. त्यामुळे या कामकाज पध्दतीला माझा आक्षेप आहे. सभागृहाच्या कामकाज पध्दतीचा तंतोतंत अवलंब झाला पाहिजे, या सभागृहाची

...6....

प्रा.जनार्दन चांदूरकर...........

डिग्निटी राखली गेली पाहिजे आणि सभागृहाचा अवमान होता कामा नये, अशी माझी अपेक्षा आहे. या कामकाज पध्दतीशी फारकत घेऊन ज्यांनी अहवाल लिहिला त्यांनी पत्रकार परिषद न घेता पहिल्यांदा या अहवालावर या सभागृहात चर्चा झाली पाहिजे, असा माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, या सभागृहाचा अवमान कधीही होणार नाही, याची काळजी अतिशय बारकाईने हे सरकारे घेत आले आहे आणि यापुढेही घेईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जनार्दन चांदुरकर यांनी हा विषय योग्यरितीने लक्षात न घेतल्यामुळे आक्षेप घेतला आहे. सन्माननीय सदस्यांचा आक्षेप काय आहे ? हा अहवाल आता सभागृहाला सादर करण्यात आला आहे. आजपर्यंत अनेक अहवाल आले आहेत. दांडेकर समितीचा अहवाल सन 1983 मध्ये तयार झाला. ज्याप्रमाणे हा अहवाल विधानसभा किंवा विधान परिषदेची प्रॉपर्टी आहे, त्याप्रमाणे तो या राज्यातील 11 कोटी 80 लाख लोकांची देखील प्रॉपर्टी आहे. त्यांचे प्रतिनिधी म्हणून आपण येथे बसतो.

सभापती महोदय, सर्वप्रथम आपण हा अहवाल सभागृहाला सादर केला आहे. समितीला केवळ असे सांगितले आहे की, .. (गोंधळ) सभापती महोदय, माझे कृपया ऐकून घ्यावे. सभापती महोदय निर्णय देतील. यासाठीच या बाबीची सभागृहाने नोंद घ्यावी, अशी विनंती मी केली आहे. हा अहवाल वाचत असताना शिफारशी कोणत्या पानावर आहेत, समितीने कोठे कोठे भेटी दिल्या आहेत, समितीने किती लोकांचे ऐकून घेतले आहे, समितीला किती निवेदने प्राप्त झाली आहेत, किती महिन्यात हा अहवाल तयार झाला आहे, अशा तांत्रिक बाबींची माहिती पत्रकार परिषदेत देण्यास त्यांना सांगण्यात आले आहे. या तांत्रिक बाबींची चर्चा आपण सभागृहात करीत नाही. समितीने किती बैठका घेतल्या यावर या सभागृहात चर्चा होत नाही. किती लोकांच्या भेटी घेतल्या, अहवाल तयार करीत असताना काय काळजी घेतली, भारांक काय आहे, मापदंड काय आहेत, या तांत्रिक गोष्टी आहेत. आजपर्यंत समितीने कशा पध्दतीने काम केले आहे, याची माहिती जनतेपर्यंत पोहोचावी, एवढाच मुद्दा आहे.

...7.....



SRR/ KTG/ प्रथम श्री.मंगेश........ 13:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार.........

सभापती महोदय, विधिमंडळात या अहवालावर चर्चा झाल्यानंतरच समितीच्या शिफारशी अंशत: स्विकारायच्या की, पूर्णपणे स्विकारायच्या, याबाबत सर्वांना विश्वासात घेऊन, चर्चा झाल्यावर आपण अहवाल तयार करणार आहोत. तत्कालीन सरकारने ही समिती गठीत केली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर.. 13:30

श्री.सुधीर मुनगंटीवार..

अहवाल तयार करतांना समितीचे निकष काय होते, एवढी तांत्रिक माहिती देण्यात येणार आहे. अहवालातील शिफारशींवर चर्चा होणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय ज्येष्ठ मंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार हे स्वत: या प्रक्रियेतील एक सदस्य आहेत. त्यांच्याकडून आम्हाला वेगळ्या अपेक्षा आहेत, त्याचे कारण असे आहे की, अहवाल सभागृहात सादर झाल्यावर सभागृहाची प्रॉपर्टी होते हे सांगण्याची आवश्यकता नाही. ती सभागृहाची प्रॉपर्टी आहेच. ती कोणाचीही असू शकत नाही. ज्यावेळी एखादी समिती गठीत होते. त्यावेळी त्या समितीची कक्षा समिती सदस्यांना सांगितली जाते. ही बाब नंतर सांगितली जात नाही. त्यांनी कोणत्या घटकांवर कोणत्या विषयावर काम करावे हे देखील त्यांना सांगण्यात येते. त्या समितीने किती बैठका घेतल्या, काय केले हे सर्व सभागृहाबाहेर जाण्यापूर्वी हा अहवाल सभागृहात सादर करण्यात आला आहे. काल सरकारने मान्य केले की, सभागृहात केळकर समितीच्या अहवालावर चर्चा होईल. अहवाल सादर करतांना मंत्री महोदय असे म्हणाले की, सभागृहाने याची नोंद घ्यावी. सभागृहाने नुसती नोंद कशी काय घ्यावी. हा अहवाल सभागृहाची प्रॉपर्टी आहे, माझ्या महिती प्रमाणे व नियमाप्रमाणे सभागृहाची परवागनी घेऊनच तुम्ही पत्रकार परिषद घेणे अपेक्षित आहे. समिती गठीत होतांना त्यांच्या कार्यकक्षा काय होत्या हे सांगण्यापूर्वी सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे असे माझे सदस्य म्हणून मत आहे. पत्रकार परिषद अडीच वाजता किंवा पाच वाजता हा विषय महत्वाचा नाही. सभागृहात या अहवालासंदर्भात अगोदर देखील काही भाष्य झाले आहे. त्यानंतर हा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे. दांडेकर समिती असेल, प्रधान समितीचा अहवाल असेल याबाबत अशा प्रक्रिया झालेल्या आहेत. सरकार काही अयोग्य प्रथा परंपरा पाडत आहेत असे आम्ही म्हणणार नाही. सभागृहात अहवाल सादर झाला आणि त्याची बाहेर चर्चा झाली तर ती वेगळी प्रथा निर्माण होईल असे होऊ नये अशी माझी सरकारला विनंती आहे.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, सभागृहात अहवाल सादर केल्यानंतर जी पध्दत आहे, ते मी सांगितली आहे. सभागृहाला विश्वासात घेऊन त्यांची नोंद घेण्याची माहिती मी दिली आहे. यापूर्वी दांडेकर समितीचा अहवाल सभागृहात सादर झाल्यावर किती तरी लोकांनी पत्रकार परिषदा घेतल्या होत्या. अहवालावर सभागृहात पहिल्यांदा चर्चा झालेली नाही, असा प्रकार

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार..

पहिल्यांदा होत नाही. शासनाकडे अहवाल आल्यावर राज्यात नियमाच्या चौकटीत राहून जी प्रक्रिया अवलंबिली जाते ती ही प्रक्रिया तशीच्या तशीच अवलंबिण्यात आली आहे. याबाबत मी फक्त जास्तीची माहिती सादर केली आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना अहवाल वाचतांना जास्तीत जास्त उपयोग व्हावा. सहजपणे अहवालातील गोष्टींची माहिती व्हावी. 571 पानांचा अहवाल वाचत असताना कोणत्या पानावर शिफारशी आहेत, याची जास्तीची माहिती देण्यासाठी समिती सदस्यांना सांगितले आहे. यामध्ये काहीही गैर नाही. माहिती घेऊनच ही कार्यवाही करण्यात येत आहे. पत्रकार परिषदेमध्ये शिफारशींवर कोणतीही चर्चा होणार नाही. अहवाल कसा तयार झाला याची माहिती देण्यात येणार आहे.

श्री.हेमंत टकले: सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अहवाल सभागृहात सादर केला आहे. अहवाल तयार करताना समितीने किती बैठका घेतल्या, समिती कोठे कोठे गेली, समितीने काय काय केले हे सांगण्यासाठी पत्रकार परिषद घेण्यात येत आहे, त्याची नोंद सभागृहाने घ्यावी. ज्यावेळी ही समिती पत्रकार परिषद घेईन त्यावेळी समितीने काढलेल्या निष्कर्षाबाबत सर्व वार्ताहर त्यांना प्रश्न विचारतील. त्यासंदर्भात समितीचे मत त्या ठिकाणी व्यक्त झाल्यामुळे सभागृहात चर्चा झाल्याशिवाय समितीच्या सदस्यांचे मत म्हणून वर्तमानपत्रात छापले जाणार आहे. त्यामुळे कदाचित याबाबत जनतेमध्ये आधीच मत तयार होणार असल्यामुळे सभागृहात होणाऱ्या चर्चेला काहीही अर्थ राहणार नाही. अशा प्रकारची शक्यता यातून उद्भवते आहे. त्यामुळे मंत्री महोदयांना आमची विनंती आहे की, सभागृहात जोपर्यंत चर्चा होत नाही, तोपर्यंत याबाबत कोणत्याही पत्रकार परिषदा घेण्यात येऊ नयेत.

श्री.सुधीर मुनगंटीवार : सभापती महोदय, एक गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देतो की, हा अहवाल सभागृहाची प्रॉपर्टी झालेला आहे. याचा अर्थ महाराष्ट्राच्या कोणत्याही व्यासपीठावर यावर चर्चाच करता येणार नाही असा होत नाही. ही बाब कृपया लक्षात घेण्यात यावी. विधानसभा किंवा विधानपरिषद सभागृहात कोणताही अहवाल जेव्हा मांडला जातो. याचा अर्थ सभागृहाच्या अनुमतीने सार्वजनिक केला जातो. सभागृहाला अहवाल देणे, सभागृहाची प्रॉपर्टी होणे याचा अर्थ हा अहवाल आता महाराष्ट्रातील कोणत्याही जनतेला बघता येणार नाही, चर्चा करता येणार नाही. असा कृपया होत नाही. विधिमंडळाच्या नियमानुसार सभागृहात अहवाल सादर होतो.

..3..



VVK/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर.. 13:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधीर मुनगंटीवार..

शासनाच्या वतीने गठीत करण्यात आलेल्या समितीने तयार केलेला अहवाल पहिल्यांदा विधिमंडळात सादर केला जातो. त्यानंतर तो बाहेर चर्चेसाठी गेला पाहिजे. अहवाल सभागृहाला सादर केल्यावर याबाबत कोणतेही टी.व्ही.चॅनेल, कोणतेही वर्तमानपत्र, कोणताही आमदारांचा समूह गट, कोणतीही एनजीओ, कोठेही, कधीही कशाही पध्दतीने चर्चा करु शकते. हे बंधन आपल्यावर राहात नाही. म्हणून या समितीच्या सदस्यांना तो अधिकार आहे. आपण एक नवीन पध्दत का केली अशी विचारणा झाली त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, नवीन पध्दत यासाठी केली आहे की, जेव्हा एखादी उच्चस्तरीय समिती अतिशय मेहनत करुन अहवाल तयार करते तो अहवाल आपण जनतेसाठी सभागृहाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिला आहे. पत्रकार लोकशाही मधील एक महत्वाची संस्था आहे. चार स्तंभापैकी पत्रकार हा महत्वाचा स्तंभ आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील पारदर्शक सरकार 1 मे 1960 नंतर काही वर्षे सत्तेवर होते. पुन्हा आता सत्तेवर आले आहे. या पारदर्शक सरकारचे स्वागत केले पाहिजे. आपण विधानपरिषद सदस्य आहात, हा आपला विशेषाधिकार आहे. हा विशेषाधिकार जनतेच्या आशीर्वादाच्या आधारावर आहे. राज्यात निर्माण झालेल्या असमतोलाबाबत जनतेने चर्चा केली तर काय बिघडेल. हा असमतोल कोणी केला, का केला, हे मी चर्चेच्या वेळी सांगणार आहे. त्याचा तपशील अत्यंत बारकाईने देईन. नियबाह्य तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत. सभापती महोदय, त्याबाबत निर्णय करतील. पत्रकार परिषद घेण्याचे आपण स्वागत केले पाहिजे अशी माझी अपेक्षा होती. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे साहेबांनी स्वागत केले.

सन्माननीय सदस्य ॲड.जनार्दन चांदूरकर यांचे असे आग्रही मत आहे की, यावर सभागृहात चर्चा झाल्याशिवाय इतरांनी चर्चाच करु नये. पत्रकार परिषद घेऊच नये. ज्या समितीने हा अहवाल तयार केला त्या समितीला हा अधिकार इनबिल्ट आहे. मी फक्त सभागृहाच्या माहितीकरिता हे सांगितले होते. यासमितीचा अहवाल तयार होण्यापूर्वी ही समिती जेव्हा जिल्हास्तरावर गेली तेव्हा ती माहिती देण्यात आलेली होती. आदरनीय केळकर साहेब जेव्हा जिल्ह्याच्या ठिकाणी गेले त्या संदर्भातील माहिती देण्यात आली होती. अहवाल सादर झाल्यावर

..4..



श्री.सुधीर मुनगंटीवार..

समितीचे सदस्य शिफारशींवर भाष्य करतील काय ? या सर्व शिफारशी समितीच्या अहवालात आल्या आहेत. शिफारशी स्वीकारावयाच्या किंवा नाही याबाबत समिती भाष्य करीत नाही. समितीचा अधिकार त्यांच्या चौकटीत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जनार्दन चांदूकर यांनी जो पॉईंट ऑफ प्रोजिसर मांडला आहे तो अतिशय रास्त आहे. विधानसभा किंवा विधानपरिषदेच्या कामकाज पत्रिका आपणाकडे येतात. कामकाज पत्रिका पाहिल्यानंतर या सरकारचा हेतू लक्षात येतो. मराठा आरक्षणाच्या संदर्भात 9 जुलै रोजी अध्यादेश काढण्यात आलेला होता, त्यासंदर्भातील विधेयक विधानसभेत मांडण्यात येणार आहे, सदर विधेयक विधानसभेत मंजूर झाल्यावर विधानपरिषदेमध्ये चर्चेला येईल. त्याबाबत मुस्लिम समाजाचे आरक्षण..

**सभापती** : सन्माननीय सदस्य आपण वेगळा विषय मांडत आहोत, ॲड.जनार्दन चांदूरकर यांनी जो पॉईंट ऑफ प्रोसिजर मांडला आहे, त्यावर आपण बोलणे अपेक्षित आहे.

ॲड.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, माझा दुसरा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा आहे की, मंत्री महोदयांनी सांगितले की, यावर चर्चा होणारच नाही काय तर या समितीच्या अहवालाची चर्चा ऑलरेडी सुरु झालेली आहे.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ पूर्वी श्री. व्ही. खर्चे 13:40

प्रा. जनार्दन चांदूरकर ...

याची चर्चा टी.व्ही.चनेल्स, न्यूज पेपर्स आणि मीडियामधून चालू झालेली आहे. हा विषय दाबून ठेवला. माझा पॉईण्ट ऑफ प्रोसिजर असा आहे की, Once the Report is tabled in the House, it becomes the property of the House. मंत्री महोदयांनी सांगितले की, ते प्रेस कॉन्फरन्स घेणार आहेत. त्यांनी हे सभागृहामध्ये सांगण्याची आवश्यकता नव्हती. त्यांनी ही बाब सभागृहासमोर का सांगितली ? त्यांनी आपले स्टेटमेंट मागे घ्यावे. कारण बाहेर सरकारच्या वतीने प्रेस कॉन्फरन्स सुरु आहे.

श्री. एकनाथराव खडसे : सभागृहासमोर जी कागदपत्रे ठेवली जातात ती या सभागृहाची प्रापर्टी होते ही गोष्ट आपणा सर्वांना मान्य आहे. सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेसंबंधी, नियम 93च्या सूचनेसंबंधी निवेदने ठेवली जातात, अन्य कागदपत्रे ठेवली जातात, अहवाल ठेवले जातात. ही कागदपत्रे ठेवल्यानंतर ती निव्वळ सभागृहाची प्रापर्टी होत नाही. केळकर समितीच्या अहवालावर चर्चा केव्हा करायची हा आपला अधिकार आहे. सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेच्या निवेदनावर, नियम 93 अन्वयेच्या निवेदनावर चर्चा होऊ शकते, काही निवेदनावर चर्चा होत नाही. ज्या निवेदनावर सदनामध्ये चर्चा होत नाही त्या निवेदनावर वर्तमानपत्रामध्ये चर्चा होऊ शकते. त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी प्रामाणिकपणे विचारणा केली. मी त्यांना सांगितले की अशी विचारणा करण्याची गरज नव्हती. सभागृहामध्ये सादर करण्यात आलेल्या कागदपत्रावर सभागृहामध्ये चर्चा होत नसली तरी ती बाहेर होत असते.

**सभापती** : केळकर समितीचा अहवाल या सदनामध्ये सादर केल्यानंतर ती या सदनाची प्रॉपर्टी होते हे खरे आहे. सदनामध्ये या अहवालाची चर्चा तातडीने आणि सविस्तरपणे झाली पाहिजे अशी आपणा सर्वांची अपेक्षा आहे. ज्यावेळी या सदनामध्ये केळकर समितीचा अहवाल सादर करण्यात आला त्याचवेळी तो सर्व सन्माननीय सदस्यांना उपलब्ध झालेला आहे असे मी समजतो. हा अहवाल अनेक माध्यमातून पत्रकारांपर्यंत आणि सर्व लोकांपर्यंत जाणार आहे, अनेक माध्यमांमध्ये हा अहवाल जाणार आहे. विधिमंडळाच्या आवारामध्ये अशा एखाद्या विषयासंबंधी मी पत्रकार परिषद घेऊ शकतो का अशी जी विचारणा करण्यात आली त्याबाबतीत मला असे वाटते की, यावर चर्चा न करता याबाबतीत तातडीने चर्चा कशी करता येईल या दृष्टीने सरकारने निर्णय





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

घ्यावा. केळकर समितीच्या अहवालाबाबत हा विचारच पुढे आला नसता आणि तो अहवाल सादर केला असता तर काहीच हरकत नव्हती. यासंबंधी सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडलेले आहेत. मला वाटते माननीय मंत्री महोदय श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितल्या प्रमाणे माझी अपेक्षा अशी आहे की, हा अहवाल ज्यावेळी विधिमंडळाच्या माध्यमातून बाहेर जातो त्यावेळी तो सरकार मार्फत जावा, अन्य कोणत्याही प्रतिनिधी मार्फत तो जाऊ नये असे माझे वक्तिगत ऑब्झर्व्हेशन आहे.

श्री. सुधीर मुंनगटीवार : यापुढे याची नोंद घेण्यात येईल.

--

श्री. प्रवीण पोटे-पाटील (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन 2010-2011 व 2011-2012 या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ KTG/ पूर्वी श्री. व्ही. खर्चे 13:40

**पृ.शी./मु.शी.**: नियम 260 अन्वये प्रस्तावासंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्रीमती विद्या ठाकूर (महिला व बाल विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 19 डिसेंबर, 2013 रोजी डॉ. दीपक सावंत, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेच्यावेळी उपस्थित केलेल्या "सबला व राजीव गांधी योजने संदर्भातील" अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**सभापती** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली अधिक माहिती कृपया छापावी.)

--

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी** : राज्यात शेतकऱ्यांच्या वाढत असलेल्या आत्महत्या याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. एकनाथराव खडसे (मदत कार्य व पुनर्वसन मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : राज्यात पडलेल्या भीषण दुष्काळामुळे आत्महत्येचे पेव फुटल्यासारखे आपल्या सर्वांच्या नजरेसमोर येत आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे वय 28 वर्षे, 38 वर्षे अशी आहेत. इतक्या तरुण वयात नैराश्येपोटी त्यांनी आत्महत्या केली आहे. त्यांना शासना मार्फत जी मदत देऊ केली जाते त्या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांकडे बैठक होते. याची पूर्तता लवकरात लवकर करण्यासाठी या सर्व प्रकरणामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना सांगून त्यांना काही निश्चित कालमर्यादा ठरवून देण्यात येणार आहे काय की जेणेकरुन आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला वेळच्या वेळी मदत मिळू शकेल ?

श्री. एकनाथराव खडसे : आत्महत्यग्रस्त शेतकऱ्यांच्या परिवाराला लवकरात लवकर मदत मिळावी या दृष्टीने जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत. या आधी देखील सूचना दिलेल्या आहेत. बऱ्याच वेळा काही प्रकरणामध्ये पीएम रिपोर्टची आवश्यकता असते. हा रिपोर्ट लवकर येत नाही. काही वेळा व्हिसेरा फोरॅन्सिक लॅबमध्ये पाठवावा लागतो. फोरॅन्सिक लॅबचा अहवाल येण्यास विलंब होतो. अशा विशिष्ट परिस्थितीमध्ये मदत देण्याच्या बाबतीत विलंब होतो. अन्यथा या संदर्भात महिन्यातून दोन वेळा बैठका घेऊन तातडीने निर्णय घेऊन आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या परिवाराला मदत करावी अशा सूचना करण्यात आलेल्या आहेत.

----

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

---

..6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./ मु.शी** : बीड जिल्हा शासकीय रुग्णालयात प्रशिक्षित तंत्रज्ञांची
रिक्त असलेली पदे याबाबत श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.
यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ. दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित :बीड जिह्यातील शासकी रुग्णालयाचा हा विषय आहे. या शासकीय रुग्णालयामध्ये एमआरआय, एक्सरे, डायलिसिस इत्यादी सेवा उपलब्ध आहेत. परंतु ही यंत्रणा चालविणारे तंत्रज्ञ उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना बाहेरुन एमआरआय, एक्सरे करुन घ्यावे लागतात. निवेदनामध्ये ही यंत्रणा व्यवस्थित सुरु आहे असे सांगितलेले आहे. परंतु ग्राऊंड रिॲलिटी ही आहे की, ही यंत्रणा चालविणारे तंत्रज्ञ उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना बाहेरुन एमआरआय, एक्सरे करुन घेण्यास सांगितले जाते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित.....

या ठिकाणी व्यवस्था नाही असे सांगून प्रसंग टाळला जातो. आज ऑपरेटर नाही, रजेवर आहेत असे सातत्याने जिल्हा रुग्णालयात पहावयास मिळते. डायलिसीस यंत्र आहे, परंतु नेफ्रॉलॉजिस्ट नाही. मी स्वत: अनुभव घेत आहे. माझ्या घरी डायलिसीस पेशंट आहे. माझी पत्नी डायलिसीसवर असून दिवसातील 24 तासापैकी 12 तास डायलिसीस घ्यावे लागते. यातील अडचण मी स्वत: समजू शकतो. माझ्या तालुक्यात संबंधित यंत्रचालक नसल्यामुळे मोठया प्रमाणावर पेशंट बाहेर जाऊ शकले नाहीत, त्यातील एक पेशंट एक महिन्यापूर्वी मयत झाला. डायलिसीस च्यासंदर्भात रुरल हॉस्पिटल सुसज्ज आहेत. किमान एक डायलिसीस मशिन तेथे ठेवली तर तालुक्याहून जिल्हयाला आणि जिल्हा स्तरावर नेफ्रॉलॉजिस्ट नाही म्हणून पेशंटला परत जावे लागते. त्याची होणारी हेळसांड थांबवायची असेल तर तालुक्यातील रुरल हॉस्पिटलमध्ये डायलिसीस, एमआरआय व एक्सरे फॅसिलिटी उपलब्ध करुन देता येईल काय?

सभापती महोदय, एमआरआय, एक्सरे मशिन ऑपरेट करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यामध्ये बराच वेळ निघून गेला आहे. याबाबत आऊटसोर्सिंग करण्याचे धोरण आखले जाईल काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी नियम 93 अन्वये दिलेली सूचना अतिशय योग्य आहे असे मी मानतो. एमआरआय, एक्सरे मशिन याबाबत शासनाचे धोरण आहे. एमआरआय मशिन पुरवठा आपण करीत नाही. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करु. कुटीर रुग्णालयामध्ये आणखी एक डायलिसीस सेंटर असावे. आज संपूर्ण राज्यामध्ये 29 डायलिसीस सेंटर आहेत. प्रत्येक ठिकाणी जवळजवळ 4-4 डायलिसीस युनिट कार्यरत आहेत. त्याचबरोबर नाशिक व अमरावती येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये प्रत्येकी 12 डायलिसीस मशिन्स आहेत. त्यामुळे डायलिसीस होत आहेत. जुलै, 2013 मध्ये डायलिसीस सेंटर इस्टॅब्लिश झाल्यानंतर 1404 रुग्णांनी लाभ घेतला आहे.

सभापती महोदय, सीटी स्कॅन मशिन एक महिन्यापासून नादुरुस्त आहे हा दावा बरोबर आहे. हे मशिन 10 वर्षापूर्वी जर्मनी येथून आयात केले असल्यामुळे त्याचे वेअर अँड टेअर निघणार आहे. या मशिनचा पार्ट जर्मनीहून मागविला आहे. तो पार्ट आल्यानंतर सीटी स्कॅन मशिन ताबडतोब सुरु करु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

23-12-2014 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) W.1

SGB/ KTG/ MMP/ 13:50

डॉ.दीपक सावंत.........

सभापती महोदय, जी 100 बेडची उप जिल्हा रुग्णालये आहेत तेथे डायलिसीस सेंटर उपलब्ध करुन देणे सहज शक्य आहे. पंढरपूर आणि मंचर या ठिकाणी दोन नवीन डायलिसीस सेंटर सुरु करीत आहोत. बीड येथील रुग्णालयावर अधिक लोड असेल तर डायलिसीसच्या संदर्भात आणखी काय व्यवस्था करता येईल याबाबत सकारात्मक विचार करुन बीड रुग्णालयामध्ये डायलिसीससाठी जरुर मदत केली जाईल.

श्री.अमरसिंह पंडित : यंत्रणा उभी करण्यामध्ये अडचणी जरुर आहेत. परंतु मराठवाड्यातील मागासलेल्या बीड जिल्हयात एमआरआय स्कॅनिंग, एक्सरे यंत्रणा बीओटी तत्वावर उभी करण्यासाठी धोरणात्मक प्रयोग म्हणून व्यवस्था केली जाईल काय? ऊस तोड कामगार उपचार घेण्यासाठी दूर अंतरावरुन येतो. परंतु रेडिऑलॉजिस्ट नाही म्हणून पेशंटला परत पाठविणे योग्य नाही. त्यामुळे बीओटी तत्वावर प्रयोग करता येईल काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्यांचा प्रश्न बरोबर आहे. त्यांनी प्रश्न उपस्थित करण्यापूर्वी पीपीपी मॉडेलवर एमआरआय, सीटी स्कॅन या विषयीचा प्रस्ताव तयार झाला असून राज्य शासनाच्या मान्यतेसाठी लवकरच सादर होईल. जीई कंपनीबरोबर करार झाला आहे. काही ठिकाणी अतिशय गरज आहे तेथे प्राथम्याने एमआरआय उपलब्ध करुन देऊ.

श्री.ख्वाजा बेग : सभापती महोदय, राज्य महामार्गावर मोठया प्रमाणात अपघात होत असतात. अशा ठिकाणी ट्रॉमा केअर युनिट स्थापन करणे गरजेचे आहे. नागपूर-बुटीबोरी-तुळजापूर महामार्गावरील आर्णी गावात सुसज्ज ग्रामीण रुग्णालय आहे. तेथे ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्यात येईल काय?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्या आर्णी गावासाठी ट्रॉमा केअर युनिट सुरु करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे. त्या संदर्भात अहवाल मागविला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर लगेच तेथील सुयोग्यता तपासून या विषयीचा विचार करण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./ मु.शी.** : कल्याण (जि.ठाणे) येथील वालधुनी नदीत मोठया प्रमाणात होणारे प्रदूषण याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

(माननीय सदस्य अनुपस्थित)

---------

**पृ. शी./ मु.शी.** : विस्तार व परिरक्षण विस्तार सुविधेसाठी केंद्र शासनाकडून उपलब्ध झालेला निधी दालन नुतनीकरणावर खर्च केल्याबाबत श्री.जयंत प्र.पाटील, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** (श्री.रामनाथ मोते) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या कामाची निविदा केव्हा मागविण्यात आली, वर्क ऑर्डर केव्हा देण्यात आली आणि काम केव्हा पूर्ण झाले व बिल केव्हा अदा करण्यात आले?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मंजूर झालेले काम पुरेसे झालेले नव्हते म्हणून या संदर्भातील पैसे थकित होते. 1992 पासून वनामती ही संस्था सुरु करण्यात आली. सदर बांधकामाचे अंदाजपत्रक दिनांक 15.9.2010, 28.9.2011 असे दोन वेळा प्राप्त झाले. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अंदाजपत्रक प्राप्त झाल्याचा दिनांक 3.2.2011, 22.4.2011 व 26.4.2011 असा आहे. काम सुरु करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास दिनांक 27.6.2011 रोजी आदेश देण्यात आले. सार्वजनिक बांधकाम विभागास धनादेशाद्वारे रक्कम दिल्याचा दिनांक 3.8.2011 आहे. सदर सभागृह तयार करावयाचे होते. विस्तार व प्रशिक्षणासाठी पैसा पडून होता. तो लवकर खर्च करण्यासाठी या कामाकरिता परवानगी देण्यात आली.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा निधी केंद्र सरकारच्या माध्यमातून देण्यात आला होता. हा निधी कार्यालय व रेस्ट हाऊसकरिता खर्च करणे बरोबर नाही. राज्य शासन याची चौकशी करणार आहे काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, आत्मा योजनेच्या माध्यमातून पैसा येतो. वेगवेगळ्या योजना असतात. राज्यामध्ये कृषी विभागाचे कोणतेही कार्यालय किंवा बैठक सभागृह नव्हते. ते अद्यावत करण्यासाठी पैसा वापरण्यात आला ही वस्तुस्थिती आहे. राज्यभरासाठी मोठया प्रमाणात केंद्र सरकारकडून पैसा येतो.

नंतर एक्स.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एकनाथराव खडसे .......

या योजनेच्या माध्यमातून 90 टक्के रक्कम केंद्र शासन आणि 10 टक्के राज्य शासनाकडून दिली जाते. तसेच स्थानिक स्तरावर योजना तयार करुन ती सादर करावयाची असते. त्या माध्यमातून अगोदर 10 टक्के रकमेची व्यवस्था करावी लागते. तसेच या योजनेत अशा कामासाठी फार कमी खर्च करण्याची परवानगी असताना जास्तीत जास्त पैसा खर्च करता येतो परंतु हा पैसा सन 2006 पासून बऱ्याच ठिकाणाहून खर्च न होता परत जात होता असे चित्र होते. तसेच ज्या ज्या वेळी राज्यस्तरीय बैठका होतात त्यासाठी साधे कार्यालय सुध्दा नव्हते त्यामुळे एक विशिष्ट बाब म्हणून तत्कालीन शासन व मंत्री महोदयांनी या कामाला परवानगी दिली, त्यानंतर अत्यंत चांगल्या प्रकारे हे सभागृह उभे राहिले आहे.

-----------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: छोटे मच्छिमार व मोठे मच्छिमारांमध्ये झालेली हाणामारी

**मु.शी.**: छोटे मच्छिमार व मोठे मच्छिमारांमध्ये झालेली हाणामारी याबाबत श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वयेची सूचना

श्री. एकनाथराव खडसे (मत्स्यव्यवसाय विकास मंत्री) : महोदय, नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्याने मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : नियम 93 चे निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात आले

**नि वे द न**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----------

.........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 चे निवेदन क्र. 30 .......

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, पर्ससीन नेटच्या बाबतीत ही नियम 93 अन्वये मी सूचना दिलेली असून परप्रांतीय मच्छिमारांचा स्थानिक व छोट्या मच्छिमारांना सतत त्रास होत आहे. अशाच परिस्थितीत हे मिनी पर्ससीन आणि पर्ससीन नेट पारंपारिक मच्छिमारांमध्ये दगडफेक होऊन प्रचंड हाणामारी झाली. हे पर्ससीन मच्छिमार स्थानिक लोकांना मदतीला घेऊन मोठ्या प्रमाणात मच्छिमार करतात त्यावर शासन बंदी घालून कडक उपाययोजना करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, छोटे मच्छिमार म्हणजेच मिनी पर्ससीन नेटधारक आणि पर्ससीन मच्छिमारांमधील हा नेहमीचा वाद असून दि. 1.12.2014 रोज मालवण येथील आचरे येथे या दोन गटात मारामारी झाली. पर्ससीन नेटधारक मच्छिमार हे खोल समुद्रात जाऊन मच्छिमार मासेमारी करतात त्यामुळे खोल समुद्रातील माशांच्या प्रजाती नष्ट होण्याची भीती असते आणि लहान मच्छिमारांना मासेमारीसाठी मासे उपलब्ध होत नाहीत. तसेच मत्स्यबीजाच्या संदर्भात देखील अनेक तक्रारी आल्या आहेत की हे बीज कोठे टाकायचे आणि टाकले तरी वाढू शकणार नाही म्हणून यावर बंदी घालावी अशी त्यांची मागणी आहे. तसेच पर्यावरणाच्या दृष्टीने देखील अशी बंदी आणता येईल काय किंवा यासंदर्भात कोणती उपाययोजना करता येईल याचा विचार सुरु झाला. त्यानंतर लहान मच्छिमार वाचले पाहिजेत यासाठी दि. 1 सप्टेबर, 2011 रोजी एक समिती स्थापन करण्यात आली त्यात डॉ. सोमवंशी जे केंद्रीय माजी महानिदेशक केंद्रीय मत्स्यसंवध्रन विभागाचे प्रमुख होते त्यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल 10 मे, 2012 रोजी शासनाकडे सादर केला आहे. त्यातील शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत. मधल्या काळात पर्ससीन नेटच्या माध्यमातून मासेमारी करण्यावर बंदी घालावी यासाठी दि. 10.12.1987 आणि दि. 13.10.199 रोजी दोन अधिसूचना काढण्यात आल्या. या अधिसूचनांना उच्च न्यायालयात स्थगिती देण्यात आली. उच्च न्यायालयाने अगोदरची अधिसूचना रद्द केली आणि त्यानंतर पुन्हा दि. 9.3.2004 रोजी या आदेशाविरुध्द दि. 8.6.2000 रोजी सुप्रिम कोर्टात स्पेशल रिट पिटीशन दाखल करण्यात आले. त्या बाबतीतील निर्णय अद्याप झालेला नसून सध्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

.........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 14:00

श्री. किरण पावसकर : महोदय, पर्ससीन नेटधारक आणि पारंपरिक पध्दतीने मासेमारी करणाऱ्यांमध्ये हे वाद नेहमीच होत असतात. प्रश्न इतकाच आहे की, पर्ससीन नेटच्या माध्यमातून मासेमारी करण्यासाठी मोठमोठ्या बोटी घेऊन समुद्रात खोलवर हे मच्छिमार जात असतील तर लहान मच्छिमारांना मासे उपलब्ध होणार नाहीत. पावसाळ्यात सरकार आपल्या मच्छिमारांना काळजी घेण्याचा सल्ला देते पण या पर्ससीन नेटधारकांची मात्र समुद्रात लांबवर जाऊन मासेमारी सुरुच असते त्यांच्यावर बंधन नसते. जी घटना आचरे या गावात झालेली आहे मी त्याच गावचा असल्याने मला ही घटना चांगली माहीत आहे. यासंदर्भात सरकारी यंत्रणेने हात वर करण्याची भूमिका घेतली असून जरी हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असले तरी 720 कि.मी. लांबीचा समुद्र किनारा असल्याने त्यांच्याबरोबर चर्चा करुन लहान मच्छिमारांना संरक्षण मिळावे म्हणून पर्ससीन नेटधारकांवर बंदी घालण्याचा विचार शासन करणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : महोदय, लहान मच्छिमारांसाठीच शासनाने या पर्ससीन बोटींच्या माध्यमातून मासेमारी करण्यावर बंदी घालावी म्हणून दोन अधिसूचना शासनाने काढल्या होत्या. त्याविरुध्द उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यात आले पण तो निर्णय विरोधात गेल्यामुळे स्पेशल रिट पिटीशनच्या माध्यमातून सुप्रिम कोर्टापर्यंत हे प्रकरण गेले आणि आजही ते प्रलंबित आहे. तसेच या प्रकरणाचा निकाल लवकर लागावा यासाठी आणि मिनी पर्ससीन नेटधारकांना संरक्षण मिळावे आणि मत्स्य शेतकरी जिवंत राहिले पाहिजे म्हणून त्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे आहे. तसेच जोपर्यंत निकाल लागत नाही तोपर्यंत या छोट्या मच्छिमारांना सुप्रिम कोर्टाच्या निर्णयाच्या अधीन राहून अन्य मार्गाने मदत करता येईल का, याचाही विचार शासन करील.

प्रा. जोगेंद्र कवाडे : महोदय, विना परवाना व अनधिकृत पर्ससीन नेटधारकांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निवेदनात म्हटले आहे. माझा मुद्दा असा आहे की, केवळ दंडात्मक कारवाई केल्याने हे मच्छिमार दंड भरुन पुन्हा आपले काम सुरु करु शकतात पण त्याऐवजी फौजदारी स्वरुपाची कारवाई केली तर ते लहान मच्छिमारांवर अन्याय करणार नाहीत, तसा निर्णय शासन घेणार काय ?

श्री. एकनाथराव खडसे : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

----------

.......5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रेणापूर (जि. लातूर) तालुक्यातील शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून केलेली आत्महत्या

**मु.शी.**: रेणापूर (जि. लातूर) तालुक्यातील शेतकऱ्याने नापिकीला कंटाळून केलेली आत्महत्या याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी नियम 93 अन्वये उपस्थित केलेल्या सूचनेवरील निवेदन चर्चेसाठी असून प्रश्न विचारण्यासाठी ते सभागृहात उपस्थित नसल्याने ते व्यपगत करण्यात येत आहे.

----------

.......6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहाच्या लॉबीत वाय-फायची सुविधा उपलब्ध करण्यासंबंधी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन**

श्री. अमरसिंह पंडित : महोदय, या सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून चर्चा असताना तसेच सन्माननीय सदस्यांना विविध प्रकारची माहिती मागविण्यासाठी त्यांनी आवश्यक ॲप्लीकेशन्स आपल्या लॅपटॉप किंवा मोबाईलवर डाऊनलोड केलेलीच आहेत. ही माहिती मिळविण्यासाठी सन्माननीय सदस्यांना इतरत्र व सभागृहाच्या बाहेर एखाद्या संगणकाच्या माध्यमातून ती मिळविणे आवश्यक असते. त्याऐवजी ती जलद गतीने माहिती उपलब्ध व्हावी म्हणून सभागृहाच्या लॉबीत वाय-फायची सुविधा उपलब्ध व्हावी, अशी आमची शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, हा निर्णय सरकारने घेण्याऐवजी माननीय सभापतींनी घ्यावयाचा आहे. या सभागृहामध्ये जे काही निर्बंध घालण्यात आले आहेत ते माननीय सभापती महोदयांनी घातलेले आहेत. यासंबंधी त्यांनीच निर्णय घेतला पाहिजे.

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.40 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.10 ते 2.40 वाजेपर्यंत मध्यंतर)

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहात एकही कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे, अशी विनंती आहे.

**तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते)** : ठीक आहे. सभागृहाचे कामकाज मी 5 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 2.41 ते 2.46 पर्यंत स्थगित करण्यात आली.)

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबई साकीनाका येथील झोपडपट्टीत शिवनेर विद्यालय आहे. झोपडपट्टीतील ही शाळा बंद करुन ती जमीन व्यापारी कारणासाठी विकण्याचा डाव संबंधित संस्थेच्या संचालकांनी आखलेला आहे. मुंबईत अनेक शाळा झोपडपट्टीत आहेत. एकदा जर शिवनेर विद्यालयाची जागा विकण्याचा डाव यशस्वी झाला तर झोपडपट्टीतील अनेक शाळा बंद करुन तेथील जागा बिल्डरला विकण्याची प्रथा सुरु होईल. झोपडपट्टीतील शाळा बहुजनांच्या असून या शाळा बंद पाडण्याचा मोठा रस्ता यामुळे मोकळा होईल आणि त्याचीच भीती मला वाटते आहे. शिवनेर विद्यालयामध्ये गेल्या दोन वर्षात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत होते. परंतु आता या शाळेच्या चालकांनी मुलांना शाळेत प्रवेश देण्यास बंद करणे, शिक्षक व मुख्याध्यापकाना छळणे, त्यांचे पगार बंद करणे असे बेकायदेशीर काम शिवनेर विद्यालयामध्ये सुरु आहे.

सभापती महोदय, या शिवनेर विद्यालयाच्या संदर्भात शिक्षण निरीक्षकांनी हस्तक्षेप करुन व्यवस्थापनाचा डाव हाणून पाडण्याचाही प्रयत्न केला होता. परंतु या जागेमध्ये करोडो रुपयांचा व्यवहार होण्याची अपेक्षा असल्यामुळे संस्था चालक ऐकण्यास तयार नाही. शिक्षण निरीक्षकांच्या सुनावणीच्या वेळेस संस्था चालक असे म्हणाले की, माझी जमीन 400 कोटी रुपयांच्या किंमतीची असून मला तुमची परवा नाही. मी ही जागा विकणार आहे. अशा प्रकारची भाषा संस्था चालकांची असेल तर आज आपल्या मुंबईवर किती मोठे संकट येऊ शकते याचा आपल्याला अंदाज बांधता येईल. या विषयासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी थेट हस्तक्षेप करण्याची गरज आहे. हा केवळ एका शाळेचा प्रश्न नाही तर ज्या ज्या ठिकाणच्या झोपडपट्टीतील शाळा आहेत, त्यांचे जे भूखंड आहे त्या भूखंडाला अनुदानित शाळांसाठीचे आरक्षण लागू करण्याची आवश्यकता असून त्याबद्दल शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी मागणी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून करीत आहे. धन्यवाद

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय श्री. चंद्रकांत रघुवंशी )**

ॲड.हुस्नबानू खलिफे :सभापती माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यातील मुस्लीम समाजातील 50 जमातीसाठी शासनाने दि. 19 जुलै, 2014 मध्ये विशेष मुस्लीम जमातीसाठी आरक्षणाचा निर्णय घेतला होता. मुस्लीम समाजाच्या आरक्षणासाठी उच्च न्यायालयात गेले असता उच्च न्यायालयाने मराठा आरक्षण रद्द केले. तथापि मुस्लीम समाजाला 5 टक्के आरक्षण शिक्षणात दिले मात्र नोकरीत आरक्षण न दिल्यामुळे त्यांच्यात तीव्र असंतोष निर्माण झ ाला आहे. सभागृहात दुरूस्ती विधेयक न ठेवल्यामुळे व त्यावर निर्णय न घेतला गेल्यामुळे मुस्लीम समाज सवलतीपासून वंचित राहत आहे. त्यामुळे यासंदर्भातील बिल आज किंवा उद्याच आणले गेले पाहिजे नाही तर ते विधेयक लॅप्स किंवा रद्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे विधेयक दुरूस्तीसाठी सभागृहात तातडीने आणून त्यावर चर्चा होऊन मुस्लीम समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

-----

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसेचे "Why I Assassinaated Ghandhi" हे भाषांतरित पुस्तक नवी दिल्ली येथे नुकतेच प्रकाशित झाले आहे. या पुस्तकाच्या प्रकाशकाने त्या संदर्भात दिलेली मुलाखत वर्तमानपत्रांमध्ये छापून आली आहे. हा प्रकाशक आत्मप्रौढीने म्हणतो की, "एखादा कीडा तुम्हाला त्रास देत असेल तर त्याला तुम्ही मारणार नाही काय ?" अशा पद्धतीची अत्यंत आक्षेपार्ह विधाने या प्रकाशकाने केलेली आहेत. हे पुस्तक दिल्लीमध्ये मोठ्या प्रमाणावर वितरित होत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याबद्दल अशा गोष्टी घडत असताना त्याचा केवळ निषेध करुन चालणार नाही तर अशा गोष्टींना पायबंद घालण्यासाठी काय करता येईल याचाही विचार झाला पाहिजे. अशाप्रकारचे आक्षेपार्ह साहित्य करणाऱ्यांचा निषेध आपण सर्वांनी एकत्रितपणे करावा अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. या संदर्भात सरकारचे काय म्हणणे आहे हे त्यांनी स्पष्ट करावे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी निवेदन करण्यात येईल.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, महान पुरुषांचा अपमान करणाऱ्या घटना देशामध्ये आणि राज्यामध्ये घडत आहेत. महात्मा गांधीजींची हत्या करणाऱ्या नथुराम गोडसेंवर फिल्म काढून महात्मा गांधींजींची हत्या कशी योग्य होती आणि तो कसा महापुरुष होता हे दाखविण्याचा प्रयत्न त्या फिल्ममधून करणार आहोत असे त्यांनी स्पष्ट केलेले आहे. महाराष्ट्रामध्ये अशी फिल्म येत असेल किंवा तसा कोणी प्रयत्न करीत असेल तर आपण वेळीच हालचाल केली पाहिजे. महाराष्ट्रात अशाप्रकारची कोणतीही घटना घडू नये यासाठी माननीय मंत्री स्पष्टपणे प्रतिक्रिया देतील काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी माननीय मुख्यमंत्री निवेदन करतील. या विषयावर विधानसभेमध्ये चर्चा झाली, त्यावेळी मुख्यमंत्री महोदयांनी उत्तर देताना सांगितले की, नथुराम गोडसे हा हत्यारा होता, आहे आणि राहणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश महेता....

नथुराम गोडसे नावाची कोणतीही प्रवृत्ती हे राज्य खपवून घेणार नाही. अशी प्रवृत्ती करणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे या संदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी मुख्यमंत्री निवेदन करतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी दंडात्मक कारवाईचा उल्लेख केला. तशी कारवाई करण्यात येईल काय ?

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, होय.

(काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात )

**तालिका सभापती (श्री.चंद्रकांत रघुवंशी )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांनी कृपया खाली बसावे. औचित्याच्या मुद्यावर सन्माननीय सदस्यांना भाष्य करता येणार नाही. या संदर्भात शासनाने उद्या निवेदन करण्यात येईल असे सांगितले आहे. तेव्हा हा विषय येथेच संपला आहे.

----------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्य शासनाने दिनांक 20 जुलै, 2011 रोजी एक शासन निर्णय निर्गमित केला. हा शासन निर्णय अपंग अधिकारी, कर्मचारी व शिक्षकांना सहाय्य करणारा आहे. या शासन निर्णयानुसार शासकीय किंवा निमशासकीय सेवेत असणाऱ्या अपंग कर्मचाऱ्यांना किंवा शिक्षकांना सहाय्यक उपकरणे / तंत्रज्ञान उपलब्ध करुन देण्यासाठी मदत करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

ठाणे् जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागातील जवळपास 104 अपंग शिक्षकांनी त्या संदर्भातील प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांना दोन वर्षापूर्वी दिलेले आहेत. या अपंग शिक्षकांनी वारंवार विनंती करुनही त्यांना या लाभापासून वंचित ठेवलेले आहे. अपंग शिक्षकांना मदत करण्यापासून टाळाटाळ केली जात आहे. माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती आहे की, या अपंगाची देय रक्कम त्यांना तातडीने देण्यात यावी आणि मागील दोन वर्षापासून अपंगाना लाभापासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करावी.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

अलिबाग (जिल्हा रायगड) तालुक्यातील सातिर्जे ग्रामपंचायतीमध्ये अनागोंदी कारभार सुरु असून ग्रामसेवक सातिर्जे हे सरपंचाच्या दडपणाखाली जनतेवर अन्याय करीत आहेत. एका प्रकरणी माहितीच्या अधिकारातील अर्जाची माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे त्यांना आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी एका प्रकरणात 16 हजार 500 रुपये दंड केला आहे.

एका प्रकरणी श्री.श्रीधर गंगाधर कर्वे यांचे घर क्रमांक 96, गट क्रमांक 367 याची नोंद सन 1956 पासून आहे. तेच घर क्रम.466 क्रमांक वर दुसरे घर दाखविले असून ते असेसमेंट लिस्टमध्ये अनुक्रमांक 533 वर नोंदविलेले आहे. वीज मंडळाकडे विजेचा पुरवठा करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या अससेमेंट लिस्टमध्ये "अनधिकृत" बांधकाम यावर कागद चिटकवून ग्रामसेवकांची सही नसताना वीज मंडळाकडे झेरॉक्स प्रत देऊन सरपंचाचा दाखला दिला आहे.

घर क्र.96, गट क्र.367 याची घरपट्टी श्रीधर गंगाधर कर्वे हे रितसर भरत असताना संदेश दत्तात्रय पवार यांनी दिनांक 4 मार्च 2006 रोजीचा जुना स्टॅम्प पेपर खरेदी करुन 5 वर्षानंतर दिनांक 29.8.2011 रोजी ग्रामपंचायत ठराव करुन हे घर संदेश दत्तात्रय पवार यांचे नावे दाखविले आहे.

ग्रामपंचायत क्षेत्रात प्रत्यक्ष जागेवर एकच घर असताना दोन्ही घरांवर घरपट्टी लावण्याचा ठराव मंजूर करुन ते संबंधित घर श्री.संदेश दत्तात्रय पवार यांच्या नावे दाखवून ग्रामपंचायतीने फसवणूक केली आहे व घराचे मूळ वहिवाटदार मालक श्री.श्रीधर गंगाधर कर्वे यांच्यावर अन्याय केला आहे.

तरी ग्रामपंचायत सातिर्जे यांच्या अनागोंदी कारभाराबद्दल कायदेशीर चौकशी व्हावी, तसेच श्री.श्रीधर कर्वे यांना योग्य तो न्याय मिळावा म्हणून मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..5..

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

बेळगाव-कारवार या सीमाभागातील बांधवांसंबंधी माझा औचित्याचा मुद्दा आहे. सन 1956 पासून महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यांमध्ये सीमा वाद सुरु आहे. मागील एक वर्षापासून त्या भागात अतिशय अशांतता निर्माण झालेली आहे. येळ्ळूरला अत्यंत निर्घृणपणाने मराठी बांधवांवर लाठीहल्ला करण्यात आला. आता ती केस न्यायालयात उभी राहणार असून त्यासाठी ॲड.रोहतगी यांची नियुक्ती शासनाने केलेली आहे. या सीमावादाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयात ज्या पद्धतीने आपली बाजू मांडायला पाहिजे त्या पद्धतीने ती न मांडण्यात आल्यामुळे आपणास अनेकवेळला माघार घ्यावी लागली आहे. ॲड.रोहतगी यांच्यामार्फत आपली भूमिका ठामपणे आणि व्यवस्थितपणे मांडली जावी यासाठी सरकारने पावले उचलावीत. दुसरे म्हणजे बेळगाव महानगरपालिकेमध्ये मराठी बांधव मोठ्या संख्येने निवडून आल्यामुळे जबरदस्तीने "बेळगावचे" नामकरण "बेळगावी" करण्यात आले आहे. या प्रकरणात केंद्र सरकारने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. याचा फटका नाट्यक्षेत्राला देखील बसलेला आहे. त्या ठिकाणी जानेवारी महिन्यामध्ये नाट्य संमेलन होणार होते. पण त्यामध्ये काही अडचणी आल्या तेव्हा शिवसेना पक्ष प्रमुख मा.श्री.उद्धवजी ठाकरे यांनी मध्यस्थीची भूमिका घेऊन महाराष्ट्र एकीकरण समितीचे प्रमुख श्री.किरण ठाकूर आणि श्री.मोहन जोशी यांच्यामध्ये चर्चा घडवून आणली आणि नाट्य संमेलन व्यवस्थित पार पाडण्यासाठी प्रयत्न केलेला आहे. हा एका पक्षाचा मुद्दा नसून महाराष्ट्रातील जनतेच्या जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. या संदर्भात शासनाने सकारात्मक पाऊल उचलावीत. तसेच हा मुद्दा सर्वपक्षीय असल्यामुळे आपण सहकार्य करावे अशी माझी विनंती आहे.

-----------

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सीमा भागाच्या बाबतीत सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेल्या मुद्याला मी पाठिंबा देतो. सभागृहाचे उपनेते या ठिकाणी उपस्थित आहेत आणि ते बेळगावच्या जवळच राहणारे आहेत. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, बेळगाव भाग केंद्रशासित करण्यासंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. महोदय, अधिवेशन सुरु होण्यापूर्वी मी हा मुद्दा मांडला होता. आज बेळगावचा मराठी माणूस त्रस्त झाला आहे. त्यांच्यावर कर्नाटक सरकारकडून अन्याय होत असून, त्याची पिळवणूक होत आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत राज्य सरकारची भूमिका स्पष्ट आणि कठोर असावयास पाहिजे. या निमित्ताने मी जाणून घेऊ इच्छितो की, शासन सीमाभागाच्या बाबतीत सर्वोच्च न्यायालयात जो दावा सुरुआहे तो जलगद गतीने चालविण्यासाठी प्रयत्नशील राहील काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाच्या बाबतीत हे राज्य सरकार मराठी भाषिकांच्या बाजूनेच आहे. सर्वोच्च न्यायालयात जी केस सुरु आहे त्या ठिकाणी निष्णात वकील देण्याची काळजी घेण्यात येत आहे. एवढेच नव्हे तर ही केस चालविण्यासाठी राज्यातून जे वकील किंवा अधिकारी दिल्लीला जातात त्यांच्या राहण्यासाठी महाराष्ट्र सदनात कायमचे काही कक्ष आरक्षित केलेले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद विषयाच्या बाबतीत राज्य सरकार नेहमीच मराठी भाषिकांच्या बाजूने उभे राहील.

----------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, सारंगवाडी साठवण तलाव वजा पूर संरक्षण योजना, ता.चिखली, जि.बुलढाणा या प्रकल्पासाठी शासनाने मौजे हिवरा खुर्द, मौजे किन्ही नाईक व मौजे इसोली शिवारातील जमिनी संपादित केलेल्या आहेत. या संपादित केलेल्या जमिनीवर गेल्या दोन वर्षापासून प्रकल्पाचे काम सुरु आहे. या जमिनीवर प्रकल्पाचे काम सुरु असल्यामुळे शेतकऱ्यांना गेल्या दोन वर्षापासून सदर जमिनीवर पीक घेता आले नाही. त्या भागातील ग्रामस्थांकडे उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नाही. शासनाने प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा अजिबात मोबदला दिला नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. त्यामुळे या सर्व शेतकरी बांधवांनी उपोषणाचे हत्यार उपसले असून प्रकल्पाचे काम बंद केले आहे. मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मागणी करतो की, उपरोक्त प्रकल्पासाठी घेतलेल्या जमिनीपोटी शेतकऱ्यांना कमीत कमी 80 टक्के रक्कम अग्रीम मोबदला म्हणून द्यावी आणि सरकारने यामध्ये लक्ष घालावे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिपकराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्यात मोठ्या प्रमाणावर तहसील कार्यालयाच्या आवारात दस्तलेखक व टंकलेखक आदि कामे करीत असणे, त्यामुळे जनतेला लवकरात लवकर दस्तऐवज माननीय तहसीलदारांकडून मिळण्यास मदत होणे, मात्र शासनाकडून बऱ्याच दिवसांपासून संबंधितांना परवाना देण्यात न येणे, परिणामी सांगोला तहसील कार्यालयासह राज्यातील इतर तहसील कार्यालयात दैनंदिन कामासाठी येणाऱ्या अशिक्षित व ग्रामीण जनतेच्या मदतीसाठी दस्तलेखक व टंकलेखक यांना नोंदणीकृत परवाना देण्यात यावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून करीत आहे.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्यात प्रामुख्याने जिल्हा परिषद व खाजगी शिक्षण संस्थांच्या माध्यमातून शिक्षण देण्याचे महत्त्वाचे कार्य होत आहे. राज्यात एकूण शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी संख्येमध्ये खाजगी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांचा मोलाचा वाटा आहे. राज्यात जिल्हा परिषदेच्या सर्वात जास्त म्हणजेच 379 इतक्या माध्यमिक शाळा मराठवाडा विभागामध्ये आहेत. त्या सर्व शाळांमधून गोरगरीब शेतकऱ्यांची मुले-मुली मोठ्या संख्येने शिक्षण घेत आहेत. या शाळांसाठी 370 मुख्याध्यापक पदांपैकी 299 पूर्ण वेळ राजपत्रित मुख्याध्यापक वर्ग-2 ची पदे मान्य आहेत. पण ती गेल्या अनेक वर्षांपासून भरली न गेल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. एखाद्या गाडीला ट्रेंड ड्रायव्हर नसेल तर ती गाडी सुध्दा व्यवस्थित चालू शकत नाही, या तर विद्यार्थी घडविणाऱ्या शाळा आहेत. तेव्हा या सर्व जिल्हा परिषद माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक वर्ग-2 ची पदे भरण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

--------

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत देशपांडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, वाशिम जिल्ह्यात शाळा चोरीला गेल्याबाबतचा हा मुद्दा आहे. अमरावती विभागातील वाशिम जिल्ह्यामध्ये मंगरूळपीर तालुक्यात मौजा दाभा येथे शासनाकडून 2006 मध्ये महात्मा जोतिबा फुले विद्यालयाला मान्यता देण्यात आली. ज्या संस्थेची ही शाळा आहे त्या संस्थेचे नाव सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था आहे. तद्नंतर संस्थेने ती शाळा मौजा सोनखास शहापूर येथे स्थलांतरित करण्यात आली. परंतु त्या शाळेची इमारत नाही, मोकळी जागा नाही. ग्रामपंचयतीचा दाखला आहे की, अशा ठिकाणी कोणतीही शाळा सुरु नाही. तरी सुध्दा शिक्षणाधिकाऱ्यांनी त्या शाळेतील कर्मचाऱ्यांना मान्यता दिली. केवळ मान्यताच दिली नाही तर ज्या कर्मचाऱ्यांना मान्यता दिली ते कर्मचारी अतिरिक्त ठरवून त्यांना अनुदानित शाळेत सामावून घेतले. एवढेच नव्हे तर त्यांचे पगार सुध्दा सुरु केले. अशाप्रकारे वाशिम जिल्ह्यात शिक्षण विभागामध्ये भ्रष्टाचार करुन अनियमितपणे काम सुरु आहे. या मुद्याच्या अनुषंगाने शासनाकडून उचित कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत घरपोच आहार (THR) पुरविण्यासाठी स्थानिक स्तरावर महिला बचत गट, ग्राम समुदाय, महिला मंडळ यांच्याकडून पुरवठा सुरु करण्याबाबतचा हा मुद्दा आहे. या विषयाच्या अनुषंगाने निदर्शनास आणून देतो की, या प्रकरणी 2013 मध्ये निविदा प्रकाशित करण्यात आली होती. ज्यावेळी निविदा उघडण्यात आल्या त्यावेळी 6 निविदाकार महिला बचत गटांना पात्र ठरविण्यात आले. त्यानंतर बचत गटांची तपासणी झाली. या निविदेसाठी ज्यांची निवड करण्यात आली त्यांनी संबंधित ठिकाणी आहार योजनेसाठी आवश्यक ती यंत्रसामुग्री सुध्दा बसविली. तद्नंतर नागपूर जिल्हा परिषदेच्या ज्या उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे या बाबतचा कार्यभार आहे त्यांनी माननीय जिल्हाधिकारी, नागपूर यांची दिशाभूल करुन त्यांना चुकीची माहिती दिली. त्यामुळे अद्यापपर्यंत नागपूर शहरात सदरहू योजना लागू झालेली नाही. नागपूर जवळच्या भंडारा, गोंदिया, वर्धा या जिल्ह्यात ही योजना लागू करण्यात आली आहे. परंतु नागपूर जिल्हा परिषदेच्या संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मात्र ही योजना सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही केली नाही. त्यामुळे शासनाने त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून करतो.

-------

..7..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी विधानपरिषद सभागृहात उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भातील माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

आता विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात येतील. त्यानंतर मराठी भाषा विकासाच्या अल्पकालीन चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

------

..8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>**

**पृ. शी./मु. शी.** : मॅटने आरक्षणाचा कायदा घटनाबाह्य ठरविणे, याबाबत श्री.हरिसिंग राठोड वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात कित्येक वर्षांपासून मागासवर्गीयांसाठी आरक्षण दिले होते. राज्याने आरक्षणाबाबतचा कायदा 2001 मध्ये संमत केला होता. आरक्षणाचा अनुशेष भरला जात नव्हता, म्हणून अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदरहू कायद्याची नीट अमंलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्राने सदरहू कायदा केला होता. परंतु मॅट न्यायालयाने हा कायदा घटनाबाह्य ठरविला आहे. त्यामुळे मागासवर्गीयांमध्ये निराशा पसरली आहे. गेल्या 8 वर्षात ज्या ज्या मागासवर्गीय कर्मचारी/अधिकाऱ्यांना बढती मिळाली होती त्या सर्व बढतीच्या फूटनोटमध्ये लिहिले आहे की, बढतीचे आरक्षण न्यायालयाच्या निकालाच्या अधीन राहून दिले जाईल. मागासवर्गीय समाजावर अन्याय झाल्यामुळे त्या समाजामध्ये तीव्र असंतोषाची भावना पसरली आहे.

---------

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड ....

त्यामुळे सामाजिक न्यायाला तडा जाण्याची शक्यता आहे. शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन न्यायालयामध्ये चांगले वकील लावले पाहिजेत. मराठ्यांची प्रकरणे हाताळली जातात, तितक्याच पोटतिडकीने या संदर्भात लढले पाहिजे, ही विशष उल्लेखाद्वारे माझी शासनाला विनंती आहे.

----

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : यवतमाळ जिल्ह्यातील आट्यापाट्या खेळात मानाचा असा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन राज्य शासनाने गौरविलेले श्री. लौकिक जगन्नाथ पुलकर या गुणी खेळाडूवर उपासमारीची वेळ आल्याने त्याला शासनाने सेवेत सामावून घेणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"यवतमाळ जिल्ह्यातील आट्यापाट्या या पारंपरिक खेळात मैदानावर आपले वर्चस्व गाजविणाऱ्या व ज्याला क्रीडा क्षेत्रातील मानाचा असा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार देऊन राज्य शासनाने गौरविले आहे, अशा श्री. लौकिक जगन्नाथ पुलकर या गुणी खेळाडूला जीवनाच्या डावात मात्र धडपडावे लागत आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी या गुणी खेळाडूवर रोजंदारीने भिंती रंगविण्याचे काम करण्याची वेळ आली आहे. त्याला दोन वेळेच्या जेवणासाठी संघर्ष करावा लागत आहे. आपल्या संसाराचा गाडा हाकण्याबराबरच अपघातामुळे पितृ छत्र हरविलेल्या भावाचाही सांभाळ करीत आहे. या गुणी खेळाडूला शासनाने तातडीने सेवेत घेऊन त्याच्या रोजीरोटीचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी मी या विशेष उल्लेद्वारे करीत आहे."

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नागरिक व शासन यामध्ये समन्वय साधण्यासाठी पुणे जिल्हा परिवहन प्राधिकरणावर नागरिकांच्या प्रतिनिधींची नेमणूक करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अनिल भोसले यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"पुणे येथे पूर्वीचे प्रादेशिक परिवहन प्राधिकरण बरखास्त करून मागील सरकारने जिल्हा परिवहन प्राधिकरणाची स्थापना केलेली होती. नागरिक व शासन यांमध्ये समन्वय साधण्यासठी या प्राधिकरणावर नागरिकांचा एक प्रतिनिधी घेणे आवश्यक असतानाही मागील 3 वर्षांपासून नागरी प्रतिनिधीची नियुक्ती करण्यात आलेली नाही. परिणामी, प्रवाशांना उपयुक्त अनेक योजना अंमलात आणण्यासाठी अडचणी येत आहेत. सर्व निर्णय घेण्याचे अधिकार सरकारी अधिकाऱ्यांच्या हाती असल्यामुळे नागरिकांच्या हिताचे निर्णय घेणे किंवा विविध योजना मार्गी लावण्यासाठी नागरिकांच्या प्रतिनिधींची नेमणूक सरकारने तातडीने पुणे जिल्हा परिवहन प्राधिकरणावर करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखद्वारे शासनास करीत आहे."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मौजे गेवराई (जिल्हा बीड) येथील पंचायत समिती कार्यालयाची इमारत मोडकळीस आल्याने येथील कर्मचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. अमरसिंह पंडित यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"मौजे गेवराई (जि. बीड) येथील पंचायत समिती कार्यालयाची इमारत मोडकळीस येऊन धोकादायक बनणे, कर्मचारी व इतर यांना जीव मुठीत धरून काम करावे लागणे, पंचायत समिती इमारत बांधकामासाठी कार्यालयाच्या नावाची नोंद सात-बारा उताऱ्यावर घेणे बाबत शासनाने विभागीय आयुक्त यांना निर्देशित करणे, विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, बीड यांनी याबाबत कार्यवाहीचे आदेश संबंधितांना देणे, सुमारे वर्षभराचा कालावधी होऊन अद्याप ही प्रक्रिया पूर्ण न होणे, लोकप्रतिनिधी व पंचायत समिती कार्यालयाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येणे, इमारत धोकादायक झाल्यामुळे अनेकांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता वाढणे, इमारत बांधकामास होणारा विलंब टाळण्यासाठी पंचायत समिती कार्यालयाची नोंद सात-बारा उताऱ्यावर घेऊन नवीन इमारत बांधकामास विनाविलंब मंजुरी देण्याची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : बेकायदा सुरक्षारक्षकांचा सुळसुळाट वाढलेला असून याबाबत सुरक्षा रक्षकांना व्यावसायिक वापरासाठी शस्त्र परवान्याकरिता "आर्म लायसन्स ॲक्ट" मध्ये बदल करण्याविषयी पोलीस दलाकडून प्रस्ताव मांडणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"राज्यात शस्त्रधारी सुरक्षा रक्षकांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, मात्र त्यांची उपलब्धता शासकीय सरकारी निर्बंधामुळे अडकलेली असणे, खाजगी शस्त्र परवान्यांचा व्यावसायिक वापर करता येत नसल्याने तसेच बँका आणि सोसायट्यांना तशी मुभा असली तरी तशी हिंमत कोणी दाखवत नाही. अनेक सिक्युरिटी कंपन्या शस्त्रधारी सुरक्षा रक्षक पुरविण्याचा दावा करीत असले तरी त्यांच्याकडे अधिकृत शस्त्र परवाना क्वचितच आढळतो. त्यामुळे बेकयदा सुरक्षा रक्षकांचा सुळसुळाट वाढलेला आहे. याबाबत सुरक्षा रक्षकांना व्यावसायिक वापरासाठी शस्त्र परवान्याकरिता "आर्म लायसन्स ॲक्ट" मध्ये बदल करण्याविषयी पोलीस दलाकडून प्रस्ताव आल्याचे निदर्शनास येत असणे, याकरिता शासनाने करावयाच्या कार्यवाही संदर्भाबाबत मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या समन्वयातून वर्धा-नांदेड-यवतमाळ या 270 कि.मी. रेल्वे मार्गाचे काम गेली 6 वर्षे होऊनही सुरुवात न झाल्याने ते सुरू करण्याकरिता राज्य शासनाने पाठपुरवा करणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. ख्वाजा बेग यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या समन्वयातून वर्धा-नांदेड-यवतमाळ या 270 कि.मी. रेल्वे मार्गाचे काम करण्याचा निर्णय फेब्रुवारी, 2008 मध्ये घेण्यात येणे, मात्र सदर निर्णयाला सुमारे 6 वर्षांचा काळ लोटूनही प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात करण्यात न येणे, परिणामी शासनाने जाहीर केलेल्या घोषणा ह्या फसव्या असल्याचा नागरिकांचा होत असलेला संभ्रम, याबाबत सदर रेल्वे प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्याबाबत राज्य शासनाने पाठपुरावा करावा, असे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास शिफारस करीत आहे."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : सोलापूर जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह अनेक पदे रिक्त पदांमुळे अनेक प्रशासकीय कामांना दिरंगाई व विलंब होत असणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दीपकराव साळुंखे यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"सोलापूर जिल्हा परिषदेत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह प्रकल्प संचालकाचे पद मागील दोन वर्षांपासून रिक्त असणे, बांधकाम विभागातील उप कार्यकारी अभियंता वर्ग-1 ची 4 पदे रिक्त असणे, जिल्ह्यात साथीच्या रोगांचे थैमान असताना 38 वैद्यकीय अधिकारी यांची पदे रिक्त असणे, काही प्राथमिक आरोग्य केंद्रांत डॉक्टर नसणे, जिल्हा परिषदेतील रिक्त पदांमुळे अनेक प्रशासकीय कामांना होणारी दिरंगाई व विलंब यामुळे सर्वसामान्य ग्रामीण जनतेत निर्माण झालेला असंतोष, जिल्हा परिषदेचा कारभार सुरळीत चालावा म्हणून शासनाने अधिकारी व वेद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे तत्काळ भरावीत, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे."

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : राज्यात सिकलसेल या जीवघेण्या रोगामुळे लहान बालकांपासून तरुणांचा मोठ्या संख्येत मृत्यू होत असून महाराष्ट्र राज्य स्तरावर सिकलसेल नियंत्रण यंत्रणा स्थापन करुन 2 'मॉजेले' (मॉलिक्युलर जेनेटीक लेबोरेटरी) स्थापित करणे याबाबत सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"राज्यातील 36 पैकी 21 जिल्ह्यांतील बहुतांश गोरगरीब जनता सिकलसेल या जीवघेण्या रोगाच्या विळख्यात सापडणे, अनेक लहान बालकांपासून तरुणांचा मोठ्या संख्येत मृत्यू होणे, राज्य शासन सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम राबवित असले, तरी संबंधित विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या अनास्था व उदासीनतेमुळे सिकलसेलची सामाजिक आरोग्य समस्या दिवसेंदिवस गंभीर होत जाणे, सिकलसेल रुग्णांची आरोग्य तपासणी नियमितपणे करणे व राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत या रोगाचा समावेश करणे, उपचारादरम्यान रुग्णाला व त्याच्या मदतनीसाला एसटी प्रवास भाडे सवलत प्रदान करणे, महाराष्ट्र राज्य स्तरावर सिकलसेल नियंत्रण यंत्रणा स्थापन करुन 2 'मॉजेले' (मॉलिक्युलर जेनेटीक लेबोरेटरी) स्थापित करणे या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

सभापती महोदय, विदर्भाच्या अत्यंत महत्वाच्या जीवघेण्या प्रश्नाकडे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी माननीय आरोगय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो. ते अनायसे सभागृहात उपस्थित आहेत. राज्यात सिकलसेल या जीवघेण्या आजाराने पीडित रोग्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गोरगरीब जनता सिकलसेल या जीवघेण्या रोगाच्या विळख्यात सापडली असून अनेक लहान मुलांपासून तरुण मुले देखील मोठ्या संख्येने या रोगामुळे मृत्युमुखी पडत आहेत, याची जाणीव माननीय मंत्र्यांना आहे. विदर्भामध्ये विशेषत: विशिष्ट जाती-जमातीमध्ये या रोगाचे प्रमाण जरी जास्त असले तरी काही उच्चवर्णीय समाजात देखील या रोगाचा प्रादूर्भाव झाल्याचे निदर्शनास

..9

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

आले आहे. जागतिक आरोगय संघटनेने देखील जागतिक पातळीवर सिकलसेल रोगाची दखल घेतली असून या रोगाच्या निर्मूलनासाठी विशेष कार्यक्रम जगभरात राबविला जात आहे. आपल्या राज्यात राज्य शासन सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम राबवित असले तरी संबंधित विभागाचे अधिकारी यांची अनास्था आणि उदासीनता यामुळे सिकलसेल ही सामाजिक आरोग्य समस्या अत्यंत गंभीर होत चालली आहे. सिकलसेल रुग्णांची आरोग्य तपासणी नियमित करण्यात यावी. तसेच, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेत या रोगाचा समावेश करण्यात यावा. उपचारासाठी रुग्णाला आणि त्याच्या मदनीसाला एसटीचा निशुल्क प्रवास मिळावा. राज्य स्तरावर सिकलसेल नियंत्रण यंत्रणा स्थापन करून 2 मॉजेले (मौलिक्युलर जेनेटीक लेबोरेटरी) स्थापन करण्याची गरज असून त्यानुसार प्रभावी यंत्रणा शासनाने निर्माण करावी, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे विनंती करीत आहे.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : लोकशाहीर, आंबेडकरी महाकवी वामनदादा कर्डक यांना दिनांक 3 जानेवारी, 2004 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दोन लाख रूपये व मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका देण्याची घोषाणा केली असूनही गेली 10 वर्षे प्रयत्न करूनही त्यांच्या कुटुंबीयांना सदनिका न मिळणे याबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"लोकशाहीर, आंबेडकरी महाकवी, वामनदादा कर्डक यांना दिनांक 3 जानेवारी, 2004 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री यांनी दोन लाख रूपये आणि मुख्यमंत्री कोट्यातून सदनिका देण्याची घोषणा करण्यात येणे, मंजूर सदनिका ताब्यात घेण्यापूर्वीच त्यांचे दुर्दैवाने निधन होणे, निधनानंतर त्यांच्या वारसांनी सदनिका ताब्यात घेण्यासाठी सतत 10 वर्षे प्रयत्न करणे, त्यांच्या कुटुंबीयांनी शासनाकडे अनेक वेळा संपर्क साधूनही त्यांना मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका न मिळणे, परिणामी त्यांच्या कुटुंबीयांना करावा लागत असलेला संघर्ष, त्यांची होत असलेली गैरसोय, त्यामुळे तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषित केलेली सदनिका त्यांच्या कुटुंबीयांना तातडीने देण्यात यावी, अशी आग्रहाची मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : खानाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील शेतकऱ्यांवर झालेला अन्याय यासंबंधी श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शेतकरी नेते आप्पासाहेब तथा नारायण नागु पाटील यांनी केलेल्या संघर्षातून कसेल त्याची जमीन कायद्याची निर्मिती करण्यात आली. शेतकऱ्यांना त्यांचे न्याय हक्क देण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात 1932 ते 1939 या काळात यासाठी आंदोलन उभारावे लागले होते. त्यातूनच 1957 साली कुळ कायद्याची निर्मिती झाली. शेतकऱ्यांच्या कसत असलेल्या जमिनीचा मालकी अधिकार कायद्याने मान्य करुन सुध्दा महसूल प्रशासन या कायद्याची अंमलबजावणी करण्यास तयार नाही. महसूल विभागाच्या संगनमताने रायगड जिल्ह्यातील अनेक गावातील शेतकऱ्यांवर वर्षानुवर्षे अन्याय होत आहे. शासकीय विभागाकडे अनेकदा पत्रव्यवहार करुनही संबंधित विभाग शेतकऱ्यांकडे लक्ष देण्यास तयार नाही. उदाहरणार्थ, पनवेल तालुक्यातील खानाव गावातील गट योजना चुकीची झाली असल्याने व वहिवाटीप्रमाणे जमीन मालक व कुळ यांच्या नोंदी न झाल्यामुळे त्याचा गैरफायदा घेऊन ज्यांचा प्रत्यक्ष मालकी हक्क, कब्जा जमिनीत नाही ते चुकीच्या महसूल नोंदीचा गैरफायदा घेऊन परस्पर तिऱ्हाईत इसमास जमिनी विकत आहेत व खऱ्या जमिनी विकणाऱ्या वहिवाटदारांवर अन्याय होत आहे. पनवेल तालुक्यातील खानाव गावातील शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाविरोधात शासन दरबारी आवाज उठविण्यासाठी ग्रामस्थांनी शेतकरी प्रबोधिनी शाखा, खानाव, तालुका पनवेल, जिल्हा रायगड नावाची ग्रामस्थांची एक समिती स्थापन केली आहे. या समितीमार्फत गेले अनेक वर्षे खानाव ग्रामस्थ (तालुका पनवेल, जिल्हा रायगड) सरकारशी लढत आहेत. या विशेष उल्लेखाव्दारे मी या गंभीर प्रकरणी शासनाचे लक्ष वेधत आहे.

-------------

...2....

**पृ. शी./मु. शी.** : अकोला नगरपालिकेचे उपायुक्त श्री.दयानंद चिंचोलीकर व एसडीपीओ श्री.प्रविण मुंढे यांनी लोकप्रतिनिधींशी केलेले गैरवर्तन यासंबंधी श्री.पांडुरंग फुंडकर वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, दिनांक 27 नोव्हेंबर, 2014 रोजी अकोला महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.दयानंद चिंचोलीकर यांच्या कार्यालयात अनेक नगरसेवक तसेच भाजपा-शिवसेनेचे पदाधिकारी महानगरपालिकेच्या हद्दीतील दुकानांचे बोर्ड कोणत्या नियमाप्रमाणे काढले याची विचारणा करण्यासाठी गेले होते. यावर श्री.चिंचोलीकर यांनी "तुम्हाला काही माहिती पाहिजे असेल तर लेखी अर्ज द्या व नंतर मला वेळ भेटल्यास लेखी उत्तर देईल", असे उर्मटपणचे उत्तर दिले. यावेळी श्री.प्रविण मुंढे, एसडीपीओ, अकोला व इतर पोलीस कर्मचारी उपस्थित असताना श्री.चिंचोलीकर यांनी नगरसेवक श्री.विजय अग्रवाल यांचा गळा धरुन त्यांना खाली पाडले. या प्रकरणी श्री.प्रविण मुंढे यांनी श्री.चिंचोलीकर यांच्याशी संगनमत करुन नगरसेवकांविरुध्द गुन्ह्यांची नोंद केली. परंतु, नगरसेवकांनी श्री.चिंचोलीकर यांच्याविरुध्द दिलेल्या तक्रारीची कोणतीही दखल श्री.प्रविण मुंढे, एसडीपीओ यांनी घेतली नाही व नगरसेवकाच्या घरातील महिलांशी असभ्य वागणूक केली. श्री.चिंचोलीकर, उपायुक्त यांना लोकप्रतिनिधींनी समज देऊन देखील त्यांच्या वर्तणुकीत कोणतीही सुधारणा न होता ते जास्त द्वेषभावनेने व सुडबुध्दीने नगरसेवकांसोबत गैरवर्तणूक करीत आहेत. यामुळे श्री.दयानंद चिंचोलीकर व श्री.प्रविण मुंढे यांची बदली करुन त्यांच्या गैरवर्तणुकीची चौकशी करावी तसेच त्यांच्या कार्यकाळात बेकायदेशीर केलेल्या कामाबाबतची त्वरित कारवाई करण्याबाबत मी सभागृहात विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे.

-------------

...3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : जिल्हा परिषदेकडून वर्ग झालेल्या सर्व योजना पुन्हा जिल्हा परिषदेकडे वर्ग करणे यासंबंधी श्री.सुनील तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.सुनील तटकरे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने तळागाळातील शेतकऱ्यांकडील पाणी वाचवून शेतीचे नवीन तंत्रज्ञान ठिबक व तुषार या योजनेच्या माध्यमातून गावोगावी विस्ताराच्या तंत्राने प्रसारित करणे, योजना पूर्ण यशस्वी होत असताना जिल्हा परिषदेला समीकरण शुल्क मोठ्या प्रमाणावर मिळत असणे, या सर्व योजना सन 1998 मध्ये एक खिडकीकडे वर्ग केल्यामुळे जिल्हा परिषदेकडे समीकरण शुल्क कमी होऊन जिल्हा`परिषदेच्या उत्पन्नात घट होणे, जिल्हा परिषदेचे सन 1983-84 पासून असलेले केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरणाच्या योजनेअंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून 50 टक्के अनुदानावरील बैलचलीत, मनुष्यचलीत ट्रॅक्टरचलीत अवजार आणि जलसिंचन साधनांच्या सुविधा पुरविणारी एकमेव लोकप्रिय योजना देखील सन 2014-2015 च्या मार्गदर्शक सूचनेमध्ये राज्य शासनाकडे वर्ग करण्यात येणे तसेच भविष्यात मागासवर्गीयांच्या कल्याणकारी विशेष घटक योजना कृषी अधीक्षक कार्यालयाकडे वर्ग होण्याची शक्यता, व्यक्त होत असलेली भीती, जिल्हा परिषदेकडे कृषी विभागाच्या योजना सामान्य शेतकऱ्यांपर्यंत न पोहोचल्यामुळे शेतकऱ्यात पसरलेले नैराश्याचे वातावरण, वरील योजनांची परिणामकारक अंमलबजावणी होण्यासाठी जिल्हा परिषदेकडे कृषी विस्ताराच्या योजना पोहोचविण्याची नितांत आवश्यकता, आतापर्यंत जिल्हा परिषदेकडून वर्ग केलेल्या सर्व योजना पुन्हा जिल्हा परिषदेकडे वर्ग करुन 73 व्या घटना दुरुस्तीनुसार त्यांची अंमलबअजावणी करण्याची होत असलेली मागणी याबाबत या विशेष उल्लेखाव्दारे मी शासनास शिफारस करीत आहे.

सभापती महोदय, 73 व्या घटनादुरुस्ती नंतर जे काही बदल आपण स्विकारले, त्या बदलानंतर हा झालेला बदल घटनेशी विसंगत असल्यामुळे या संदर्भात तातडीने कार्यवाही होईल, अशी अपेक्षा व्यक्त करतो.

----------------

...4.....

**पृ. शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यातील काही गावांना होत असलेला फ्लोराईडयुक्त पाण्याचा पुरवठा यासंबंधी श्री.हेमंत टकले, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, नागपूर येथील अधिवेशनात विदर्भाचे प्रश्न प्रामुख्याने मांडले जातात. त्यामध्ये मला सध्याच्या स्थितीत अत्यंत दुर्दैवी अशा चंद्रपूर जिल्ह्याचा उल्लेख करावा लागतो. या जिल्ह्यात प्रदूषणाचे अनेक प्रश्न आहेत. ते प्रश्न असताना चंद्रपूर जिल्ह्यातील 240 गावे फ्लोराईडयुक्त पाणी पितात. त्यामुळे त्यांना अनेक रोगांची लागण होते, त्यांच्या मेंदुवर परिणाम होतो, शरीरात रक्त तयार होण्याची प्रक्रिया थांबते आणि त्यांना अपंगत्व येते. यामध्ये जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील 30, चिमुर येथील 38 आणि भद्रावती येथील 22 गावांचा समावेश आहे आणि तेथील पाणी पुरवठा योजना सदोष आहेत. त्यामुळे तेथील नागरिक फ्लोराईडयुक्त पाणी पित आहेत. हा अत्यंत महत्त्वाचा आणि जीवन मरणाचा प्रश्न आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गोरगरीब जनतेला फ्लोराईडयुक्त पाणी पिण्यापासून मुक्त करण्यासाठी तातडीने विशेष निधी देण्यात यावा. या संदर्भात आपण निरीचे सहकार्य घेतलेले आहे. निरीचे सहकार्य घेऊन आर्थिक सहाय्य देण्याची आवश्यकता असेल तर ती तातडीने मंजूर करुन नागरिकांच्या पाणी पुरवठ्यामधून फ्लोराईडयुक्त पाणी कायमचे नष्ट होईल, या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत, अशा प्रकारची विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी**. : ग्राहक न्यायालयातील न्यायाधीशांच्या विविध समस्या यासंबंधी श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात न्याय व्यवस्था बळकट असली पाहिजे, बलशाली असली पाहिजे. या राज्यातील ग्राहक न्यायालयामधील न्यायाधीशांबाबत राज्यातील प्रशासनासमोर अतिशय गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील ग्राहक न्यायालयांमध्ये न्यायाधीश रोजंदारीवर असणे, चपराशी व शिपाई यांच्या वेतनापेक्षा न्यायाधीशांचे मानधन कमी असणे, न्यायाधीशांना 400 रूपये रोजंदारीवर नियुक्त करणे, हा न्यायाधीश महोदयांचा, न्याय व्यवस्थेचा अपमान होणे, माननीय न्यायाधीशांच्या मानधनात वाढ करण्यात येणे, या ग्राहक न्यायालयांमधील 41 न्यायाधीश अद्याप बिनपगारी असणे, या विषयी केंद्रीय मंत्री श्री.के.व्ही.थॉमस यांच्याकडील बैठकीत अनेक ठराव पारीत होणे, त्यानुसार ग्राहक न्यायालयाच्या सदस्यांना प्रथम न्यायदंडाधिकाऱ्यांचा दर्जा देणे, वेतन, भत्ते आणि सुविसधाही देणे, सहसचिव समकक्ष वेतनश्रेणी लागू करणे, स्केलनुसार किमान 80 हजार वेतनाची त्यांची अपेक्षा असणे, अशा सर्व शिफारशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला करीत आहे.

---------------

...6.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापती स्थानी माननीय उप सभापती)**

पृ.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्युनगंड दूर करणे

मु.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्युनगंड दूर करणे या विषयावर सर्वश्री.हेमंत टकले, सुनिल तटकरे, राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री.आनंद ठाकूर, अमरसिंह पंडित, रामराजे निंबाळकर, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, ख्वाजा बेग, प्रभाकर घार्गे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु.........

**उप सभापती** : आता आपण मराठी भाषा प्रस्तावावर चर्चा सुरु करणार आहोत. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे हे ऑनलेग होते. अद्याप सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना बोलावयाचे आहे. त्या आता सभागृहात उपस्थित नाहीत. या सदस्यांची भाषणे झाल्यानंतर मंत्र्यांचे उत्तर सुरु होईल.

(काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

ज्यांची नावे पक्ष प्रतोदांकडून आलेली आहेत, त्यांनाच मी संधी देणार आहे. आता फक्त दोनच सन्माननीय सदस्यांची नावे माझ्याकडे आहेत. त्यांनाच मी संधी देणार आहे. अन्य कोणालाही संधी मिळणार नाही.

आता सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी आपले भाषण सुरु करावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले व अन्य सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. मराठी भाषा समृध्द व्हावी, सर्वसमावेशक व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. इंग्रजी भाषेने सर्व जगाला कवेत घेतल्यामुळे इंग्रजी भाषेचा विस्तार झाला आणि ती जगभर पसरली. मराठी भाषेने काही नवनवीन शब्द आत्मसात करणे गरजेचे आहे. त्यामुळे ही भाषा वाढण्यास मदत होईल. याबाबत मतभेद निर्माण करण्याची आवश्यकता नाही. भाषा वाढविण्यासाठी, भाषेचा विस्तार करण्यासाठी मराठी भाषा साधी आणि सोपी झाली पाहिजे.

यानंतर श्री.वि.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VVK/ प्रथम श्री.रोझेकर 15:30

प्रा.जोगेंद्र कवाडे..

रेल्वेमध्ये ज्याला आम्ही सिंग्नल म्हणतो त्याला मराठीत नवीन शब्द आला आहे, अग्नी रतावा गमन दर्शक लोह ताम्र पत्ती का एवढे कोण म्हणणार आहे. टेबल, खुर्ची, चेअर यांना हेच शब्द वापरण्यात येणार आहेत. जे शब्द मराठीत प्रचलित आहेत. ते शब्द मराठीत ऑब्झर्व करुन वापरावेत व मराठी भाषा समृध्द करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रात वेगवेगळ्या बोली भाषा बोलल्या जातात. बोली भाषेतील काही प्रचलित शब्द मराठी भाषेने आत्मसात केले पाहिजेत. जेणेकरुन मराठी भाषा समृध्द व मोठी झाली पाहिजे. मराठी भाषेत काही हिंदी व ऊर्दु शब्द आहेत, काही इंग्रजी शब्द आहेत, ते शब्द मराठी भाषेने आत्मसात करुन घेतले तर मराठी भाषेचा फायदा होईल. माननीय राज्य मंत्री यांनी काल हिंदी आणि ऊर्दु शब्द वापरला होता. तो शब्द आता माझ्या लक्षात नाही. जे शब्द अत्यंत लोकप्रिय, प्रचलित असतात अशा शब्दांचा समावेश मराठी भाषेत करुन घेतला तर मराठी भाषेचा सन्मान कमी होणार नाही. मराठी भाषा आणखी जास्त समृध्द व विकसित होण्यासाठी त्याची मदत होईल.

महोदय, मराठी भाषा प्रस्तावावर बोलताना मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांना धन्यवाद देतो की, त्यांनी हा प्रस्ताव उपस्थित केला आहे, मराठी भाषेचा मुद्दा अत्यंत महत्वाचा आहे, आमच्या स्वाभिमानाचा आहे, आमच्या गौरवाचा आहे, मराठी भाषेचा गौरव वाढविण्यासाठी जे प्रयत्न करण्याची आवश्यकता असेल ते प्रयत्न शासनाने केले पाहिजे. लोकाश्रया सोबत राजाश्रय मराठी भाषेला मिळाला तर निश्चितपणे मराठी भाषा सर्व समावेशक झाल्याशिवाय राहणार नाही. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून सरकारला माझी विनंती आहे की, मराठी भाषा समृध्द करण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात यावेत, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो, धन्यवाद, जयभीम.

-----------

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे मी आभार मानतो व ऋण व्यक्त करतो की, त्यांनी मराठी भाषेचा प्रस्ताव पुन्हा सभागृहात मांडला आहे. सन्माननीय सदस्य ॲड.जनार्दन चांदूरकर यांनी काल चर्चेत भाग घेताना इंग्रजीचे अनेक शब्द मराठीत आहेत असा उल्लेख केला होता. मराठी व्यक्त करण्यासाठी इंग्रजी शब्दांचा आधार घ्यावा लागतो अशी परिस्थिती आहे. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी राज्य सरकार आटोकाट प्रयत्न करीत आहे. मात्र त्याला अजून यश आले नाही. त्या संदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या समितीने अहवाल तयार करताना आवश्यक तेवढे पुरावे समिती सादर करु शकली नाही. याचे मुख्य कारण असे आहे की, मराठी ही अभिजात म्हणजे ओरिजन भाषा आहे, मराठी ही संस्कृतोद्भव भाषा आहे. अशी जी आमची धारणा आहे ती अतिशय चुकीची आहे. किंबहुना मराठी ही संस्कृत भाषेच्याही अगोदरची आहे. मराठी भाषा माझी मातृ भाषा आहे, ती संस्कृत भाषेची मावशी आहे. संस्कृत भाषा ही मराठीची भाची आहे. आपण संस्कृत भाषेला मूळ मातृभाषा मानतो, हा मुळात समज आहे. मराठी भाषा ही मावशी आहे. आता काही नाणी व शिलालेख उपलब्ध आहेत. संस्कृत भाषेचा शिलालेख इ.स.पूर्व 160 मधील आहे, तो पुरावा आहे. संस्कृत भाषेमधील नाणी ही त्या नंतरची आहेत. मराठीचा शिलालेख नाणेघाट नाशिक जवळ आहे बदलापूर येथून पुढे गेल्यावर तो सापडतो, तो इ.स.पूर्व 180 मधील आहे. जवळपास 350 वर्षे मराठी भाषा जुनी असल्याचा पुरावा महाराष्ट्रातील आहे. ऋग्वेद संस्कृतमध्ये रचले गेले असा आपला समज आहे. मुळात सिंधी भाषेत सिंधू ब्रजदा किंवा सिंधू या भाषेत रचले गेले आहेत. आणि संस्कृत भाषेचा उगम सिंधी भाषेच्या पोटातून झालेला आहे. संस्कृत ही उत्तम अशी ज्ञात भाषा आहे, कारण तिने अनेक भाषांना कवेत घेत एक कल्चर भाषा तयार केली आहे. संस्कृतचा अर्थ कल्चर आहे. त्यामुळे ती कल्चर केलेली भाषा आहे. तसेच ऊर्दु ही एक कल्चर भाषा आहे. अनेक भाषांना सामावून घेत एक अत्यंत वेगळे सौंदर्य घेऊन ती उभी राहिली आहे. तसेच संस्कृत भाषा ही स्वत:चे सौदर्य घेऊन उभी राहिली आहे. मॅक्स मुलरच्या प्रभावामुळे आपण आपल्या सर्व

..3..



VVK/ प्रथम श्री.रोझेकर 15:30

भाषांना कमी लेखले आहे. आज इंग्रजीच्या किंवा इतर भाषांचा तुलनेत मराठी भाषेचा न्युनगंड आपण पाहत आहोत. याचे कारण आपण स्वत:ला संस्कृत भाषे पेक्षा कमी लेखले आहे. एकनाथ व ज्ञानेश्वर महाराजांनी संस्कृत भाषेला थेट आव्हान दिले होते की, संस्कृत देवे केली तर मराठी भाषा काय चोरापासून तयार झाली आहे काय ? असा रोकडा सवाल एकनाथ आणि ज्ञानेश्वर महाराजांनी विचारला होता. त्यांनी ती हिंमत दाखविली होती. आपण मराठी भाषेची सुरुवात ज्ञानेश्वर किंवा फार तर महानुभव यांच्या काळापासून करतो. त्या अगोदर दीड हजार वर्षापूर्वी महाराष्ट्रात मराठी या नावाने महाराष्ट्र प्राकृती या नावाने ओळखली जात होती. त्याचा अभिमान आपण बाळगला पाहिजे. अभिजात भाषेच्या संदर्भात राज्य सरकारने जी समिती नियुक्त केली होती त्या समितीने पुरेसे पुरावे दिलेले नाहीत. नाणेघाटाचा पुरावा दिलेला आहे. पंचतंत्राची रचना संस्कृतमधून झाली असे आपण मानतो. पंचतंत्राची रचना महाराष्ट्रातील पैठण येथे म्हणजे मराठवाड्यात झाली आहे. त्याला प्रतिष्ठाण मानले जाते. तेथे सातवाहन राज्याचे राज्य होते. त्या राजघरान्यातील राजदरबारात गुनाढ्य हा लेखक, राजकवी व मोठा विचारवंत व साहित्यिक होता. त्या लेखकाने हे संकलन केले होते. सातवाहन या राज्याने स्वत: गाथा संप्तशर्तीचे संकलन केले होते. हे आपणाला मान्य आहे पण पंचतंत्र हे त्या अगोदरचे आहे. त्याचे पहिले संकलन देखील महाराष्ट्रातील आहेत. शेमेंद्र आणि सोमदेव या दोघांनी फरशाच्या भाषेतून पंचतंत्र सातव्या ते आठव्या शतकात संस्कृतमध्ये नेले. संस्कृतच्या आधी फरशाच्या भाषेत, त्या अगोदर पहेलवी भाषेत, त्या अगोदर अरबी भाषेत पंचतंत्र पोहचले होते. हे पंचतंत्र मराठीतून गेले आहे. कर्टक आणि दमनक ही दोन्ही मराठी नावे आहेत, या दोघांच्या संवादातून पंचतंत्र सुरु होते. कथा रचल्या गेल्या व या संस्कारावर फक्त महाराष्ट्र नाही तर देश आणि जगात अनेक समूह पंचतंत्राच्या संस्कारावर पोसले गेले आहेत. जगातील सर्वात मोठ्या प्राचीन अभिजात ग्रंथाची रचना पहिल्यांदा माझ्या माय मराठी किंवा मराठी भाषेतील आहे. हे आपण अभिमानाने सांगितले पाहिजे. त्यासंदर्भातील पुरावे आपण सादर करु शकलो तर अभिजात भाषेचा दर्जा लवकर मिळू शकेल, तमिळ व मल्याळम यांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेला अजून प्रतिक्षा करावी लागते. त्याचे कारण आपण पुरावे सादर करु शकलो नाही. मराठी अटकेवार गेली असे आपण म्हणतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चीनपर्यंत मराठी भाषा गेली होती. निओ प्रांतात 2000 वर्षापूर्वी मराठी भाषेतील लेखी पुराव्याच्या प्लेट आजही उपलब्ध आहेत. निओ प्रांतात एक मराठी राजा गेला होता. तो सम्राट अशोकाच्या पुढील सरदाराच्या काळातील सहकारी असावा. तो तेथे जाऊन राज्य करीत होता. तेथून तो आदेश देत होता. आता आपण जसे आदेश निर्गमित करतो, तो लिहून आदेश देत होता. सुरुवातीला तो असे लिहित होता की, महानुमा महाराया लिहिती आणि पुढे आदेश लिहित होता. असे अर्वाचिन मराठीत शब्द आहेत. मराठी भाषेत चीनमधील राजाने दिलेले आदेश आहेत, त्याचे अनेक सहकारी मराठी होते.त्यामध्ये काही चिनी होते त्यामुळे चिनी भाषेची सरमिसळ त्यात दिसून येते. त्या प्लेट आजही चीनमध्ये उपलब्ध आहेत. माझी विनंती आहे की, आपण भवानी तलवार शोधण्यासाठी लंडन येथे गेलो होतो. माझ्या माय मराठीच्या ज्या पाट्या आहेत, त्या शोधण्यासाठी एखादी कमिटी सरकारने पाठविण्यास काही हरकत नसावी. या पाट्या आणल्या तर एक भक्कम पुरावा उपलब्ध होऊ शकेल. आज मराठी भाषा अपंग दिसते त्याचे कारण आपण व्यवहार अजूनही मराठी भाषेत करीत नाही. मुंबई महानगरपालिकेचा 80 टक्के व्यवहार सभागृहाच्या पलिकडील व्यवहार इंग्रजीत होतो. सभागृहातील नगरसेवक मराठीत बोलतात, पत्र मराठीत लिहितात. महानगरपालिकेचे अधिकारी गृहनिर्माण सोसायटीला पत्र लिहायचे असेल तर ते इंग्रजीत पाठवितात. महानगरपालिकेचा सर्व व्यवहार इंग्रजीत होतो. शासन व प्रशासनाची भाषा मराठी नसेल तर या राज्यात मराठी राजभाषा होईल व ती सर्व विद्यार्थ्यांनी शिकावी अशी सक्ती आपण कशी करणार ? आपला व्यवहार मराठीत सुरु झाला की, लोक आपोआप शिकायला लागतील. आपण नेहमी उल्लेख करतो की, मराठी भाषा व्यवहारांची झाली पाहिजे. हायकोर्ट व न्यायालयाची भाषा मराठी झाली पाहिजे] ज्ञानविज्ञानाची भाषा मराठी झाली पाहिजे असा आपण आग्रह धरतो. यशवंतराव चव्हाण साहेब म्हणत होते की, लोकभाषा ही ज्ञानभाषा झाली पाहिजे. असे त्यांनी मराठी राज्य निर्माण करतांना सांगितले होते.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या आधी लोकमान्य टिळकांनी साहित्य संमेलनामध्ये भाषण करताना सांगितले होते की, अशा प्रकारे साहित्य संमेलने भरवून तुमची मराठी वाढणार नाही. ज्या दिवशी उद्योगाची आणि व्यापाराची भाषा मराठी होईल त्या दिवशी मराठी भाषा धावत जाईल. गुजराथी भाषा आज व्यापाराची मातृभाषा बनलेली आहे याचे मुख्य कारण गुजराती माणूस जेथे जातो तेथे तो गुजरातीमध्ये व्यवहार करतो. आपला व्यापार आणि आपला उद्योग केवळ दुकानाच्या पाटीपुरता सीमित राहाता कामा नये. एखाद्या माणसाने आपल्या नावाची अद्याक्षरे इंग्रजीमध्ये लिहिली म्हणून त्याला विरोध करुन चालणार नाही. आर्थिक आणि बाजाराचा सर्व व्यवहार मराठीमध्ये करण्याच्या दृष्टीने शासनाने पुढाकार घेतला तर आपोआप मराठीची प्रगती अधिक होईल. मी या निमित्ताने काही सूचना करु इच्छितो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख आहे की, मराठी ऐवजी पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे ओढा आहे. याचे कारण असे आहे की, जी भाषा जगवते ती भाषा जगते. जी भाषा मला जगवेल ती भाषा शिकण्याचा मी प्रयत्न करीत असतो. आज मराठी भाषा ही जगविण्यासाठी पुरेशी नाही असे वाटत असेल तर ते इंग्रजी भाषेकडे जातील. केवळ मराठी ही ज्ञान भाषा होऊन चालणार नाही. सर्व मराठी शाळा ह्या द्विभाषिक कराव्यात. मराठी आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळा कराव्यात आणि इंग्रजी शाळांमध्ये मराठी हा देखील प्रथम भाषेचा विषय करावा. इंग्रजी ही प्रथम भाषा असते. बोर्डामध्ये तशी सोय आहे. त्यासाठी वेगळा कायदा करण्याची गरज नाही. शासनाने केवळ निर्णय घेतला पाहिजे. जितक्या अनुदानित शाळा आहेत त्या एकाच वेळी मराठी आणि इंग्रजी भाषा शिकातील.किमान सायन्स आणि गणित विषय इंग्रजीतून शिकविल्या जाणाऱ्या शाळांना सेमीइंग्रजी शाळा म्हणतो. परंतु त्या शाळांना सेमीइंग्रजी शाळा न म्हणता बायलिंग्वल शाळा म्हटले पाहिजे. अशा प्रकारे मराठी-इंग्रजी शाळा काढल्या तर कोणीही इंग्रजी शाळांकडे जाणार नाही. पूर्वी खेरसाहेब येण्यापूर्वी महाराष्ट्रामध्ये ही स्थिती होती. माझे वडील बायलिंग्वल शाळेत शिकले. माजी शालेय शिक्षण मंत्री श्री. बाळासाहेब थोरात यांनी या सभागृहामध्ये सांगितले होते की, त्यांचे वडील बायलिंग्वल शाळेत शिकलेले असल्यामुळे त्यांचे मराठी आणि इंग्रजी भाषांवर प्रभुत्व होते. आज या दोन्ही भाषांवरील आपले प्रभुत्व कमी झालेले आहे. याचे कारण मराठी भाषा आपण संपवली. मराठी शाळेमध्ये मराठी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

नीट नाही आणि इंग्रजी बिलकुल येत नाही अशी अवस्था आहे. यामधून आपला समाज जात आहे त्याला दुरूस्त करायचे असेल तर इंग्रजीवरील प्रभुत्व वाढविणे आवश्यक आहे. ज्या दिवशी मराठी माणसाचे इंग्रजीवरचे प्रभुत्व वाढेल त्या दिवशी त्याचे मराठी देखील मोठे होईल. दुस-या बाजूल शासन, प्रशासन आणि सर्व निम-शासकीय संस्थांचे सर्व व्यवहार, त्यांचा प्रत्येक आदेश आणि निर्णय जो लोकांपर्यंत जाईल तो मराठीतच गेला पाहिजे असा आग्रह आपण धरला तर मराठी अत्यंत मजबू होऊ शकेल. यासाठी राज्य शासनाने तातडीने सर्व शाळा बायलिंग्वल करण्याचा धाडसी निर्णय घ्यावा. ज्या इंग्रजी शाळा मराठी हा प्रथम विषय घेतील त्या शाळांना ताबडतोब अनुदान द्यावे. शासनने हे केले तर आपोआपच गरीब मराठी मुलांना इंग्रजी शाळेत शिकता येईल. इंग्रजी शाळा विनाअनुदानित आहेत. त्यामुळे तिकडे जाता येत नाही. मराठी शाळांना गळती लागलेली आहे. त्यामुळे मराठीची ही गत आहे. अशा दुहेरी संकटामध्ये मराठी अडकलेली आहे. इथे मराठी जगत नाही म्हणून केवळ आक्रंदन करून चालणार नाही. मराठी जगवायची असेल तर तिचा व्यवहार वाढवावा लागेल इतकेच सांगून मी थांबतो. धन्यवाद.

----

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी मराठी भाषेचे पुढील 25 वर्षासाठीचे धोरण ठरविण्याच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा या सभागृहामध्ये उपस्थित केली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभी आहे.

सन्माननीय सदस्य श्री. टकले यांचा भर मराठी विद्यापीठ निर्मितीवर अधिक आहे. या सभागृहामध्ये अनेक वेळा मराठीच्या संदर्भात चर्चा झालेली आहे. यापूर्वी जेव्हा लोकशाही आघाडीचे सरकार होते त्यावेळी देखील ही चर्चा झालेली आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने थोडक्यात सूत्र रुपाने मुद्दे मांडणार आहे. मी एका गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छिते की, माझ्या माहिती प्रमाणे या सदनाचे सन्माननीय सदस्य आणि कवी श्री. ना.धों. महानोर हे 1991च्या दरम्यान पुण्यातील साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. त्यावेळी मी त्यांना स्वत: विचारले होते की आपण विधानपरिषदेमध्ये काम केलेले आहे, राज्य सरकारकडून आपल्या काय अपेक्षा आहेत ? महानोर हे सर्वांच्या जवळचे आहेत. महानोर यांना न ओळखणारा कुणी असेल असे मला वाटत नाही. रवींद्र नाट्य मंदिराचे कशा पध्दतीने नियोजन व्हावे, कशा पध्दतीने त्याचा वापर व्हावा इथ पासून मराठी भाषा केंद्राच्या संदर्भात अनेक सूचना त्यांनी केलेल्या होत्या. माझी पहिली सूचना अशी आहे की, या सदनाचे माजी सदस्य आणि ज्येष्ठ साहित्यिक श्री. ना.धों.महानोर यांनी मराठी साहित्य आणि भाषेबद्दल ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्याची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारने पाऊल उचलावे. अनेक मान्यवर साहित्यिक सदस्य शासनाकडून काही अपेक्षा करतात, वर्षानुवर्षे अनेक गोष्टी करण्याबाबत शासनाला सूचना करीत असतात. शेवटी ते सूचना करण्याचे थांबतात. त्यांच्या सूचनांची दखल न घेणे हे शासनाला शोभणारे नाही. त्यांनी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी केली जात नाही याकडे मला शासनाने लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय, मला दुसरे असे सुचवावयाचे आहे की, परिस्थिती बदलत आहे. त्यामुळे भाषेचे स्वरुप सहाजिक बदलत जाणार असून ते आपण स्वीकारले पाहिजे. या दृष्टीकोनातून मराठी भाषेचा विकास आणि वृद्धी म्हणजे ठराविक प्रकारचीच मराठी भाषा सर्व ठिकाणी लोकप्रिय झाली पाहिजे असा कुणाचा आग्रह नाही. शुद्ध-अशुद्धतेच्या बाबतीत मराठी भाषा सर्वांना समजेल असे नियम केले पाहिजेत. विशेषत: मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या ठिकाणी इतर भाषिक लोक येऊन

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

राहातात. त्यांना मराठी शिकायचे असेल तर शेजारापाजाऱ्यांकडून ते शिकतात. परंतु प्राथमिक आणि प्रगत मराठी भाषा शिकविण्याचे वर्ग राज्य सरकारकडून सर्वदूर चालविले गेले तर मराठी शिकण्याची ज्यांची इच्छा आहे ते निश्चितच मराठी शिकतील. शिवसेना मागणी करते किंवा आमचा बडगा आहे म्हणून मराठी शिकणे हा एक भाग झाला. परंतु ज्यांना स्वत:हून मराठी शिकण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी आपण चांगले पर्याय उपलब्ध करुन दिले पाहिजेत.

माझा तिसरा मुद्दा असा आहे की, दूरदर्शन आणि वाहिन्या फार मोठ्या प्रमाणावर घराघरातून पाहिल्या जातात. या वाहिन्यांवर अनेक चांगले कार्यक्रम दाखविले जातात. परंतु मराठी वाहिन्यांवरुन जी मराठी भाषा बोलली जाते, मराठी वाहिन्यांवर जी संस्कृती दाखविली जाते तीच आपली संस्कृती आणि भाषा आहे अशा प्रकारचे मत पुढील काही वर्षात तयार होईल की काय असे मला वाटत आहे. इंग्लडमध्ये शाळेत जाणाऱ्या मुलांना देव कोण असे विचारण्यात आले होते. त्या मुलांनी एकच चित्र सातत्याने पाहिले होते. म्हणून त्यांनी इंग्लडच्या पंतप्रधानांचा फोटो दाखवून हाच देव आहे असे सांगितले. मला असे वाटते की, वाहिन्यांवर जे मराठी दाखवले जाते, चर्चिले जाते ते मराठी सुधारण्यासाठी वाहिन्यांनी प्रयत्न केले पाहिजेत, त्याबाबतीत राजकीय हस्तक्षेप न करता या मराठी वाहिन्यांवरील सामाजिक वातावरण कसे बदलेल हे पाहिले पाहिजे.

सभापती महोदय, माझी चौथी सूचना अशी आहे की, शहरामध्ये अनेक प्रकारचे प्रशिक्षण वर्ग चालतात. त्या अभ्यासक्रमामध्ये परप्रांतातील मुले फार मोठ्या प्रमाणात प्रवेश घेतात. मी विरोधी पक्षामध्ये असताना देखील ही सूचना मांडली होती. आपल्या राज्यामध्ये चालू असलेल्या अभ्यासक्रमामध्ये मराठी शिकणे हे अनिवार्य असते. तरी देखील विद्यापीठांवर, अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांवर आपण बंधन आणू शकत नाही की किमान 50 मार्कांचा एक पेपर मराठी भाषेत असावा. असे बंधन घातले तर त्याचा फायदा असा होईल की, मराठी शाळेत शिकणाऱ्या मुलांना 50 मार्कांच्या पेपरमध्ये चांगले मार्क्स मिळतील. मराठी भाषेच्या पेपरमध्ये अधिक मार्क्स मिळाले पाहिजेत म्हणून उच्च विद्याविभूषित विद्यार्थी देखील प्रयत्न करतील. हे विद्यार्थी इतर प्रांतातून शिकायला येतात आणि अभिमानाने सांगतात की आम्ही सिम्बॉयसिसमध्ये शिकलो, पण

..5..

डॉ. नीलम गो-हे...

आम्हाला मराठी येत नाही. We don't know Marathi we understand something. या लोकांना खाण्याचे मराठी पदार्थ चांगले माहीत असतात. त्यांना सुरळीच्या वड्या माहीत असतात, पुरण पोळी माहीत असते. पण मराठी भाषा शिकण्यास अजिबात महत्व देत नाहीत. आजही मराठीला प्रतिष्ठा नाही. म्हणून जेथे उच्च विद्येचे जेथे वर्ग चालतात,पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे वर्ग चालतात तेथे मराठी भाषेला कसे सामावून घेता येईल या दृष्टीने विचार झाला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, जे लोक इंटरनेट वापरतात त्यांना विकीपिडिया माहीत असेल. विकीपिडियावर भारतातील आणि जगातील अनेक लोक अनेक भाषामध्ये स्वयंस्फूर्तीने काम करीत असतात. विकीपिडियाचा मराठी विभाग पाहिला तर प्रत्येकाला अभिमान वाटेल अशा पध्दतीचे काम जगातील मराठी भाषिक लोकांनी केलेले आहे. कोणताही वैचारिक दबाव न आणता जे मान्य नसेल ते कंसात टाकून जे मान्य असेल त्याला संमती दर्शवायची या प्रमाणे त्यांनी योगदान केलेले आहे. मला या गोष्टीचे वाईट वाटते की, राज्य सरकारच्या मराठी विभागाच्या दृष्टीने हा विकिपिडिया अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न पडतो.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

तूही यत्ता कंची. या विकीपिडियाशी मराठी विभागाने जोडून घेतले पाहिजे. स्वत:चा फायदा करुन घेतला पाहिजे, समृध्द केले पाहिजे. मराठी भाषेतील युनिकोडची मागणी सातत्याने केली जात आहे. मराठी अभ्यास केंद्रामध्ये श्री.दीपक पवार हे काम करीत आहेत. मराठी विभागाकडे अधिकारी नसतील, या विषयाबद्दल तळमळ नसणारे लोक नसतील असे मला वाटत नाही. वेळ पडल्यास या मराठी अभ्यास केंद्राची मदत अधिकृतपणे घेऊन आवश्यकता भासली तर आऊटसोर्सिंगकडे कामे सोपवून राज्य सरकारने इच्छाशक्ती दाखवावी.

सभापती महोदय, घुमान येथे मराठी साहित्य सम्मेलन होणार आहे. तेथे पायाभूत सुविधा पुरविण्याबाबत राज्य सरकारकडून मदतीची अपेक्षा आहे. त्यात ट्रेन सोडणे, निवास व्यवस्था करणे या बाबी आहे. केवळ परप्रांतात सम्मेलन होणार आहे म्हणून राज्य सरकारचा संबंध नाही असे न म्हणता सढळ हाताने राज्य सरकारने मदत करण्याची भूमिका घ्यावी. मराठी विद्यापीठ करण्याचा निर्णय घेतला तर निश्चितपणे ते मोठे पाऊल असेल. मराठी विद्यापीठामध्ये येणारी माणसे मराठी भाषा प्रेमी असावीत एवढी काळजी सरकारने घ्यावी एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामहरी रुपनवर (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 1 मे, 1960 रोजी भाषावार प्रांतरचनेनुसार राज्याची निर्मिती झाली आणि महाराष्ट्र राज्याने आपली वाटचाल सुरु केली. महाराष्ट्र राज्य हे मराठी भाषिकांचा प्रदेश म्हणून अस्तित्वात आले असे माझे मत आहे. मराठवाडा, विदर्भ, कोकण, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र या सर्व प्रदेशांसह महाराष्ट्र एकत्रितपणे बलशाली झाला पाहिजे, मराठी भाषा बलशाली झाली पाहिजे. भारतात मराठी ही एक उत्कृष्ट भाषा आहे असे मत आजपर्यंत अनेकांकडून व्यक्त केले गेले आहे. या सभागृहात आतापर्यंत 29 ते 30 ठराव मांडले गेले. मराठी ही व्यवहाराची भाषा बनली पाहिजे हा आग्रह धरण्यात आला. आज मराठी माणूस दिल्लीमध्ये गेल्यानंतर हिंदी भाषेत बोलतो. गुजरातचा माणूस महाराष्ट्रात आल्यानंतर गुजराती भाषेमधून बोलतो. महाराष्ट्रामध्ये व्यवहाराची भाषा जाणीवपूर्वक मराठी असणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज महाराष्ट्रामध्ये प्रत्येक भागात बोलली जाणारी मराठी भाषा वेगवेगळी आहे. खानदेशात बोलली जाणारी अहिराणी भाषा, कोकणात बोलली जाणारी मालवणी भाषा आहे, अशा अनेक प्रकारच्या भाषा या महाराष्ट्र प्रदेशात बोलल्या जात आहेत. मराठी भाषा ही गुणसंपन्न आहे. या भाषेचे एकत्रिकरण करण्यासाठी मराठी विद्यापीठ निर्माण झाले पाहिजे. या सगळ्या अणुरेणूंचा अभ्यास करुन मराठी भाषा लोकांपुढे गेली पाहिजे.

सभापती महोदय, न्यायालयाचा व्यवहार मराठी भाषेतून झाला पाहिजे या मताशी मी सहमत आहे. शासनाने परिपत्रक काढूनही न्यायालयीन कामकाज 100 टक्के मराठी भाषेतून होत नाही ही वस्तुस्थिती आहे. मराठी भाषा शाळेत शिकविली जाते तेवढी ज्ञात होते. त्यापेक्षा ही भाषा कितीतरी मोठी आहे. परंतु आपल्याला कोणी शिकविले नाही त्यामुळे ती आपल्यापुढे आली नाही, म्हणून आपल्याला समजली नाही. आज राज्यात मोठया प्रमाणात मुले इंग्रजी भाषेतून शिक्षण घेत असतील तर राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना आणि मुलांना मराठी भाषा कशी समजेल हा गहन प्रश्न निर्माण झाला आहे. सीमा भागातील बांधवांची मुले कन्नड शाळेत शिकत आहेत. तेथे मराठी भाषेतून शिक्षण दिले जात नसल्यामुळे कन्नड शाळेत शिक्षण घेणे अनिवार्य ठरत आहे. आपल्या शेजारच्या राज्यातील वादग्रस्त सीमा भागात आपण मराठी शाळा सुरु करु शकत नाही. ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्राधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकप्रकारे भाषेची गळचेपी आहे. विदर्भासह महाराष्ट्र प्रांत समृध्द झाला पाहिजे. एकत्र राहून विकसित झाला पाहिजे ही कल्पना असताना आपल्या काळजाचा एक तुकडा बेळगाव कर्नाटक प्रांतात आहे, तो भाग तडफडत आहे. महाराष्ट्रात येण्यासाठी त्या भागाची धडपड सुरु आहे. तेथील मराठी भाषिक जनता आपल्याकडे नजर लावून बसली आहे.

सभापती महोदय, भाषेच्या संदर्भात आजच्या वर्तमानपत्रात एक बातमी प्रसिध्द झाली आहे. मराठी भाषेला केंद्र सरकार अभिजात भाषेचा दर्जा देणार आहे, त्याबद्दलचा प्रस्ताव दाखल करुन घेण्यात आला आहे. केंद्र स्तरावर काही थोड्या भाषांना अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झालेला आहे. मराठी भाषेला जर केंद्र सरकार अभिजात भाषेचा दर्जा देणार असेल तर आपल्याला ही भाषा अभिजात असल्याचे सिध्द करावे लागेल. त्यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे प्रयत्न करुन मान्यता मिळवावी. मराठी भाषेबद्दल विधिमंडळाकडून आणि सरकारकडून सर्वसामान्य लोकांच्या काय अपेक्षा आहेत हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या राज्यातील कोट्यवधी मराठी भाषक जनता विधिमंडळाने आपल्या भाषा, संस्कृतीचा आणि न्याय आर्थिक आणि राजकीय आकांक्षांचा आवाज व्हावे अशी अपेक्षा धरुन असते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयापासून आजतागायत अनेकदा विधिमंडळाने जनतेचा हा आतील आवाज ऐकला आणि त्याला मूर्त रुप दिले. त्याचे प्रतिबिंब यात पडलेले दिसते. मात्र अजून खूप काही धडायला हवे आहे. मराठी माणसांचे म्हणून निर्माण झालेले हे राज्य खऱ्या अर्थाने मराठी चेहेऱ्याचे होण्यासाठीची दीर्घ लढाई आपल्याला लढायची आहे. हा संयुक्त महाराष्ट्राचा दुसरा लढा आहे. मराठी अभ्यास केंद्राचे कार्यकर्ते याला मराठीकारण असे म्हणतात. हे मराठीकारण यशस्वी होणे हे मराठीच्या इतिहासाचे गोडवे गाण्यापेक्षा जास्त महत्वाचे आहे. कारण मराठी भाषेचा आणि मराठी माणसांचा इतिहास किती श्रेष्ठ होता यापेक्षा त्यांचे वर्तमान काय आहे आणि भविष्य काय असणार आहे हे जास्त महत्वाचे आहे. हे भविष्य घडविण्याची जबाबदारी आपल्या सगळ्यांची आहे. मराठीचे जग आपल्या सगळ्यांच्या हयातीत बदलावे यासाठी लागणारा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची जिद्द आपल्यात आहे का यावरच आपले भवितव्य अवलंबून राहणार आहे. आम्ही त्यासाठी झगडत राहणारच आहोत आणि तुम्ही त्यात सामील व्हाल असा विश्वास आहे. असे लोकांचे विधिमंडळाबाबत मत आहे. ते मी सभागृहापुढे मांडले आहे. या मराठी भाषेवर आपण सर्वांनी प्रेम केले पाहिजे एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करतो.

----------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी मराठी भाषेबद्दल नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे. या भाषेवर होणारी इतर भाषांची अतिक्रमणे पाहता अल्पकालीन चर्चा घेण्याऐवजी दीर्घकालीन चर्चा झाली असती तर या विषयाला आपण न्याय देऊ शकलो असतो.

सभापती महोदय, ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवि कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर यांचा जन्म दिवस हा मराठी भाषा दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. 27 तारखेसाठी कोणतेही मुंबईतील ऑडिटोरियम उपलब्ध होणार नाही अशा पध्दतीने बुकिंग अगोदरच केले जाते आणि आम्हाला मराठी भाषेचा किती कळवळा आहे हे दाखविण्याचा प्रयत्न होतो. परंतु हा कळवळा रहात नाही. तो राहिला असता तर निश्चित परिणाम दिसून आला असता.

सभापती महोदय, आज ग्रामीण भागामध्ये या मराठी भाषेवर अतिक्रमण होत नाही. बहुभाषिक शहरे आहेत त्यातील मुंबई, पुणे, नागपूर आदी शहरांच्या ठिकाणी रोजगाराच्या निमित्ताने वेगवेगळ्या प्रांतातून लोक आलेले आहेत. त्यांनी या भाषेवर अतिक्रमण केले आहे. मुंबईचे उदाहरण घ्यायचे झाले तर आपण फक्त मराठी भाषेचा वापर करण्याबद्दल सूचना देत बसलो असा प्रकार झाला आहे. खऱ्या अर्थाने मराठी भाषेचा प्रसार आणि प्रचार करावयाचा असेल, मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी सरकारने पुढील 25 वर्षासाठी काय केले पाहिजे हे ठरविण्यासाठी 2010 मध्ये न्या.नरेंद्र चपळगावकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी भाषा सल्लागार समिती स्थापन केली होती.

नंतर 2एच.1...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........

या सर्व गोष्टींची गरज आहे. याबाबत समिती असावी, त्यांचेही मत घ्यावे व त्या माध्यमातून प्रचार आणि प्रसार कसा करता येईल याचाही विचार करावा. पण जर मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार जलद गतीने करावयाचा असेल तर मिडियाशिवाय दुसरा पर्याय नाही असे मला वाटते. त्यात मग दूरदर्शन वाहिनी असो अथवा एसएमएसच्या माध्यमातून असो याच माध्यमातून खरा प्रचार आणि प्रसार होऊ शकतो. मी असे सांगू इच्छितो की, मराठी भाषा शिकणारी जी नवीन पिढी आहे त्यांच्यासाठी चांगल्या शाळा देखील निर्माण केल्या पाहिजेत. अगदी मागील वर्षापर्यंत मुंबईतील मराठी शाळांमधून 27 हजार विद्यार्थ्यांनी मराठी शाळांना जय महाराष्ट्र केलेला आहे आणि ही सत्य परिस्थिती आहे. त्याउलट माझी अशी सूचना राहील की, एखादी आयसीएसई अथवा आयबी लेव्हलची शाळा असेल तेथे सुध्दा एक विषय मराठी कंपल्सरी केला पाहिजे. आज एक तरी एखादी मराठी शाळा दाखवा की तेथे चांगल्या सुविधा असतील. आम्हालाही वाटले पाहिजे की, आमच्या मुलांना मराठी शाळेत पाठवावे पण तशी शाळांची अवस्था राहिलेली नाही, एक प्रकारे गोडावूनचे स्वरुप या मराठी शाळांना आलेले आहे. त्यात काही मराठी शाळा भाड्याने सुध्दा दिलेल्या असून कोणी युनियनचे ऑफिस थाटले आहे तर इतर व्यवसाय करीत आहेत अशा प्रकारे आपसात वाटून घेतल्या आहेत. खरे तर मराठीची आवड असणाऱ्यांकडूनच मराठीची जोपासना केली जात नाही मग प्रचार आणि प्रसाराचा प्रश्नच येत नाही अशी अवस्था आज मराठी शाळांची झालेली आहे.

महोदय, दुसरी बाब आवर्जून लक्षात येईल की, आपण देशात इतरत्र कोणत्याही प्रांतात गेलो, कलकत्ता अथवा मद्रासमध्ये गेलो तर त्या भागात आपल्या मोबाईलवर साधा मिस्ड कॉल आला तरी देखील त्याची ट्यून त्या प्रांतातील प्रादेशिक भाषेतूनच येते. मग आपल्याच राज्यात अशा प्रकारे मराठीतून ट्यून देण्यास अथवा उत्तर देण्यास काय धाड भरली आहे हेच मला कळत नाही. आपल्या राज्यात जर त्या प्रांतांचे अनुकरण केले आणि इतर प्रांतातील अर्थात सर्वच मोबाईल्सच्या माध्यमातून येणाऱ्या ट्यून्स अथवा मेसेजेस मराठीतून टाकण्याची गरज आहे. त्यासाठी मेसेज सॉफ्टवेअर तयार करण्याची गरज आहे ते शासनाने केले पाहिजे. या छोट्या गोष्टींसाठी कायदा करण्याची गरज आहे असे मी म्हणणार नाही पण कलकत्ता आणि मद्रास प्रांतात ज्याप्रमाणे सॉफ्टवेअर तयार केले त्याप्रमाणे आपल्या राज्यात देखील तयार करावे.

.......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ........

महोदय, मराठी भाषेतून रोजगार निर्मिती व्हावी अशी माझी सूचना आहे. नोकरी धंद्यासाठी येणाऱ्या प्रत्येकाला वाटले पाहिजे की मला मराठी भाषा आली तर मला नोकरी मिळू शकते. मग ती सरकारी संस्था असो अथवा खाजगी संस्था असो, अशा प्रकारे काही तरी टक्केवारी ठेवणे आवश्यक आहे आणि जोपर्यंत हे होणार नाही तोपर्यंत कोणीच मराठी शिकणार नाही. या सदनात आपण मराठीवर केवळ चर्चा करतो, आणखी समित्या नेमल्या जातील तरी देखील मराठीला न्याय देऊ शकणार नाही. मराठी भाषेला खरोखरच न्याय द्यावयाचा असेल तर येणाऱ्या नवीन विद्यार्थ्यांना रोजगार निर्मिती होत नाही तोपर्यंत ती पिढी मराठी शिकणार नाही. तसेच मिडियाच्या माध्यमातून प्रचार करण्यासाठी कायदा बनवावा लागणार आहे व हे शासनाने करावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

---------

..........3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ख्वाजा बेग (नामनियुक्त) : महोदय, मराठी भाषेबद्दल बोलत असताना मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, निसर्गाने, या ईश्वराने निसर्गाची निर्मिती केली. ही निर्मिती करीत असताना त्याने सूर्य, वारा, ऊन आणि पाऊस यांचीही निर्मिती केली. हे ऊन, वारा आणि पाऊस आपल्याला जीवन जगण्यासाठी आवश्यक ते सर्व देत असतात पण त्याचे कोणतेही बिल आकारत नाही. जशी निसर्गाने सृष्टीची निर्मिती केली आणि कोणतेही बिल न आकारणाऱ्या निसर्गाप्रमाणेच अजून एक व्यक्ती या पृथ्वीतलावर निर्माण केली ती म्हणजे जिला आपण "आई" म्हणतो ती आई. त्या आईनंतर दुसरी एखादी गोष्ट मानवनिर्मित असेल तर ती केवळ भाषा हीच आहे आणि जसे आपण जन्मदात्या आईला "माय" म्हणतो तसेच आपण मराठी भाषेला सुध्दा "माय मराठी" असेच संबोधत असतो. या मराठीचे प्रेम, या मराठीचे वास्तव असे आहे ती केवळ उत्तर निर्माण करते, कोणताही प्रश्न ती निर्माण करीत नाही. म्हणून म्हटले जाते की, जिंदगी का निशां है मराठी

कितनी दिलकश जुबाँ है मराठी
जिसकी बुलंदीया न पा सके कोई
वो ऊंचा आसमां है मराठी.

या पध्दतीने एका शायराने मराठीचा उल्लेख केला आहे. या आईला जी जन्म देते, जी ओळख देते तिचे ऋण फेडण्याची संधी कधीच कोणाला मिळत नाही. म्हणून मी या माध्यमातून असे सांगू इच्छितो की, जिने जन्म दिला आणि जिने ओळख दिली त्या मराठीचे ऋण माझ्यावर आहे आणि हे विशद करताना मला मराठीचा अत्यंत अभिमान वाटतो. जी मूलत: संस्कृत भाषेतून निर्माण झालेली आहे अशा या मराठीची उत्तरोत्तर प्रगती होऊन ती पूर्णत्वास येऊन त्यासाठी मराठी भाषा विद्यापीठ निर्माण करावे अशी विनंती करुन मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल पुन्हा आपले आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

----------

........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : महोदय, महाराष्ट्र ही संतांची कर्मभूमी आहे. बहुसंख्य मराठी भाषिक या प्रांतात राहत असल्याने तिला अभिजात वारसा मिळणे आवश्यक आहे. उदा. हिंन्दी भाषेला जसा राष्ट्रीय दर्जा आहे तसा मराठीला प्रांतानुसार अभिजात दर्जा मिळाला पाहिजे अशी माझी सूचना आहे. अभिजात दर्जा याचा अर्थ राज्याची संस्कृती, परंपरा आणि लोकमान्यतेची उच्च पातळी असे सर्वश्रेष्ठ स्थान मिळणे म्हणजेच अभिजात दर्जा प्राप्त होणे. त्यामुळे भाषिक वाद संपुष्टात येईल. मराठी साहित्यिकांनी जे लेखन तसेच कविता केल्या आहेत त्यातून असे काही शब्द वापरलेले आहेत की कधी कधी वाटते की याला पर्याय असू शकतो काय असे आपले उच्च दर्जाचे लेखक या मातीने निर्माण केले आहेत. त्या मराठीला आज मात्र दुय्यम दर्जा प्राप्त झाला आहे, एक प्रकारचा न्यूनगंड तिच्यात निर्माण झाला आहे. या निमित्ताने मी दोन तीन सूचना करणार आहे.

महोदय, माझी पहिली सूचना अशी आहे की, मराठी भाषेतील नाटके व सिनेमा यांना शासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे. तसेच सर्व कादंबऱ्या आणि कविता नेटच्या माध्यमातून वाचकांसाठी उपलब्ध झाल्या पाहिजेत. शाळांमध्ये कंपल्सरी मराठी भाषा हा विषय शिकविलाच पाहिजे. न्यायालयाचे निवाडे तसेच युक्तिवाद हे देखील मराठीतूनच झाले पाहिजेत. मराठी भाषिक आय.ए.एस. सारखे उच्च दर्जाचे अधिकारी जास्तीत जास्त कसे तयार होतील याकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. तसेच ज्या आय.ए.एस. दर्जाच्या अधिकाऱ्यांना मराठी भाषा येत नसेल त्यांना कंपल्सरी शिकायला लावले पाहिजे. भाषा संचालनालयात मराठी भाषिक अनुवादकांची पदे कमी असल्यामुळे ते मिळत नाहीत अशी आजची परिस्थिती आहे, ती पदे तातडीने भरली पाहिजेत, अशी विनंती करुन वेळेअभावी माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. भारवि .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष प्रा.जनार्दन चांदूरकर यांनी मराठी भाषेवरील अल्पकालीन चर्चेत सहभागी होताना जे इंग्रजी शब्द वापरले आहेत ते तंतोतंत लिहून आले आहेत. त्यामुळे मी आपल्याकडे सहज विचारणा करीत आहे.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, भाषा अधिक समृद्ध, श्रीमंत करावयाची असेल, भाषेचा स्कोप वाढवायचा असेल तर तिने दुसऱ्या भाषेतील शब्द घेतले पाहिजेत आणि आपले शब्द दुसऱ्या भाषेला दिले पाहिजेत. हा भाषेच्या संदर्भातील सिद्धांत आहे. लिंग्वीस्टीक थेअरी जपली पाहिजे.

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आमच्या पक्षाचे प्रतोद सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचे आभार मानतो. त्यांनी राज्यात मराठी विद्यापीठ व्हावे, मराठीचा सन्मान राखावा म्हणून अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आहे. सर्व ऋतूमध्ये कोणता चांगला ऋतू असेल तर तो म्हणजे वसंत ऋतू होय. त्यात श्री.वसंतराव डावखरे यांनी मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी त्यांचे देखील आभार मानतो.

**उप सभापती** : आपण आभारात वेळ घालविल्यामुळे मी आपणाला आता फक्त अर्धा मिनिटेच बोलण्याची संधी देणार आहे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या सभागृहात संस्कृत आमची माय आहे, मराठी आमची मावशी आहे असे म्हटलेले आहे. त्यामुळे मी असे म्हणू इच्छितो की,

माणूस मी मराठीच
आई मराठीतच प्राण माझे
तू खोल म्हणाली खिडकी
आणि मी उघडले दरवाजे.

मराठी भाषेच्या संवर्धना विषयी बोलत असताना मला मराठी म्हणून जन्मल्याचा आनंद वाटतो आणि मराठी म्हणूनच मी मरणार आहे, असे सांगताना माझ्या मनात कोणताही संशय नाही. आमची माणसे भाषण करीत असताना विल्यम वर्डस्वर्थचे नाव घेतील, विल्यम शेक्सपिअरचे नाव घेतील. लॉर्ड टेनिसनचे नाव घेतील आणि त्यांचे उदाहरण देतील की, "William Shakespeare was telling that, I have not pass M.A. but I am father of English."

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**The Deputy Chairman** : Hon'ble Member, please speak in Marathi.

श्री.प्रकाश गजभिये : असे म्हणत असताना त्यांना श्री.सुरेश भटांचे नाव घ्यायला अडचण का वाटते हे मला कळत नाही. श्री.सुरेश भट यांनी उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याचा पेटवा मशाली या काव्यांसह किती तरी सुंदर काव्ये मराठीत लिहिली आहेत. एका वाक्यामुळे राज्यात आंदोलन उभे राहू शकते . आपल्या राज्यातील मुले देशातच नव्हे तर विदेशात देखील आपली हुशारी दाखवतात. मराठी विद्यापीठ तयार करणे ही सरकारची जबाबदारी आहे. ती आपण निश्चितपणे पूर्ण कराल अशी मला आशा आहे. माझी एक सूचना आहे. आपण मराठीत फलक लावले. मराठीत बारा महिने आहेत. त्या महिन्यानुसार आपण कामकाज करीत नाही. त्या महिन्यांप्रमाणे कामकाज का करीत नाही ? चैत्र, वैशाख, ज्येष्ठ,आषाढ,श्रावण, भाद्रपद, अश्विन, कार्तिक, मार्गशीष, पौष, माघ, फाल्गुन असे मराठीचे बारा महिने आहेत. हे सरकार खरोखच स्वाभिमानी असेल आणि या शासनाला मराठीचा फार कळवळा असेल तर या मराठी महिन्यांनी काम सुरू करावे अशी मी विनंती करतो आणि येथेच थांबतो.

......

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन.**

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. राज्यात पडलेल्या दुष्काळामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने प्रदेश युवक काँग्रेसच्यावतीने नागपूर येथे अधिवेशन सुरू असताना शासनाला सर्व परिस्थितीची जाणीव करून द्यावी या उद्देशाने युथ काँग्रेसने श्री.विश्वजीत कदम यांच्या अध्यक्षतेखाली विधान सभेवर एक मोर्चा काढला होता. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी या मोर्चाचे आयोजन केले होते. विदर्भ,मराठवाडा, खान्देश व उर्वरित महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना न्याय मिळावा म्हणून, त्यांच्यावर असलेले कर्ज माफ करावे म्हणून मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक पॅकेज मिळावे व जे कुटुंब निराधार आहेत त्यांना मदत करण्यासाठी युवक काँग्रेसचे मोर्चा काढला होता. अत्यंत शांततेने युवक काँग्रेसचा मोर्चा विधानसभेवर धडकला असताना त्यांना एका मर्यादेपर्यंत थांबविण्यात आले. हा मोर्चा अत्यंत शांततेने निघाला होता. या मोर्चामध्ये कुठेही गडबड नव्हती. त्या ठिकाणी पोलिसांनी आक्रस्ताळपणे लाठीचार्ज केला. बळाचा वापर केला. त्यामुळे मोर्चामध्ये धांदली उडाल्याचे आपण सर्वांनी वर्तमानपत्रात वाचले असेल. ज्या पद्धतीने युथ काँग्रेसच्या कार्यकर्त्यांवर लाठीचार्ज केला तो चुकीचा आहे. काही दिवसांपूर्वीच हे शासन आले आहे. या राज्यामधील परिस्थिती त्यांना देखील माहीत आहे. या शासनाने शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारची मदत दिलेली नाही. पॅकेजसाठी केंद्र शासनाकडे निधी मागितला असून तो आल्यानंतर देऊ असे शासनाने सांगितले आहे. तो पैसा कुणाला देणार आहे हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. शेतकऱ्यांना हेक्टरी किती मदत देण्यात येणार आहे हे देखील स्पष्ट झालेले नाही. कापूस, सोयाबीन, धान पिकविणाऱ्या आणि कोरडवाहू शेतकऱ्याला किती मदत करण्यात येणार आहे याची ते वाट पहात आहेत.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे .......

दुष्काळात तसेच गारपिटीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना नेमकी कोणती मदत दिली जाईल याची घोषणा या सरकारने केलेली नाही. यासंदर्भात राज्यातील संपूर्ण राज्यात प्रक्षोभ पसरला असल्यामुळे युथ कॉंग्रेसने विधान मंडळावर शांततापूर्ण मोर्चा काढला असताना शासनाने या मोर्चावर बळाचा वापर केला. मोर्चावर लाठीचार्ज केल्यामुळे मोर्चातील अनेक लोक जखमी झाले. मोर्चातील अनेक लोकांना पोलिसांनी ॲरेस्ट सुध्दा केले आहे. चुकीच्या पध्दतीने, बळाचा वापर करुन युथ कॉंग्रेसच्या मोर्चावर लाठीचार्ज करण्यात आला. ज्या अधिकाऱ्यांनी शांतपणे आयोजित केलेल्या युथ कॉंग्रेसच्या मोर्चावर लाठीचार्ज केला त्या संबंधित अधिकाऱ्यांवर, कर्मचाऱ्यांवर राज्य शासनाने कारवाई केली पाहिजे. युथ कॉंग्रेसच्या मोर्चावर लाठीचार्ज करण्यात आला त्यासंदर्भात शासनाने निवेदन करुन लाठीचार्ज करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली याची माहिती देण्याची आवश्यकता आहे. या घटनेच्या संदर्भात चौकशी होण्याची आवश्यकता असून त्याचा अहवाल या ठिकाणी आला पाहिजे. या सदनामध्ये मंत्री महोदय उपस्थित आहेत त्यामुळे या घटनेच्या संदर्भात त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सभागृहात माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित नाहीत. माननीय गृह राज्यमंत्री आल्यानंतर सदर विषयाच्या संदर्भात निवेदन केले जाईल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

श्री. संजय दत्त : माननीय गृह राज्यमंत्री येईपर्यंत सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात यावे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी जवखेडे गावात घडलेल्या घटनेसंबंधी महाराष्ट्र विधान परिषद निमय 97 अन्वये अल्पकालीन चर्चेला सुरुवात करावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय,..

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. जोगेंद्र कवाडे हे अल्पकालीन चर्चा सुरु करीत नसल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी जात पडताळणी समित्यांमधील रिक्त असलेल्या पदाबाबत महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा दिलेली आहे ती त्यांनी सुरु करावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात.)

या विषयाचे निवेदन आज झाले नाही तर उद्या करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी शांतता राखावी अशी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनाही काही बोलावयाचे नाही असे दिसते.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, त्याबद्दल मी आपले आभार मानतो. अहमदनगर जिल्हयातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावातील एकाच कुटुंबातील ......

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**कार्यपध्दती विषयक माहितीचा मुद्दा**</u>

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दोन अंतिम आठवडा प्रस्ताव दाखविण्यात आले आहेत. हे दोन्ही प्रस्ताव क्लब केले जातील असा माननीय सभापतींनी निर्णय दिला होता. या विषयाच्या संदर्भात आमच्याकडे आता जे जोडपत्र आले आहे त्यामध्ये आम्ही दिलेला प्रस्ताव सुरुवातीला न दाखविता आमच्यानंतर देण्यात आलेला प्रस्ताव सुरुवातीला दाखवण्यात आला आहे. त्यामुळे या जोडपत्रात दुरुस्ती करण्यात यावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सदर बाब तपासून घेतो.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, पॉईंट ऑफ प्रोसिजरच्या मुद्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभागृहाच्या इतिहासात पहिल्यांदाच दोन अंतिम आठवडा प्रस्ताव या सभागृहात आले असून त्यावर आज सकाळी चर्चाही झाली आहे. त्या चर्चेच्या संदर्भात माननीय सभापती महोदयांनी जो निर्णय दिला आहे त्याबद्दल आम्हाला काहीही बोलावयाचे नाही. परंतु एकत्रित प्रस्ताव देण्याचा निर्णय घेण्यात आला त्यावेळी दोन्ही नेत्यांनी एकत्रितपणे बसून ड्राफ्टींग करणे आवश्यक होते. हे प्रस्ताव आम्ही देतो की, विधानमंडळ सचिवालय देते हे आम्हाला कळले पाहिजे. प्रस्ताव देण्याचा अधिकार आमचा असेल तर या ठिकाणी जो प्रस्ताव दिलेला आहे तो नेमका कोणी दिलेला आहे याची माहिती कामकाजास सुरुवात होण्यापूर्वी आम्हाला मिळावी अशी विनंती आहे.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी कामकाजाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, .......

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यासंदर्भात आपण पहिल्यांदा रुलींग देणे आवश्यक आहे.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**उप सभापती** : मला असे वाटते की, सभागृहाचे कामकाज चालविणे यापुढे फार कठीण होणार आहे. या विषयाच्या संदर्भात सभापती महोदयांनी दोन्ही पक्षाच्या प्रमुखांशी चर्चा करून हा प्रस्ताव तयार केलेला असावा. त्यांच्या अनुमतीने हा प्रस्ताव विधिमंडळाकडे आला असावा असे मला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती**.......

वाटते. हा प्रस्ताव मी आताच पाहतो आहे. याविषयाच्या संदर्भात आपल्याला स्पष्टीकरण पाहिजे असेल तर मी स्वत: सभापती महोदयांबरोबर घडलेल्या घटने विषयी बोलतो आणि आपल्याला सविस्तर माहिती देतो.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्ताव दोन आले होते. परंतु असा इतिहास होऊ नये यासाठी मी आणि विरोधी पक्ष नेते आम्ही दोघांनी असे सांगितले की, अंतिम आठवडा प्रस्ताव कंबाईन करण्यात यावा आणि हा अंतिम आठवडा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे मांडतील, त्यांनी तो मांडला नाही तर आम्ही सुरु करु सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे प्रस्ताव मांडत नसतील तर विरोधी पक्ष नेत्यांनी प्रस्ताव मांडावा अशी चर्चा त्यावेळी झाली होती. सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे यांना या विषयाच्या संदर्भात माहिती नसेल तर त्यांनी त्यासंदर्भात माहिती घ्यावी.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहाचा वेळ आपण किती घेणार आहात ? या विषयाच्या संदर्भात आपण सकाळी 5-10 मिनिटे चर्चा केलेली असून मी सुध्दा या विषयावर माझे विचार व्यक्त केले होते. या अधिवेशनात मी या कार्यालयावर अनेक आक्षेप नोंदवले आहेत. आपले कार्यालय यासंदर्भात काय करते ? या ठिकाणचे सचिव काय करतात ? विरोधी पक्ष नेतेच अंतिम आठवडा प्रस्ताव देत असतात. या विषयाच्या संदर्भात मी आक्षेप घेतल्यानंतर सभापती महोदयांनी कबूल केले होते की, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात पहिला मान विरोधी पक्ष नेत्याचा असतो. त्यामुळे मी आणि सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे एकत्र बसतो आणि यासंदर्भात निर्णय घेतो. अशा प्रकारचे रूलींग माननीय सभापती महोदयांनी दिले होते. माननीय सभापती महोदयांचे सकाळचे रूलींग रेकॉर्ड झालेले आहे. सभापती महोदयांनी सांगितले होते की, या सभागृहाला काल पर्यंत विरोधी पक्ष नेता नव्हता परंतु आज सभागृहाला विरोधी पक्ष नेते आहेत. त्यामुळे विरोधी पक्ष नेत्यांचा प्रस्ताव पहिल्यांदा घेतला जाईल असे सभापती महोदयांनी रूलींग दिलेले आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आता चर्चा होऊ शकत नाही.

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज सकाळी सभापती महोदयांच्या दालनात सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे आणि माझी दोन्ही विषय क्लब करण्याविषयी चर्चा झाली होती. परंतु या प्रस्तावाचे जोडपत्र येत असतांना त्या प्रस्तावामधील जे कन्टेन्ट आहेत ते कन्टेन्ट आम्हाला जोडपत्र देतांना दाखवले नाही. आम्हाला कन्टेन्ट दाखवले गेले नाही हा आमचा मूळ मुद्दा आहे. दोन्ही विषय क्लब करण्याच्या बाबतीत सभागृहात चर्चा झाली होती परंतु जोडपत्रातील कन्टेन्ट बाबत काहीही दाखवले नाही.

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, या नवीन प्रस्तावावर फक्त नावे बदललेली आहेत, परंतु त्या खालील पूर्ण प्रस्ताव हा सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी दिलेला आहे, तोच आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात कालपासून चर्चा सुरु होती. परंतु आता माननीय विरोधी पक्ष नेत्याची नियुक्ती झाल्यानंतर परिस्थितीमध्ये फरक पडलेला आहे. आज सकाळी जी चर्चा झाली त्यामध्ये प्रथेप्रमाणे एकच प्रस्ताव असावा असे मान्य करण्यात आले. हा प्रस्ताव एकत्रित करण्यास मान्यता देण्यात आली. त्यानंतर दुपारचे कामकाज सुरु झाल्यानंतर आमच्या हातामध्ये सुधारित प्रस्ताव देण्यात आला, त्या प्रस्तावामध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी दिलेल्या प्रस्तावातील विषयाचा एकही शब्द नाही आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे तो जशाचा तसा दिलेला आहे आणि त्यावर फक्त नावे बदलली आहेत. कोणत्याही परिस्थितीत अशा पद्धतीने दुरुस्ती चालणार नाही. या प्रस्तावाचा संपूर्ण गाभा बदलायचा असेल तर आम्हाला तो कदापि मान्य होणार नाही.

**उप सभापती** : माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण प्रथम माझे म्हणणे ऐकून घ्यावे. प्रोसिजरप्रमाणे अंतिम आठवडा प्रस्ताव झाला पाहिजे. त्यानुसार दोन्ही प्रस्ताव एकत्रित करण्यात आले. त्या संदर्भात वाद आहे. तेव्हा माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अर्धा-तास बसून त्यातील कन्टेंटवर एकमत करुन सभागृहामध्ये नवीन प्रस्ताव आणावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपल्या निर्णयावर बोलता येत नाही हे मला माहीत आहे. मी या ठिकाणी पॉईन्ट ऑफ प्रोसिजर उपस्थित केला होता की, हा प्रस्ताव कोणी तयार केला ? हा प्रस्ताव तयार करण्याचा अधिकार कोणाचा आहे, हा अधिकार आमचा आहे की, विधिमंडळ कार्यालयाचा आहे, याबाबत स्पष्टीकरण द्यावे. या ठिकाणी जो प्रस्ताव देण्यात आलेला आहे, तो आम्ही दिलेला नाही, त्यामुळे आम्हाला तो मान्य नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**सभापती** : मी सदनाला सांगू इच्छितो की, काल दुपारपासून अंतिम आठवडा प्रस्तावावर पुष्कळ चर्चा झाली. शेवटी असा निर्णय घेतला जो डिफेक्टीव्ह होता आणि त्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत. प्र.पाटील यांनी पॉईन्ट आऊट केले आणि ते बरोबर होते. परंतु त्या क्षणाला अन्य कोणताही पर्याय सुचला नाही. कारण सायंकाळी 6.00 पर्यंत तशी परिस्थिती नव्हती. आज सकाळी माझ्या दालनात बैठक झाली त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेते आणि सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे उपस्थित होते. त्या बैठकीत दोन्ही प्रस्ताव एकत्रित करुन या प्रस्तावाची सुरुवात माननीय विरोधी पक्ष नेते यांच्याऐवजी सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे करतील असे माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आणि त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे भाषण करतील.

याठिकाणी असा आक्षेप घेण्यात आला आहे की, जो प्रस्ताव रीडआऊट झाला त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या प्रस्तावातील विषय जास्त आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, जे चुकीचे रीडआऊट झालेले आहे ते दुरुस्त करण्यात येईल. अंतिम आठवडा प्रस्ताव दुरुस्त झाल्यानंतर त्यावर आपण चर्चा करु.

सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे हे अल्पकालीन चर्चेला सुरुवात करतील. तत्पूर्वी मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे की, आजच्या कामकाजपत्रिकेवरील एकूण कामकाज पाहिले आणि ते सर्व कामकाज पूर्ण करायचे झाले तर आपण रात्रभर बसलो तरी ते कामकाज संपण्याची शक्यता नाही. त्यामुळे आपण या चर्चेवर मर्यादा घालू या, वक्त्यांवर मर्यादा घालू या. आपण अत्यंत चांगल्या पद्धतीने हा विषय मांडला, तर त्याचे उत्तर देखील लगेच येईल, यादृष्टीने आपण प्रयत्न केला तर कामकाज पूर्ण होण्याची शक्यता आहे.

अल्पकालीन चर्चेवर सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री रामहरी रुपनवर, हरिभाऊ राठोड, संजय दत्त, भाई जगताप आणि अन्य सन्माननीय सदस्यांची नावे आहेत. माझी सभागृहाला विनंती आहे की, अल्पकालीन चर्चेवर फक्त सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे बोलतील आणि त्यांचे भाषण झाल्यावर त्यावर माननीय गृहमंत्री उत्तर देतील.



अस्वाक्षरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे.
मु.शी.: मराठी माणसाच्या मनात मराठी भाषेविषयी असलेला न्यूनगंड दूर करणे या विषयावर सर्वश्री हेमंत टकले, सुनिल तटकरे, राजेंद्र जैन, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री आनंद ठाकूर, अमरसिंह पंडित, रामराजे नाईक-निंबाळकर, प्रकाश बिनसाळे, किरण पावसकर, ख्वाजा बेग, प्रभाकर घार्गे वि.प.स.यांनी उपस्थित केलेली नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री ) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी सांगितले की, या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीत चर्चा केली तर ती उपयुक्त ठरेल. माननीय गृह राज्य मंत्र्यांना सभागृहात उपस्थित राहण्यासाठी निरोप पाठविण्यात येईल. ते सभागृहात उपस्थित होईपर्यंत सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी मराठी भाषेच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावरील उत्तर देण्यास मला अनुमती द्यावी अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : आपणास उत्तरासाठी 15 मिनिटे देण्यात आलेली आहे. यावेळेत आपण उत्तर पूर्ण करावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि अन्य सदस्यांनी मराठी भाषेच्या संदर्भात काल अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आणि आज त्यावर उत्तर देण्याची संधी मला मिळत आहे त्याबद्दल आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या सभागृहात मराठी भाषेच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्य सातत्यांने विषय मांडत असतात. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व अन्य सदस्य नेहमीच मराठी भाषेबद्दल चर्चा करण्यासाठी आग्रही राहिले आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेबद्दल सातत्याने विचार करावा लागतो, मराठी भाषा बळकट करण्यासाठी काही विशेष प्रयत्न करावे लागतात आणि त्यासाठी चर्चा उपस्थित करावी लागते ही माझ्यादृष्टीने चांगली गोष्ट नाही. या अल्पकालीन चर्चेवर बोलताना सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी ज्ञानेश्वर माऊलींचा उल्लेख केला. संत एकनाथानी म्हटले होते की, "टीका तरी मराठी परी ज्ञानदाने होईल लाठी." मराठी संस्कृतीच्या माध्यमातून मराठीचा विकास व्हायचा असेल तर त्यासाठी प्रथम मराठी भाषा टिकणे अत्यंत महत्वाचे आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

कितीही आणि काहीही म्हटले तरी सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे मराठी भाषेचा वापर करणे हे अभिमानास्पद आहे. त्यामुळे या बाबतची जाणीव राज्यातील प्रत्येक व्यक्तीला असावयास पाहिजे. माझ्या मोबाईलवर मार्केटींग कंपन्यांच्या लोकांचे फोन येतात आणि ते माझ्याशी हिंदी किंवा इंग्रजी भाषेत बोलतात. मी त्यांना सांगितो की, आपल्याला जे काही सांगायचे असेल ते मराठी भाषेतून सांगावे. परंतु ते सांगतात की, आम्हाला हिंदी आणि इंग्रजी भाषा येते, मराठी भाषा येत नाही. मी त्यांना सांगतो की, मला मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तिन्ही भाषा समजतात. परंतु तुला जर खरोखरच माल विकायचा असेल तर तू मला मराठी भाषेमध्ये समजून सांगायला पाहिजे. राज्यातील जनतेने सुध्दा अशा प्रकारे हिंदी वा इंग्रजी भाषेतून मार्केटींग करणाऱ्या लोकांना सांगितले तर मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरु होईल. सर्वांनी त्या लोकांना सांगितले पाहिजे की, तू जर मराठी भाषेतून समजून सांगितले तरच तुझा माल घेण्याबाबत आम्ही विचार करु या सर्व मार्केटींगच्या ठिकाणी मराठी भाषा आली पाहिजे, हा आग्रह त्यातून सुरु होतो. अशा छोट्याछोट्या गोष्टी सर्वसामान्य माणसांमध्ये अभियान म्हणून राबविण्याची गरज आहे. मराठी भाषेतील पाट्याच्या बाबतीत आंदोलन आवश्यक आहे काय, तर हो, आवश्यक आहे. मराठी भाषिक माणसाचे आंदोलन आणि मराठी भाषेच्या संवर्धनासाठीचे आंदोलन या दोन्ही बाबी वेगवेगळ्या आहेत. त्यामध्ये फरक केला पाहिजे.

महोदय, माझ्याकडे मराठी भाषा विभाग आल्यानंतर मी विभागाच्या अधिकाऱ्यांकडून ब्रिफींग घेतले. वास्तविक पाहता मराठी भाषा विभाग एका राजकीय आंदोलनानंतर निर्माण झाला. त्यावेळी हा विभाग माननीय मुख्यमंत्र्यांकडे होता. परंतु या सरकारमध्ये मनुष्यबळ विकास विभाग म्हणून शालेय शिक्षण, उच्च व तंत्रशिक्षण विभागाबरोबरच मराठी भाषा विभाग सुध्दा मी स्वीकारावा असा आग्रह माननीय मुख्यमंत्र्यांनी धरला होता. या निमित्ताने सांगतो की, खऱ्या अर्थाने मराठी भाषेच्या बाबतीत काही गोष्टी पुढील काळात करणे गरजेचे आहे.

महोद, माझ्याकडे मराठी भाषा विभाग आल्यानंतर समितीने मराठी भाषा विषयक धोरण-2014 चा मसुदा सादर केला होता. वास्तविक पाहता या धोरणाबाबत जनतेकडून त्यांची मते मागवावयास पाहिजे होती. त्यामुळे डॉ.नागनाथ कोतापल्ले यांच्या समितीने सादर केलेले मराठी भाषा विषयक धोरण दिनांक 5 नोव्हेंबर, 2014 रोजी मराठी भाषा विभाग आणि राज्य सरकारच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित... 16:40

श्री.विनोद तावडे....

संकेत स्थळावर टाकण्यास सांगितले. त्यावर लोकांच्या प्रतिक्रिया मागविण्यास सुरुवात केली. त्यानंतर मला अनेकांचे फोन आणि ई-मेल आले आणि त्यांनी सांगितले की, प्रतिक्रिया सादर करण्याची मुदत कमी आहे. त्यामुळे आम्ही ती मुदत दिनांक 25 फेब्रुवारी, 2015 पर्यंत वाढविली आहे. या बाबतीत जास्तीत जास्त अभिप्राय आणि सूचना येणे आवश्यक आहेत. डॉ.कोतापल्ले यांच्या समितीने जे अभिप्राय दिले होते, त्यामध्ये नमूद केले होते की, ज्या प्रमाणे नामदार यशवंतराव चव्हाण यांनी लोकभाषा या ज्ञानभाषा झाल्या पाहिजेत असे म्हटले होते, त्या दृष्टीने कार्यवाही झाली पाहिजे, असा आग्रह धरला आहे. ज्ञानशाखांची अद्ययावत व गुणवत्तापूर्ण पाठ्यपुस्तके आणि संदर्भ पुस्तके निर्माण करणे, प्रशासकीय क्षेत्रात मराठी भाषेचा 100 टक्के वापर झाला पाहिजे, महाराष्ट्रात विविध बोलींचे शब्दकोष तयार करणे, वाचन संस्कृतीचा विकास करणे या बाबतीत सुध्दा त्यामध्ये आग्रह धरण्यात आलेला आहे.

श्री.हेमंत टकले : महोदय, सन्माननीय मंत्री महोदय यांच्याकडून या विषयाला न्याय देण्याइतपत व्यवस्थित उत्तर मिळेल ही खात्री त्यांच्याकडून होती. आताच त्यांनी सांगितले की, मराठी भाषा विषयक धोरणाबाबत जनतेचे अभिप्राय व सूचना पाठविण्याची मुदत 15 डिसेंबर, 2014 होती. परंतु आता ती मुदत दिनांक 25 फेब्रुवारी, 2015 पर्यंत वाढविली आहे. या गोष्टीचे आम्ही स्वागतच करतो. परंतु केवळ एवढ्यावरच अवलंबून न राहता, या विषयी राज्याच्या महसूल विभागवार बैठका आयोजित केल्या आणि त्या बैठकांमध्ये मराठी भाषा विषयक धोरणाबाबत सविस्तर माहिती शासनामार्फत दिली तसेच त्या बैठकीत मान्यवरांचे अभिप्राय एकत्रितरित्या आले तर या संवादातून आपल्याकडे जो उलटा मतप्रवाह येईल तो सुध्दा अधिक महत्त्वाचा असल्यामुळे आपण त्याचाही अंतर्भाव करावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : महोदय, केवळ काही शब्दांच्या आग्रहावरून मराठी भाषा पुढे जाईल असे ज्यांना वाटते ते अशा प्रकारचा आग्रह धरतात. शेवटी टप्प्याटप्प्याने सर्वांनाच पुढे जायचे आहे.

महोदय, समितीच्या अभिप्रायाबाबत सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला तशीच कल्पना आमच्या विभागाची आहे आणि त्या पध्दतीने आम्ही नक्की कार्यवाही करणार आहोत, किंबहुना ते प्रत्यक्षात केले जाईल. महाराष्ट्रातील विविध बोलीचे शब्दकोष तयार करणे आवश्यक, वाचन

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

संस्कृतीचा विकास करणे गरजेचे आहे, मराठी भाषा विषयक उपक्रमासाठी मराठी भाषा अधिकाऱ्यांची काही प्रमाणात नेमणूक करावी लागेल, मराठी माध्यमांच्या शाळांची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करणे, इत्यादी अनेक बाबी आहेत.

महोदय, मी विधानसभा सभागृहात शिक्षण विषयक प्रस्तावावर उत्तर देताना जे सांगितले होते, तेच पुन्हा या सभागृहात सांगतो. मराठी शाळा कमकुवत आणि बंद होत असल्यामुळे आपण सर्वच चिंतेत आहोत. मी विधिमंडळाच्या सर्व सदस्यांना असे आवाहन केले आहे की, प्रत्येक आमदाराने एक आदर्श मराठी शाळा दत्तक घ्यावी. विधानसभेच्या 288 आणि विधानपरिषदेच्या 78 आमदारांनी मिळून प्रत्येकी एक शाळा दत्तक घेतली तर फार मदत होईल. मला वाटते सुरूवातीला एक शाळा दत्तक घेऊ या. ती शाळा कशाप्रकारे आदर्श करायची या बाबतचे परिपत्रक शासनाच्या माध्यमातून प्रत्येक सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल. त्या आमदारांनी शाळांसाठी आवश्यक असलेल्या सोयी सुविधा निर्माण कराव्यात. गरज पडली तर या बाबतीत नियोजन विभागाशी बोलून या कामी थोडासा आमदार निधी खर्च करता येईल काय, हे सुध्दा बघू. इयत्ता 7 वी, 8 वी नंतर मुलींचे शाळा सोडण्याचे प्रमाण जास्त आहे. कारण त्या शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहांची व्यवस्था नसते. अशा ठिकाणी काही करता येईल काय, याचा त्यात विचार करता येईल. अशाच काही इतही गोष्टी आहेत. "एक आमदार-एक आदर्श मराठी शाळा" ही संकल्पना राबविली तर या निमित्ताने काही तरी चांगली प्रक्रिया सुरु होऊ शकते.

महोदय, डॉ.कोतापल्ले यांच्या समितीने सुचविले आहे की, सर्व प्रकारच्या बँकातील कारभार उदाहरणार्थ पैसे काढणे-भरणे, धनादेश, मुदत ठेव, लेखन उतारा इत्यादी मराठी भाषेत सुध्दा असला पाहिजे. आपण केंद्रातील सर्व आस्थापनांमध्ये बघतो की, त्या ठिकाणी इंग्रजी व हिंदी भाषेचा उल्लेख असतो. त्या ठिकाणी मराठी भाषेचा उल्लेख नसतो. बाकीच्या राज्यात आग्रहपूर्वक त्या त्या राज्यांच्या भाषांचा उल्लेख असतो. तसाच आग्रह मराठी भाषेच्या बाबतीत धरण्याबाबत डॉ.कोतापल्ले यांच्या समितीने सूचना केली आहे. शिवाय मराठी भाषेच्या संगणक साक्षरतेची नितांत आवश्यकता आहे. या संगणक साक्षरतेच्या बाबतीत अधिक सक्रीय होणे गरजेचे आहे. माननीय श्री.अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना मी याच सभागृहात विचारले होते की, आपण

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



SJB/ पूर्वी श्री.अजित... 16:40

श्री.विनोद तावडे....

मराठी भाषेचे युनिकोड तयार केले आहे काय ? कारण आकृती फॉंट उघडला नाही तर, ती व्यक्ती मराठी फॉंटचा वापर करणे सोडून देते. त्यामुळे मराठी भाषेचे युनिकोड सुरु करण्याच्या बाबतीत आवश्यक त्या गोष्टी करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे अग्रक्रमाने सुचविलेल्या गोष्टीमध्ये प्राधान्याने लक्ष घालून त्या बाबतीत ताबडतोब कार्यवाही करण्याचा विचार करीत आहोत.

महोदय, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला पाहिजे. अभिजात भाषेचा दर्जा म्हणजे क्लासिकल लॅंग्वेज होय. सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी मूळ क्लासीकल लॅंग्वेजच्या बाबतीत सांगितले. युनोच्या व्यासपीठावरुन अभिजात हा शब्द आला आहे. मला अनेक वेळा प्रश्न पडतो की, अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त होणे म्हणजे काय ? अनेकांच्या मनात या बाबतीत थोडा गोंधळ असू शकतो. ती भाषा प्राचीन आहे, दीड-दोन हजार वर्षांपूर्वीची आहे हे सिध्द करु शकलो तर तिला अभिजात भाषा म्हणता येईल. ज्या भाषेची मौलिकता आणि सलगता आहे, म्हणजे ती भाषा गेल्या 50-100 वर्षाच्या काळात खंडीत झालेली नाही ती अभिजात भाषा असू शकते. भाषिक आणि वाङमयीन परंपरेचे स्वयंभूपण आहे, म्हणजे त्यांचे साहित्य ट्रान्सलेटेड नाही, तर स्वत: निर्मित आहे, ती अभिजात भाषा होऊ शकते. प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रुप यात पडू शकणाऱ्या खंडासह जोडलेले असलेले नाते, त्यात लक्षात घेतले जाते. आतापर्यंत केंद्र सरकारने तामीळ, संस्कृत, तेलगू, कन्नड, मल्याळम व उरीया या सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे आणि सातवी भाषा म्हणून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. लोकसभेमध्ये कालच माननीय खासदार श्रीमती पूनम महाजन यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय केंद्रीय मंत्री श्री.महेश शर्मा यांनी उत्तर देताना सांगितले की, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव विभागाकडून आलेला आहे. त्या प्रस्तावाचा विचार करुन 27 फेब्रुवारी रोजी म्हणजेच मराठी भाषा दिनाच्या पूर्वीच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

केवळ त्या घोषणेवर न जाता मला सरकार म्हणून महाराष्ट्राच्या सामान्य जनतेला एक आवाहन करायचे आहे. प्रा. रंगनाथ पाठारे यांच्या अध्यक्षतेखाली अभिजात मराठी भाषा समितीची स्थापना सन 2012 ला झाली. त्यांनी केलेल्या कामाचा अहवाल दिनांक 12 जुलै, 2013 ला राज्य शासनाने केंद्र सरकारकडे पाठविला. आधी तो अहवाल मराठीत पाठविण्यात आला, नंतर इंग्रजीत आवश्यक असल्यामुळे तसा तो पाठविण्यात आला. मी त्यानंतर सर्व खासदारांना पत्र लिहिले की, त्यांनी साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना मराठी भाषेबद्दल पत्र लिहावे. मी सांगू इच्छितो की, सर्व आमदारांनी, महाराष्ट्रातील सर्व लोकप्रतिनिधींनी म्हणजे जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, नगरसेवक यांनी साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पत्र लिहिले पाहिजे की, आमची मराठी भाषा प्राचीण आहे. आपण जरूर यासाठी आग्रह धरावा. आपले पत्र साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना गेले पाहिजे. माझे तर पुढे असे म्हणणे आहे की, राज्यातील 12 कोटी जनतेतील मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला पाहिजे असे अग्रक्रमाने वाटणाऱ्या सामान्य माणसाने सुध्दा साहित्य अकादमीच्या अध्यक्षांना पोस्ट कार्डवर लिहिले पाहिजे की, आमच्या मराठी भाषेला आपण अभिजात भाषेचा दर्जा द्यावा. ती तो दर्जा मिळण्याच्या निकषात बसणारी भाषा आहे. आज या निमित्ताने मी राज्यातील सर्व जनतेला आवाहन करीत आहे. अध्यक्ष, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, शास्त्री भावन या पत्त्यावर आपण लाखो पत्रे पाठविली तर आपल्या सगळया प्रयत्नांना त्याची मदत होईल. आपणाकडून तशी पत्रे गेली पहिजेत, असे मला प्रामाणिकपणे वाटते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मराठी भाषेतून व्यवहार करण्याच्या संदर्भात न्यायालयाचा निर्णय झाला आहे. उच्च न्यायालयातील कामकाज मराठीतून चालेल, हा पुढचा टप्पा आहे. कनिष्ठ न्यायालयात सामान्य शेतकरी आपला 7/12, आपल्या शेतीची कागदपत्रे घेऊन न्यायालयात बसलेला असतो. परंतु, त्या ठिकाणी न्यायाधीश आणि वकील काय बोलतात, हे त्याला कळत नाही. ते कामकाज मराठीतून झाले पहिजे, असा निर्णय दिला आहे. पण निर्णय देऊन मराठीतून कामकाज चालू होत नाही. शेवटी असा निर्णय आल्यानंतर तो अंमलात यायचा असेल तर कायद्याचे शिक्षण मराठीतून उपलब्ध होणे गरजेचे आहे. आपल्याला कुठेतरी विचार करावा लागेल की, कनिष्ठ न्यायालयात प्रॅक्टिस

श्री. विनोद तावडे ....

करणाऱ्या वकिलाला जो मराठीतून कायदा शिकला आहे, त्याला प्राधान्य मिळाले पाहिजे. न्यायालयात मराठीतून कारभार होण्यासाठी त्याची मदत होऊ शकते. आपलयाला अशा काही रचना निर्माण कराव्या लागतील.

सभापती महोदय, आज इंग्रजीचे मोठे प्रस्थ आहे. परंतु, त्याला मराठी टक्कर देऊ शकणार नाही, असे मला वाटत नाही. आज जी मराठी भाषेची स्थिती आहे, तीच केव्हा तरी 15 व्या, 16 व्या शतकात स्पॅनिश व लॅटीनची होती. तेव्हा इंग्रजी कुठेच नव्हती. पण त्यांनी जगावर राज्य करायचे ठरविले होते. जगावर राज्य करायचे असेल तर जे जे लॅटिन आणि स्पॅनिश भाषेमध्ये आहे मग ते मेडिकल सायन्स असेल ते सर्व इंग्रजी भाषेत केले. स्पॅनिश व लॅटिन भाषेमध्ये व्यापार, कॉमर्स होते ते त्यांनी इंग्रजीत केले. त्यांनी कायदा इंग्रजीमध्ये केला. 50, 60, 70 वर्षांच्या प्रयत्नानंतर या जगात स्पॅनिश, लॅटिन ही भाषा पुसून इंग्रजी चालते हे दाखविले. इंग्रजी भाषेत हे सर्व करता येत असेल तर आपल्या राज्यापुरते का होईना मराठीत हे करायचे हा निर्धार सरकारचा आहे. आपण करणार हे नक्की आहे.

सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांशी या विषयावर चर्चा केली की, यापुढे सर्व नस्त्यांवर सर्व आयएएस अधिकाऱ्यांनी, सचिव, प्रधान सचिव यांनी मराठीत अभिप्राय लिहिले पाहिजेत. असाच आग्रह या सरकारचा राहणार आहे. मला मान्य आहे की, आज 100 टक्के इंग्रजीमध्ये अभिप्राय लिहितात. परंतु, ते 6 महिन्यांत 80 टक्के होईल. लगेच होणार नाही. एखाद्या अधिकाऱ्याला ताबडतोब सवय होणार नाही. तो इंग्रजीमध्ये त्याचे अभिप्राय लिहितो. सदर बाब परिपत्रकाच्या स्ध्माने सर्वांना सांगण्यात येईल की, सर्वांनी मराठीतून अभिप्राय लिहिले पाहिजेत. सुस्न्मातीच्या काळात थोडेसे अवघड वाटेल. पण टप्प्याटप्पयाने सवय केली तर हे होईल. मराठीतील अभिप्रायाची टक्केवारी प्रत्येक सचिव, प्रधान सचिवांची कशी वाढते, याची दखल त्यांच्या वार्षिक गोपनीय अहवालामध्ये घेतली जाणार आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे परिपत्रक काढण्याचे मान्य केले आहे. दुसऱ्या भाषेचा विरोध नाही. आपल्या राज्यात मराठी भाषा आपली आहे. मराठी भाषा असेल तर आपल्या येथे येणाऱ्या नस्त्यांवर मराठीमध्ये अभिप्राय आले पाहिजेत, हा आग्रह

..3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

असला पाहिजे. सदर बाबतीत कोणत्याही दंडात्मक कारवाईचा मुद्दा नाही. हा आग्रहाचा मुद्दा आहे. आपण सर्वांनी आग्रह धरला तर हे होणार आहे आणि हे होऊ शकते.

सभापती महोदय, माझ्याकडे ज्या दिवशी हे खाते आले तेव्हापासून मी खूप प्रयत्न करीत आहे. मला देखील स्वीय सहायक, सचिव असे लिहिण्यास पटकन सोपे होते. आपण फक्त ठरविले पहिजे. मला देखील असे लिहिण्यास 15-20 दिवस जड गेले. पण नंतर ते जमायला लागले. मला वाटते की, आपण हा आग्रह धरला तर यामध्ये नक्की यश मिळवू शकतो. कारण सुरूवातीला आपण पीटीओ लिहायचो, नंतर कृमाप लिहायला लागलो आणि नंतर तेच लिहिण्याची सवय लागली. बारीक गोष्टी आहेत. परंतु तरीही हे सर्व नीट होण्यासाठी एक शासकीय शब्दकोष निर्माण करावा लागेल. शासनाच्या रोजच्या वापरात येणारे शब्दांचा मराठीत काय अर्थ आहे या संदर्भातील शब्दकोष निर्माण केला आणि तो आपण सहज उपलब्ध करून देऊ शकलो तर तो प्रत्येकासोबत राहील. आपल्याला सुरूवातीच्या काळात त्याचा वापर करता येऊ शकेल. आपल्याला तसे करणे अधिक उपयुक्त होऊ शकते. माझ्याकडे हे खाते आल्यानंतर मी मराठी भाषा विषयात काम करणाऱ्या अनेक मंडळींबरोबर चर्चा केली. मराठी अभ्यास केंद्राचे श्री. दीपक पवार, इतर सर्व मंडळी, वेगवेगळ्या विद्यापीठांचे मराठीचे विभाग प्रमुख, मराठी विभाग, विविध महाविद्यालयांतील मराठी वाङ:मय मंडळे ही मराठीच्या अस्मितेची फौज आहे, या सैन्याच्या आधारे मला असे वाटते की, मराठी भाषेला एक प्रतिष्ठा प्राप्त करून द्यायची आहे. ती प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याची लढाई आपण लढू शकतो, जिंकूही शकतो आणि ती नवीन पिढीपर्यंत यशस्वीपणे पोहचवूही शकतो, असा माझा विश्वास आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी अत्यंत चांगला उद्देश जाहीर केल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे, आभारी आहे. मुंबई मनपाकडून लोकांशी करण्यात येणारा व्यवहार आजही इंग्रजी भाषेत आहे. ते शासनाचे मुख्य अंग आहे. तेथे, मुंबईत मराठी झाले की, संपूर्ण महाराष्ट्रात मराठी होईल. मुंबई मनपा तुमच्या ताब्यात आहे. आपण तेथेही मराठी भाषेचा आग्रह धरावा.

..4



MSK/ पूर्वी श्री. बोर्डे 16:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मुंबई मनपा कोणाच्या ताब्यात आहे, ही बाब वेगळी आहे. राज्यातील मनपाचे कामकाज मराठीतून चालले पाहिजे. आपला हा आग्रह राहिला तर खूप चांगले होणार आहे. आपण जोपर्यंत मराठी भाषा संवर्धनासाठी राजकीय विचारधारेच्या पलीकडे जात नाही तोपर्यंत हे काही होणार नाही. मी आरोप करीत नाही, फक्त सूचना करीत आहे. आपण अनावश्यक गोष्टींत पडू नये, असे माझे मत आहे. मी मराठी भाषा संगणकीय युगानुकूल बनविणे आवश्यक असल्याने त्यासाठी काय करावे लागेल याबाबत चर्चा करीत असताना, मराठी भाषेचे संगणकीय युगानुकूल बनविणे, त्यासाठी युनिकोड प्रणाली बनविणे, मराठी संशोधन विकास चालना देण्यासाठी प्रयत्न करणे हे आवयक कसे आहे हे सांगितले. फॉन्टची संख्या वाढविणे कसे गरजेचे आहे, चांगले फॉन्ट कसे निर्माण होतील, तरूण पिढीला भाषा वापरण्यास अधिक आकर्षक कशी वाटू शकेल हे पाहणे गरजेचे आहे, हे सांगितले. मराठीच्या 60 बोलीभाषा आहेत.

सभापती महोदय, 2 वर्षांपूर्वी अंदमानमध्ये एक वयोवृध्द स्त्री 108 व्या वर्षी मरण पावली. ती मरण पावल्याची बातमी तशी विशेष नाही. पण त्या महिलेला अंदमान भागतील 'बो' ही भाषा येत होती. तिच्या मृत्यूमुळे ती भाषाच लुप्त झाली. त्या भाषेचे कुठेही डिजिटलायझेन नव्हते, संग्रह केलेला नव्हता. माझे मत असे आहे की, आपल्याकडे राजकीय व्यवस्था असताना अशी एक बोली भाषा लूप्त होणे म्हणजे आपल्या हातून घडलेला तो गुन्हा आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...........

50-100 वर्षानंतर ज्यावेळी मराठीतील 60 बोलीभाषांपैकी केवळ 56 बोलीभाषा शिल्लक राहिल्या आहेत, असे लक्षात येईल त्यावेळी त्या त्या वेळची सरकारे निकम्मी होती, असे म्हटले जाईल. त्यामुळे या सर्वच्या सर्व बोलीभाषांचे डिजिटलायझेशन, ऑडिओ-व्हिडिओ व्हिज्युअलायझेशन करणे गरजेचे आहे. जेणेकरुन या सर्व बोलीभाषा पुढील 50-100 वर्षे टिकविणे आपल्याला शक्य होईल. अशी व्यवस्था आपण करणार आहोत आणि ते करणे गरजेचे आहे, असे मला वाटते.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अतिशय चांगली मार्गदर्शक तत्वे मंत्री महोदय घालून देणार आहेत. परंतु, आता बोलताना त्यांच्याकडून 'निकम्मा', असा असंसदीय शब्द वापरला गेला आहे. तो कामकाजातून काढून टाकावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ठीक आहे. 'निकम्मा' या शब्दा ऐवजी मी 'अकर्तृत्त्ववान', असा शब्द वापरतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, येथे 'भाषाद्रोही', हा शब्द समर्पक होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मराठी भाषा विद्यापीठाची मागणी सन 1921 मध्ये माननीय न.चि.केळकर यांनी साहित्य संमेलनामध्ये केली होती. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी मराठी विद्यापीठ असावे, अशा आशयाचा ठराव दिनांक 1 फेब्रुवारी, 2013 रोजी पुणे येथील बैठकीत सल्लागार समितीने पारित केला. कोणतेही विद्यापीठ स्थापन करण्यासाठी साधारणपणे दीड-दोनशे कोटी रुपये खर्च येतो, हे आपल्याला माहीत आहे. पण मला प्रामाणिकपणे असे वाटते की, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यानंतर केंद्र सरकारकडून जो निधी येतो तो आपण मराठी भाषेच्या संवर्धनासाठी वापरु शकतो. त्या आधारे या योजना आपण अग्रक्रमाने करणार आहोत.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संवर्धनासाठी कोणत्याही प्रकारचे कायदे करण्यापेक्षा अशा काही गोष्टी आपण करु शकलो तर ते अधिक चांगले होईल. मी नेहमी सांगतो की, रवीद्रनाथ टागोर यांच्या 'गितांजली' या काव्यसंग्रहाला नोबेल पारितोषिक मिळाले. कारण, या काव्यसंग्रहाचे भाषांतर डब्ल्यू बी.यिडस्ने केले आणि मग ते नोबेल समिती समोर गेले. त्यामुळे आपल्याला नोबेल पारितोषिक मिळाले. असे चांगले साहित्य भाषांतरित करण्याची व्यवस्था आपण

...2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

केली आणि जागतिक स्तरावरील वेगवेगळ्या भाषांमध्ये हे साहित्य भाषांतरित झाले तर ते अधिक परिणामकारक ठरेल. समजा हिंदीत भाषांतर झाले तर दिल्लीत प्रकाशन करावे, इंग्रजीत झाले तर लंडनमध्ये करावे. असे काही कार्यक्रम केले आणि मराठी भाषेतील चांगले साहित्य जगात नेले तर ते त्या स्पर्धेमध्ये येईल. आपल्याला कल्पना आहे की, एक 'श्वास' सिनेमा ऑस्करला गेल्यानंतर त्या देशातल्या अनेक चित्रपट निर्मात्यांचे आणि अन्य लोकांचे मराठी चित्रपट सृष्टीकडे लक्ष गेले. अशाच प्रकारे ज्ञानपीठ पुरस्कार असेल किंवा अन्य ठिकाणे असतील तेथे मराठी साहित्य जात राहिले पाहिजे. ते त्याच वेळी जाईल जेव्हा ते चांगल्या पध्दतीने भाषांतरित केले जाईल आणि ते त्या त्या ठिकाणी आपण पोहोचवू शकू. अशा काही गोष्टी करणे गरजेचे आहे. या गोष्टी जर आपण नीट करु शकलो तर खऱ्या अर्थाने या मराठी भाषेला आपण उच्च स्थान देऊ शकू.

सभापती महोदय, अलीकडेच युनेस्कोने 'आंतरराष्ट्रीय योग दिवस', मान्य केला आहे. ज्यावेळी आपल्याकडे नियमित योगासने असायची त्यावेळी त्यामध्ये फार मोठा सहभाग असायचाच, असे नाही. पण कालांतराने आपल्या मूळ आपल्या देशाचा असणारा हा योगाभ्यास जागतिक पातळीवर स्विकारला गेला. त्याप्रमाणेच जागतिक पातळीवरील अनेक बाल मानस शास्त्रज्ञ आग्रहाने हे मांडत आहेत की, मातृभाषेतून शिक्षण घेतले गेले तर तो विद्यार्थी आयुष्यात यशस्वी होत असतो. हे आता इतके जोमाने सुरु झाले आहे की, पुढील 5-10-15 वर्षात आपल्या देशातील, आपल्या राज्यातील पालकांना सुध्दा आपल्या मुलाने मातृभाषेतूनच शिक्षण घेतले पाहिजे, असे आग्रहाने वाटेल. पण सायन्स किंवा अन्य काही विषय हे त्याला अशा पध्दतीने उपलब्ध करुन दिले तर पालकांना सांगणेही सोपे जाईल.

सभापती महोदय, मराठी भाषेबाबत मी आग्रहाने एवढेच सांगेन की, मराठी भाषेचे विद्यापीठ, मराठी भाषेतून करावयाचा कारभार किंवा मराठी भाषेबाबत आपल्या सर्वांच्या ज्या स्वाभाविक अपेक्षा आहेत, त्या राज्य सरकार म्हणून हे सर्व घटक एकत्र करुन, त्यांना फॅसिलिटेड करुन गती देण्याचे काम आपण करु शकतो. परंतु, राज्य सरकारनेच हे सर्व केले पाहिजे, अशी

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश....... 17:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.........

भूमिका घेतली गेली तर मराठी भाषेचे संवर्धन होईल, असे मला वाटत नाही. ही एक सामान्य माणसाची चळवळ झाली पाहिजे.

सभापती महोदय, एक गोष्ट सन्माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते येथे उपस्थित असताना मी सांगू इच्छितो की, सामान्य माणसाच्या तोंडून चुकून चार इंग्रजी शब्द बाहेर आले तरी त्याला न डिवचता प्रेमाने सुचविले तर तो ते ॲक्सेप्ट करील, डिवचायला गेलो तर तो लांब जाईल. सामान्य माणसाने मराठीचा अधिकाधिक स्विकार केला पाहिजे. माझे म्हणणे असे आहे की, डिवचून हे काम होणार नाही. पण प्रेमाने सांगितले तर नक्की होऊ शकते. शेवटी त्या त्या वेळच्या वातावरणामध्ये आपल्यावरही त्याबाबतचा परिणाम झालेला असतोच. मुळात पालक आता विचारपूर्वक मुलांच्या शिक्षणाची निवड करीत आहेत. काही भागात त्याला सुरुवात झाली आहे तर काही भागात कालांतराने सुरुवात होईल. मला असे वाटायचे की, आम्ही याच शाळेत का आहोत. त्याचे कारण असे असायचे की, ती शाळा घराशेजारी आहे. त्या शाळेत घालण्याचा हा एवढाच निकष होता. ती शाळा चांगली आहे, असा विचार नव्हता. चार भावंड असल्यामुळे चार वेळा चौघांना कोण शाळेत सोडेल, असा प्रश्न असायचा. चौधांना एकाच शाळेत सोडले की, प्रश्न मिटायचा. आता मात्र पालक विचारपूर्वक शाळा निवडत आहेत, विचारपूर्वक विषय निवडत आहेत आणि अशा वेळी जर आपण मराठी भाषा विषयातील चांगली जागरुकता निर्माण करु शकलो तर ते फार चांगले होणार आहे आणि ते आपण नक्की करणार आहोत.

सभापती महोदय, माझी खात्री आहे की, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या उद्देशाने हा विषय मांडला आहे, तो आपण पूर्ण करण्याच्या दिशेने गतीने जाऊ शकू. हाच विश्वास व्यक्त करतो आणि थांबतो.

------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर मंत्री महोदयांनी सभागृहात आपली भूमिका सविस्तरपणे मांडली आहे. त्यांच्या भाषणातील शेवटच्या भागात त्यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर काय उपलब्धी होणार आहे, हे सांगितले आहे. अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्यानंतर केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणावर भाषा संवर्धनासाठी निधी मिळतो, हा अतिशय महत्त्वाचा भाग आहे.

सभापती महोदय, आजचे सरकार किंवा यापूर्वीचे सरकार असताना अनेक योजनांमध्ये असे असते की, त्या सहभागाने पुढे जात असतात. त्यामुळे केवळ अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर केंद्र शासनाकडून जो निधी उपलब्ध होईल त्यावर मराठी विद्यापीठ स्थापन करण्याचा प्रयत्न करु, असा विचार न करता आपण आतापासून या विद्यापीठासाठी आवश्यक त्या निधीची उपलब्धता करुन देण्याची खरी गरज आहे.

सभापती महोदय, मंत्रालयीन सर्व विभागांमधील अधिकारी आणि कर्मचारी यांनी मराठीचा वापर करावा, अशा प्रकारची जबरदस्ती न करता प्रेमाने सांगून अंमलबजावणी होईल, या दृष्टीने मंत्री महोदय प्रयत्न करणार आहेत. त्यांचे हे प्रयत्न स्तुत्य आहेत. सर्वात मोठी अडचण ही आहे की, आपण एकाच वेळी सर्व विभागांना हे सांगितले किंवा मराठी भाषेचा सप्ताह जाहीर केला तर नेमकी किती गती या प्रयत्नांना मिळाली आहे, हे तपासणे थोडे अवघड जाईल. विधी व न्याय विभाग हा शासनाचा अतिशय महत्त्वाचा विभाग आहे. गेल्या काही वर्षांची या विभागाची परंपरा, ज्याचा उल्लेख या सभागृहात नेहमीच होत असतो. ज्या ज्या वेळी सभागृहात विधेयके चर्चेसाठी येत असतात त्यावेळी तुम्हाला, आम्हाला सर्वांना याचा अनुभव येत असतो. या विभागात काम करणारे अधिकारी मराठी भाषेत विचारच करीत नाहीत. तो मूळ विचार त्यांचा दुसऱ्या भाषेत होतो आणि मग भाषांतराकरवी काही तरी वेगळे भाषांतर तयार होते आणि ते विधेयक आपल्यासमोर येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.वि.खर्चे.........

श्री.हेमंत टकले..

ते विधेयक म्हणून आपल्या पुढे येते, या निमित्ताने सकाळी विषय झाला होता. याबाबत मला अशी माहिती मिळालेली आहे की, मराठी विभागासाठी जे मुनष्यबळ आवश्यक आहे, ते उपलब्ध नाही. विधी व न्याय विभागातील आमच्यापर्यंत अशी माहिती आलेली आहे की, विधेयकाचा मसुदा तयार करण्यासाठी जो कर्मचारी वर्ग आहे तो पुरेसा प्रशिक्षित नाही. त्यामुळे वयाची 70 वर्षे ओलांडलेल्या कर्मचाऱ्यांना देखील तुम्ही या कायद्याचा मसुदा तयार करु शकता असे म्हणून त्यांना पुन्हा पुन्हा कामावर बोलविले जाते. ही परिस्थिती बदलणे शासनाला सहज शक्य आहे. त्यासाठी शासनाची इच्छा शक्ती असायला पाहिजे. आपण यामध्ये जे प्रस्तावित केले आहे. ते पुढील काळात आम्हाला निश्चितपणे बघायला मिळेल. मराठी भाषेबाबतची आपली आत्मियतता अधीक स्पष्टपणे लोकांच्या समोर येईल व मराठी भाषेचा सन्मान आपणाकडून केला जाईल असा विश्वास आपण दिला त्याबाबत आपले अभिनंदन करतो.

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपलेली आहे.

--------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अहमदनगर जिल्ह्यातील जवखेडे खालसा या गावात दलित कुटुंबातील तीन व्यक्तिंची केलेली निघृण हत्या

**मु.शी.**: अहमदनगर जिल्ह्यातील जवखेडे खालसा या गावात दलित कुटुंबातील तीन व्यक्तिंची केलेली निघृण हत्या या विषयावर प्रा.जोगेंद्र कवाडे सर्वश्री.रामहरी रुपनवर, हरिभाऊ राठोड, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री. शरद रणपिसे, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री.अनिल भोसले, नरेंद्र पाटील, सुनिल तटकरे, हेमंत टकले, श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ. सुधीर तांबे, डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, धनंजय मुंडे, प्रकाश गजभिये, दिपकराव सांळुखे, श्रीमती विद्या चव्हाण,सर्वश्री.जयवंतराव जाधव, विक्रम काळे, किरण पावसकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**सभापती** : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी एक तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य प्रा.जोगेद्र कवाडे आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे (राज्यपालांद्वारे नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम ९७अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावातील एकाच दलित कुटुंबातील व्यक्तींच्या दिनांक 20 ऑक्टोबर, 2014 रोजी झालेल्या निर्घृण हत्या, या प्रकरणातील आरोपींची नावे पोलिसांना मिळूनही आरोपींना पकडण्यात आलेले अपयश, तसेच पोलिसांनी आरोपी म्हणून पकडलेल्या संशयितांची नार्कोटेस्ट करण्यापूर्वी सुरू केलेल्या तपासासाठी जाधव कुटुंबातील त्यांचे आई-वडील, आजी-आजोबा यांना रात्री अपरात्री बोलावून दमदाटी व दबावाखाली त्यांची चौकशी व जबानी घेण्याच्या प्रकारामुळे जाधव कुटुंबियात वाढते दहशतीचे व असुरक्षिततेचे वातावरण, आरोपी मोकाट असल्याने त्यांच्याकडून पुन्हा घात होईल या भितीने कुटुंबिय चिंताग्रस्त असणे, पोलिस याप्रकरणी दबावाखाली तपास करीत असल्याबाबत जनमानसात निर्माण झालेला संशय, तसेच यापूर्वी अहमदनगरच्या खर्डा गावातील नितीन आगे या दलित तरुणाचा, नानेगाव

..3..



VVK/ प्रथम श्री.राझेकर.. 17:10

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(ता.बदनापुर, जि.जालना) गावातील दलित मातंग समाजातील सरपंच मनोज कसाब, हवेली तालुक्यातील (पुणे) चिखली गावातील माणिक उदागे या बौध्द तरुणाचा तसेच गोंदिया जिल्ह्यातील कवलेवाडातील श्री.संजय खोब्रागडे या बौध्द समाजातील व्यक्तीची करण्यात आलेली हत्या, या सर्व प्रकरणातील आरोपींना आतापर्यंत पोलिसांना पकडण्यात आलेले अक्षम्य अपयश, त्यामुळे पोलिस तपास यंत्रणेवरील जनतेचा उडत चाललेला विश्वास, त्यामुळे यासर्व घटनांचा तपास पोलीस यंत्रणेऐवजी सी.बी.आय. अथवा ए.टी.एस. मार्फत करण्याचा व दलितांच्या हत्या रोखण्यासाठी अत्याचारपिडीत विभाग ॲट्रॉसिटी कायद्यानुसार अत्याचार प्रवण घोषित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना."

सभापती महोदय, हिवाळी अधिवेशन सुरु झाल्यापासून जवखेडा दलित हत्याकांडाच्या संदर्भात सभागृहात चर्चा व्हावी व सरकारने कठोर व गंभीर निर्णय घ्यावा यासाठी अधिवेशन सुरु झाल्यापासून माझी व इतर सन्माननीय सदस्यांची तळमळ व आग्रह होता. नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित करण्यास मला परवागनी दिली त्याबाबत मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, अत्यंत गंभीर व माणुसकीला काळिमा फासणारे हे प्रकरण आहे. अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा गावातील एकाच दलित कुटुंबातील संजय जाधव, त्यांची पत्नी जयश्री जाधव व त्यांचा एकुलता एक तरूण 20 वर्षाचा मुलगा सुनील जाधव या तिघांची 20 ऑक्टोबर, 2014 रोजी निर्घृण हत्या करण्यात आली आहे. गृह राज्य मंत्री महोदय, दलितांची हत्या झालेली असताना सभागृह गंभीर नाही ही मोठी चिंतेची बाब आहे. या तिघांची निघृण हत्या झाल्यावर या प्रकरणातील आरोपींची नावे सुरूवातीला पोलिसांना मिळाली होती. तरी देखील पोलिसांना त्या आरोपींना अटक करण्यामध्ये अपयश आले होते. पोलिसांनी आरोपी म्हणून पकडलेल्या संशयितांची नार्कोटेस्ट करण्यापूर्वी व सुरु असलेल्या तपासात जाधव कुटुंबातीलच त्यांचे नातेवाईक आई-वडील, आजी-आजोबा यांना रात्री बेरात्री पोलीस स्टेशनमध्ये बोलावून दमदाटी करून दबावाखाली त्यांची चौकशी व जबाब घेण्याच्या प्रकारामुळे जाधव कुटुंबामध्ये दहशतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. आरोपी मोकाट असल्यामुळे त्यांचा घात केव्हा होईल या भितीने जाधव कुटुंब चिंताग्रस्त झाले होते.

..4..

सभापती महोदय, यापूर्वी देखील अहमदनगर जिल्ह्यात नेवासा तालुक्यातील सोनई गावामध्ये आमच्या वाल्मिकी समाजाच्या  तीन तरुणांचे अशाच पध्दतीने तुकडे तुकडे करुन हत्या करण्यात आली होती. नगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील खर्डा गावी नितीन आगे या 16 वर्षाच्या दलित तरुणांचे हाल हाल करुन त्याला ठार करण्यात आले. त्याच जामखेड तालुक्यात बबन मिसाळ या आमच्या मातंग समाजाच्या कर्तबगार तरुणाची भर दिवसा हत्या करण्यात आली होती. जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील नानेगांव नावाचे गाव आहे, या गावातील मनोज कसाब हा मातंग समाजाच्या सरपंचाची देखील अशाच पध्दतीने निर्घृन हत्या करण्यात आली होती. पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील चिखली गावातील माणिक उदागे या दलित बौध्द तरुणाची अशाच पध्दतीने हत्या करण्यात आली. गोंदिया जिल्ह्यात गारेगांव नावाचा तालुका आहे. प्रफुलभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली या जिल्ह्याचे कामकाज चालत आहे. या तालुक्यात कवलेवाडी नावाचे गाव आहे, एका छोट्या बुध्दविहारसाठी संजय खोब्रागडे यांनी जागा मागितली होती. त्यावरुन भांडण झाले उन्हाळ्याच्या दिवसात तो घराच्या बाहेरील पडवीत  झोपला असताना त्याच्या अंगावर रॉकेल टाकून त्याला जिवंत जाळण्यात आले. नागपूर येथील शासकीय मेडिकल महाविद्यालयात त्याला ॲडमिट करण्यात आले होते, आठ दिवस तो तरुण मृत्युशी झुंज देत होता. तहसीलदार, मॅजिस्टेट  व पोलिसांपुढे त्याने आरोपींची नावे सांगितली होती की, या व्यक्तीने रॉकेल टाकले यांनी आगकाडी लावली अशी नावे सांगितली होती. तरी देखील संबंधितांवर कोणत्याही प्रकारची कारवाई झाली नाही. जालना जिल्ह्यातील जाफ्राबाद तालुक्यातील वरुड बु. गांव आहे, 25 ते 30 वर्षापासून ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेवर बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र तेथील बौध्द लोकांनी उभारले होते. त्यानंतर बहुजन समाजाच्या बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांचे तैल चित्र उभे केले होते. धनगर समाजाच्या बांधवानी त्या ठिकाणी अहिल्याबाई होळकर यांचे तैलचित्र उभारले होते. त्या गावातील संरपचाने तक्रार केली 20 वर्षापूर्वी त्यांना ही जागा दिसली नाही. आता बुलडोझ र लावून तेथील तैलचित्र काढून टाकण्यात आली आहेत. शासन, प्रशासन, पोलीस व जालना जिल्ह्याचा जिल्हाधिकारी असे शासकीय अधिकारी जेव्हा जातीयवादी असतात व जातीय मानसिकतेने पिसाळलेले असतात तेव्हा ते आतंकवादापेक्षा जास्त खतरनाक असतात हे मला

..5..



प्रा.जोगेंद्र कवाडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्या माध्यमातून सरकारला सांगावयाचे आहे. त्यानंतर जवखेडा येथील प्रकरण घडले आहे. हे प्रकरण 20 तारखेला घडले होते 25 तारखेला मी जवखेडा गावात गेलो होतो. हे प्रकरण 22 तारखेला जगाच्या समोर आले होते. संपूर्ण राज्यात व देशात खळबळ माजली होती. त्यानंतर राज्यात आंदोलन व उद्रेक सुरु झाला. मी 25 तारखेला जवखेडा गावी भेट दिली व 27 तारखेला मुंबईला येऊन माननीय राज्यपाल महोदयांची मी भेट घेतली. जवखेडा खालसा गावातील जाधव परिवराचे तुकडे तुकडे करण्यात आले होते, हात वेगळे, पाय वेगळे बापाला मधून कापून टाकले होते. धड वेगळे व अर्धा भाग वेगळा केला होत. जयश्री जाधव यांचा मेंदू बाहेर काढून टाकण्यात आला होता. सुनील जाधव या 20 वर्षाच्या एकुलत्या एक मुलाचे गुप्तांग कापण्यात आले होत. त्याचे डोके बोअरवेलमध्ये जात नव्हते म्हणून त्यांच्या डोक्याचे दोन तुकडे करुन ते बोअरवेलमध्ये टाकण्यात आले. हे सर्व चित्र मी माझ्या मोबाईलवरील व्हॉटसअॅपच्या माध्यमातून मला प्राप्त झालेली क्लिप मी माननीय राज्यपाल महोदयांना राजभवनात दाखविली होती.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

त्यावेळी माननीय राज्यपाल महोदय थरारुन गेले. त्यांनी विचारले क्या हो रहा है हमारे महाराष्ट्र राज्य मे. फुले, शाहु, डॉ. आंबेडकरांचा हा पुरोगामी महाराष्ट्र आहे. माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदय, आपण माणुसकीचे शिक्षण देणारे विद्यापीठ सुरु करा. समतेचे शिक्षण देणारे, अन्याय अत्याचाराशी कसे लढावे हे शिकविणारे विद्यापीठ सुरु करा. या गोष्टी अनेक वर्षापासून आपल्या महाराष्ट्रामध्ये होत आहेत. खैरलांजीचे प्रकरण आपल्याला ठावूक आहे. भंडारा जिल्हयातील खैरलांजीमध्ये भय्यालाल भोतमांगेची पत्नी सुरेखाबाई त्यांची कॉलेजमध्ये शिकणारी एकुलती एक मुलगी प्रियंका तसेच सुधीर आणि रोशन ही दोन मुले असा त्यांचा परिवार होता. त्यांचा काय गुन्हा होता ? त्यांचा गुन्हा काहीच नव्हता. ते सन्मानाने जगत होते हे बाकीच्या लोकांना आवडत नव्हते. कुणाच्या पुढे ते झुकत नव्हते, कुणाच्या पुढे ते वाकत नव्हते. आंबेडकरी बाण्याने ते लढत होते हे लोकांना आवडत नव्हते. डावा साधला आणि संपूर्ण गावाने भय्यालाल भोतमांगेच्या घरावर हल्ला केला. भय्यालाल भोतमांगेची 16 वर्षाची मुलगी प्रियकां हिला लग्न करुन तिची गावातून धिंड काढण्यात आली. तिच्या दोन्ही भावांना दगडाने ठेचून ठार करण्यात आले. मायलेकींची लग्न धिंड काढण्यात आली. गावाच्या भर चौकात आईवर बलात्कार करुन तिला मारुन टाकले. मुलीवर बलात्कार केला. 16 वर्षाच्या प्रियंकावर बलात्कार करुन तिच्या गुप्तांगामध्ये काठी खुपसून, हाल हाल करुन तिला ठार करुन टाकले. काय चालले आहे आमच्या या महाराष्ट्रामध्ये ? पोलीस साथ देत नाहीत. ॲट्रासिटीचा कायदा आहे. दात आणि नखे नसलेला हा कायदा आहे. पोलीस आणि शासन अत्याचाराची दखल घेत नाही. जाधव परिवारातील लोकांवर खोटे आरोप लावले गेले. खरे आरोपी सापडत नाहीत म्हणून, काही लोकांना वाचविण्यासाठी, धनदांडग्या लोकांना वाचविण्यासाठी, पोलिसांनी हे षडयंत्र रचले. दोन महिने झाले तरी आरोपी सापडले नाहीत. मग त्यांना एकाऐकी जादुची कांडी सापडावी तसे जाधव कुटुंबातील अशोक आणि प्रशांत हे सापडले. पोलिसांनी त्यांची नार्को टेस्टची मागणी केली. पॉलिग्राफ टेस्टेची मागणी केली, एसडीची मागणी केली, एलएव्ही टेसटची मागणी केली. ही मागणी अहमदनगरमध्ये करण्यात आली. मोदी साहेबांच्या अहमदाबादमध्ये त्यांना नार्कोटेस्टसाठी नेण्यात आले. त्यांनी त्यास विरोधी केला. त्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

परिवाराने असे ॲफेडेव्हिट केले की, "आम्हाला पोलीस अधिकाऱ्यांनी बोलावले आणि सांगितले की, आम्हाला या हत्याकांडाचा पाठपुरावा करु द्या, तुम्ही गप्प बसा नाही तर तुम्हाला कुठे तरी अडकवू." त्यानंतर 6 डिसेंबरच्या आधी या तिहेरी हत्याकांडातील जाधव परिवाराच्या पुतण्याला अटक करण्यात आली. सर्वत्र हीच चर्चा आहे की, पोलीस खाते, शासन आणि प्रशासन आपल्या वरिष्ठ लोकांना वाचविण्यासाठी जाधव परिवाराच्या लोकांना बळीचा बकरा बनवून या प्रकरणावरील लक्ष दुसरीकडे वळविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत आहे. माझ्यासहीत सर्वांचा हा आरोप आहे. ही शासनाची भूमिका आहे. दीड महिन्यापर्यंत गुन्हेगाराचा शोध लागत नाही. कुत्र्याने विहिरीमध्ये पडलेले शरीराचे तुकडे शोधून काढले. आधी तुकडे सापडत नव्हते. रक्त हुंगत ते कुत्र विहिरीकडे गेल्यानंतर शरीराचे तुकडे सापडले. संजयच्या शरीराचे तुकडे करुन बोअरवेलमध्ये टाकण्यात आले होते, तेही कुत्र्याने शोधून काढले. त्याच वेळी प्रशांत आणि अशोक हे आरोपी असते तर त्यांच्या अंगावर कुत्रा गेला असता. पण त्या कुत्र्याने काही केले नाही. जेथे हा क्रूर, पाशवी, सैतानी प्रकार घडला त्या ठिकाणी आम्ही भेट दिली.बाजूला वाघ परिवार रहातो. जाधव परिवारातील दिलीप वाघ याने आम्हा शंभर दोनशे लोकांपुढे सांगितले की, वाघ परिवारातील कोणत्या तरी महिलेशी जयश्री जाधव यांच्या मुलाचे प्रेम संबंध होते. त्यांचा फोटोही सापडला. पोलिसांनी जाधव परिवातील लोकांची नार्को टेस्ट केली आणि ज्या बाईचे नाव जाधव परिवारातील लोकांनी सांगितले त्या बाईची नार्को टेस्ट पोलीस करत नाही. कारण ती बाई एका अत्यंत प्रतिष्ठित राजकीय घराण्याशी संबंधित आहे. याही पलीकडे जाऊन मी सांगतो की, केवळ ती प्रतिष्ठित राजकीय परिवाराशी संबंधित नाही तर सत्ताधारी पक्षातील लोकांच्या परिवाराशी संबंधित आहे त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला जातोय. तपास करा. दूध का दूध पानी का पानी होऊ द्या. जाधव परिवारातील लोक गुन्हेगार असतील तर त्यांना फासावर लटकवा. संपूर्ण देशामध्ये आंदोलने झाली. जवखेडे हत्याकांडाच्या निषेधार्थ अमेरिकेतील न्युयॉर्क शहरामध्ये, युनोच्या कार्यालयापुढे तेथील दलितांनी निदर्शने केली. जिनिव्हामध्ये जेथे कमिशनरेट आहे त्या ठिकाणी निदर्शने करण्यात आली. मानवी अधिकाराचे भारतात कसे उलंघन केले जाते त्याचा पाढा त्या ठिकाणी वाचण्यात आला. जवखेडा हत्याकांडामुळे, खैरलांजी हत्याकांडामुळे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

आमच्या देशाची मान शरमेने खाली घालायची वेळ आलेली आहे. आमच्या महाराष्ट्रामध्ये निवडणुकीच्या काळात सोनिया गांधी आल्या होत्या. ज्यावेळी खैरलांजी घडले त्यावेळी सोनियाजी म्हणाल्या होत्या की, दलितों की हत्याकांड से हमारी गर्दन शरम से झुक गयी है. ही मानसिकता काही बदलत नाही. म्हणजे मेण्टली सीक सोसायटी आहे. ही मानसिकता बदलण्याची जरुरी आहे ती केव्हा बदलणार ? माननीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले की, प्रत्येकाने एकेक शाळा दत्तक घ्यावी. त्यानी फार चांगली सूचना केली. दलितावरील अन्याय, अत्याचार थांबविण्यासाठी तुम्ही सर्वांनी एकेक गाव दत्तक घ्या. तंटामुक्ती योजना कशासाठी आहे ? तंटामुक्तीचा पुरस्कार ज्या जवखेडे गावाला मिळाला त्या गावामध्ये अशा प्रकारे दलितांच्या, बौद्धांच्या कत्तली केल्या जात आहेत. आज ही परिस्थिती आहे. आमची मागणी आहे की, पोलिसांनी केलेला तपास हा योग्य नाही. या प्रकरणाचा तपास नि:पक्षपातीपणे करावा, पोलिसांच्या तपासावर विश्वास नाही, कारण या राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या जिवावर जी वरिष्ठ मंडळी आहे त्यांच्या दबावाखाली या प्रकरणाला वळण देण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. जाधव परिवारातीलच लोकांना आरोपी बनविले तर आंदोलन होईल. इतक्या व्यथा आणि वेदना सहन करुन बाबासाहेब आंबेडकरांची दलित मागासवर्गीय जनता महाराष्ट्रामध्ये जगत आहे.बाबासाहेबांना धन्यवाद द्यायला पाहिजे की अन्याय अत्याचाराचा बदला घेण्यासाठी, प्रतिकार करण्यासाठी अजून लोकांनी हातामध्ये दगड उचलला नाही, अजून हातामध्ये बंदूक घेतली नाही, अजून हातामध्ये शस्त्र घेतले नाही. ज्यांनी आम्हाला लोकशाहीच्या पक्रियेमध्ये आणले आणि कायद्याचा सन्मान करायला शिकविले त्या बाबसाहेब आंबेडकरांच्या जनतेवर अशा प्रकारे अत्याचार केले जात आहेत. अहमदनगर जिल्ह्यामध्ये जवळ जवळ 300 अॅट्रॉसिटीचे गुन्हे घडले. महाराष्ट्रामध्ये मागील 5 ते 10 वर्षामध्ये दलित अत्याचाराचे 10 हजार गुन्हे घडले आहेत. आमच्या राज्यातील दलितावरील अत्याचाराच्या गुन्हयांचा लवकरात लवकर तपास लागावा, आरोपींना कठोर शिक्षा व्हावी म्हणून फास्ट ट्रॅक कोर्टाची मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत. परंतु एकही फास्ट ट्रॅक कोर्ट करण्यात आले नाही. मागील सरकारमधील गृहमंत्र्यांनी 6 फास्ट ट्रक्ट करण्याची घोषणा केली परंतु एकही फास्ट ट्रॅक कोर्ट केले नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सभापती महोदय, सामाजिक न्याय राज्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत, त्यांनी या संदर्भात निश्चितपणे विचार करावा, एखादी बैठक घ्यावी. राज्यातील दलितांवर होणारे अत्याचार कसे थांबतील, कोणती कडक कारवाई करता येईल या संदर्भात माझी मागणी आहे की, ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये दलितांवर अत्याचार होईल तेथील सिनियर इन्स्पेक्टरला आरोपी बनविले पाहिजे. ज्या जिल्हयामध्ये दलितांवर अत्याचार होईल तेथील पोलीस अधीक्षकाला आरोपी बनविले पाहिजे आणि त्या जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांना देखील आरोपी केले पाहिजे. हे होणार नसेल तर हे अत्याचाराचे प्रकार थांबणार नाहीत.

सभापती महोदय, जवखेडा येथील दलित हत्याकांडाची सीबीआय मार्फत चौकशी झाली पाहिजे. मी एटीएस मार्फत चौकशी करण्याची मागणी केली होती. विदेशी आंतकवादाचा मुकाबला करण्यासाठी एटीएसची स्थापना करण्यात आली आहे. तो जसा आतंकवाद आहे तसा हा जातीय आतंकवाद आहे. हा आतंकवाद संपुष्टात आणण्यासाठी शासन एटीएसची मदत का घेत नाही? कारण अत्याचार करणाऱ्या लोकांना सरकारमधील काही बेइमान लोकांचा पाठिंबा असतो. संजय, जयश्री आणि सुनील जाधव या तिघांची तुकडे करुन हत्या करण्यात आली. त्यांच्या परिवारातील सदस्यांना आज पोलीस त्रास देत आहेत. तुम्ही अत्याचाराचा पाठपुरावा करणे सोडून द्या. नाही तर तुम्हाला अटक करु असे सांगितले जाते.

सभापती महोदय, सुदैवाने माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह खात्याची जबाबदारी आहे. मी माननीय राज्यपालांना भेटल्यानंतर नागपूर मुक्कामी माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यावेळी माननीय समाजिक न्यायमंत्री श्री.राजकुमार बडोले तेथे उपस्थित होते. मी त्यांना विनंती केली की, माननीय मंत्री श्रीमती पंकजा मुंडे व श्री.दिलीप कांबळे यांना जाधव परिवाराची भेट घेण्यासाठी पाठविले हे चांगले काम केले. परंतु आपण स्वत: सांत्वन करण्यास जाणे आवश्यक होते. त्यामुळे एक मेसेज गेला असता. खैरलांजी घटना घडल्यानंतर मुख्यमंत्री तेथे गेले नाहीत. संपूर्ण जगामध्ये जवखेडा हत्याकांडाची प्रतिक्रिया उमटत आहे. महाराष्ट्र पेटलेला आहे. देशामध्ये असंतोष माजला आहे. अशा वेळी आपण त्या ठिकाणी भेट दिली तर तपास व्यवस्थित होईल. तपास यंत्रणा वेगाने कामाला लागेल. जातीयवादी शक्तींना धाक निर्माण होईल. दलितांवरील अत्याचार थांबले पाहिजेत या दृष्टीने मुख्यमंत्री लक्ष घालीत आहेत असा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

मेसेज जाईल. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, मी निश्चित भेट देतो. त्याप्रमाणे ते जाऊन आले. दु:ख एका गोष्टीचे वाटते, ते म्हणजे 8 डिसेंबरला त्यांनी भेट दिली. 6 डिसेंबर हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन असतो. देशातील लक्षावधी जनता चैत्यभूमीवर जमते. जवखेडा दलित हत्याकांडाबद्दल विद्रोह होऊ नये म्हणून जाणीवपूर्वक 6 डिसेंबरच्या 2 दिवस आधी जवखेडा परिवारातील दोन मुलांना अटक केल्याची बातमी वृत्तपत्रात छापून आली. हे जाणीवपूर्वक धडवून आणण्यात आले. हे अन्याय अत्याचार केव्हा थांबणार आहेत? पोलीस जर दलितांचे संरक्षण करीत नसतील, अत्याचार करणाऱ्या लोकांना साथ देत असतील, शासन आणि प्रशासन दलितांचे संरक्षण करीत नसतील तर दलितांनी कुत्र्याच्या मौतीने मरायचे काय? पोलीस, प्रशासन संरक्षण करणार नसेल तर शासनाने स्पष्टपणे सांगावे की, दलितांनी, पिडितांनी स्वत:चे संरक्षण प्राणपणाने स्वत:च करावे.

सभापती महोदय, आतंकवाद्यांचा मुकाबला करण्यासाठी काश्मीरमधील जनतेला बंदुका देण्यात आल्या. जातीयवादी हिंदुस्थानी तालिबानी आमच्या देशात निर्माण झाले आहेत. त्यांचा मुकाबला करण्यासाठी शासनाने दलितांना स्वसंरक्षणार्थ शस्त्रे का देऊ नये? तुम्ही संरक्षण करीत नाही, सरकार संरक्षण करीत नाही, पोलीस संरक्षण करीत नाही. अत्याचार सातत्याने सुरु आहेत. अशा वेळेला दलितांनी कुत्र्याच्या मौतीने मरण्यापेक्षा लढत लढत मरणे काय वाईट आहे?

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले होते, अन्याय अत्याचार कोणावर करु नका. गुन्हा नसताना अत्याचाराविरुध्द उठणारे हात तुम्ही तोडून टाकले पाहिजेत. हा संदेश अन्याय अत्याचाराविरुध्द लढण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दिला. आजच्या प्रसंगी अत्यंत दु:खी अंत:करणाने सांगावेसे वाटते की, खैरलांजी येथील घटनेबाबत सरकारने न्याय दिला नाही. सरकार देखील जातीयवादाच्या बाजूने वागले. म्हणून मी आमदारकीचा राजीनामा दिला होता. मला काल परवा आमच्या मित्रांनी विचारले, जवखेडा प्रकरणावरुन राजीनामा देणार का? आता सरकार कोणाला न्याय देणार नसेल, पोलीस न्याय देणार नसेल, प्रशासन न्याय देणार नसेल तर या सभागृहामध्ये बसून सरकारचा राजीनामा घेण्यासाठी आम्ही संघर्ष करु. दलितांच्या हक्कासाठी संघर्ष करु. या प्रकरणाचा जो तपास सुरु आहे तो अत्यंत

...3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

चुकीच्या पध्दतीने सुरु आहे. जाधव कुटुंबातील तीन माणसे मारली गेली, त्यांच्या देहाचे तुकडे करण्यात आले, त्याच परिवारातील लोकांना अटक केली जाते आणि खरे आरोपी मोकाट फिरत आहेत. त्यांचे लागेबांधे वरपर्यंत पोहोचले आहेत. त्यामुळे या प्रकरणाचा तपास सीबीआय मार्फत व्हावा अशी मी मागणी करतो.

सभापती महोदय, हे प्रकार थांबले पाहिजेत. जातीय मानसिकता थांबली पाहिजे. आम्हाला आमच्या देशाला जगातील महान शक्ती बनवायचे असेल तर आम्हीच आमच्या माणसांचे तुकडे करु लागलो तर आमचा देश कसा महान शक्ती बनणार आहे? देशातील दलित समाजाचे संरक्षण करणे हे शासनाचे आणि बहुसंख्याक समाजाचे कर्तव्य आहे याचे भान ठेवले पाहिजे. जवखेडा दलित हत्याकांडाची चौकशी माननीय मुख्यमंत्र्यांनी सीबीआय मार्फत केली जाईल असे म्हटले होते. आपल्या वतीने मी सरकारला विनंती करतो की, जवखेडा प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करावी. धन्यवाद.

------------

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी दलितांवर होणाऱ्या अत्याचाराच्या संदर्भात जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केली आणि त्या चर्चेला आपण मान्यता दिली त्याबद्दल मी आभार मानते.

सभापती महोदय, या चर्चेमध्ये त्यांनी 5-6 घटनांचा उल्लेख केला आहे. माझ्यासमोर 100 पेक्षा जास्त घटना येत आहेत. वेळेअभावी सर्व घटनांच्या तपशीलामध्ये मी जाऊ शकत नाही. आपण जवखेडा धटनेच्या मुळाशी गेलो तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते ती म्हणजे गाव पातळीवर अजूनही सरंजामी विचाराचा पगडा आहे. ज्या गावातील दलित समाज सुसंस्कृत होतो, स्वत: स्वत:चे म्हणणे मांडू लागतो हे बऱ्याच वेळेला गावकऱ्यांना मान्य होत नाही.

नंतर 2आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ........

आणि त्यावरुन त्या गावात मोठ्या प्रमाणात संघर्ष झालेले दिसून येतात. या विषयावर सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. खैरलांजी बद्दल सभागृहात चर्चा झाली त्यानंतर अशाच प्रकारे ज्या ज्या वेळेस दलितांवरील अत्याचाराच्या घटना घडल्या त्या त्या वेळेस चर्चा झाल्या. खर्डा येथील प्रकरणात देखील चर्चा झालेली आहे. खर्डा येथे मी स्वत: गेले होते. त्याचप्रमाणे माणिक उदागे नावाच्या तरुणाची चिखलीला हत्या झाली ती त्याच्या बरोबर असणारीच होती. हा उदागे नावाचा मुलगा अत्यंत हुशार आणि तडफदार होता. या घटनेनंतर माझ्या असे लक्षात आले की, अशा प्रकारे दलितांमध्ये जे जगत असतात, त्यांच्यावर अत्याचार होताना कोणाचाही पाठिंबा नसतो किंवा कोणीही त्यांना सहकार्य करीत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. त्याच्या कारणांमध्ये जात असताना असेही अनुभवायला मिळाले की, बऱ्याच वेळा आंतरजातीय स्वरुपाच्या प्रकरणांमधून असे उद्रेक झालेले दिसून येतात. आपण नैतिकतेच्या संदर्भात कोणीही तत्वतेत्ता अथवा बादशहा नाही म्हणून कोणलाही कायदा हातात घेऊन अशा प्रकारे तुकडे करण्याचा किंवा शिक्षा करण्याचा तसेच बहिष्कार टाकण्याचा अधिकार नाही तरी देखील हे सर्व आपण स्वीकारत असतो.

महोदय, गेल्या 15 वर्षात दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ज्या समित्या महसूल विभागाकडून प्रत्येक जिल्हानिहाय स्थापन व्हायला पाहिजे होत्या त्या का झाल्या नाहीत, असतील तर त्यांच्या बैठका किती झाल्या आणि त्यातून कोणते निष्कर्ष समोर आले हे सभागृहाला अवगत केले पाहिजे. तसेच अशा प्रकारचे दलित आणि दलितेतर यांच्यामधील तणाव काय आहेत, खैरलांजीच्या संदर्भात सांगितले पाहिजे की, महसूल विभागाच्या शांतता कमिटीची बैठक अनेक वर्षांपासून तेथे झालेली नव्हती. खर्डा या गावाला मी गेले असता तेथील सरपंचांना अशा बैठकीबाबत विचारले असता त्यांनी मला सांगितले होते की, 15 दिवसांपूर्वीच तंटा मुक्ती समितीची बैठक आमच्या गावात झाली असून आमच्या गावात कोणत्याही प्रकारचा तणाव नव्हता, असे उत्तर गावकऱ्यांनीही मला दिले होते. पण प्रत्यक्षात हा उद्रेक तेथे झाला हे आपण पाहिला. याचा अर्थच असा आहे की, समाज प्रबोधनाचे जे मार्ग आपण वापरतो त्यात आमुलाग्र बदल होण्याची गरज आहे. राजीनामा कोण कोणाचा मागणार हा प्रत्येकाचा अधिकार आहे पण जनतेने जो जनादेश आपल्याला दिलेला आहे त्यातून गेल्या 15 वर्षात ज्या घटना घडत असल्याचे आपण पाहतो त्या

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

अनुषंगाने मला सूचना करावयाची आहे की ज्या ज्या ठिकाणी अशा अत्याचाराच्या घटना झाल्या आणि जेवढी प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत त्या अनुषंगाने माझी गृह विभागाला विनंती राहील की, दलितांवरील अत्याचारांच्या ज्या ज्या प्रकरणांमध्ये चार्जशीट दाखल झालेले नसतील आणि कोर्टात फक्त प्रकरण पडून असेल अशा केसेसमधील इन्व्हेस्टीगेटिंग ऑफिसर आणि सरकारी वकील यांच्या माध्यमातून कोणत्या पध्दतीने केस लढली जाणार आहे यासंबंधीचा आढावा घेणे आवश्यक आहे.

महोदय, माणिक उदागे अथवा नितीन आगे असो, अशा प्रकरणांच्या माध्यमातून मी उदाहरण म्हणून सांगू इच्छिते की, त्यांचे कुटुंबीय त्या वेळेस सांगत होते की, "आम्हाला वाटते आमच्या मुलाने आत्महत्या केली नसून त्याला मारण्यात आले आहे, हा पोस्ट मार्टेम रिपोर्ट चुकीचा आहे". अशा प्रकरणांमध्ये जर व्हिडीओ फिल्म नसेल तर पुरावे कसे उभे करणार आणि सिध्द कसे करणार हा खरा प्रश्न आहे म्हणून अशा प्रकरणांच्या संदर्भात राज्य मानवी हक्क आयोगाने आढावा घेण्याची गरज आहे. याखेरीज मला मुद्दा सांगावेसे वाटते की, अशा प्रकरणांमध्ये गुन्हे शाबीत होण्याचे प्रमाण केवळ अडीच ते तीन टक्के इतकेच असते. आपण ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुल्यांच्या नावाने राज्य करतो तरी देखील गुन्हे सिध्द होण्याचे प्रमाण इतके नगण्य असावे यावरुन आपल्या कार्यपध्दतीमध्ये त्रुटी असल्याचे दिसून येते. अशा केसेसमध्ये एक तर साक्षीदार होस्टाईल होतात अथवा कुटुंबे तरी स्थलांतरित केले जातात, कारण त्यांना कोणतेही संरक्षण दिले जात नाही म्हणूनच गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण कमी असते.

महोदय, जालना जिल्ह्यातील या गावाला मी गेले असता स्वत: माहिती घेण्याचा प्रयत्न केला असता या प्रकरणातील दोन्ही बाजूचे लोक दलित समाजाचेच आहेत. यावरुन असे म्हणता येईल की काही वेळा गावात जातीय तणावाच्या माध्यमातून वेगवेगळ्या जातीचे लोक एकत्र येतात आणि आर्थिकदृष्ट्या मजबूत नाही अशा माणसाचा बळी गेल्याच्या घटना समोर येतात. खैरलांजी येथे घटना घडल्यानंतर प्रचंड आंदोलने झाली, जवखेडा येथील घटनेनंतर देखील ठिकठिकाणी आंदोलने होत आहेत, तसाच अनुभव काठेवाडीच्या घटनेच्या वेळेस आम्हाला आला होता. अशा वेळेस दोन तीन कार्यकर्त्यांनी एक-एक प्रकरणाचा पाठपुरावा करायला पाहिजे आणि तसा

.......3



PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 17:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .......

पाठपुरावा झाला नाही तरी अशा प्रकरणांमध्ये आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करण्याची सुध्दा शासनाची जबाबदारी आहे. गेल्या वर्षभरात अशा प्रकरणातील 10 घटनांमध्ये एफआयआर दाखल झालेले असतील, त्यामध्ये कायद्यानुसार जी कठोर शिक्षा अभिप्रेत असते ती आरोपींना झाली तरच अशा गोष्टींना आळा बसण्यास मदत होईल. तसेच अशा घटना भविष्यात घडू नयेत म्हणून महसूल विभागाच्या दक्षता समित्या कार्यरत करण्याच्या दृष्टीने शासनाने पावले उचलावीत याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. दलितांवर अत्याचार होतात पण दलित महिलांवर देखील वेगवेगळ्या प्रकारचे आणि जणू गावाच्या मालकीची असल्याप्रमाणे तिच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन असतो. नितीन आगे प्रकरणात ज्या मुलीबरोबर त्याची मैत्री होती तिलाही भेटण्याचा मी प्रयत्न केला पण मला पोलिसांनी तिला भेटण्यास मनाई केली होती. पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी भूमिका मांडली होती ती प्रामुख्याने ब्राम्हण्यांच्या विरोधातील होती पण ही मुलगी ब्राम्हण नव्हती तरी देखील दलितांवरील अत्याचाराच्या घटनांमुळे किती तरी लोकांचे जीव जात आहेत त्याची आज कोठेही नोंदणी केली जात नाही. शेवटी एका मानवी नरसंहाराची एक शोकांतिका म्हणून या प्रश्नाकडे बघून दलितांना न्याय देण्याच्या दृष्टीने आणि सामाजिक न्यायाची भूमिका शासनाने बजावली पाहिजे अशी खंत व्यक्त करुन माझे भाषण संपविते.

-------------

........4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषयावर सभागृहात चर्चा सुरु असून त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, खरे तर राज्यातील दलितांना शासन न्याय का देऊ शकत नाही हा विचार करण्याची वेळ आलेली आहे. मी प्रथमच या वरिष्ठ सभागृहात सदस्य म्हणून आल्यानंतर गावागावात जाऊन ज्या ज्या ठिकाणी अशा दलितांवरील अत्याचाराच्या घटना घडल्या पाहिल्या असता त्या भागातील प्रत्येकाची या सभागृहाकडे आशेने बघण्यासारखी परिस्थिती आहे. जवखेडा हत्याकांड झाल्यानंतर मी नगरला जाऊन आला असता अतिशय संवेदनशील असा हा जिल्हा असल्याचे मानण्यास हरकत नाही. या जिल्ह्यात घडलेल्या सर्व प्रकरणांची सांगड घातल्यानंतर खरोखरच या जिल्ह्याला दलित अत्याचारग्रस्त जिल्हा म्हणून शासनाने घोषित करावे अशी माझी विनंती आहे. जोपर्यंत अशा घटनांमधील आरोपींवर कारवाई होत नाही तोपर्यंत आरोपी मोकाटच राहतात आणि त्यांच्या मनातील भीती सुध्दा संपलेली असते. नंतर पुन्हा ते आरोपी अतिशय क्रूरतेने मर्डर करणे, किड्यामुंग्यांसारखे माणसांना मारत असतात, मानवतेची हत्या करीत असतात की परमेश्वराला सुध्दा न पटणारे कृत्य ते करीत असतात. अशा घटना केवळ एकाच तालुक्यात घडतात असे नाही तर अनेक गावांमधून अशा घटना घडत असतात. नितीन आगे, माणिक उदागे तसेच मनोज कसाबसारख्या हत्याकांडाच्या बाबतीत सांगावयाचे तर त्या गावाच्या आजू-बाजुच्या गावांमध्ये सुध्दा अशी असंख्य प्रकरणे घडत असतात. याचे कारण की अशा घटना घडल्यानंतर आरोपी मोकाटच असल्याने ते निर्दयपणे असे गुन्हे करीत असतात आणि त्यांना कायद्याचे कसलेही भय वाटत नसते. सभागृहात चर्चा झाल्यानंतर शासनाने काय उपाययोजना केल्या याबाबतचा संदेश या चर्चेच्या माध्यमातून राज्याला द्यावयाचा आहे. बरेच लोक धर्मांतराच्या नावावर कायदा करण्याचा विचार करतात पण त्यासाठी कायदा करण्याची गरज नाही.

यानंतर श्री. भारवि .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये...

भारतीय संविधान बलशाही आहे, ताकदवान आहे. ते ताकदवान नसते तर संजय दत्त आज कोठडीमध्ये नसता. ते ताकदवाद नसते तर अफझल कसाब हा नरकात नसता. भारतीय संविधान नसते तर आपणही त्या उच्च स्थानावर नसता आणि आम्ही येथे नसतो. आपल्याला न्याय देण्याचे काम करावयाचे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान दिले असून त्यानुसार काम केले पाहिजे. आपण तो जिल्हा अत्याचारग्रस्त म्हणून घोषित केला पाहिजे. एखाद्या गावामध्ये दंगल झाल्यानंतर मंत्री त्या पोलिसावर जबाबदारी सोपवितो. मग तेथे कर्फ्यु लावण्यात येतो. त्यावेळी घरातून कोणीही माणूस निघत नाही. त्याच्या मनात भीती असते की, आपण घरा बाहेर पडलो तर आपल्यावर गोळी झाडण्यात येईल, मारण्यात येईल. ती भीती प्रत्येक नागरिकांच्या मनात असते. त्यामुळे ते आंदोलन, दंगल दाबली जाते. तेथे काही दिवसांनी शांतता प्रस्थापित होते. पूर्वी आम्ही सरकारमध्ये होतो. आता आपण सरकारमध्ये आला आहात. तरी देखील न्याय मिळत नाही म्हणून या राज्यातील दलित अस्वस्थ झालेला आहे. तेथील घरदार विकून दुसऱ्या गावात चालला आहे, अशी परिस्थिती या महाराष्ट्रात येणे म्हणजे प्रत्येक नागरिक हा भीतीच्या वातावरणात जगत आहे असा त्याचा अर्थ होतो. ही शोकांतिका आहे. आता त्याच्या मनाला वाटत असेल की, मी आता असे साधे राहून चालणार नाही. मी बुद्धाच्या विचाराने चालणार नाही. मला माझ्या हातामध्ये बंदूक घ्यायला पाहिजे. मग माझ्या भावाला ज्या क्रूरतेने मारले तसे मी सुद्धा मारले पाहिजे असा विचार त्याच्या मनामध्ये येतो आणि मग तो म्हणतो

तुझ्या मनात आज दोस्ता माझ्या मनात आग रे
तुझ्या भावाला कापले जात आहे
बंदूक भरू लाग रे.

आज अशी अवस्था त्याच्यावर का येते ? आज नक्षलवाद का फोफावतो आहे, दहशतवादी का तयार होत आहेत, तेथे एकमेकांचे गळे का कापले जात आहेत, यासाठी आपणच जबाबदार आहोत. त्याला भारतीय संविधान जबाबदार नाही. माणूसच माणसाचा वैरी झालेला आहे. माणूसच माणसाचा शत्रू झाला आहे. त्यातूनच खैरलांजी प्रकरण घडले. त्यातूनच अनेक असे हत्याकांड घडतात. यात जो गुन्हेगार नसतो त्याला सुद्धा मारण्यात येते. ही घटना घडल्यानंतर राज्यामध्ये

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये...

उद्रेक झाला. प्रत्येक गावात आंदोलने झाली. लातूरमध्ये 250 ते 300 जणांवर गुन्हे दाखल झाले. या सर्वांकडून रुपये 35.00 लाख वसूल करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. प्रत्येकाच्या घरी जाऊन अटक करण्यात आली व 15 ते 20 दिवस जेलमध्ये ठेवण्यात आले. त्यांना बेल मिळू नये असे प्रयत्न देखील पोलिसांकडून झाले. नॉन बेलेबल ऑफेन्सेस त्यांच्यावर लावण्यात आले. हे सर्व राजकीय गुन्हे होते. आम्ही जेव्हा आंदोलने करतो तेव्हा आम्हाला सकाळी अटक केल्यानंतर संध्याकाळी सोडले जाते. त्यामुळे त्यांच्यावर जे गुन्हे लावण्यात आले आहेत ते मागे घेतले पाहिजे. शाळेत, कॉलेजमध्ये शिकणाऱ्या मुलांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. अशाने त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त होते. अशा जातीय हिंसाचारामध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांवर गुन्हे दाखल करण्यात आले असतील तर ते मागे घेण्यात यावेत अशी मी मंत्री महोदयांना विनंती करणार आहे.

जे फिर्यादी होते, तक्रारकर्ते होते त्यांनाच अटक करण्यात आली आहे. फिर्यादींनाच आरोपीच्या पिंजऱ्यामध्ये उभे केले जात असेल तर ते चुकीचे आहे. आपले कायदे हे जनतेच्या हिताचे आहेत. पण आज जनतेला नेस्तनाबूत करण्याचे कायदे तयार होत आहेत काय, असा प्रश्न देखील मी आपल्या माध्यमातून शासनाला विचारणार आहे. नुकतेच जाधव कुटुंब नागपूरला आले होते. नागपूरला मोर्चा काढण्यात आला होता. ज्या आईने मुलगा, सून, नातवंड गमावला ती या मोर्च्यामध्ये सामील झाली होती. ती म्हणत होती की, आपण मला न्याय द्यावा. तो जर दिला नाही तर माझी येथूनच अर्थी निघेल. न्याय मिळत नसेल म्हणून अशा प्रकारे माणसे रडत असतील तर ते चुकीचे आहे. अशा लोकांना आज न्याय देणे गरजेचे आहे. आज खऱ्या आरोपींचा शोध घेणे गरजेचे आहे. आम्ही खैरलांजीमध्ये आंदोलन केले होते. राज्य पोलिसांनी बरोबर कामगिरी केली नाही म्हणून आम्ही सीबीआय चौकशीची मागणी केली. त्यानुसार तो तपास सीबीआयकडे देण्यात आला. तसाच या प्रकरणाचा तपास देखील सीबीआयकडे द्यावा अशा प्रकारची मागणी मी या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश गजभिये....

निमित्ताने करतो. त्यातूनच खरे काय ते निष्पन्न होईल. तरच या राज्यातील दलित समाधानी होईल. तेव्हा हे प्रकरण सीबीआयकडे सोपवावे व खऱ्या आरोपीला अटक करून शिक्षा करावी आणि जाधव कुटुंबाला न्याय द्यावा. दलित, हिंदू, बौद्ध, जैन, मुस्लिम हा धर्म वेगळा असला तरी त्या माणसांचे रक्त एकच आहे. एखाद्या मुस्लिमाने दलिताला रक्त देणे ही मानवता आहे. अशा प्रकारचे काम आपण करावे.

सभापती महोदय, झगडे कुठे होतात ? एखाद्या मोकळ्या जागेत मंदिर बांधायला कोणी गेले तर त्याला विरोध होत नाही. पण तेथे कोणी पंचशीलचा झेंडा किंवा निळा झेंडा लावयला गेले की, त्याला विरोध होतो. विरोध झाल्यानंतर मग दंगल होते. मग तेथे 4 ते 6 महिने पोलीस राहतात. आज तर काही ठिकाणी पोलिसांनी वास्तूच तयार केली आहे. तेव्हा याकरिता काही तरी नियम करायला पाहिजेत. काल आपण एक विधेयक मंजूर केले. त्या डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये मंदिर, विहार, स्मशानालय, मशिदीकरिता जागा ठेवली पाहिजे. हे काम केले तर या राज्यातील दलित सुखी होईल. मुस्लिमांकरिता मशिदीसाठी जागा ठेवली पाहिजे. सर्वधर्मीयांकरिता न्याय दिला तर कुठलाही समाज नाराज होणार नाही. सर्वधर्मसमभाव ही भावना जागृत करण्याकरिता या सभागृहाच्या माध्यमातून मंत्री महोदयांनी धोरणात्मक निर्णय घ्यावा. तो धोरणात्मक निर्णय या राज्याला बाध्य राहील. या राज्यामध्ये कुठेही दंगल होणार नाही यासाठी प्रयत्न करावा. एवढे बोलून मी येथेच थांबतो.

.....

**सभापती** : सभागृहाची वेळ आजचे पूर्ण कामकाज होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांच्यासह सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरेंसह सर्वजण उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य उद्वेगाने बोलले की आमच्या हातामध्ये बंदुका द्याव्यात. हे खरे नाही. त्यांनी बुद्धाचा मार्ग स्वीकारला आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये देखील बोलले आहेत. या समाजावर अन्याय, अत्याचार होऊन सुद्धा कोणी अतिरेकी झाला नाही, विद्रोही झाला नाही याची आपण दखल घेतली पाहिजे. ज्यावेळी ही घटना घडली त्याच्या विरोधात सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी देखील निदर्शने केली. येथे जातीयवादी मुद्दा मांडण्यात आला आहे. आपल्या आणि आमच्या राज्यात दलितांवर किती अन्याय झालेत हा काही आजचा विषय नाही. बिहार पेक्षा महाराष्ट्राची अवस्था अतिशय वाईट आहे असे निरनिराळ्या संस्थांनी केलेल्या सर्व्हेमध्ये आढळून आलेले आहे. एक सर्व्हे झालेला आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, भारतामध्ये दर तासाला दोन दलितांवर अत्याचार केला जातो.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ......

दर दिवशी 3 दलित महिलांवर बलात्कार होतात, दर दिवशी 2 दलितांच्या हत्या होतात, 11 दलितांना मारहाण केली जाते, 2 दलितांची घरे जाळली जातात असे दर आठवडयाला 13 दलितांचे खून केले जातात, दर आठवडयाला 6 दलितांचे अपहरण केले जाते. या ठिकाणी मी राजकीय भाषण करणार नाही. दलितांवरील अन्यायाच्या संदर्भात अनेक घटना घडल्या असून त्यावेळेस कोणाचे सरकार होते, दलितांची हत्या करणारे कोणत्या पक्षाचे होते, हे मी येथे सांगणार नाही. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मानगाव तालुक्यात एका दलिताच्या ताब्यात एक गॅस एजन्सी होती, ती एजन्सी एका सवर्णाने घेतली. परंतु सुवर्णांनी वसंत कांबळे आणि अलका कांबळे यांना जंगलात नेऊन दोरीने बांधून त्यांना जिवंत जाळण्यात आले. अशा अनेक घटना महाराष्ट्रात घडलेल्या आहेत. सन 2002 ते एप्रिल, 2014 पर्यंत दलित अत्याचाराच्या एकंदर 18036 घटना घडलेल्या आहेत. या घटना दलित अत्याचाराच्या असतील, मारहाणीच्या असतील. या ज्या घटना घडल्या आहेत या घटना जर इतर समाजामध्ये घडल्या असत्या तर त्याचा बदला किंव प्रतिशोध कसा घेतला असता याची कल्पना सुध्दा आपण करु शकत नाही. दलितांना माननीय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुध्दाचा मार्ग दिल्यामुळे ते प्रतिशोध घेत नाहीत. केवळ अहमदनगर जिल्हयातच या घटना घडलेल्या आहेत असे नसून संपूर्ण महाराष्ट्रात दलितांवरील अत्याचाराच्या घटना घडलेल्या आहेत. जातीयवादी प्रवृत्तीचा, बुरसटलेल्या प्रवृत्तीचा आपण सर्वांनी निषेध केला पाहिजे. आपण सर्वानी समता मानणारे आणि विषमता मानणारे असे दोन गट तयार करण्याची आवश्यकता आहे. यामध्ये कोणता पक्ष, कोणती जात, कोणती जमात याचा संबंध न लावता अन्यायाला प्रतिकार करणाऱ्या अशा ज्या सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना आहेत त्यांनी एकत्र येऊन काम केले तरच आपण खऱ्या अर्थाने 21 व्या शतकात जाऊ शकू. महाराष्ट्रामध्ये बिहार, उत्तर प्रदेशापेक्षा जास्त अन्याय अत्याचार होत आहेत. दलित अत्याचाराच्या घटना घडल्यानंतर सजा होण्याचे प्रमाण केवळ 1 टक्का आहे. खैरलांजी किंवा नितीन आगेच्या केसमध्ये त्याच वेळी आरोपीला पकडून तत्काळ सजा झाली असती तर जवखेडाची घटना घडली नसती. खैरलांजीच्या संदर्भात दलित संघटनांनी तसेच सर्व पक्षाच्या तसेच सर्व समाजाच्या लोकांनी आगडोंब उभा केला होता. अनेकांनी मोर्चे काढले होते, महिला मंत्रालयात घुसल्या होत्या परंतु खैरलांजीच्या आरोपींना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ......

जी शिक्षा त्यावेळेस व्हावयास पाहिजे होती ती झाली नाही. त्यावेळी कोणाचे शासन होते, कोण गृहमंत्री होते याही पेक्षा त्याच वेळी आरोपींना सजा झाली असती तर दलितावर अन्याय,अत्याचार करणाऱ्यांना धाक राहिला असता. जवखेडा येथे जी घटना झाली त्यामध्ये कोण आरोपी होते याची माहिती माननीय गृहमंत्री येथे देतील. परंतु तालिबानी प्रवृत्तीलाही लाजवून खांडोळी करण्याची घटना या महाराष्ट्रात प्रथमच घडली आहे. एखादी घटना झाली की, आता व्हॉटस् ॲपवर निरनिराळे प्रकारचे मेसेज येत असतात, विघ्नसंतोषी लोक मेसेज पाठवित असतात. या सर्व घटनांमुळे दलितांचे मन दुःखी झालेले आहे. दलितांमध्ये प्रतिशोधाची भावना अजूनपर्यंत निर्माण झालेली नसल्यामुळे मी या समाजाला धन्यवाद देतो. प्रतिशोधाच्या भावनांचा उल्लेख या ठिकाणी सन्माननीय सदस्य सर्वश्री गजभिये आणि कवाडे साहेबांनी केला आहे. त्यांनी सांगितले आहे की, आमच्या हातामध्ये बंदुका द्या, आम्ही या प्रवृत्तींचा प्रतिशोध घेतो. सभापती महोदय, प्रतिशोधातून काहीही साध्य होत नाही उलट प्रतिशोधातून केवळ अराजकताच निर्माण होईल. आपण सर्वांनी मिळून दलितांच्या हत्येच्या विरोधात प्लॅटफॉर्म तयार केला नाही, शोध घेतला नाही तर तर या घटना थांबू शकणार नाहीत.

पुरोगामी महाराष्ट्रात अनेक संत, महंत होऊन गेले आहेत. शाहू,फुले, आंबेडकर या महाराष्ट्रात जन्माला आले आहेत. त्यांनी आपल्याला समतेचा आणि बंधुत्वाचे विचार दिलेले आहेत. परंतु या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे दुर्दैवी वातावरण निर्माण झालेले आहे. जेव्हा प्रतिशोधाचे वातावरण महाराष्ट्रात निर्माण होते तेव्हा ते वातावरण आपल्या महाराष्ट्राला कलंकित केल्या शिवाय राहणार नाही. अहमदनगर जिल्हा अत्याचार ग्रस्त करावा असे सर्वांना वाटू लागले आहे. परंतु ही जी प्रवृत्ती आहे त्या प्रवृत्तीचा समूळ नायनाट करण्याची आवश्यकता आहे. चांद्या पासून बांद्या पर्यंतची प्रवृत्ती संपवली पाहिजे. दलित अत्याचारपासून कोणतेही गाव, तालुका, किंवा जिल्हा सुटलेला नाही. कोकणामध्ये दलितांवरील अत्याचार कमी प्रमाणात झालेले आहेत. कोकणातील वसंत कांबळेची घटना सोडली तर त्यातल्या त्यात कोकणामध्ये दलित अत्याचाराच्या घटना कमी घडलेल्या आहेत. चांद्यापासून ते बांद्यापर्यंत दलित अत्याचाराच्या दुर्दैवी घटना घडत आहेत. दलित महिलांवर मोठया प्रमाणात अत्याचार होत आहेत. अत्याचारामध्ये पक्षीय कार्यकर्ते सुध्दा सामील आहेत. सर्व पक्षाच्या लोकांनी एकत्र येऊन दलित अत्याचारांवर कंट्रोल करण्याची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ......

आवश्यकता आहे. जे दुष्ट लोक आहेत मग ते कोणत्याही समाजाचे किंवा कोणत्याही पक्षाचे असोत त्यांना आपण संरक्षण देता कामा नये. जर आपण असे ठरवले तर या महाराष्ट्रात दलितांवर अन्याय, अत्याचार होणार नाहीत. महाराष्ट्राचा इतिहास आज आपल्याला कलंकित होतांना दिसतो आहे तो कलंकित इतिहास पुसून शाहू,फुले, आंबेडकर,छत्रपती शिवाजी महाराजांचा जो महाराष्ट्र आहे त्याचे नावलौकिक परत मिळवण्यासाठी तुम्हा-आम्हाला एकत्रित येऊन काम करावे लागणार आहे. आपल्याला विषमता बांधणारे आणि समता बांधणारे असे दोन गट करावे लागतील. हे गट कोणत्या जातीचे, पंथाचे आहे याकडे न पाहता अत्याचार करणारा हा अत्याचारीच आहे असू समजून त्यांना संरक्षण न देता अत्याचार करणाऱ्याला शासन व्हावे,शिक्षा व्हावी असे ठरवले तर या महाराष्ट्रामध्ये दुर्दैवी घटना घडणार नाहीत. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, महाराष्ट्रात अशा प्रकारच्या ज्या तालिबानी प्रवृत्तीच्या घटना घडलेल्या आहेत त्यासाठी कोण जबाबदार आहेत त्याचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. जवखेडा येथील घटनेत खांडोळी करुन मारण्याची जी दुर्दैवी घटना घडली आहे त्याचा शोध घेऊन आरोपींना जास्तीत जास्त कडक शासन झाले पाहिजे. मी दोन्ही गृह राज्य मंत्र्यांना कळकळीची विनंती करतो की, शिक्षा होण्याचा जो रेट आहे तो 90-95 टक्क्यापर्यंत गेला तर महाराष्ट्रात दलितांवर अत्याचार करणाऱ्यांची, दलित महिलांवर अत्याचार करण्याची, बलात्कार करणाऱ्याची, छोटया छोटया 4-5 वर्षाच्या मुलींवर बलात्कार करणाऱ्याची हिंमत होणार नाही. महाराष्ट्र विकृत झाला आहे की, काय, मनुष्यच बिघडला आहे की, काय असे वाटू लागले आहे. दलितांवरील अत्याचार करणाऱ्यांची वृत्ती ठेचून काढली पाहिजे व आरोपींना जास्तीत जास्त कडक शासन झाले पाहिजे, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री. अजित......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे (गृह राज्यमंत्री (ग्रामीण) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली. या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री~~:~~ प्रकाश गजभिये आणि भाई गिरकर यांनी देखील काही मुद्दे उपस्थित केले.

सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील जवखेडे खालसा येथे ही दुर्दैवी घटना घडली आणि दिनांक 21 ऑक्टोबर, 2014 रोजी गुन्ह्याची नोंद झाली. ~~फिर्यादी गुन्ह्याची नोंद~~ गु.र.क्र.316/214 भा.दं.स. कलम 302, 201 अन्वये या गुन्ह्याची नोंद करण्यात आली. तसेच अनुसूचित जाती जमाती प्रतिबंध कायदा या गुन्ह्याखाली देखील नोंद करण्यात आली. ~~घेऊन~~ आपण हे वाढीव कलमसुद्धा लावलेले आहे. या गुन्ह्याचा तपास करीत असताना पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. हे आव्हान पेलताना ~~वत असताना~~ पोलिसांनी एकूण 500 साक्षीदारांची विचारपूस आणि चौकशी केली. त्यामध्ये 140 साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. त्या चौकशीच्या अनुषंगाने मोबाईल कॉल्सचे डिटेल्स आणि डम डाटा रेकॉर्ड याचे विश्लेषण स्वतंत्र तपास यंत्रणेद्वारे करण्यात आले. सदर ~~गुन्ह्यातील साक्षीदार~~प्रकरणी ~~हे व्यक्त केलेल्या संशयांच्या अनुषंगाने~~ न्यायवैद्यक प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडून ~~एकूण~~ 13 संशयीतांची ~~साक्षीदार यांची~~ मानस शास्त्रीय चाचणीसुद्धा करण्यात आली. या गुन्ह्याच्या अनुषंगाने 6 ~~साक्षीदार~~ संशयीत~~–~~ आढळून आले. त्यांच्या पुढील चाचणीसाठी न्यायालयाकडून परवानगी घेऊन न्याय वैज्ञानिक संचालनालय, गुजरात यांचेकडून मानसशास्त्रीय तपासणी करण्यात आली. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये दिनांक 2.12.2014 रोजी राहत्या घराची झाडाझडती आणि गुन्ह्याच्या संबंधाने मुद्देमाल मिळून आला. मानस शास्त्रीय तपासणी अहवालाच्या निष्कर्षावरुन व तपासातील इतर बाबीवरुन व प्रकरणातील फिर्यादीवरुन गुन्ह्याच्या संदर्भातील सहभाग निश्चित पुरावा उपलब्ध झाल्याच्या कारणावरुन दिनांक 3.12.2014 रोजी श्री.प्रशांत जाधव याला अटक करण्यात आली. दुसरा आरोपी श्री.अशोक जाधव यास दिनांक 7.12.2014 रोजी अटक करण्यात आली.या दोन्ही आरोपींना मॅजेस्टीक कस्टडी देण्यात आली आहे. तिसरा आरोपी श्री.दिलीप जगन्नाथ जाधव यास दिनांक 18.12.2014 रोजी अटक करण्यात आली असून तो पोलीस कस्टडीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी तपासा संदर्भात काही मुद्दे उपस्थित केले. दिनांक 21.10.2014 रोजी पाथर्डी पोलीस स्टेशन अंतर्गत हा गुन्हा नोंदविण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे....

आला. पोलीस चौकशी संशयाच्या भोवऱ्यात राहू नये म्हणून नाशिक पोलीस क्षेत्राचे विशेष पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या परिक्षेत्रातील आठ अनुभवी पोलीस अधिकारी यांचा स्पेशल टास्क फोर्स नेमून विशेष पोलीस निरीक्षक यांना पुढील तपासाचे आदेश देण्यात आले.

सभापती महोदय, या प्रकरणामध्ये फॉरेन्सिक लॅबमध्ये ब्रेन मॅपिंग करण्यात आले. मानस शास्त्रीय न्यायवैद्यक तपासणी करण्यात आली. जे काही पुरावे आहेत ते सायन्फिटीकली एव्हीडन्स सादर करुन पुढी कार्यवाही करण्यात आली. या प्रकरणी जो फिर्यादी होता त्यास आरोपी म्हणून अटक करण्यात आली. त्यानंतर तीन आरोपींना अटक करण्यात आली. अतिशय क्रूरपणे हे हत्याकांड करण्यात आले होते. या प्रकरणी सरकार अतिशय संवेदनशील आहे. या तपासामध्ये आणखी काही गोष्टी आढळून येत आहेत काय याचा देखील तपास चालू आहे. या प्रकरणी अजून चार्जशीट दाखल करण्यात आलेली नाही. या प्रकरणाच्या अनुषंगाने नाशिकचे आय.जी.जास्तीचा तपास करीत आहेत.

सभापती महोदय, दिनांक 28 एप्रिल, 2014 रोजी खर्डा गावात श्री.नितीन आगे यांच्या संदर्भात घटना घडली. त्याचा गळा दाबून मृत्यू झाल्याचे पोस्टमार्टेममध्ये आढळून आले. या प्रकरणामध्ये 13 आरोपींना अटक करण्यात आली. त्यामध्ये तीन बालकांचा समावेश होता. या तीन बालकांना बालसुधार गृहात पाठविण्यात आले आहे. 10 आरोपी न्यायलयीन कोठडीत आहेत. सदर गुन्हयाची चार्जशीट दाखल करण्यात आली असून सदर गुन्हा आता न्यायप्रविष्ठ आहे.

सभापती महोदय,मौजे नानेगाव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना येथे सरपंचावर खुनी हल्ला झाला. जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अनुसूचित जाती जमाती प्रतिबंध कायद्यानुसार आणि भा.दं.सं.कलम लावून 11 आरोपींना अटक करण्यात आली आहे. दिनांक 30.5.2014 रोजी न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर बाब आता न्यायप्रविष्ठ आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे....

सभापती महोदय, चिखली, ता. हवेली, जिल्हा पुणे येथे एका दलित कार्यकर्त्यावर हल्ला झाला. त्या प्रकरणामध्ये दिनांक 3.5.2014 रोजी चार आरोपींना अटक करण्यात आली. दिनांक 28.7.2014 रोजी त्यांच्यावर दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून आता ते प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

सभापती महोदय, दिनांक 17.5.2014 रोजी जिल्हा गोंदिया, तालुका गोरेगाव मु.पो.कवलेवाडा येथे एका 50 वर्षीय बौद्ध समाजातील इसमावर पहाटे रॉकेल टाकून जाळण्याची दुर्दैवी घटना घडली. या प्रकरणी सुद्धा अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यामध्ये दोन ओरापी निष्पन्न झाले आहेत. दिनांक 16.8.2014 रोजी त्यांच्यावर दोषारोप पत्र दाखल करण्यात आले असून सदर प्रकरण आता न्याय प्रविष्ठ आहे.

सभापती महोदय, या चर्चेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी येथे जे प्रश्न उपस्थित केले त्याबाबत शासनाने केलेली कारवाई मी येथे सांगितली आहे. त्याच बरोबर येथे फास्ट ट्रॅक कोर्ट स्थापन करण्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याबाबत सांगू इच्छितो की, अनुसूचित जाती जमाती प्रतिबंधक कायद्यातील खटले चालण्यासाठी औरंगाबाद, नागपूर, ठाणे, नाशिक, पुणे आणि अमरावती अशी सहा विशेष न्यायालये मंजूर करण्यात आले असून त्यापैकी औरंगाबाद, नागपूर आणि ठाणे येथील न्यायालये सुरु झाली आहेत. उर्वरित न्यायालये देखील लवकर सुरु करण्याची कार्यवाही शासनामार्फत करण्यात येईल. हे शासन दलितांवरील अत्याचार रोखण्यासाठी संवेदनशील असून नागरी हक्क संरक्षण पथकाचे अधिकारी, अंमलदार, प्रत्यक्ष खटल्याच्या सुनावणीच्या वेळी हजर राहून तपास अधिकारी, फिर्यादी साक्षीदार न्यायालयात साक्षीच्या कामी हजर राहणे, फिर्यादीमध्ये नमूद केल्याप्रमाणे साक्ष देणे, सुनावणी दरम्यान योग्य मुद्दे सादर करणे इतर अनुषंगिक बाबीवर अत्यंत बारकाईने आणि अतिशय सूक्ष्मपणे लक्ष ठेवून आहे. त्याचप्रमाणे गुन्ह्याच्या प्रगतीबाबत आढावा घेऊन गुन्ह्याच्या तपासातील त्रुटी संदर्भात शासनामार्फत योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.राम शिंदे....

महोदय, या चार गुन्ह्यांपैकी तीन गुन्ह्यांमध्ये चार्जशीट दाखल केली आहे. जवखेडा खालसा, ता.पाथर्डी जि.अहमदनगर येथील प्रकरणी तपास काम सुरु आहे. या प्रकरणी तपास काम सुरु असल्यामुळे चार्जशीट दाखल करण्यात आली नाही. त्यामुळे या प्रकरणी अतिशय कसोशीने तपास करुन यामध्ये जास्त गुन्हेगार आढळून आले तर त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल, हे मी या निमित्ताने सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो.

महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी विभागीय बैठका होत नसल्याबाबतचा मुद्दा उपस्थित केला. मी त्यांना सांगतो की, विभागीय स्तरावर अशा प्रकारच्या समित्या गठीत केल्या आहेत. त्या समित्यांच्या बैठका होतात. परंतु या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले खरे समजून, या विषयी संबंधितांना स्मरणपत्रे पाठवून या बैठका वेळोवेळी घेण्यासाठी आणि अत्याचार रोखण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, एवढेच या निमित्ताने सांगतो व थांबतो.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, माननीय गृह राज्यमंत्र्यांनी जवखेडा येथील घटनेसंदर्भात तसेच इतरही बऱ्याच घटनांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली या बाबतची माहिती दिली. संजय जाधव, जयश्री जाधव व सुनील जाधव या तिहेरी हत्याकांड प्रकरणी प्रशांत, अशोक, दिलीप जगन्नाथ जाधव, शारदा दिलीप जाधव, रविंद्र जगन्नाथ जाधव, नाथा फकीरा आल्हाट यांना अटक करण्यात आल्याचे या ठिकाणी सांगण्यात आले. महोदय, अटक करण्यात आलेल्या व्यक्तींनी जे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे ते सभागृहाच्या पटलावर ठेवण्यासाठी मी परवानगी मागतो. त्यांचा छळ करुन कबुली जबाब देण्यासाठी त्यांना कसे भाग पाडले हे त्या प्रतिज्ञापत्रात नमूद केले आहे. महोदय, ही घटना घडल्यानंतर आरोपींचा शोध लागला नव्हता. त्यावेळी सरकारने ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला. वास्तविक पाहता आरोपींचा पत्ता नसताना ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला. याचा अर्थ असा होतो की, पोलिसांना पक्के माहीत होते की, हत्याकांड घडवून आणणारे दलित नाही तर दलितेतर आहेत, जातीयवादी आहेत. महोदय, राज्याचा ॲट्रॉसिटी ॲक्ट-1989 चा आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, पोलीस विभाग या कायद्याचा किती इमाने-इतबारे वापर करीत आहे याची माननीय राज्यमंत्र्यांना माहिती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे काय ? अत्याचार झाल्यानंतर गरीब, दलित, पीडित व्यक्ती तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनमध्ये गेल्यानंतर पोलीस त्यांची दखल घेत नाही. त्यांना तेथून हाकलून लावतात. परंतु अशा घटनांच्या बाबतीत जेव्हा कार्यकर्त्यांकडून दबाव येतो तेव्हा पोलिसांकडून ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला जातो. या निमित्ताने मी माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो की, एका बाजूला ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केल्यानंतर दुसऱ्या बाजूला पोलीस पीडित व्यक्तीवर, दलित व्यक्तीवर दरोड्याची क्रॉस केस दाखल करतात. या निमित्ताने मी माननीय गृह राज्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केल्यानंतर दलितांवर क्रॉस केस दाखल करावी, असे तंत्र गृह विभागाने स्वीकारले आहे काय ? महोदय, राज्यात जेवढ्या अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत त्यापैकी ॲट्रॉसिटीची केस दाखल करणाऱ्यांपैकी जवळजवळ 75 टक्के दलितांवर क्रॉस केस दाखल करुन त्यांना जेरबंद करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे....

**सभापती** : मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, अल्पकालीन चर्चेवर राईट ऑफ रिप्लायची कोणतीही तरतूद नाही. मला वाटते आपणास एखादी शंका असेल तर ती विचारावी.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अशा प्रकरणांसाठी फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण केले जात आहेत ही चांगली गोष्ट आहे. जवखेडा येथील घटनेचा उद्रेक संपूर्ण महाराष्ट्रात झाला आणि होत आहे. आंबेडकरी आणि दलित चळवळीच्या आंदोलनाला नक्षलवादी म्हणून त्यांना बॅन करण्याचा प्रयत्न करण्यात आला. जर आंबेडकरी चळवळीला नक्षलवादी म्हणून त्या चळवळीचा अपमान केला जात असेल तर ती बाब महाराष्ट्रातील जनता कधीही खपवून घेणार नाही. या निमित्ताने सांगतो की, दलित बांधवांना अन्याय, अत्याचाराचा प्रतिशोध घेण्यासाठी नक्षलवादी बनण्याची गरज नाही. कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अन्याय, अत्याचाराचा प्राणपणाने प्रतिकार करण्यास सांगितलेले आहे. त्यांनी अन्याय, अत्याचाराचा प्रतिशोध घेण्यास सांगितले नाही. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, दलितांना स्वसंरक्षणार्थ शस्त्रसज्ज करण्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे काय ? अत्याचार करणाऱ्यांच्या हाती शस्त्र होते, त्यांना तुम्ही थांबविले काय ? दलितांना स्वसंरक्षणार्थ शस्त्रसज्ज करण्यासाठी......

**सभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

**--------**



अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभागृहापुढील कामकाजाबाबत**

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, म.वि.प. नियम 259 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे व इतर सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर आता चर्चा सुरु होईल. या प्रस्तावावरील चर्चेला सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी सुरुवात करावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेला नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आज चर्चेला येणार आहे की नाही ?

**सभापती** : मी सांगू इच्छितो की, आज अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा नक्की पूर्ण होईल. या व्यतिरिक्त आजच्या कामकाजपत्रिकेवर दोन अल्पकालीन चर्चा दर्शविण्यात आलेल्या आहेत. त्यातील जात पडताळणी समित्यांबाबतची अल्पकालीन चर्चा उत्तरासह एका तासात संपविली पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांची कायदा व सुव्यवस्थेबाबतची अल्पकालीन चर्चा सुध्दा आहे. मला वाटते सुरुवातीला अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा सुरु करु या. ही चर्चा उत्तरात दोन तासात संपविली पाहिजे.

डॉ.दीपक सावंत : महोदय, आता सायंकाळचे 6 वाजून 27 मिनिटे झाली आहेत. आपण अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा दोन तासात संपविण्यास सांगितले आहे. त्यानंतर उर्वरित दोन अल्पकालीन चर्चा घेण्यात येणार असल्याचे आपण सांगितले आहे. कामकाजपत्रिकेवर अल्पकालीन चर्चेनंतर नियम 260 अन्वयेचे दोन प्रस्ताव दर्शविण्यात आलेले आहेत.

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, म.वि.प. नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दिलेल्या दोन्ही प्रस्तावांवर आज आणि उद्याही चर्चा होणार नाही. पण अर्धा-तास चर्चा होणार आहेत.

श्री.धनंजय मुंडे : महोदय, काही विधेयके टेबल झाली आहेत.

**सभापती** : आज विधेयके टेबल होणार नाहीत.

श्री.धनंजय मुंडे : ठीक आहे.

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सन्माननीय सदस्यांच्या प्रवासासाठी विशेष विमानाची व्यवस्था करण्याबाबत</u>**

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, मी या माध्यमातून सन्माननीय सदस्यांची महत्त्वाची अडचण आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. या संदर्भात सरकारने प्रयत्न केला तर सन्माननीय सदस्यांची अडचण सुटू शकेल. कारण अशा प्रकारचे प्रयत्न पूर्वी सुध्दा होत आलेले आहेत.

महोदय, उद्या अधिवेशन संपत असल्यामुळे उद्या नागपूरहून मुंबईला जाण्यासाठी विमाने उपलब्ध नाहीत. शिवाय विमान तिकिटाचे दर 26 ते 28 हजार रुपये झालेले आहेत. अशी परिस्थिती पूर्वी जेव्हा उद्भवत होती तेव्हा सभागृहाच्या माध्यमातून विनंती करीत होतो. त्यानंतर सरकारच्या माध्यमातून माननीय केंद्रीय हवाई वाहतूक मंत्र्यांना विनंती करुन सन्माननीय सदस्यांच्या सोयीसाठी नागपूर-मुंबई किंवा नागपूर-पुणे या दरम्यान विशेष विमान सोडण्यात येत होते. विमानाचे नियमित चार्जेस आम्ही देण्यास तयार आहोत. त्यामुळे माझी विनंती आहे की, अशा प्रकारची व्यवस्था झाली तर सन्माननीय सदस्यांची उद्या होणारी गैरसोय दूर होईल.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मला आपले पत्र मिळाले आहे. मी आसनावरुन उठलो की, त्या दृष्टीने काय प्रयत्न होतील, ते पाहतो. मला कल्पना आहे की, आपण औरंगाबाद विषयी देखील सांगितले आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मला एवढेच सांगायचे आहे की, आता सन्माननीय सदस्यांनी फ्लाईटस्बाबत सांगितले. मी सांगू इच्छितो की, त्यांना फ्लाईटस तरी आहेत. परंतु, मराठवाड्यातील सन्माननीय सदस्यांना फार गैरसोयीचे आहे. त्यामुळे एक फ्लाईट औरंगाबादसाठी असावी, ही विनंती.

**सभापती** : ठीक आहे. माझ्या लक्षात ही बाब आली आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझी नियम 97 अन्वयेची अल्पकालीन चर्चा आहे.

**सभापती** : मी आताच सांगितले आहे की, नियम 97 अन्वयेच्या दोनही चर्चा होणार आहेत. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दोन्ही चर्चा 90 मिनिटांमध्ये संपतील अशा पध्दतीने भाषणे करावीत. कारण माननीय मंत्री उत्तराला तयार राहतील आणि बाकी सन्मानीय सदस्य यदाकदाचित नसतील, असे होऊ नये.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आपण पक्षनिहाय वेळ दिला तर सोयीचे होईल. कारण नंतर भाषण करण्यास संधी मिळत नाही.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अलीकडच्या 3-4 वर्षांच्या काळात तुम्हाला किती वेळ दिला, हे आपण दोन्ही बाजूंच्या सन्माननीय सदस्यांच्या समवेत बसून पाहू या. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी भाषणास सुरुवात करावी.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांची डबघाईस आलेली आर्थिक स्थिती.

**मु.शी.**: राज्यातील महानगरपालिका, नगरपालिका यांची डबघाईस आलेली आर्थिक स्थिती या विषयावर सर्वश्री. सुनील तटकरे, जयवंतराव जाधव, राजेंद्र जैन, हेमंत टकले, संदिप बाजोरिया, अमरसिंह पंडित, धनंजय मुंडे, ख्वाजा बेग, दीपकराव साळुंखे, माणिकराव ठाकरे, राजेंद्र मुळक, सय्यद मुझफ्फर हुसेन, भाई जगताप, डॉ. सुधीर तांबे, सर्वश्री. हरिसिंग राठोड, रामहरी रुपनवर, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. शरद रणपिसे, श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 259 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"देशाची आर्थिक राजधानी असलेल्या व सर्वात जास्त उत्पन्न असणारी मुंबई महानगरपालिका तसेच झपाट्याने शहरीकरण होत असलेली ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकांची विविध समस्यांमुळे होत असलेली दुरावस्था, या ठिकाणी वाढत असलेल्या झोपडपट्ट्या व वाढत असलेली लोकसंख्या त्यामुळे तेथील नागरिकांना नागरी सुविधा न मिळणे, मुंबई महानगरपालिकेत रिक्त असलेले भूखंड विकासकांना देऊन त्या ठिकाणी टॉवर व मॉल उभे असणे, यात प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार होणे, झोपडपट्टी पुनर्विकास योजनेत पात्र झोपडपट्टीधारकांना डावलून बनावट सभासद नोंदणी करण्यात होत असलेला प्रचंड भ्रष्टाचार, नागरिकांना अत्यंत अपुरा पाणी पुरवठा होणे, यासाठी महिलांनी वेळोवेळी धरणे व आंदोलने करणे, मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईन्स अत्यंत जीर्ण झाल्या असून त्या बदलण्याची आवश्यकता, मुंबईत कोलमडून पडलेली वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस मालमोटारी व गाड्यांची वाढत असलेली संख्या त्यामुळे वाहतुकीची होत असलेली प्रचंड कोंडी, बऱ्याच ठिकाणी एमएमआरडीएची सुरु असलेली कामे संथगतीने सुरु असणे, दूषित पाण्यामुळे मुंबई शहरात डेंग्यू, मलेरिया रोगाची साथ मोठ्या प्रमाणात पसरणे, यात बऱ्याच लोकांचा झालेला मृत्यू, प्रत्येक वर्षी पावसाळ्यात ठिकठिकाणी

..3



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

पाणी तुंबून मुंबईतील जनजीवन ठप्प होणे, मुंबई, ठाणे व कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील बरीचशी नैसर्गिक तलाव व तळी बुजवून त्यावर अनधिकृत बांधकामे सुरु असणे, या महानगरपालिकांच्या रुग्णालयांची झालेली दुरावस्था, रुग्णांना औषधोपचार वेळीच न मिळणे, त्या ठिकाणी आवश्यक त्या मशिन्स नसणे, मुंबईतील फेरीवाल्यांवर कारवाई करण्यात महानगरपालिकेला आलेले अपयश, मुंबई महानगरपालिकेत ई-टेंडर मध्ये झालेला भ्रष्टाचार, माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई शहराच्या विकासासाठी माननीय पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्याचा घेतलेला निर्णय, या निर्णयामुळे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांवर व पर्यायाने राज्य शासनाच्या अधिकारांवर येत असलेले निर्बंध, राज्यातील महानगरपालिकांची तसेच नगर परिषदा, नगर पंचायती यांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे आणि वाढत्या नागरिकरणामुळे येथील नागरिकांना पुरविण्याच्या नागरी सुविधांमध्ये कमतरता जाणवत असणे, शहरी भागातील मूलभूत सुविधांच्या विकासासाठी निधीची मोठी अडचण महानगरपालिकांना जाणवत असणे, खासकरुन महानगरांमध्ये दळणवळण, वाहतूक, रस्त्यांवरील खड्डे, पाणीपुरवठा, पाणी निचरा, वाढता घनकचरा, ई-कचरा, वाढती झोपडपट्टी, आरक्षित जागेवर होणारे अतिक्रमण इत्यादी बाबींमुळे महानगरपालिका, नगरपरिषदा यांच्यावर ताण निर्माण झालेला असणे, त्यामुळे विकासात्मक कामे होत नसणे, शासकीय अनुदान स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त न झाल्याने अनेक प्रस्ताव रखडलेले असणे, नोकरभरती संदर्भात प्रस्ताव, हद्द वाढीचे प्रस्ताव, नगररचनेसंदर्भातील प्रस्ताव इत्यादी शासनाच्या लालफितीमध्ये अडकल्यामुळे विकासास येणारी बाधा, त्यातच शासनाने एलबीटी रद्द करण्याचे धोरण जाहीर केले असून एलबीटी रद्द झाल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांना उत्पन्नाचे स्त्रोत कोणत्या मार्गाने उपलब्ध होणार हे स्पष्ट होत नसणे याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील सर्व स्वराज्य संस्थेचे कर निश्चिती, शासकीय यंत्रणेकडून येणाऱ्या अडचणी तसेच एलबीटी व टोल बाबतचे धोरण निश्चित करुन स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकटी देण्यासाठी तसेच निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांची या शासनाकडून अंमलबजावणी व पूर्तता करण्यात न आल्याने उपरोक्त सर्व बाबींसंदर्भात राज्यातील जनतेमध्ये पसरलेली तीव्र नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

..4

श्री. धनंजय मुंडे ....

सभापती महोदय, मी आपल्या राज्याच्या राजधानीच्या आणि त्याला संलग्न असणाऱ्या महानगरपालिकांतील विविध समस्यांच्या संबंधी हा अंतिम आठवड्याचा प्रस्ताव सभागृहात मांडला आहे. राज्याच्या उप राजधानीमध्ये अधिवेशन होत आहे आणि अंतिम आठवड्याच्या प्रस्ताव हा राजधानीचा आहे. गेल्या 2 महिन्यांपूर्वी राज्यात सत्तांतर झाले आणि भाजप- शिवसेना यांचे सरकार राज्यात आले. भाजप व शिवेसना गेल्या 15 वर्षांनंतर सत्तेत आली. सत्तेत आल्यावर काय करावे आणि काय करू नये, अशी उत्सुकता सत्तेत आलेल्या माननीय मुख्यमंत्र्यांची, माननीय मंत्र्यांची होती आणि तशीच उत्सुकता हे सरकार काय करणार आहे याबाबत महाराष्ट्रातील जनतेमध्ये सुध्दा होती. सत्तेत आल्यानंतर पहिलेच अधिवेशन नागपूरला होत असल्यामुळे वेगळ्या विदर्भाच्या बाबतीतील सरकारची भूमिका स्पष्ट व्हायला हवी होती आणि तशीच भूमिका मुंबईच्या बाबतीत सुध्दा सरकारकडून स्पष्ट होणे अपेक्षित होते. मुंबई संयुक्त महाराष्ट्रात रहावी यासाठी 105 हुतात्म्यांनी बलिदान दिले आहे. मुंबई राज्याची राजधानी असली तरी ती या देशाची आर्थिक राजधानी आहे. 105 हुतात्यांनी बलिदान दिले, त्यावेळी ही मुंबई महाराष्ट्राची राजधानी म्हणून राहिली आहे. मला वाटते की, हा सर्व इतिहास महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला माहीत असतना तो माननीय मुख्यमंत्र्यांना माहीत असला पाहिजे होता.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते सभागृहात अंतिम आठवडा प्रस्तावावर भाषण करीत आहेत. आपली परंपरा राहिली आहे की, ज्यावेळी सन्माननीय विरोधी पक्षनेते अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असतात, त्यावेळी सभागृहाचे नेते सभागृहामध्ये उपस्थित राहिले पाहिजेत. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण सभागृह 5 मिनिटांसाठी स्थगित करावे.

**तालिका सभापती** : मी सांगू इच्छितो की, माननीय मंत्री नोंद करून घेत आहेत. सभागृहाचे नेते सभागृहात येत आहेत.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सभागृहाच्या नेत्यांनी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण सुरूअसताना सभागृहात उपस्थित राहिले पाहिजे, अशी माझी विनंती आहे. हा परंपरेचा प्रश्न आहे.

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : मी सांगू इच्छितो की, आपण सदनाच्या सन्माननीय नेत्यांना बोलावून घेत आहोत. माननीय मंत्री नोंद करून घेत आहेत. मी निरोप पाठवित आहे. आपण चर्चा सुरू राहू द्यावी. वेळ कमी आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. मी तुमच्या मताशी सहमत आहे. मी निरोप पाठवितो. आपण प्रस्तावावरील भाषण सुरू ठेवावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र मुळक साहेबांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे. सभागृह कायद्याने चालते, तसे प्रथा, परंपरेने सुध्दा चालते. आपण सभागृहाच्या प्रथा, परंपरा पाळल्या पाहिजेत. सभागृहाचा डेकोरम आहे. सभागृहाचे नेते चर्चेच्या वेळी उपस्थित असणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, 105 हुतात्म्यांचा इतिहास महाराष्ट्राला जसा माहीत आहे तसा राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांना सुध्दा माहीत असायला हवा होता. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी एक निर्णय घेऊन मुंबई शहराच्या विकासासाठी एक समिती गठीत केली आणि सुमोटो त्या समितीचे अध्यक्ष देशाच्या माननीय पंतप्रधानांना घोषित केले. समितीचे अध्यक्ष माननीय पंतप्रधानांना घोषित करीत असताना त्यांच्या कार्यालयासुध्दा हे माहीत नव्हते. मी वाचले की, माननीय पंतप्रधानांनी याबाबतची नाराजी एका वर्तमानपत्रामध्ये व्यक्त केली.

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

अशी काय गरज पडावी की, राज्याच्या मुख्यमंत्र्यांना मुंबई शहराच्या विकासासाठी समिती गठीत करावी लागली आणि त्याचे अध्यक्षपद देशाच्या माननीय पंतप्रधानांना द्यावे लागले ?

सभापती महोदय, सभागृहात माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत उपस्थित आहेत. त्यांनी देखील याचा खोलवर विचार करावा. आमच्यासाठी हा फार काळजीचा विषय नाही. पण ज्या महापालिकेमध्ये अनेक वर्षे आपण सत्तेमध्ये आहात, तुम्ही याचा विचार करणे गरजेचे आहे. यापूर्वी मुंबईचा विकास झाला नाही का ? पण आपल्याला तसे म्हणता येणार नाही. पण ज्या दुर्दशेतून आज मुंबई जात आहे, त्याचा विचार माननीय मुख्यमंत्र्यांनी करणे गरजेचे होते.

सभापती महोदय, निवडणुकीच्या काळात आम्ही अनेक घोषणा ऐकल्या. "केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र', अशा पध्दतीचीही एक घोषणा होती. मग आज राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी स्वत: मुंबई शहराच्या विकासाबाबत विचार करावयास हवा होता. समिती गठीत करुन देशाच्या माननीय पंतप्रधानांना समितीचे अध्यक्ष करण्याऐवजी त्यांनी स्वत: एखादे व्हिजन डॉक्युमेंट मुंबई शहराबाबत आमच्यासमोर ठेवावयास हवे होते. परंतु, तसे ते ठेवले गेले नाही. यामधूनच नेतृत्त्वाचा कस आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, कुठे तरी असे वाटते की, या राज्याच्या राजधानीचे, मुंबईचे महत्त्व येणाऱ्या काळात कमी व्हावे, असा प्रयत्न होत आहे आणि तसा तो वेळोवेळी झाला आहे. आज मुंबईपासून एकएक गोष्ट दूर होत चालली आहे. सन 1935 पासून मुंबईत असणारे रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय दिल्लीला हलविण्यात आले आहे. काय केले आपल्या राज्याने ? जे.एन.पी.टी.सारख्या बंदरातून आंतरराष्ट्रीय मालवाहतूक होते. ती मालवाहतूक गुजरातमध्ये हलविले गेले. काय केले आपल्या राज्याने आणि आपल्या नेतृत्त्वाने ? सागरी सुरक्षा प्रशिक्षण केंद्र, ज्यासाठी राज्य सरकारने जमीनही खरेदी केली होती, जे पालघरला होणार होते, तेही गुजरात राज्यात गेले. आज ती जमीन तशीच पडून आहे. आम्ही इतिहास वाचतो, त्यापासून प्रेरणा घेतो पण आज कुठे तरी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला असे वाटते आहे की,, गुजरातपासून

...2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे........

मुंबई संयुक्त महाराष्ट्रमध्ये आली याचा राग आजही कुठे तरी मनात आहे का ? त्यामुळेच या सर्व गोष्टी मुंबईतून गुजरातला चालल्या आहेत का ? सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट येथे उपस्थित आहेत. त्यांनी देखील या गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबईचा गोदी कामगार आणि गिरणी कामगार, ही मुंबईची ओळख आहे. आज त्यांची काय अवस्था आहे ? गोदी कामगार, गिरणी कामगार यांना आपण घरे देऊ शकत नाही म्हणून हा कामगार मुंबईतून हद्दपार होत चालला आहे. त्यांचे हक्क आपण हिरावून घेत आहोत. आज अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने हे सर्व विषय या सदनामध्ये चर्चिले जावेत, म्हणून हे सर्व विषय मी मांडत आहे.

सभापती महोदय, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे मुख्यालय मुंबईतून हलविण्याचा प्रयत्न यापूर्वीही झाला होता. त्यावेळी या देशाच्या पंतप्रधान सन्माननीय इंदिराजी गांधी होत्या. त्यांनी तो प्रयत्न केला होता. मात्र, त्यावेळी आदरणीय यशवंतरावजी चव्हाण यांनी हा विषय त्यांच्यासमोर ठेवला, त्यांना तो समजावून सांगितला आणि ते कार्यालय महाराष्ट्रातच राहिले, हा इतिहास आहे. आज राज्यात आणि देशात एकाच पक्षाचे सरकार आहे. असे असताना राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांनी हा विषय देशाच्या माननीय पंतप्रधानांसमोर ठेवलेला दिसत नाही. त्यांनी हे सर्व विषय त्यांच्यासमोर मांडले असते तर पालघरला असलेले सागरी सुरक्षा प्रशिक्षण केंद्र गुजरातला गेले नसते. या सर्व गोष्टींसाठी कुठे तरी आजचे राज्यकर्ते जबाबदार आहेत, असे मला स्पष्टपणे सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, मुंबईसाठी वेगळी समिती गठीत करणे, हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा, स्वाभिमानाचा आणि ऐक्याचा विषय आहे. तो आपण कसा मान्य केला, देवच जाणो. त्याबाबत आपण अवाक्षर देखील काढले नाही, उलट समर्थन केले, आनंदाची गोष्ट आहे. सत्तेत सामील झाल्यानंतर कसा बदल होतो, 105 हुतात्म्यांनी केलेल्या बलिदानाचा सुध्दा विसर पडतो. एक वेळ भारतीय जनता पक्षाला विसर पडला असेल तर ते मी समजू शकतो. पण शिवसेनेला पडला असेल तर ती विचार करण्यासारखी गोष्ट आहे.

..3.....

श्री.धनंजय मुंडे.........

सभापती महोदय, निवडणुकीपूर्वी आम्ही ऐकले आहे की, कोणत्या तरी खानाची फौज आली आहे. असा प्रचार त्यावेळी झाला होता. कोणत्या खानाची फौज.........

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे हे पहिलेच भाषण आहे. ते शांतपणे ऐकून घेणे आवश्यक आहे. परंतु, त्यांनी मुंबईच्या प्रश्नांविषयी बोलले तर आम्हाला जास्त आनंद वाटेल.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**तालिका सभापती** : आपण शांत व्हा. मी त्यांना बोलण्याची परवानगी दिली नव्हती. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझ्या भाषणातील काही मुद्दे सन्माननीय मंत्री डॉ.दीपक सावंत यांना कदाचित लागले असतील. त्यांना माझ्या भाषणामुळे कळ लागण्यापेक्षा ज्यावेळी या गोष्टी घडत होत्या, त्यावेळी ती लागली असती तर मला जास्त आनंद झाला असता. सभापती महोदय, आज राज्याच्या ऐक्याचा प्रश्न मुंबईच्या चौकाचौकामध्ये आणि राज्याच्या चौकाचौकामध्ये निर्माण होत आहे, चर्चिला जात आहे. या बाबत सर्वच राजकीय पक्ष आपली भूमिका येणाऱ्या काळात ठरवतील. मला एका गोष्टीचा आनंद आहे. समिती गठीत झाल्यानंतर आमच्या पक्षाचे नेते आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी माननीय पंतप्रधानांना एक पत्र पाठविले. त्यांनी सांगितले की, मुंबई महाराष्ट्रापासून तुम्हाला वेगळी करावयाची आहे म्हणूनच अशी समिती गठीत केली आहे. असा प्रयत्न कोणी करीत असेल तर हा प्रयत्न आम्ही खपवून घेणार नाही, हे देखील मी या सदनामध्ये या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, भारतीय संविधानानुसार आपण संघराज्याचा ढाचा स्विकारला आहे आणि ते आपल्या संविधानाचे मूलभूत अंग आहे. संघराज्य पध्दतीने द्विस्तरीय संस्था म्हणजेच केंद्र आणि राज्य शासनाचे अधिकार आणि जबाबदारी आपण स्पष्टपणे सुनिश्चित केली आहे. सत्ता विभाजनाचा सिध्दांत हे सुध्दा आपल्या संविधानाचे मूलभूत अंग आहे आणि त्यानुसार केंद्र आणि

...4....



श्री.धनंजय मुंडे.........

राज्य शासनाने एकमेकांच्या अधिकारावर अतिक्रमण करु नये, यावर भर दिलेला आहे. आज कुठे तरी ही समिती गठीत झाल्यानंतर स्वाभाविकपणे जी संस्था, मी तुमचे बोलतो आहे, जी संस्था मुंबईचा विकास करते, जी महानगरपालिका विकास करीत आहे, त्या मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारावर हा घाला आहे. स्वाभाविकपणे मुंबई महापालिकेच्या अधिकारावर घाला म्हणजे राज्य सरकारच्या अधिकारांवर घाला आहे. (अडथळा) एमएमआरडीएने काय विकास केला हे तुम्हाला आणि आम्हालाही माहीत आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.......

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे..

सभापती महोदय, मुंबई शहराचा कारभार मुंबई महानगरपालिकेतर्फे चालविला जातो. मुंबई महानगरपालिकेत शिवसेना पक्षाचे महापौर आहेत. त्याना ही बाब मान्य असेल तर आनंद आहे. मुंबई शहरात रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. त्यामुळे मुंबई शहराच्या लोकसंख्येत सतत वाढ होते. परप्रांतिय लोंढे मुंबई शहरात येतात, त्यामुळे हे शहर देखील गुदमरायला लागले अशी परिस्थिती आहे. परप्रांतिय लोंढ्यांवर अनेक वेळा राजकारण झाले आहे, यातून कधीही मार्ग निघाला नाही. या चर्चेच्या माध्यमातून मला सरकारकडून अशी अपेक्षा आहे की, परप्रांतियांचे लोंढे थांबवून मुंबईचा विकास व मुंबईच्या नागरिकांना सुख सोई देणार आहात काय ? यामध्ये कोणतेही राजकारण नको, मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीचे साधन असलेल्या रेल्वेच्या बाबतीत गंभीरपणे विचार केला जात नाही. सुदैवाने महाराष्ट्रीय माणसाकडे रेल्वे मंत्री पद मिळाले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. राज्य व केंद्रात एकाच पक्षाचे सरकार आहेत. त्यामुळे मुंबईतील रेल्वे वाहतुकीचे काही तरी प्रश्न निकाली निघतील.

सभापती महोदय, प्रत्येक संस्था एकमेकांवर जबाबदारी ढकलित असल्यामुळे मुंबई शहराची हेळसांड झाल्याचे आपण पाहत आहोत. या सर्वातून बाहेर पडायचे असेल तर मलिदा संस्कृतीमधून बाहेर पडणे आवश्यक आहे. मुंबईचा विकास करायचा असेल तर राज्याचे माननीय मुख्यमंत्री, मुंबई महानगरपालिका, एमएमआरडीए या सर्वांनी विकास करणे गरजेचे आहे. माननीय प्रधानमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील समिती नियुक्त करणे हा मुंबईच्या विकासासाठी पर्याय होऊ शकत नाही. हा निर्णय मुख्यमंत्री महोदयांनी घेतल्यानंतर महानगरपालिकेच्या अधिकारावर गदा येईल तेव्हा या निर्णयाला आव्हान करणारे अनेक लोक उभे राहतील व त्यासाठी महानगरपालिकेला सामोरे जावे लागेल. विकास करताना अडचणी आल्यावर त्याबाबतचा सामना महानगरपालिकेला करावा लागेल. याचा विचार करणे आवश्यक आहे. अशी समिती स्थापन झाली तर सेनेच्या अधिपत्याखाली असलेल्या महानगरपालिकेचा अप्रत्यक्षपणे ताबा केंद्राच्या पर्यायामुळे भारतीय जनता पक्षाच्या नियंत्रणाखाली जाईल. समिती स्थापन करण्यामागे काही उद्देश आहे काय ? हा प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो. मुंबई शहर, ठाणे, कल्याण-डोबिवली यासारखी महानगरपालिका संपूर्णपणे कंत्राटदारांच्या ताब्यात गेल्या आहेत. या शहरांचा विकास कसा करावा हे कंत्राटदार ठरवित आहेत. कोणतेही कामे मुदतीत न होता त्या कामास वाढीव मुदत पुन्हा पुन्हा दिली जात आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे..

असे अनेक उदाहरणे आपण मधल्या काळात वर्तमानपत्रात वाचली आहेत व टी.व्ही.वर देखील पाहिली आहेत. कोणत्याही प्रकल्पाच्या कंत्राटामध्ये कंत्राटदाराच्या हिताचा विचार केला जातो. आरोग्य विभागाच्या बाबतीत देखील हीच बाब पहावयास मिळते. डेंग्यू या रोगाने अनेक लोकांचे बळी जात असताना त्यावर नियंत्रण करण्यासाठी जो औषधोपचार केला जातो, त्यात देखील भ्रष्टाचार झाल्याची घटना महाराष्ट्र राज्याने पाहिली आहे. डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जी औषधे फवारणीसाठी मागविली होती. त्या औषधाच्या फवारणीमुळे 80 टक्के डास देखील मेले नाहीत. असे माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी विधानसभेत एका लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात सांगितले आहे, याचा अर्थ काय समजावा. फवारणीच्या औषधामुळे डास मेले नाही हे माननीय आरोग्य मंत्री महोदयांनी कबूल केले आहे. प्रत्यक्ष भ्रष्टाचार झाल्याचेच हे कबूल करण्यात आले आहे. हे खरे असतांना पुन्हा पुन्हा त्याच कंपनीला..

डॉ.दिपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, या प्रश्नांचे उत्तर या सभागृहात मीच दिले होते. मी असे सांगितले होते की, ज्यावेळी क्षेत्रिय चाचणी करण्यात आली त्यावेळी असे आढळून आले होते की, 80 टक्के डास मरत नाहीत. त्यावेळी हे औषध पुन्हा चाचणीसाठी पाठविले होते. तो औषधाचा साठा परत पाठविण्यात आला होता. त्या कंपनीला दंड आकारुन आणखी जास्त पेनॅल्टी लावण्यात आली होती. मुंबई महानगरपालिकेच्या ठरावाप्रमाणे एखादे औषध रिजेक्ट झाल्यास पुन्हा त्या कंपनीला ओषध सप्लाय करण्याची संधी देण्यात येते. औषधाचा सप्लाय पुन्हा आल्यावर तो परिणामकारक झाला होता.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात मंत्री महोदयांनी जे सांगितले होते तेच त्यांनी पुन्हा आता सांगितले आहे. या विषयाच्या बाबतीत नियम 260 चा प्रस्ताव दिलेला आहे. त्या चर्चेच्या निमित्ताने मला सविस्तर बोलता येईल. 80 टक्के डास मरत नाहीत हे आरोग्य मंत्री महोदयांनी सांगितल्यानंतर देखील त्याच कंत्राटदारांकडून ते औषध घेतले जाते. मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयात स्वच्छतेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. आरोग्य मंत्री महोदयांनी त्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. डॉक्टरांचा बळी डेंग्यूच्या आजाराने झाला आहे. दवाखान्यातील आरोग्य व्यवस्थेचे कंबरडे मोडले असेल तर सामान्य माणसांचे आरोग्य कसे सुरक्षित राहील असा मोठा प्रश्न मुंबईत निर्माण झाला आहे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे..

सभापती महोदय, महानगरपालिकेच्या शाळांच्या इमारती मोडकळीस आल्या आहेत. मुलांना कोणत्याही सुविधा उपलब्ध होत नाहीत. महानगरपालिकांच्या शाळांमधून गळती का सुरु आहे. याचा शोध घेतला जात नाही. अनधिकृत झोपड्या मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. पिण्याच्या पाण्याची चोरी होत आहे. दीड कोटी लोकसंख्या सांभाळणाऱ्या मुंबईचा श्वास गुदमरायला लागला आहे. यावर सारखे उपाय करण्यात येताात, 55 उड्डाणपूल बांधून देखील मुंबईच्या वाहतुकीची समस्या कायम आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी प्रत्येकाने अनुभवली आहे. मुंबईत पाच आरटीओ कार्यालये आहेत. रोज असंख्य वाहनांची नोंदणी होते. मुंबईत दोन गोष्टी नेहमी होतात. पावसाळ्यात गटारी तुंबून पाणी बाहेर येते. सायंकाळच्या वेळी रस्ते तुंबून वाहने रस्त्यांवर अडकतात. वाहतुकीच्या बाबतीत फार मोठ्या समस्या असल्यामुळे मुंबईच्या वाहतुकीबाबत सरकार काही धोरण आखणार आहे काय असा माझा प्रश्न आहे. उड्डाणपूल, स्कॉय वॉक, मोनोरेल, मेट्रो वनचा प्रारंभ झाला आहे. मुंबईच्या वाहतुकीविषयी संपूर्ण मुंबई, ठाणे, डोंबिवली या परिसरात फार प्रचंड नाराजी आहे.

या नंतर श्री.मा.शिगम..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे...

123 उपनगरीय स्थानकातून रोज 75 लाख प्रवासी प्रवास करतात. मुंबई शहरातील वाहतुकीचे प्रश्न जटील झालेले आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, 20 मिनिटापूर्वी आम्ही अशी मागणी केली होती की, या सभागृहामध्ये विरोधी पक्षनेते हे अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असताना माननीय मुख्यमंत्री किंवा सभागृहाच्या नेत्यांनी या ठिकाणी उपस्थित असणे आवश्यक आहे. आपण सांगितले की, सभागृहामध्ये उपस्थित राहाण्यासाठी त्यांना निरोप दिलेला आहे. परंतु ते जर येणारच नसतील तर आम्हाला देखील बोलताना आमच्या भाषणामध्ये तशी सुधारण करता येईल. आपली सूयना मान्य होत नसेल तर सभागृहाच्या कामकाजाचे काय करायचे ? आपण सांगितले की, सभागृहाचे कामकाज उरकायचे आहे. तसे करु नका.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या नेत्यांना निरोप दिलेला आहे. ते येत आहेत.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य आपापल्या जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. धनंजय मुंडे : सदनाच्या प्रथा आणि परंपरे प्रमाणे या ठिकाणी कामकाज होते. मी 20 मिनिटापासून महत्वाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलत असून अद्यापपर्यंत सभागृहाचे नेते सभागृहामध्ये हजर झाले नाहीत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपल्या जागेवर शांत बसावे. मी सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांना बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आपणाकडून आम्हाला संरक्षणाची अपेक्षा आहे. आपण सांगितले की, निरोप दिलेला आहे, ते येतील. आम्ही आपले ऐकले आणि कामकाज सुरु झाले. माननीय विरोधी पक्षनेत्याचे भाषण सुरु होण्यापूर्वी हा मुद्दा उपस्थित झालेला होता. सभागृहाच्या कामकाजामध्ये सभागृहाच्या नेत्यानंतर विरोधी पक्षनेत्याला महत्व आहे. विरोधी पक्षनेते हे 20 मिनिटापासून बोलत आहेत. सभागृहाच्या नेत्यांना निरोप दिला आहे, असे आपण सांगितल्या नंतर आम्ही खाली बसलो आणि चर्चा सुरु झाली. अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा सुरु झालेली

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

आहे. राज्याच्या एकूण परिस्थितीच्या संदर्भात आणि त्यानुषंगाने घ्यावयाच्या धोरणासंबंधातील ही चर्चा आहे. म्हणून या चर्चेच्या वेळी सभागृहाचे नेते किंवा माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये उपस्थित असणे महत्वाचे आहे. ते सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा सभागृहाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेते जेव्हा बोलण्यासाठी उभे रहातात त्यावेळी सभागृहाचे नेते सभागृहामध्ये येतात आणि त्यांचे भाषण ऐकतात.संसदीय लोकशाही प्रणालीची ही प्रथा-परंपरा आहे. अंतिम आठवडा प्रस्तावाच्या संदर्भात 3 वेळा निर्णय बदलण्यात आले. चर्चा क्लब करुन माननीय विरोधी पक्षनेत्यांना प्रस्ताव मांडण्याची संधी दिली. अशा वेळी सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहामध्ये येणे आवश्यक आहे. ते सभागृहामध्ये येईपर्यंत सभागृहाची बैठक 10 मिनिटे तहकूब करावी अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : विरोधी पक्षाचा अंतिम आठवडा प्रस्ताव हा महत्वाचा आहे यामध्ये कोणतीही शंका नाही. आपण ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावनांशी मी सहमत आहे. अंतिम आठवाडा प्रस्तावावरील चर्चा सुरु असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी किंवा सभागृहाच्या नेत्यांनी उपस्थित असले पाहिजे. मी देखील विरोधी पक्षनेता होतो.

**तालिका सभापती** : सभागृहाचे नेते सदनामध्ये आलेले आहेत. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी विरोधी पक्षनेता असताना 90 टक्के वेळा सभागृहामध्ये नेते उपस्थित रहात नव्हते हे मी पाहिलेले आहे. ऊसाच्या संदर्भात एफआरपी संबंधी बैठक सुरु आहे. त्यासंदर्भात तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे. त्या संदर्भातील निर्णय उद्या जाहीर करावयाचा आहे. सर्वपक्षीय नेत्यांची बैठक सुरु आहे. त्या बैठकीला सन्माननीय माजी उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार, तसेच विधानसभेतील विरोधी पक्षनेते श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे उपस्थित आहेत. त्या बैठकीला हजर रहावे लागल्यामुळे सभागृहामध्ये येण्यास मला थोडा विलंब झाला.

..3..



MSS/ पूर्वी श्री. व्ही. खर्चे 19:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे : राज्य सरकारला मुंबईच्या वाहतुकीचा गुंता सोडविणे आवश्यक आहे. ज्याला आपण शहराची जीवन वाहिनी म्हणतो अशा लोकलमधून 123 उपनगरीय स्थानकातून 75 लाख प्रवासी प्रवास करतात. वाहतुकीच्या संदर्भात केवळ प्रश्न निर्माण करुन चालणार नाही तर त्यावर काही मार्ग देखील सुचवावे लागणार आहेत याची जाणीव मी विरोधी पक्षाच्या बाकावर बसलो असलो तरी मला आहे.

...नंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...........

सभापती महोदय, मेट्रो रेल्वे टप्पा-1 या प्रकल्पाच्या 11 कि.मी.च्या कामाला 5 वर्षे लागली. मेट्रो रेल्वे टप्पा-2 आणि टप्पा-4 एकत्रितपणे राबविण्यात येणार असून दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द हा मार्ग भुयारी करण्याचे ठरले असून त्याचे काम केव्हा सुरु होणार याची स्पष्टता झालेली नाही. चेंबूर-वडाळा मोनो रेल्वे सुरु झाली असून वडाळा-जेकब सर्कल मार्गाचे काम सुरु आहे. हे काम केव्हा पूर्ण होणार याची माहिती नाही. मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या वेगवेगळ्या टप्प्याचे मार्ग निश्चित करताना नियोजन काय केले आहे याचा विचार सरकारला करावा लागणार आहे.

सभापती महोदय, मुंबईतील जल वाहतुकीच्या टेंडरला प्रतिसाद मिळाला नाही. विविध कारणांमुळे टेंडर रद्द झाले. नवीन सरकार या जल वाहतुकीसंबंधी काय करणार आहे हे सभागृहाला कळले पाहिजे. तेवढाच एक मार्ग आहे. जल वाहतुकीच्या बाबतीत या सरकारला धोरण आणावे लागेल. तरच मुंबईतील वाहतुकीची कोंडी दूर होऊ शकेल. पश्चिम किनारपट्टीवरील कोस्टल रोड किंवा सी लिंकचे घोडे कधी पुढे धावणार आहे हे देवच जाणो.

सभापती महोदय, कोळीवाड्यांसाठी सीआरझेड नियम शिथिल केले जाणार की नाही या बाबतची भूमिका स्पष्ट होण्याची आवश्यकता आहे. जून्या इमारतींच्या पुनर्विकासाची नियमावली मुंबई उपनगरासाठी केव्हा निश्चित करणार हे या प्रस्तावावरील चर्चेच्या उत्तरामध्ये सरकारकडून स्पष्ट होणे अपेक्षित आहे. शहरातील वाहनांची बेसुमार संख्या वाढत असून वाहतुकीची कोंडी निर्माण होऊन मुंबईकरांचे जीवन असह्य बनत चालले आहे. हा विषय सुटला तर मुंबईकरांची फार मोठया समस्येतून सुटका होणार आहे.

सभापती महोदय, राज्याच्या राजधानीच्या सुरक्षिततेचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. 26.11 ची फार भयानक घटना मुंबई शहराने सहन केली. या घटनेमध्ये राज्याच्या पोलीस दलातील कार्यक्षम अधिकाऱ्याना गमवावे लागले. असंख्य निष्पाप मुंबईकरांना आपले प्राण गमवावे लागले. त्या घटनेनंतर मुंबई शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सुरक्षा भक्कम करण्यासाठी जी काही उपाययोजना करावयाची आहे ती नवीन सरकारने अंमलात आणणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने मुंबई-अहमदाबाद मार्गावर बुलेट ट्रेन सुरु करण्याची घोषणा केली आहे. देशातील बुलेट ट्रेनचा हा पहिला महत्वाकांक्षी प्रकल्प ठरेल. आम्हाला अशी माहिती मिळाली आहे की, या प्रकल्पाच्या टर्मिनल उभारणीसाठी जागा देण्यास एमएमआरडीएने नकार दिल्यामुळे हा प्रकल्प राज्याबाहेर जातो की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे. माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे...........

मुख्यमंत्री हे एमएमआरडीए या प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. माननीय मुख्यमंत्री आणि माननीय पंतप्रधान हे दोघेही एकाच पक्षाचे नेते आहेत. अशा स्थितीत माननीय पंतप्रधानांनी घोषणा केलेल्या बुलेट ट्रेन प्रकल्पाला जागा देण्यास एमएमआरडीएने नकार दिल्यामुळे हा प्रकल्प संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. या चर्चेच्या निमित्ताने सरकारकडून खुलासा होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबईतील एक एक प्रकल्प शहराबाहेर जात आहेत. अशा परिस्थितीत नवीन प्रकल्प बाहेर गेला तर मुंबई शहराचे महत्व आम्हीच आमच्या हातून कमी करतो की काय अशी स्थिती निर्माण होईल. मुंबई शहरातील रेल्वेची समस्या गहन बनली आहे. राज्यातील रेल्वेच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याबाबत सातत्याने पाठपुरावा केला गेला. परंतु केंद्रीय रेल्वेमंत्र्यांना राज्याच्या रेल्वे प्रश्नाविषयी आस्था दिसून आली नाही. अनेकदा मागणी करुनही राज्यातील रेल्वेचे प्रश्न प्रलंबित राहिले. त्यामुळे केंद्र सरकारच्या पातळीवर प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी एक स्वतंत्र कक्ष मंत्रालयात स्थापन करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेतील ई-निविदेतील घोटाळा जवळपास 100 कोटी रुपयांचा आहे. आज मुंबई महापालिकेमध्ये शिवसेना-भारतीय जनता पक्षाची सत्ता आहे. महापालिकेतील विरोधी पक्षाच्या गटनेत्यांनी पोलिसांकडे या ई-निविदा घोटाळ्यासंबंधी तक्रार केली. परंतु भारतीय जनता पक्षाच्या सभागृहातील गटनेत्यांनी सुध्दा या घोटाळ्याबाबत पोलिसांकडे तक्रार केली. त्यात अधिकाऱ्यांची नावे सुध्दा अंतर्भूत आहेत. एकूण 14 जणांची नावे तक्रारीमध्ये नमूद केली आहेत. ज्यांनी भ्रष्टाचार केला त्या महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी हा घोटाळा दडपण्याचा प्रयत्न चालविला आहे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाकडे मुंबईकरांचे लक्ष लागले आहे. या घोटाळयाबाबत काय निर्णय घेणार आहेत हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे. आम्ही सत्ताधारी बाजूला असताना आमच्यावर अनेकदा आरोप करण्यात आले. आज सत्ताधारी पक्षाचीच मुंबई महापालिकेत सत्ता असताना तेथील घोटाळयाची सरकार चौकशी करणार काय याकडे महाराष्ट्राचे आणि मुंबईकरांचे लक्ष लागले आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यापूर्वी या सभागृहात विविध आयुधांच्या माध्यमातून मुंबई आणि मुंबई महानगराच्या समस्या मांडल्या गेल्या आहेत.  मी पुन्हा एकदा राज्याच्या उप राजधानीमध्ये हिवाळी अधिवेशन सुरु असताना राज्याच्या राजधानीच्या समस्या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या निमित्ताने

...3...



श्री.धनंजय मुंडे...........

मांडल्या आहेत.  आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

---------

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी म.वि.प.नियम 259 अन्वये मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावाला समर्थन देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या विषयाची व्याप्ती संपूर्ण राज्यभर आहे. राज्यात 26 महानगरपालिका असून मुंबईसारख्या अ वर्ग महापालिकेतील आजची स्थिती, दररोज वाढणारे स्वरूप आपण पाहतो. या संदर्भात कोणत्याही उपाययोजना न होणे, त्यामुळे तेथील नागरिकांच्या स्वास्थ्यापासून त्यांच्या नागरी सुविधांपर्यंत होणाऱ्या अन्यायाबाबतचे मुद्दे मला आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहेत.

नंतर 3बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी अतिशय महत्वाचे मुद्दे उपस्थित केले असून त्यांचे केवळ संदर्भ सोडला तर मी रिपीटेशन होणार नाही याची काळजी घेणार आहे. मुंबई शहरच नव्हे तर लगतची मोठी शहरे त्यात ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर अशा मोठ्या महानगर पालिकांमध्ये माझे कामगार संगठन आहे. या संस्थांमध्ये नक्की काय घडत आहे यासंबंधीचा माझा अभ्यास आहे त्या अनुषंगाने मी उल्लेख करणार आहे. त्या समस्यांच्या बाबतीत केवळ येथे बसून तावातावाने बोललो तर त्याचा फायदा होईल असे कधी घडत नाही. पण काही गोष्टी मात्र अशा आहेत की, त्यासाठी काही काळ लागण्याची आवश्यकता नक्कीच नाही. म्हणून राज्यातील मुंबईसह ठाणे, नवी मुंबई, नागपूर, औरंगाबाद, जळगांव सारख्या महापालिकांचा विचार केला तरी झपाट्याने शहरीकरण होत आहे आणि आपण जरी म्हणत असलो की 40 टक्के लोकसंख्या शहरी भागात राहते ते प्रमाण आता 50 टक्क्याच्या वर पोहचले आहे. या शहरांमधून झोपडपट्टयांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असून त्यांच्या बाबतीत कोणत्या उपाययोजना करावयाच्या हा देखील भीषण प्रश्न आहे. त्यासाठी शासनाने सुरुवातीला एसआरडी सारखी योजना आणली पण त्याने साध्य झाले नाही म्हणून पुन्हा एसआरए सारख्या योजना आणल्या त्यावेळी वाटले होते की, सर्वसामान्यांना नक्कीच यामुळे दिलासा मिळेल पण तसे दिसत नाही म्हणून मी मुद्दाम सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. या शहरांमध्ये विकास करणाऱ्या यंत्रणा असतील त्यात म्हाडासारख्या शासनाच्या संस्था, सिडको, बीएमसी, एमएसआरडीसी किंवा एमएमआरडीए सारख्या यंत्रणा पाहिल्या तर त्यांची निर्मितीच शहराचा कोंडलेला श्वास मोकळा करण्यासाठी करण्यात आली होती. एसआरए सारख्या योजनेच्या माध्यमातून तर मोफत जमीन देऊन त्यावर गरिबांसाठी परवडणारी घरे बांधावयाची होती. सुरुवातीला या योजनेच्या माध्यमातून सन 1995 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्याचा निर्णय घेतला आणि आता उदार हेतूने शासनाकडून सन 2000 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्यात आल्या, त्याचे मुख्य कारण म्हणजे गरिबांना घरे मिळाली पाहिजेत, पण त्यात काही तरी तांत्रिक अडचणी निघतात आणि त्याचा परिणाम म्हणून ही घरे मिळत नाहीत.

महोदय, राज्यातील बहुतांशी महानगरपालिकांना आज झोपडपट्टयांचा विळखा पडलेला आहे आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी केवळ 15 दिवस अधिवेशन घेतले आणि निघून गेले तर

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

त्यातून मार्ग निघू शकणार नाही. खरे तर आपण येथून गेल्यानंतर नागपूर शहर कसे असते हे आपल्याला दिसून येईल. तसेच जगातील टॉप मोस्ट शहरामध्ये आज मुंबईचा नंबर कोठे आहे याचा विचार करण्याची वेळ आली आहे. दुर्दैवाने याबाबत शासन निर्णय घेते पण शासनात बसलेले अधिकारी, विकासक अथवा तत्सम यंत्रणांचे काय चालले आहे याचाही विचार होणे अगत्याचे आहे. सन 1995 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्यात आल्या, त्यानंतर 2000 पर्यंत आपण आलो तरी देखील त्यातील अनेक लाभार्थी कसे अपात्र ठरतात हा संशोधनाचा विषय आहे. त्याचबरोबर पिढ्यान्‌पिढ्या तेथे राहणाऱ्या लोकांच्या अनेक जुन्या चाळी आहेत, त्यांनाही अपात्रतेचे प्रमाणपत्र अशा यंत्रणा तसेच विकासकांकडून दिले जाते. त्यानंतर त्या लाभार्थ्याला बोलावून एक-दोन लाख अशी ठराविक रक्कम घे आणि घर सोडून देण्याचे सल्ले देण्यात येतात, यात म्हाडाचे अधिकारी असतील अथवा अन्य यंत्रणांचे अधिकारी, जे बिल्डरांचे हस्तक बनलेले असतात ते असतील त्यांच्याकडून अशी कामे केली जातात. अशा गोष्टींना आळा घातला नाही तर या शहरांवर कदाचित वेगळीच परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. यासंदर्भात मुंबईचे एक साधे उदाहरण मी देऊ इच्छितो की, इंग्रजांच्या काळात घरात काम करणाऱ्या एका व्यक्तिला स्वत:चे घर नावावर करुन दिल्याची नोंद असतानाही त्याला अपात्र ठरविण्यात आले आणि सांगण्यात आले की, तू 2 लाख रुपये घे आणि निघून जा. अशा वेळेस आपण जेव्हा कायदा करतो त्यातून कोणावर अन्याय झाला तर त्याला एक प्रकारे फोरम असावे म्हणून ही चर्चा करीत आहोत. पण तसे न होता मिलीभगत करण्याचीच प्रवृत्ती आज बळावत चालली आहे. चारही बाजूंनी वाढणाऱ्या ठाणे शहरात देखील ही परिस्थिती मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहे.

महोदय, आज म्हाडाच्या मुंबई येथील कार्यालयात गेलो आणि खालीच विचारले की, या कार्यालयात किती दलाल आहेत त्याची माहिती तत्काळ मिळाली की या कार्यालयात चार दलाल आहेत. शासनाने एसआरएसारख्या योजना राबवून गरिबांना घरे मिळावीत म्हणून अनेक वेळा डीसी रुल्स मध्ये बदल केले आहेत. त्यात मग 33 (3), 33 (7), 33 (9) अशा विविध कलमांमध्ये बदल केला.ते सर्व बदल झोपडपट्टी आणि पुनर्विकासाशी लागू होणारे आहेत. एवढे करुन देखील हे आपण करु शकलो नाही तर कितीही भाषणे केली तरी कदाचित ती रेकॉर्डवर राहतील प्रश्न

..3..



PFK/ श्री. भोगलेनंतर ..... 19:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

मात्र तसेच कायम राहतील यात शंका नाही. आपण मुंबईच्या प्रश्नांवर नेहमीच चर्चा करतो तसेच सर्वंकष चर्चा करण्याचाही आपण प्रयत्न करतो. बीडीडी चाळी, बीआयटी चाळी तसेच बीएमसीच्या वसाहतींचे अनेकविध असे प्रश्न आजही तसेच आहेत. यासंदर्भात शासनाने एक धोरण ठरविले होते त्या माध्यमातून फारशी प्रगती झाली नाही. त्यानंतर शासनाने या चाळी स्वत: विकसित करण्याचा निर्णय जाहीर केला तरी देखील त्यातून काहीच साध्य झाले नाही. हीच परिस्थिती ठाणे, नागपूर सारख्या मोठ्या शहरांमध्ये आहे. मी पोलिसाचा मुलगा असल्याने तसेच माझ्या वडिलांच्या पुण्याईमुळे मी या सभागृहाचा सदस्य आहे. त्या मुंबई शहरातील पोलीस लाईनच्या संदर्भात सांगू इच्छितो की 18-18 तास काम करणाऱ्या पोलिसांच्या व्यथा मला माहीत आहेत, माझ्या वडिलांनी 38 वर्षे पोलीस विभागात सेवा केली त्यामुळे मला त्यांच्या समस्यांची चांगली जाण आहे.

नंतर श्री. भारवि ..........

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, झोपडपट्टीदादा, म्हाडाचे काही अधिकारी, महानगरपालिकांचे अधिकारी या सर्वांचे संगनमत झाले की त्या सर्वांना घरे मिळतात. मात्र पोलिसांना घरे मिळत नाहीत.

सभापती महोदय, माझे बालपण वरळीतील बीडीडी चाळ क्र.26 मध्ये गेले आहे. आज वरळी बीडीडी चाळीत राहणाऱ्या लोकांना व पोलीस वसाहतीला कोणत्याही प्रकारच्या मूलभूत सुविधा उपलब्ध नाहीत. त्यांना मेहरबानीने सुविधा देत आहेत अशा पद्धतीने तेथील कारभार चालू असतो. आज तेथील इमारतींच्या डागडुजीसाठी फक्त दहा कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. या अंतिम आठवडा प्रस्तावाच्या माध्यमातून मी सरकारवर टीका टिपणी करण्यासाठी उभा नाही. मागील सरकारच्या हातून काही गोष्टी घडलेल्या आहेत. पण अधिकच्या सोयी होणे आवश्यक आहे. त्याचा आपण विचार केला पाहिजे. येथे आपण या चर्चेच्या माध्यमातून खूप तावातावाने भाषणे केल्यानंतर काही तरी मार्ग निघाला पाहिजे.

मला येथे एका गोष्टीचे उत्तर हवे आहे. या 26 महानगरपालिकांमध्ये विशेषत: मुंबई, ठाणे, उल्हासनगर, नागपूर, नाशिक, औरंगाबाद या महानगरपालिकांच्या क्षेत्रात खूप मोठे तलाव होते, मोकळ्या जागा होत्या. त्या कुठे गेल्या याचा तपशील आम्हाला मिळाला पाहिजे. मुंबईमध्ये पूर्वी मोठ्या वाड्या होत्या. विहिरी होत्या. या विहिरी आता पर्यंत होत्या. त्या विहिरी व तलाव बुजवून त्यावर मोठे मॉल उभारण्यात आले आहेत. त्या जागांवर पोलिसांसाठी घरे का झाली नाहीत ? येथे गिरणी कामगारांच्या समस्या देखील मांडल्या पाहिजेत. त्यांना घर देणे आवश्यक आहे. आपण गिरणी कामगारांना घरे देऊ शकतो. मला सांगताना आनंद होतो की, मागच्या सरकारने 8 हजार गिरणी कामगारांना घरांचे वितरण केले आहे. आज गिरणी कामगारांची संख्या 1 लाख 20 हजार इतकी असून त्यांना आपण घरे देणार आहात काय? परवडणाऱ्या घरांबद्दल आपण नेहमी बोलतो. त्यासाठी रोड मॅप तयार करायला हवा. तो सर्व शहरांसाठी असणे आवश्यक आहे. या तलावांच्या मागे मोठा इतिहास होता. आज आपण प्रत्येक शहरात गुदमरलेल्या अवस्थेत वावरत आहोत. नागपूरची एकेकाळी लोकसंख्या 4 ते 5 लाख होती. ती लोकसंख्या आज 25 लाखावर गेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

जेएनएनयुआरएम, तेरावा वित्त आयोग याच्या माध्यमातून येणारा पैसा कुठे वापरला जात आहे ? युपीए सरकारच्या माध्यमातून किती पैसा आला ते आपण पहावे. जेएनएनयुआरएम हे फक्त मुंबई पुरते मर्यादित नाही. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या राज्यात 1038 कोटी रूपये आले व त्यापैकी फक्त 700 कोटी रूपये खर्च झाले आहेत. बाकीचे पैसे तसेच पडून आहेत. आज मी कामगारांचे प्रतिनिधीत्व करीत आहे. त्यामुळे मी एक गोष्ट मान्य करतो की, एक रूपया पैकी 60 ते 68 पैसे हे कर्मचाऱ्यांच्या पगारावर खर्च होत आहेत. आज ठाणे महानगरपालिकेची अशी स्थिती आहे की, तेथील कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर होत नाही. बाकीच्या महानगरपालिकांमध्ये देखील हीच स्थिती आहे. आजची चर्चा ही महानगरपालिकांपुरतीच मर्यादित असल्यामुळे मी हे सर्व सांगत आहे. महानगरपालिकांची ही स्थिती आहे तर ब, क, ड वर्ग नगरपालिकांची काय स्थिती असेल ?

मुंबईसंबंधी माझे मित्र माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी बराच उल्लेख केला आहे. त्यामुळे मी त्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही हे सुरूवातीलाच सांगितले आहे. नागपूर शहराला अतिरिक्त पाणी पुरवठा करण्याकरिता जामघाट कोची प्रकल्प करावा लागणार आहे. त्यासाठी अडीच हजार कोटी रूपयांची आवश्यकता आहे. नागपूर मधील संपूर्ण पाण्याचे शुद्धिकरण करावयाचे असेल तर त्यासाठी साडेतीन हजार कोटी रूपये लागणार आहेत. घन कचरा व्यवस्थापनासाठी आपण राज्यव्यापी कार्यक्रम घेतला आहे. तो किती यशस्वी झाला आहे हे आपल्या उत्तरातून मिळेलच. आपण वेगवेगळे टॅग लावतो. टॅग हा शब्द चांगला नाही. तरी देखील तो मी उच्चारत आहे. एखाद्या योजनेला वेगळे नाव दिले की, काही तरी वेगळे केले असे आपल्याला वाटते. आता प्रधानमंत्री जन-धन योजना लागू करण्यात आली आहे. जसे काही आकाशातून नवीन काही पडले आहे असे त्याकडे पाहिले जात आहे. आपण स्वच्छता अभियान देखील घेतले. त्याला माझा विरोध नसून समर्थन आहे. त्याचा आम्ही निश्चितच पाठपुरावा करू. यासंबंधातील माझ्या भावना आपण सर्वांनी समजून घ्याव्यात. टॅग लावल्याने नवीन काही तरी होत आहे अशा भ्रमात राहिलो तर ते चुकीचे आहे. अशाने आपण त्या विषयाला न्याय देऊ शकणार नाही.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

आज नागपूरमध्ये स्वच्छतेची काय स्थिती आहे ? मंत्री,आमदार, शासकीय अधिकारी यांच्या गाड्या फक्त सिव्हील लाईन्स येथूनच भराभर जात असतात. तेथेच फक्त स्वच्छता आहे. आपण बर्डीला जाऊन बघावे. मी तेथे राहतो. आज तेथील परिस्थिती काय आहे ? स्वच्छतेचा नुसता देखावा नसावा अशी प्रांजळ भूमिका मी मांडत आहे. नागपूर येथील घनकचरा व्यवस्थापनासाठी 500 कोटी रूपयांची आवश्यकता आहे. नदी आणि सरोवर पुनर्जीवित करण्यासाठी जवळ जवळ 500 कोटी रूपयांची आवश्यकता आहे. रस्ते व पूल बांधणीसाठी जवळ जवळ एक हजार कोटी रूपयांची आवश्यकता आहे. आज एकट्या नागपूरसाठी साडे नऊ हजार कोटी रूपयांची आवश्यकता आहे. आज नागपूरची लोकसंख्या 24 लाख 78 हजार इतकी आहे. पुढील वर्षी किंवा पाच वर्षाने येथे काय होईल हे मी सांगण्याची आवश्यकता नाही. ही स्थिती नागपूरची आहे. अशीच स्थिती जळगाव, नाशिक, औरंगाबाद, ठाणे आणि तत्सम महानगरपालिकांची आहे. यात मुंबईची कथा किती सांगावी ? त्यासंबंधीचा उल्लेख माझ्या मित्रांनी अनेक वेळा केलेला आहे. मी येथे टॅग हा शब्द वापरला आहे तो मला देखील योग्य वाटलेला नाही. आता ई-टेंडरिंग होत आहे. त्याद्वारे आपण काय पाहिले, त्यातून काय साध्य झाले ? त्यात देखील प्रचंड भ्रष्टाचार आहे. एखादी नवीन प्रणाली आपण स्वीकारत असू तर त्याचा लाभ त्या शहरातील नागरिकाला खऱ्या अर्थाने झाला पाहिजे. या नव्या प्रणालीमुळे आता ई-भ्रष्टाचार सुरू झाला आहे.

दर पावसाळ्यात खड्डे बुजविण्यासाठी 600 ते 800 कोटी रूपये लागतात. कोणाला खड्डयात टाकले आणि बाहेर काढले यात मी फारसे न बोललेले बरे. मला येथे कोणत्याही गोष्टीची अतिशयोक्ती करावयाची नाही. हीच स्थिती नाशिक, औरंगाबाद, नागपूर व इतर महानगरपालिकांमध्ये आहे. या सर्व गोष्टींचा आपण कधी तरी गांभीर्याने विचार करणार आहोत की नाही ? असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, एक कुटिल डाव आखला जात आहे. खाजगीकरणावर मी जास्त विस्ताराने बोलणार नाही. ती काळाची गरजसुद्धा आहे हे मला मान्य आहे. या देशाने 1991 साली पार्टली ग्लोबलाईज्ड अर्थव्यवस्था पद्धती स्वीकारली.

यानंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

मुंबईची बीईएसटी, ठाण्याची टीएमटी आणि पुण्याची पीएमटीची आज काय परिस्थिती आहे याची आपल्याला कल्पना आहे परंतु नागपूरमध्ये कोणती परिवहन सेवा आहे याची मला फारशी माहिती नाही. परिवहन सेवेच्या संदर्भातील सर्व व्यवस्था आज डबघाईस आलेल्या आहेत. या व्यवस्था डबघाईस आलेल्या आहेत की, त्या डबघाईस नेल्या जात आहेत हे मला माहिती नाही. परंतु माझ्या माहिती नुसार मुंबई, ठाणे आणि नागपूर या ठिकाणी खाजगी बस सेवा सुरु करावयाच्या असल्या कारणाने या परिवहन सेवा डबघाईस आणल्या जात आहेत असे मला वाटते.

सभापती महोदय, मुंबई आणि उपनगरात रेल्वेमुळे एका वर्षात 6000 माणसांचा मृत्यू झाला आहे. मुंबईकर हा देशातील विविध भागातून पोटाची खळगी भरण्यासाठी आलेला नागरिक आहे. शहरामध्ये नोकरी मिळेल, घर मिळेल यासाठी आलेल्या नागरिकाला परिवहन सेवा किंवा लोकल सेवा सुध्दा चांगल्या प्रकारे मिळत नाही. मंत्री महोदय श्री. गिरीष बापट यांना पुण्याची परिवहन सेवा कशी सुरु आहे हे सांगता येणार नाही. पुण्याची पीएमटी आता आयसीयुमध्ये आहे. पुण्यातील कर्मचाऱ्यांनी वर्गणी काढून गाडी दुरुस्त करुन सुरु केली होती. असे असतांना आपण कोणत्या गप्पा मारत आहात. भविष्यात कदाचित तुमच्या आमच्या जागा बदलतील. एकमेकावर जोरजोराने आरोप करुन एवढयावरच आम्ही थांबणार आहोत काय ? परिवहन सेवा किंवा इतर गोष्टी करण्यासाठी आपण पैसे कोठून आणणार आहात ? या चर्चेला थोडासा राजकारणाचा वास येण्याची शक्यता आहे परंतु मी सर्वांची क्षमा मागून सांगू इच्छितो की, मुंबईच्या संदर्भात आपल्या सर्वांची भाषणे काढून वाचली तर त्यामध्ये असे दिसून येईल की, एकटी मुंबई एकंदर रेव्हेन्यूपैकी 45 टक्के रेव्हेन्यू केंद्र सरकारला देत असते. आज राज्यात व केंद्रात तुमचे सरकार असतांना आपण मुंबईच्या विकासासाठी का पैसे आणीत नाहीत ? तुम्ही जेव्हा विरोधी पक्षात होता तेव्हा तुम्ही आम्हाला केंद्रातून मुंबईच्या विकासासाठी पैसे का आणीत नाहीत असे विचारीत होता आता आणा मुंबईच्या विकासासाठी केंद्राकडून पैसा. मुंबईच्या विकासासाठी आम्ही केंद्राकडून 35 हजार कोटी रुपये आणले होते व त्यासंदर्भातील सर्व माहिती मी आपल्याला देण्यास तयार आहे. आम्हाला अपेक्षा आहे की, महाराष्ट्रातील सर्व नागरिकांनी आपल्याला वेगळा मेन्डेट दिलेला आहे.त्यामुळे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी आता तुमच्यावर आहे. आता मागील वर्षापेक्षा मुंबईतून जास्त पैसे केंद्रात जात आहेत.

सभापती महोदय, निवडणुकीच्या काळात एलबीटीच्या संदर्भात आम्ही आपली भाषणे ऐकली आहेत. एप्रिल महिन्यापर्यंत एलबीटी काढण्यात येईल यासंदर्भातील आपली भाषणे आम्ही ऐकलेली आहेत. माझी आपल्याला नम्रपणे विनंती आहे की, आपण जेव्हा देशातील राज्यांच्या विकासांची चर्चा करतो त्यावेळेला आम्ही स्वत:चे राजकारण मध्ये आणतो का हा प्रश्न प्रत्येकाने स्वत:ला विचारला पाहिजे. कदाचित मी सुध्दा त्यामध्ये येऊ शकेन. एलबीटीच्या संदर्भात पर्याय काय हे आपल्याला मागच्या सरकारने विचारले होते. श्री. मोहन गुरनानी हे व्यापाऱ्यांचे प्रमुख असून माझी त्यांच्याशी ओळख आहे. परवा ते मुख्यमंत्र्यांच्या दालनात दिसले होते. त्यांनी नंतर मला बैठक चांगल्या प्रकारे झाल्याचे सांगितले. मला या ठिकाणी फरक करावयाचा नाही परंतु आपण कोणती दिशा देत आहात, जनतेला आपण कोणता संदेश देत आहात ? व्यापाऱ्यांनी जे मागितले ते त्यांना एप्रिल पर्यंत देण्यास तुम्ही तयार झाला आहात. आम्हीही त्यासंदर्भात तयारी दाखवली होती.

सभापती महोदय, पीएमटीचे तुम्ही नेमके काय करणार आहात, पुण्याच्या परिवहन सेवेच्या संदर्भात आपण नेमकी कोणती भूमिका घेणार आहात, बीईएसटीसाठी पैसे कधी देणार आहात, ठाण्याच्या टीएमटीसाठी पैसे कधी देणार आहात ? या सर्व परिवहन सेवा आज मृत्यूशय्येवर आहेत. या परिवहन सेवा आज बंद होतील किंव उद्या बंद होतील याबद्दल कोणालाच काही सांगता येणार नाही. बसमधून सर्वसामान्य गरीब,वंचित, पीडित प्रवास करतात त्यामुळे सर्वसामान्यांच्या परिवहन सेवेसाठी तुम्ही कधी पैसे देणार आहात ?

सभापती महोदय, रेव्हेन्यूचे जे स्त्रोत आहेत ते तुम्ही कशा प्रकारे वळवणार आहात ? जीएसटी प्रणाली जगभरात सुरु असून ती आपल्याकडे आली पाहिजे, नव्हे ती काळाची गरज आहे. दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, ज्यावेळेला केंद्रामध्ये आमचे सरकार होते त्यावेळेला केंद्रसरकारमध्ये जीएसटीच्या मुद्याच्या संदर्भात चर्चा सुरु होती त्यावेळेला भाजपा प्रणित सर्व राज्यांनी जीएसटीला प्रचंड विरोध केला होता. परंतु आज तेच म्हणत आहेत की, "जीएसटी जल्दी लाओ". जीएसटीचा निर्णय केंद्राने घेतला तर एलबीटी आपोआप कॅन्सल होत असतो, एलबीटी रद्द करण्यासाठी तुम्हाला वेगळे प्रयत्न करावे लागणार नाहीत. ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ........

सभापती महोदय, समजा एप्रिल महिन्यात एलबीटीचा निर्णय झाला तरी जीएसटी अस्तित्वात यावयास कमीतकमी दीड वर्ष लागतील. परंतु या दीड वर्षाच्या काळात सर्व नगरपालिकांच्या स्त्रोताचे काय करणार आहात ? पूर्वी जकात कर होता परंतु तोही आता रद्द झालेला आहे. माझ्या माहिती प्रमाणे 40 ते 45 टक्के पैसे सेवा करातून येत असतात. त्यामुळे वर्ष सहा महिने महानगरपालिकांचा कारभार कसा चालणार आहे ? या महानगरपालिकांतील कर्मचाऱ्यांचे पगार कसे होणार आहेत, त्या ठिकाणच्या विकासाची कामे कशी होणार आहेत, मूलभूत सुविधांची कामे कशी होणार आहेत ? यासंदर्भात शासनाकडे काहीच उत्तर नाही. एखादी नवीन प्रणाली स्वीकारीत असतांना तीचा स्वीकार करणे आवश्यकच असते. जीएसटी प्रणाली जगभरात सुरु असून ती सुटसुटीत आहे. यासंदर्भातील शंका-कुशंकांना उत्तरे मिळतील. परंतु मधला जो मोरोटोरिअम पिरिएड आहे त्यामध्ये त्या त्या महानगरपालिकांमध्ये आपण नेमके काय करणार आहात याचे उत्तर मंत्री महोदयांच्या भाषणातून येणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मूलभूत सुविधांच्या स्त्रोताची जेव्हा चर्चा होते किंवा आपण मुद्दे मांडत असतो त्यावेळेला मला टोलच्या संदर्भात सांगावयाचे आहे की, टोलचा संबंध जास्तीत जास्त शहरी भागात आहे तसेच राज्यातील वेगवेगळया रस्त्यावरही तो आहे. महानगरपालिका क्षेत्रात टोलचे प्रमाण मोठया प्रमाणात आहे. या चर्चेमध्ये मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. टोलच्या बाबतीत मी जे काही बोलतो आहे त्यामध्ये माझा कोणता राजकीय अभिनिवेश आहे ? आज मी एक बातमी वाचली होती त्यामध्ये देशामध्ये साधारण 15 कोटीच्या आसपास व्हेईकल आहेत व त्यातील 54 टक्के व्हेईकल कमर्शिअल आहेत. याचे को-रिलेशन टोलशी लावले जात आहे. तुम्ही टोल मुक्त करणार आहात. टोल मुक्त केला तर आम्हाला आनंदच होईल. या अगोदर आम्ही 44 टोल नाके बंद केलेले आहेत. निवडणुकीमध्ये टोल मुक्तीच्या घोषणा करण्यात आल्या त्या मी समजू शकतो परंतु टोल मुक्तीचे पडसाद आपल्याला भोगावेच लागणार आहेत. आपण सरकारमध्ये असल्यामुळे आपल्यालाच त्याचे उत्तर शोधून काढावे लागणार आहे.

सभापती महोदय, आज सर्व महानगरपालिकांमध्ये मेट्रो आवश्यक झाली आहे. पुणे, नागपूर येथे मेट्रो आणली जाणार आहे अशी घोषणा या सरकारने निवडणुकीच्या काळात केली होती. नागपूर येथे मेट्रो येणे ही काळाची गरज आहे. आम्ही सर्व अखंड महाराष्ट्र मानणारे आहोत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ....

आपल्या पक्ष प्रमुखांचे स्वागत करायला पाहिजे. केंद्रात नरेंद्र आणि राज्यात देवेंद्र अशी आपली घोषणा होती. या दोघांच्या नावामध्ये इंद्र असला तरी आपण दोघांनी नागपूरसाठी काम केले पाहिजे. मी मघाशी साडेनऊ हजार कोटी रुपयांचा उल्लेख केला ती रक्कम आपण केंद्रातून आणून नागपूर शहराचे भले करावे. बॅकलॉगच्या संदर्भात विषय येईल तेव्हा आम्ही बोलू. यापूर्वी देखील आम्ही बोललो आहोत. विदर्भवासियांच्य मनामध्ये जी भावना निर्माण झालेली आहे ती भावना दूर होऊन अखंड महाराष्ट्र ज्यासाठी 106 जणांनी हौतात्म्य पत्करले त्यांना सुद्धा या गोष्टींचा आनंद होईल.

सभापती महोदय, मुंबईतील काही शहरांच्या लगत समुद्र आहे, काही शहरे नदीच्या लगत आहेत तर काही शहरे तलावाच्या लगत आहेत, त्याठिकाणी सीआरझेडचा नियम लागू आहे. मुंबई शहर हे सात बेटांचे आहे, हे आपणा सर्वांना माहीत आहे. या मुंबई शहरामध्ये 89 गावठाणे आणि कोळीवाडे आहेत. या गावठाणामध्ये किंवा कोळीवाड्यामध्ये टॉयलेटसुद्धा बांधता येत नाही. आपण 21 व्या शतकाचा उल्लेख करतो. या संदर्भात मागील सरकारने निर्णय घेतलेला आहे. सीआरझ ेडमध्ये एमआरझेड करुन तसेच सीआरझेड-1आणि सीआरझेड-2 असा फरक करुन विकास करण्याचा प्रयत्न केला. हा निर्णय मागील दोन वर्षापूर्वीचा आहे. या सभागृहात मुंबईच्या संदर्भात चर्चा झाली होती त्यावेळी मीच हा विषय मांडला होता. हा विषय राज्यव्यापी आहे. नदीच्या ठिकाणीसुद्धा हा नियम लागू आहे. मुंबईमध्ये जी 89 गावठाणे आहेत ते खरे मुंबईकर आहेत. आम्ही सर्वजण इकडून तिकडून आलेलो आहोत.मुंबादेवी आणि सिद्धीविनायक ही त्यांची पूर्वीपासूनची श्रध्दास्थाने आहेत. मी आपल्याकडे बोट दाखवून गप्प बसणार नाही. सीआरझेड-1 होता त्यावेळी तुम्हा आम्हाला त्याची चिंता होती. सीआरझेड 60 वर्षापासून होता असे सांगण्याचा कोणी प्रयत्न करु नये. सन 1991 पासून देशात सीआरझेड लागू झाला आहे. त्याचा पिरियड काहीही असला तरी त्यामध्ये वारंवार संशोधन होत राहणार आहे. सीआरझेड पासून आपण सीआरझेड-1 आणि 2 केले. सीआरझेड असल्यामुळे नदीकाठची गावांना, गावठाणांना त्यांच्या मूलभूल सुखसोयी उभ्या करता येत नाहीत. तेव्हा अशाप्रकारणांमध्ये संशोधन करुन निर्णय घेणे आवश्यक आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप ....

सभापती महोदय, या विषयावर बोलण्यासाठी दोन-चार तास अपुरे आहेत. कदाचित एक दिवससुद्धा कमी पडेल. माझ्या पक्षाकडून मला बोलण्यासाठी वेळ देण्यात आलेला आहे. आमच्या पक्षातील आणखी एक-दोन सदस्य बोलतील. या प्रस्तावावर बोलण्यासाठी आमच्या पक्षाकडून 11 नावे देण्यात आली होती, परंतु आम्ही ती नावे कमी केली आहेत. आम्ही फक्त तीन-चार सदस्य बोलणार आहोत.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, या विषयावर जी चर्चा होत आहे ती फक्त अंतिम आठड्यापुरता सीमित राहू नये. अन्यथा चर्चा झाली, माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर आले आणि आम्ही गप्प बसलो, असे होता कामा नये. मी आपणास काही आकडेवारी दिलेली आहे. मग ती मुंबईची असेल, नागपूरची असेल वा अन्य शहराची असेल त्याबाबत आपण जरूर उल्लेख करावा. महानगरपालिकांच्या पैशांचा स्त्रोत आणि त्यांच्या भागातील विकास करण्यासाठी केंद्रातून येणारा निधी, मग तो 13 व्या वित्त आयोगाकडून येणारा निधी असेल किंवा अन्य माध्यमातून येणारा निधी असेल, या पैशांच्या बाबतीत आपली काय भूमिका आहे हे सदनाला विदित करावे अशी माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो. आपण मला वेळ वाढवून दिला त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते )** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चा अडीच तासात संपवावयाची आहे. या प्रस्तावावर आपल्याच दोन पक्षातील सदस्य बोलणार आहेत. आपल्या पक्षाच्या सुरुवातीच्या वक्त्यांनी 40 -40 मिनिटे घेतली आहेत. तेव्हा आपण दहा मिनिटांमध्ये आपले विचार मांडावेत.

श्री.किरण पावसरक : सभापती महोदय, दहा मिनिटांमध्ये मुंबईचे प्रश्न मांडता येतील काय ?

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेसाठी दोन तास चाळीस मिनिटे दिलेली आहेत. सत्ताधारी आणि विरोधी पक्षासाठी हा वेळ आहे. या प्रस्तावावरील उत्तरासाठी माननीय मंत्री महोदयांसाठी अर्धा किंवा पाऊणतास लागणार आहे. आपणास ही चर्चा वेळेत संपवावयाची असेल तर आपणास वेळेचे नियोजन करावे लागेल. सुरुवातीच्या वक्त्यांची जास्त वेळ घेतला तर मग बाकीच्या वक्त्यांना बोलण्यासाठी कमी वेळ मिळतो. आता चर्चा सुरु होऊन एक तास चाळीस मिनिटे झालेली आहेत आणि आपणास ही चर्चा दोन तास चाळीस मिनिटांत संपवावयाची आहे. तेव्हा आपण वेळेचे नियोजन करावे अशी विनंती आहे.

-------

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी जो अंतिम आठवडा प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या असंख्य प्रश्नांवर दहा-पंधरा मिनिटात बोलणे म्हणजे याचा अर्थ आम्ही मुंबईच्या कोणत्याही प्रश्नांना हात लावला नाही असा होतो. तेव्हा आपण मला जास्त वेळ द्याल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई महानगरपालिका ही देशातील सर्वात मोठी महानगरपालिका मानली जाते. मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प 33 हजार कोटी रुपयांचा आहे. देशातील एका छोट्या राज्यापेक्षा या महानगरपालिकेची मोठी उलाढाल आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नांबाबत बोलायचे झाले तर सर्व गाड्या पेट्रोल संपल्यावर पेट्रोल पंपावर जाऊन थांबतात त्याप्रमाणे मुंबईचे सर्व प्रश्न मुंबई महानगपालिकेकडे जाऊन थांबतात. एमएमआरडीए नवीन प्रकल्पांचे काम करते. तेव्हा एमएमआरडीएच्या नावाने सुरुवातीला बोंब मारण्यात आली. आपणास मुंबईचे प्रश्न खऱ्या अर्थाने धसास लावायचे असतील, मुंबईचा विकास करायचा असेल, त्या शहरातील लोकांना काही सुविधा द्यायच्या असतील तर ती सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मुंबई महानगरपालिकेने 33 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प मांडताना त्यामध्ये पाणी, आरोग्य आणि रस्ते यासाठी 27 टक्के तरतूद केली आहे. माझा प्रश्न आहे की, आपण खरोखर 27 टक्के रक्कम वापरली आहे काय ? त्या पूर्वीच्या अर्थसंकल्पामध्ये या कामांसाठी 22 टक्के रक्कम दाखविण्यात आली होती. ही 22 टक्के रक्कम खर्च करण्यात आली काय ? अर्थसंकल्पावर चर्चा होते आणि मीडियादेखील त्याची दखल घेते. पण जेवढी तरतूद करण्यात आली होती तेवढी रक्कम खर्च करण्यात आली का ? आपण फक्त आकडेवारी फूगवून सांगायची आणि त्याचा लोकांसाठी काही उपयोग होणार नसेल तर ते आकडे फूगवून दाखविण्यामध्ये काय अर्थ आहे, ते आकडे कुठे गेले ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

सभापती महोदय, महानगरपालिकेमध्ये डायग्नोसिस लॅब सुरु करणे, ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी स्वयंसेवी संस्था व त्यांच्यासाठी हेल्पलाईन असावी, मुंबईच्या लौकिकात भर टाकणाऱ्या व्यक्तींना, संस्थाना मुंबई रत्न, मुंबई भूषण या पुरस्काराने गौरविण्यात येईल अशा अनेक घोषणा करण्यात आल्या होत्या. पण त्यातील एकही काम झालेले नाही. त्याचप्रमाणे सर्व रुग्णालयांमध्ये मदत कक्ष, नोंदणीकृत संस्थाना पाळणाघर, महिलांसाठी प्रसाधनगृहे या सर्व गोष्टींचा समावेश होता. या सर्व गोष्टी गेल्या कुठे ? या सर्व गोष्टी अर्थसंकल्पामध्ये दाखविण्यात आल्या होत्या. मी मागील एक-दोन वर्षाबद्दल बोलत नाही. या सर्व गोष्टी अर्थसंकल्पामध्ये वर्षानुवर्षे दाखविल्या जात आहेत. जी पाळणाघर होती ती बंद झाली आहेत. प्रसाधनगृहाबद्दल बोलायचे तर आपण देखील मुंबई शहरात फिरता, त्या प्रसाधनगृहांची काय अवस्था आहे ते आपण पाहत आहोत. तेथे कोणत्याही प्रकारची व्यवस्था नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

ज्यावेळी मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प सादर होतो त्या अर्थसंकल्पातील पैसा कोठे जातो याचा उलगडा होणे गरजेचे आहे. महोदय, मुंबईतील मोठ्या रुग्णालयांवरील भार कमी करण्यासाठी मुंबईमध्ये काही ठिकाणी दवाखाने आणि प्रसूती गृहे बांधली होती. प्रभादेवी आणि माहीम येथे महापालिकेची प्रसूती गृहे होती. परंतु ही प्रसूती गृहे आहे तशीच बंद आहेत. अंधेरी येथे बांधण्यात आलेल्या प्रसूती गृहाचे ओपनिंग गेल्या सात वर्षांपासून झालेले नाही. ही रुग्णालये बंद असल्यामुळे त्यांचा भार कूपर, जे.जे., के.ई.एम. या रुग्णालयांवर पडतो. या निमित्ताने विचारु इच्छितो की, या इमारती बंद ठेवून रुग्णांना आरोग्य सेवा कशा पुरविणार आहात ? जर या बाबतीत पर्यायी तरतूद केली असेल तर ते समजले पाहिजे. या सोयी 2-5 वर्षात निर्माण केल्या नाहीत तर तब्बल 10-12 वर्षापूवीच्या आहेत. महोदय, आरोग्य सेवा देणारी इमारत जागेवर आहे, परंतु त्यातील प्रसूती गृह बंद आहे. पाळणा घराच्या बाबतीत सांगायचे झाल्यास केवळ वरळी येथील पाळणा घर सुरु आहे. पाळणा घराची जागा मुंबई महापालिकेची आहे, परंतु ते पाळणा घर स्वयंसेवी संस्था चालवित आहे. सबअर्बला कोठेही पाळणा घर झालेले नाही. म्हणजे जागा आरक्षित ठेवून त्यातून सर्व काही काढायचे असा हा प्रकार आहे.

महोदय, मुंबईमध्ये गाव-खेड्यातून, राज्याच्या कानाकोपऱ्यातून माणसे येतात. मुंबई कोणाला कधीही उपाशी ठेवत नाही. दोन हाताना काम देण्याची, त्यांचे संरक्षण करण्याची आणि कोणालाही उपाशी न ठेवण्याची काळजी मुंबई घेते. राज्याला न्याय देणारे, शेतकऱ्यांना न्याय देणारे, चांद्यापासून बांद्यापर्यंतच्या सर्व लोकांना न्याय देणारे मंत्रालय हे मुंबईत आहे. त्यामुळे मंत्रालयाची काळजी घेतली जाते. सर्व मंत्र्यांची घरे सुध्दा मुंबईत आहेत, त्यांची सुध्दा काळजी घेतली जाते. उच्च शिक्षणासाठी प्रवेश हवा असेल तर मुंबईला प्राधान्य दिले जाते. हल्ली लंडन आणि अमेरिकेला उच्च शिक्षणासाठी जातात हा भाग निराळा आहे. परंतु पूर्वी विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी मुंबईला येत होते. एखाद्याला मोठा आजार असेल तर टाटा किंवा के.ई.एम. रुग्णालयामध्ये गोरगरीब माणूस उपचारार्थ येत होता. एवढेच नव्हे तर पर्यटनासाठी सुध्दा मुंबईत अनेक माणसे येत होती. परंतु आज मुंबईत येणाऱ्या लोकांची आपण पुरेशी व्यवस्था करु शकतो काय, हा प्रश्न या निमित्ताने मला पडतो. आपण के.ई.एम. किंवा अन्य रुग्णालयात गेला तर



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित.... 20:00

श्री.किरण पावसकर....

काही पेशंट हे खाटेवर आणि बहुतांश पेशंट हे खाटेच्या खाली झोपलेले दिसतील. वास्तविक पाहता या सर्व लोकांची काळजी घेण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. ही जबाबदारी एकट्या राज्यकर्त्यांची आहे असे मी म्हणणार नाही. मी तर म्हणेन की, ही जबाबदारी सर्वस्वी महानगरपालिकेची आहे. कारण मुंबईत येणाऱ्या लोकांसाठी महापालिकेने कोणतीही सुविधा ठेवली नाही. शिक्षणाची सोय ठेवली नाही. आरोग्याच्या बाबतीत सांगायचे झाल्यास आरोग्य सेवेचे तीन-तेरा वाजले आहेत. के.ई.एम. रुग्णालयात दोन डॉक्टर आहेत. त्यांना हिंदुजा रुग्णालयात जावे लागते. के.ई.एम.मध्ये माझ्या आईवर शस्त्रक्रिया झाली होती. कारण पूर्वी त्या रुग्णालयात चांगल्या सुविधा होत्या. परंतु आता त्या रुग्णालयातील डॉक्टरांना हिंदुजा रुग्णालयात जावे लागते. मी विचारु इच्छितो की, खेड्यापाड्यातून आलेल्या किती रुग्णांना आपण हिंदुजा आणि बॉम्बे हॉस्पीटलमध्ये पाठविणार आहात ? त्यांना ते परवडणार आहे की नाही. वास्तविक पाहता महापालिकेच्या रुग्णालयात ज्या सुविधा द्यावयास पाहिजे त्या आपण देऊ शकत नाही. या बाबतची जबाबदारी महापालिकेची आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, आपण महापालिकेला अशा प्रकारे किती दिवस वाऱ्यावर सोडून देणार आहात ? महापालिकेमध्ये अर्थसंकल्प नाही, पैसा नाही अशी आकडेवारी या ठिकाणी सांगितली जाते.

महोदय, मुंबईत दोन दिवसासाठी पाहुणे आले तर त्यांना काय दाखवावे ? म्हातारीचा बूट हे पर्यटन स्थळ बंद झाले आहे. प्राणी संग्रहालयाचा आराखडा पाच-सात वर्षांपूर्वी तयार केला होता, त्याचे काय झाले, राणीच्या बागेचे काय झाले ? राणी बागेच्या बाबतीत सांगतो की, तेथील प्राणी बाजूला काढून ती जागा लवकरात लवकर एखाद्या अजगर बिल्डरला देण्याजोगी परिस्थिती मध्यंतरी निर्माण झाली होती. महोदय, आज तारापूर मत्स्यालयाची काय परिस्थिती आहे ? या निमित्ताने मी विचारतो की, मुंबई बघायला येणाऱ्यांना आम्ही काय दाखवायचे ? आजच्या घडीला मुंबईत केवळ मंत्रालय, मॉल आणि मंत्र्यांचे बंगले दाखवू शकतो. या शिवाय अजून काय दाखविणार ?

महोदय, आज मी त्या मालकांची नावे घेऊन सांगू शकत नाही. परंतु 10 वर्षांपूर्वी मुंबईत 21 फाईव्ह स्टार हॉटेल्स बांधण्यात आल्या होत्या. त्यातील काही मालक कदाचित आपली हॉटेल

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

बंद करतील इथपर्यंत परिस्थिती आली आहे. मुंबईला पर्यटक येण्यासाठी काही तरी पर्यटनविषयक बाबी विकसित कराव्या लागतील. किंबहुना पर्यटनाच्या बाबतीत काही तरी व्यवस्था करावी लागेल. औरंगाबाद येथे जाणाऱ्या पर्यटकांची संख्या मुंबईच्या तुलनेत जास्त आहे. मुंबईत बाहेरच्या देशातून येणाऱ्या पर्यटकांची संख्या आता कमी झाली आहे. परिणामी फाईव्ह स्टार हॉटेलची व्यवस्था कोलमडली आहे. ही व्यवस्था सुरक्षेच्या बाबतीत कोलमडली असेल किंवा इतर काही गोष्टींमुळे कोलमडली असेल. आज मुंबईतील उद्याने बकाल झाली आहेत. मुंबईतील उद्याने वा मैदाने ही गर्दुल्ले आणि जुगाऱ्यांची अड्डे बनली आहेत. महोदय, मुलुंडमध्ये 9 उद्याने होती. परंतु आज त्या उद्यानांची अवस्था बकाल झाली आहे.

महोदय, बाहेरच्या देशातील एखाद्या उद्योजकाला गुंतवणूक करण्यासाठी मुंबईत आणले आणि सहार विमानतळाच्या बाहेर पडलो तर हायवेच्या उजव्या बाजूला पुलाखाली भिकारी जेवण बनविताना दिसतात. ही परिस्थिती असताना पुलाखाली सुशोभीकणाचे काम आपण करु शकलेलो नाही. या बाबतीत अनेक प्रस्ताव दिले होते. पण कार्यवाही झाली नाही. आपण वारंवार सिंगापूर आणि लंडनचे उदाहरण देतो. त्या ठिकाणी कशा प्रकारच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत यावर आपण बोलतो. मलेशियामध्ये गेल्यास तेथे संध्याकाळी ब्रीज दाखविले जातात. एवढेच नव्हे तर ब्रीजखाली केलेली रोषणाई सुध्दा दाखाविली जाते. माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्या मंत्री पदाच्या काळात राज्यामध्ये 55 पूल बांधण्यात आले, ही गोष्ट नाकारुन चालणार नाही. त्या पुलाखाली सुशोभीकरण झाले तर भिकारी आणि गर्दुल्ल्यांपासून सुटका होईल. बांद्रा, सहार आणि अंधेरी येथील पुलाची सुध्दा तशीच परिस्थिती आहे. या पुलांचे सुशोभीकरण करण्यासाठी काय लागणार आहे ? हे काम बीओटी तत्त्वावर कोणत्याही कंपन्याना दिले तर ते त्या ठिकाणी आपले शोरुम करतील, तेथे चांगल्या टोईंगच्या गाड्या ठेवतील. एवढेच नव्हे तर पोलिसांची सुध्दा व्यवस्था करतील. परंतु मुंबई महापालिका मुंबईचे सुशोभीकरण करण्यासाठी एक स्टेप पुढे येत नाही. महोदय, आता पर्यंत मी जे काही सांगितले ते विकासाच्या बाबतीत सांगितले.

..4..

श्री.किरण पावसकर....

महोदय, या सभागृहात मी महापालिकेच्या काही कंत्राटदारांची आकडेवारी ठेवली होती. 'खड्डयातून बांधलेत इमले' या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द झाली होती. या अनुषंगाने मी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. महापालिकेने मुंबईतील खड्डे बुजविण्यासाठी 2011 मध्ये 80 कोटी रुपये, 2012 मध्ये 70 कोटी रुपये आणि 2013 मध्ये 56 कोटी रुपये कंत्राटदारांना दिले. मुंबईतील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या बाबतीत ज्याचे काम चांगले नाही त्यांनाच पुन्हा ते काम दिले. मी तर म्हणेन की, काळ्या यादीत गेलेल्या कंत्राटदाराला हे काम दिले. महोदय, या ठेकेदारांना 278 कोटी रुपये केवळ खड्डयांवरील चर भरण्यासाठी दिले. 2014 मध्ये 71 कोटी रुपयांचा प्रस्ताव आला होता. जुलैमध्ये त्या प्रस्तावात वाढ होऊन तो 138 कोटी रुपयांचा झाला आणि नोव्हेंबर मध्ये तोच प्रस्ताव 278 कोटी रुपयांवर पोहोचला. भारतीय जनता पक्षाने त्यावेळी महापालिकेमध्ये या बाबतीत हरकत घेतली होती. या वरुन आपणच काम कसे वाढवित गेलो हे दिसून येईल. पूर्वी 71 कोटी रुपयांचे असलेले काम 278 कोटी रुपयांपर्यंत गेले. परंतु या बाबतीत महापालिकेला कोणी विचारत नाही आणि आपण केवळ सुशोभीकरण आणि आरोग्याच्या बाबतीत बोलतो. परंतु मी सांगितलेल्या गोष्टी बघितल्या तर महापालिकेच्या सर्व कंत्राटदारांची यादी आपल्यासमोर ठेवता येईल.

महोदय, आज सकाळी माननीय मुख्यमंत्र्यांनी जो विषय मांडला त्यातून लोकांना थोडा तरी न्याय मिळेल अशी माझी अपेक्षा आहे. महोदय, आज मुंबईमध्ये इमारतींची काय परिस्थिती आहे ? शंकरलोक इमारत, माहीमची अल्ताफ मंजील, डॉकयार्डची महापालिकेची इमारत आणि दहिसरची पीयूष इमारत कोसळून त्यामध्ये 77 लोक मृत्युमुखी पडले. मुंबईला आपण सुरक्षित आणि चांगले म्हणतो, पण असे प्रकार घडलेले आहेत. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, मुंबईमध्ये 30 वर्षापेक्षा जुन्या असलेल्या इमारती 32429 इमारती आहेत. त्यापैकी केवळ 13,779 इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट झाले आहे. इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी आपण सभागृहात वारंवार करतो. परंतु निम्म्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट होऊ शकले नाही. मुंबईत अत्यंत धोकादायक असलेल्या इमारती 593 आहेत. त्यापैकी केवळ 169 इमारतीच रिकाम्या करण्यात आल्या आहेत. अशी परिस्थिती असेल तर त्या इमारतीतील लोकांना कसे जिवंत ठेवणार

..5..



श्री.किरण पावसकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहात ? या इमारतींचा विकास करताना सीआरझेड कायदा केंद्र सरकारचा आहे किंवा तो भाग हेरिटेजमध्ये आहे अशी कारणे सांगितली जातात. आज सकाळी एका लक्षवेधीच्या माध्यमातून चांगला उलगडा झाला. परंतु या सर्व बाबींमुळे महापालिका इतरांकडे बोट दाखविते. माननीय मुख्यमंत्र्यांनी आज सकाळी केलेल्या निवेदनामध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली की, हेरिटेज समिती ही महापालिकेकडून स्थापन करण्यात आली आहे. एकीकडे महापालिका शिवाजी पार्कला अशा पध्दतीने डिस्कशन लावते.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

मग त्यासाठी नियम काय सांगतो हे पाहिले पाहिजे. सीआरझेड हा केंद्र शासनाचा कायदा आहे. ते हेरिटेजमध्ये आलेले आहे. आज सकाळी आम्ही चांगला उलगडा केला. महापालिका इतरांकडे बोट दाखविते. माननीय मुख्यमंत्र्यांच्या निवेदनामध्ये एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, हेरिटेज कमिटी महानगरपालिकेकडून आली आहे. एकीकडे महानगरपालिकाच शिवाजी पार्कला अशा पध्दतीने डिस्कशन लावत आहे, हेरिटेज कमिटीला लोकांचे विचार घेण्यासाठी पाठवित आहे आणि दुसरीकडे त्यांचेच काही नेतेच पुन्हा संध्याकाळी जाऊन भाषण करतात की आम्ही शासनाला हे करू देणार नाही. हेरिटेज कमिटी महानगरपालिकेची आणि महानगरपालिकाचेच नेते मग संध्याकाळी जाऊन कशाला भाषणे करीत आहेत ? त्यांनीच कमिटी ठेवायची आणि पुन्हा त्यांनी लोकांना दिलासा द्यायचा आणि त्यांनीच सांगायचे की, आम्ही हेरिटेज तुमच्याकडे येऊ देणार नाही. अशा पध्दतीने भूलथापांचे राज्य करून मुंबईकरांना सत्ताधाऱ्यांनी वेठीस धरले आहे. सभापती महोदय, मघाशी विद्यार्थ्यांचा विषय चर्चेला आला. आपण सर्वजण मराठीच्या संदर्भात चांगले बोललो. 27 हजार विद्यार्थ्यांनी मराठी शाळांना बाय-बाय केले आहे, जय महाराष्ट्र केले आह. मराठीच्या असंख्य शाळांची दुर्दशा झाली आहे, त्यांची व्यवस्था चांगली नाही. आपल्या मुलांचे नुकसान होईल, म्हणून पालकांनी आपल्या मुलांना महानगरपालिकेच्या शाळांतून काढले आहे. बऱ्याच पालकांनी महानगरपालिका शाळांतून काढल्यानंतरही महानगरपालिका अर्थसंकल्पात शिक्षणावरील तरतूद 1500 कोटी रुपये दाखवित आहे. 1500 कोटी रुपयांची तरतूद शिक्षणावर असेल तर महानगरपालिकेला शाळा भाड्याने का लावाव्या लागतात ?

सभापती महोदय, महापौरांचे किंवा कोणाचे तरी डेकोरेशनचे सामान एखाद्या परेलच्या शाळेमध्ये का ठेवावे लागत आहे, काही युनियन ऑफिस पोर्तुगीज चर्चच्या शाळांना भाड्याने का द्यावे लागत आहे ? एकीकडे आपण मराठीचा प्रचार, प्रसार झाला पाहिजे, असा गळा काढतो आणि दुसरीकडे जेथे विद्यार्थी तयार होणार, पुढील पिढी तयार होणार आहे, तिकडच्या शाळा मात्र आपण भाड्याने देत आहात. किती शाळा भाड्याने लावल्या आहेत, याची मी आपल्याला यादी देईन. आपण देखील आश्चर्यचकीत व्हाल. हेरिटेजचे सांगितले तसेच आहे. हेरिटेजचा वाघोबा

..2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

यांनीच उभा करायचा आणि यांनीच पुन्हा संध्याकाळी सांगायचे की, आम्ही तुम्हाला वाचवित आहोत. तसेच, या शाळांचे आहे. मराठी शाळांसाठी फक्त गळा काढायचा. मराठी शाळांसाठी तरतूद केलेली रक्कम कुठे खर्च झाली, 1500 कोटी रूपये शिक्षणावर कुठे खर्च झाले, किती नवीन शाळा बांधल्या, कुठे ग्रंथालय बांधून दिले, किती जुन्या शाळा दुरूस्त केल्या, तुमचे किती विद्यार्थी वाढले ? मराठी शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली पाहिजे. त्यामुळे एवढी तरतूद करण्यात आली. आपण शिक्षणाच्या संदर्भात एवढी तरतूद केली असेल तर मला वाटते की, सर्व पालक तुमच्या महानगरपालिकांच्या मराठी शाळेकडे येतील.

सभापती महोदय, आपण मुंबईत घरी रात्री व्यवस्थित झोपतो, याचे कारण राज्याचे पोलीस आहेत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी त्यांचे पोलिसांच्या बाबतीतील अनुभव सांगितले. 26.11 च्या वेळी आपण सर्वजण पोलिसांच्या बरोबरीने उभे राहिलो. हा हल्ला नव्हता. हे युध्द होते. आपण पोलिसांची काळजी घेण्यासाठी सदनातच फक्त किती वेळा बोलणार आहोत ? आपण पोलीस खात्यासाठी काय करतो, याचा देखील विचार केला पाहिजे. मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याच्या संदर्भात 800 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. कॅमेरे लागले का ? 3 वेळा त्या संदर्भात रि-टेंडरिग झालेले आहे. मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे लागणे गरजेचे होते.

सभापती महोदय, मघाशी बीडीडी चाळींच्या संदर्भात बोलण्यात आले. पोलिसांच्य मुंबईतील अनेक भागात वसाहती आहेत. पोलिसांच्या बाबतीत आपल्याला विचार करून निर्णय घ्यावा लागेल. शास्त्री नगरमधील पोलिसांच्या 3 इमारती कोसळल्या. लोक बाहेर निघून गेले. आता त्या गोष्टीला चार वर्षे झाली आहेत. ज्या इमारती कोसळल्या त्यांच्या संदर्भात तरी निविदा काढा. सदर वसाहतींत तीनशे कुटुंबे होती. आम्ही 600 घरे पोलिसांसाठी बांधून देण्यास तयार आहोत, असे प्रस्ताव समोर आले तर ते तरी त्यांना द्या. आपण पोलिसांना 220 चौ.फू.चे, 450 चौ.फू. चे घर देतो. उरलेली जागा डेव्हलपरला देऊ शकता. पोलिसांच्या इमारती पडल्या आहेत. आपण पोलिसांचीही घरे बांधण्यास तयार नाही. पोलिसांचे सक्षमीकरण करण्यासाठी, पोलीस दलाचे मनोधैर्य वाढविण्यासाठी आपण त्यांना घरे देणे ही तातडीची गरज आहे. आपण पोलिसांची घरे

..3



MSK/ पूर्वी श्री. बोर्डे 20:10

श्री. किरण पावसकर ....

फक्त दुरूस्त करून चालणार नाही. कारण 120, 180 चौ.फू.च्या घरामध्ये त्यांना ठेवून त्यांची पुढील पिढी काम करू शकणार नाही. ते तुमचे सरंक्षणाही करू शकणार नाहीत. कारण त्या पोलिसांचे लक्ष आपल्या घरी असणार. तुम्ही सांगणार आमचे संरक्षण करा. परंतु, हे होऊ शकणार नाही. लालफितीमध्ये अडलेल्या फाईल्स बाहेर काढून पोलीस दलासाठी आपण कोणती सक्षम भूमिका घेणार आहात. पोलिसांच्या संदर्भात सक्षम भूमिका घेण्याची गरज आहे. मुंबईमध्ये जागा नाही असे आपण म्हणतो. परंतु, मुंबईत जवळवास 300 अशी मैदाने असतील की, जी आरक्षित आहेत. 300 आरक्षित मैदानांवर लोकप्रतिनिधींनी आपले क्लब बांधले आहेत. आपण या संदर्भात पाहण्याची गरज आहे. आपण ती जागा लोकांच्या मनोरंजनासाठी, क्रीडांगण म्हणून सांभाळेन आणि उरलेला भाग डेव्हलप करीन, त्याचा गोरगरिबांना फायदा होईल, असे सांगून घेतो.

सभापती महोदय, गोरेगावचे प्रबोधनकार क्रीडा संकुल आहे, अंधेरीचे क्रीडा संकुल आहे, मंडपेश्वर आहे, पोईसर जिमखाना आहे, दहिसर स्पोर्ट क्लब आहे, मातोश्री क्लब आहे. या स्पोर्टच्या जमिनी महानगरपालिकेच्या आहेत. आपण महानगरपालिकेकडून क्लब घेतो आणि फाईव्ह स्टार क्लब बांधतो. आपण कोणती क्रीडांगणे ठेवली आहेत, कोणाला खेळण्यासाठी क्रीडांगणे देत आहात, आपण गेल्या 10-15 वर्षांत किती दर्जेदार खेळाडू तयार केले ? काहीही झाले की, आपण श्री. सचिन तेंडूलकर यांचे नाव घ्यायचे आणि बाकीच्या सर्वांना झाकून ठेवायचे, हे ठीक नाही. फक्त आमचा मुंबईचा सचिन तेंडूलकर, असे म्हणायचे योग्य आहे का ? आपण नवीन खेळाडूंना तयार केले पाहिजे. कबड्डीमध्ये किती तरी खेळाडू निघून गेले, हॉकीमध्ये किती तरी खेळाडू निघून गेले, याची आपल्याला माहितीच नाही. आपण फुटबॉलच्या खेळासाठी किती खेळाडू तयार केले, खेळाडूंसाठी आपले धोरण काय आहे ? आपण अगोदर मुंबई भूषण, मुंबई रत्न अगोदर देत होता. आपण कित्येक वर्षे ते खेळाडूंना दिलेले नाही.

सभापती महोदय, महापौर बंगल्याची अवस्था वाईट आहे. महापौर बंगल्याच्या मागच्या बाजूची इमारत पावसाळ्याच्या लाटांमुळे तुटून जाईल. आपण महापौर बंगल्याला हेरिटेजमधून काढू शकला नाही. महापौरांना नगराचा प्रथम नागरिक म्हटले जाते. मग तुम्ही कोणाला संरक्षण देणार

..4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहात ? आपण महापौर बंगल्याच्या समोरचा भाग तसाच ठेवा. माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, महापौर बंगल्याचा दर्शनी भाग आहे तसाच ठेवा आणि मागे रिपेअर करा. कारण हेरिटेजसाठी करायचे असेल तर महापौर बंगल्याला तरी वाचवा.

सभापती महोदय, एक जमाना असा होता की, तेथे राज्यातील खेळाडू, देशातील खेळाडू, इतर देशाचे खेळाडू पारितोषिक मिळाल्यानंतर यायचे. चांगले गायक, चांगले कलाकार यांना आणून तुम्ही त्यांना गौरवपूर्ण वागविले. मला वाटत नाही की, गेल्या 10 वर्षांत कोणाचे गौरव झ ाले. खेळाडू, कलावंत यांचा कोणाचा गौरव झाल्याचे मला तरी आठवत नाही. श्री. सुधीर भाऊ महापौर असताना त्यांनी ते काम केले आहे. तसेच, श्री. मनोजींनी देखील ते काम केले आहे. महापौर बंगल्याचा लौकिक आहे, मुंबईचा लौकिक आहे, तो लौकिक वाढविण्यासाठी आपण काय करणार आहात ? प्रत्येक अर्थसंकल्पात या संदर्भात तुम्ही तरतूद दाखविली आहे, मात्र काहीही केलेले नाही, याचे मला दुःख होत आहे. आपण कामासाठी पैसा दाखविला आहे आणि ठैकेदारांना दिला आहे. आपण या ठेकेदारांकडून पैसे परत घेणार आहात का, काळ्या यादीत टाकलेल्या लोकांना पुन्हा कामे दिली आहेत, त्यांच्याकडून तरी पैसा वसूल करणार का ? मुंबईतील जनतेला सुख-सोयी देण्यासाठी आपण भविष्यात काय करू शकतो, याचाही विचार करण्याची गरज आहे. मी या निमित्ताने कवितेच्या दोन ओळी वाचून दाखवितो.

"मंबई आमचा जीव, मुंबई आहे आमची शान,
राज्याची राजधानी आणि देशाच्या आर्थिक राजधानीचा मान,
झाले होते शेकडो हुतात्मे, मुंबईसह महाराष्ट्र एक करण्यासाठी,
राहिली मुंबई कायम एकसंघ, जरी झाले प्रयत्न ती तोडण्यासाठी,
सामावून घेतले तिने सर्वांना, झाली ती सर्वांची माय,
सर्व सामान्यांची मुंबई जाऊन आता होते ती हाय-हाय,
आले सगळे लोंढे मुंबईत, वाढत चालला तिच्यावरचा भार,
समस्याही आता, सगळ्या वाढत चालल्यात फार,
पायाभूत सुविधा दळववळण सगळ्याच समस्या चालल्यात वाढत,

..5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

सरकारला कसल्याच या गोष्टींचा, काहीच फरक नाही पडत,
सरकारने आता तरी द्यावे, सगळ्याच समस्यांकडे लक्ष थोडं,
ठेवली सगळयांचीच विकासाची इच्छा, तर अडणार नाही कामाचे घोडं,
आपल्या मुंबईच्या भल्यासाठी, आता चला दाखवू परत एकदा एकजूट,
अशी ठेवू राज्याची एकी की, पाडू शकणार नाही कोणी फूट,
जेव्हा सगळ्या योजना चांगल्या योजना, मुंबईकडे पाहून इतरांना कळतील,
खूप साऱ्या जनतेचे आशीर्वाद आपल्याला नक्कीच मिळतील."

सभापती महोदय, कल्याण, मुंबई येथील श्री. आशिष दोशी यांनी ही मुंबईवरील कविता दिली होती, ती मी मुद्दाम वाचून दाखविली. परंतु, सभापती महोदय, कविता वाचून सुधारणारे हे नाहीत. ज्यांच्या हातामध्ये मुंबई मनपा आहे, त्यांना शेरोशायरी, कविता सांगून काही होणार नाही. कारण 18-20 वर्षे त्यांच्यावर साचलेला मळ असाच ताबडतोब कोणत्याही साबणाने निघणार नाही. त्यांना न्याय द्यायचा असेल तर शासनाला कुठेतरी कठोर भूमिका घ्यावी लागेल. फक्त आरोप करीत आहोत, असे मी म्हणणार नाही. मुंबई मनपाने त्यांच्या अर्थसंकल्पामध्ये प्रत्येक कामासाठी दाखविलेल्या रकमेचा हिशेब जनतेला मिळाला पाहिजे आणि हा हिशेब मिळवून देण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी. माननीय मंत्र्यांकडून अर्थसंकल्पावर काही तरी उत्तर मिळावे, एवढी अपेक्षा करतो. धन्यवाद !

----

( नंतर श्री. रोझेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, चर्चेला सुरुवात होऊन बराच वेळ झाला आहे. येथील लांबलचक भाषणे मी ऐकली आहेत. या सर्व भाषणातून आणि चर्चेतून जे मुद्दे उपस्थित करावयाचे होते, ते बहुतेक मुद्दे उपस्थित झाले आहेत. मोठे भाषण करुन सभागृहातील सन्माननीय सदस्यांना तिष्ठत बसविण्याची माझी मनस्थिती नाही. इंग्रजीमध्ये जसे म्हटले जाते की, "Brevity is a sole of wit." याचा अर्थ, जे काही सांगावयाचे आहे ते थोडक्यात सांगा, त्यामध्येच शहाणपण आहे. त्यानुसार मी 5 मिनिटात माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा संदर्भ घेऊन तो एक्सपांड करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. असे करीत असताना थोडा वेळ लागला तर चालेल ना ? कारण, हा फार महत्त्वाचा विषय आहे. मुंबईच्या विकासासाठी एक समिती स्थापन करण्याची घोषणा महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. जशी त्यांनी घोषणा केली तशीच मुंबईच्या विकासाच्या संदर्भाची घोषणा आणि प्लॅनिंग श्री.नितीन गडकरी यांनी जाहीर केले. त्याचबरोबर श्री.नितीन गडकरी यांच्या भाषणामध्ये मुख्यमंत्र्यांमार्फत हा कार्यक्रम राबविला जाईल किंवा काय, याचा उल्लेखही नव्हता. त्यामुळे मुंबईच्या विकासाची स्पर्धा भारतीय जनता पक्षामध्ये श्री.नितीन गडकरी आणि श्री.देवेंद्र फडणवीस यांच्यामध्ये लागलेली आहे की काय, अशी थोडीशी शंका वाटत आहे. तशी स्पर्धा कदाचित नसेलही.

सभापती महोदय, काल, परवा टाईम्स ऑफ इंडिया या वर्तमानपत्रात श्री.एकनाथराव खडसे यांच्यावर एक राईटअप आलेला आहे. या राईटअपमध्ये ज्या भाषणाचा संदर्भ घेतला आहे, त्या भाषणाच्या वेळी मी सभागृहात उपस्थित होतो. फडणवीस साहेब त्यांच्या बाजूला बसले होते. श्री.खडसे साहेब जे बोलले त्याचा रेफरन्स घेऊन हा राईटअप आलेला आहे. त्यामध्ये मुद्दा असा रेज केला आहे की, विधानपरिषदेमध्ये श्री.एकनाथराव खडसे असे म्हणाले की, "मी काही मुख्यमंत्र्यांपेक्षा कमी नाही. लोकांनी माझ्यावर टिका केली. परंतु, या सभागृहाचा नेता करुन माझा मानसन्मान वाढविला आहे." या राईटअपचे कन्क्ल्युजन असे होते की, खडसे साहेबांनी अद्याप

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर...........

होप्स सोडलेले नाहीत. Whether it is in the making process? अशी थोडीशी शंका निर्माण होते. जर मेकिंगमध्ये असेल तर आम्ही वाट बघू. पण तोपर्यंत घोषणा करुन लोकांमध्ये संभ्रम निर्माण करु नका, अशा प्रकारची माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी आपल्या भाषणात आदरणीय नेते श्री.शरद पवार साहेबांनी पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्राचा उल्लेख केला आहे. ते पत्र प्रसिध्द झाले आहे आणि मी ते वाचलेले आहे. त्या पत्रामध्ये पवार साहेबांनी एक गोष्ट पॉईंट आऊट केली आहे की, "मी सुध्दा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो, आपणही गुजरात राज्याचे मुख्यमंत्री होता. अशा पध्दतीच्या समितीचे अध्यक्ष पंतप्रधानांनी होणे बरोबर नाही. उत्साहाच्या भरात महाराष्ट्राच्या तरुण मुख्यमंत्र्यांनी जर अशा प्रकारची बाजू मांडली असेल, मागणी केली असेल तर त्याकडे लक्ष देऊ नये, असे मला वाटते." अशा प्रकारचा एक टोमणा किंवा अशा प्रकारची बाजू खुद्द पवार साहेबांनी मारलेला आहे. एकंदरीत पाहता देशातील वातावरण आणि भारतीय जनता पक्षामधील आरएसएस आणि त्यांची प्रशासकीय मंडळी, मोदी यांच्या बरोबरचे लोक यांच्यामध्ये द्वंद्व चालले आहे आणि त्याची ही परीणती आहे की काय ?

सभापती महोदय, श्री.नितीन गडकरी यांनी बोरिवली पासून शिवडी पर्यंत रेल्वेचा भुयारी मार्ग आणि माहीम पासून कुलाबा पर्यंत भुयारी मार्ग घोषित केला आहे आणि त्यासाठी 90 हजार कोटी रुपयांचे बजेटही जाहीर करुन टाकले आहे. पण हे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना माहितच नाही. ज्याप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, दिल्लीमध्ये पंतप्रधान कार्यालयाला महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी अशी काही घोषणा केल्याचे माहीतच नव्हते. त्यामुळे यांच्यामध्ये कोऑर्डिनेशन आहे किंवा नाही, याबद्दलची शंका तयार होते. हे सर्व केओटिक आहे आणि त्याला शिवसेनेचे राजकारण खतपाणी घालत आहे, असे दिसते.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आजचे कामकाज पूर्ण होणार नाही. ते उद्यावर जाणार आहे. ही चर्चा आज आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना थोडे बोलू द्यावे.

...3....



SRR/ प्रथम श्री.मंगेश....... 20:20

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आज सकाळी 10.00 वाजेपासून आपण बसलो आहोत, याचाही विचार आपण सर्वांनी करावा.

प्रा.जनार्दन चांदूरकर : सभापती महोदय, देशात गोंधळाचे वातावरण आहे. राजकीय गोंधळ चालला आहे आणि त्या गोंधळात महाराष्ट्र वाहून चालला आहे की काय, अशी शंका येते. सरकार चालविण्यासाठी स्टॅबिलिटी आहे, असे जनतेला वाटले पाहिजे. परवा सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी भाषण करीत असताना असे सांगितले की, शिवसेनेने राज्यपालांचे वाहन अडविले आणि नंतर शिवसेना सत्तेत सामील झाली. त्यामुळे जोपर्यंत हे मनाने एक होत नाहीत, त्यांच्यामध्ये कोॲलिशन होत नाही, तोपर्यंत हे सरकार यशस्वी होऊ शकणार नाही. हा महाराष्ट्र चांगल्याप्रकारे चालवावा, अशा माझ्या त्यांना शुभेच्छा आहेत.

सभापती महोदय, देशाचे माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी संपूर्ण देशाला स्वच्छतेची हाक दिली आहे आणि प्रत्येकाने स्वच्छतेच्या कामामध्ये लागले पाहिजे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्याला माझा पूर्णपणे पाठिंबा आहे. ही मोहीम मुंबई महानगरपालिकेमध्ये राबविण्यासाठी तेथील आयुक्तांनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना बोलाविले आणि सांगितले की, सायंकाळी 6.00 वाजता कार्यालय सुटते, मी आपल्याला दुपारी 4 वाजताच सुटी देतो. परंतु, सायंकाळी 4.00 वाजे पासून सायंकाळी 6.30 वाजेपर्यंत आपण कार्यालयाची स्वच्छता केली पाहिजे. यामुळे तेथील कर्मचारी परेशान झाले आहेत. अशी जर तुम्ही सक्ती करु लागला तर ते बरोबर नाही. त्यांनी एक परिपत्रक काढले आहे. दुसरे असे की, हा डिसिजन घेण्यापूर्वी आणि लोकांच्या भावनांशी खेळण्यापूर्वी सध्याची जी एक्झिस्टिंग प्रणाली आहे, त्याचे काय करणार आहात ? आज सफाई खात्यामध्ये हजारो, लाखो कर्मचारी काम करीत आहेत.

यानंतर श्री.वि.खर्चे......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जनार्दन चांदूरकर..

स्वच्छता मोहीम राबविण्याची घोषणा माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी यांनी केली, त्याबाबत मी त्यांना सलाम करतो. ही घोषणा केल्यानंतर साफसफाई करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारावरील जो पैसा वाचणार आहे, त्यामुळे जास्त फरक पडणार आहे काय ? याबाबत शासनाने काही अल्टरनेट कार्यक्रम घोषित केला आहे काय ? पूर्वीच्या तत्वज्ञानानुसार एक बाब अशी होती की, मी जेव्हा नवीन शर्ट विकत घेतो, तेव्हा जुन्या शर्टाचे मी काय करणार असा प्रश्न स्वत:ला विचारावयाचा असतो. त्यानंतर त्या पूर्वीच्या शर्टाचे काय करणार ?

मंत्री महोदय, सरकार चालवित असताना हाताच्या बोटावर इशारे करुन चालत नाही. मुख्यमंत्री महोदयांनी मुंबईसाठी समिती स्थापन करण्याच्या संदर्भात जे वक्तव्य केले, त्यामुळे मुंबई महानगरपालिका व परिसरात विरोधाचे वातावरण तयार झाले आहे. याचा दुसरा भाग असा आहे की, संघ राज्याच्या कल्पनेवर मोदीजी नेहमी भारतीय संविधानाच्या विरोधात बोलत होते. परंतु आता ते निवडून आल्यावर खायचे दात वेगळे आणि दाखवायचे दात वेगळे आहेत. त्यांनी भारतीय जनता पक्षाच्या अजेंड्याप्रमाणे काम सुरु केले आहे. मुंबई शहरात व परिसरात तीन कोटी लोक राहतात. रस्त्यांच्या रुंदीला मुंबईच्या लोकसंख्येने भागले तर वन बाय वन स्क्वेअर फूटावर 10 लोकांना उभे रहावे लागते. मुंबई शहराचा विकास करण्यासाठी आरएसएसचे कार्यक्रम राबविण्याचे सोडून द्यावेत. शहराच्या विकासाची कास धराल तर आम्ही तुमच्या बरोबर राहणार. सरकार फक्त घोषणा करुन जनेतची दिशाभूल करणार असेल तर आम्ही सरकारला रस्त्यावर फिरु देणार नाही, असा इशारा मी देतो व माझे भाषण संपवितो.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, कोणत्याही सन्माननीय सदस्याचा मी अवमान करु इच्छित नाही. प्रा. जनार्दन चांदूरकर यांचे भाषण ऐकताना मी या ठरावातील विषयाकडे पाहत होतो. सन्माननीय सदस्य मोदीजी, गडकरी, फडणवीस, खडसे, आरएसएस, हाफ चड्डी, शर्ट असे बोलत होते, हे कोणत्या विषयाला धरुन आहे. सन्माननीय सदस्यांना भाषण करण्याचा पूर्ण हक्क आहे. सरकार आपणाकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करीत आहे. मार्गदर्शन करण्यापेक्षा आपण रस्त्यावर आल्यास फिरु देणार नाही अशी भाषा करीत आहात, यासाठी आम्ही देखील तुमच्याशी दोन हात करण्यास मजबूत आहोत.

सभापती महोदय, माझा मुद्दा एवढाच आहे की, विषय मांडत असताना थोडे इकडे तिकडे होते ते मी समजू शकतो. सभागृहात बसून मी भाषणाचे टिपण घेत आहे. प्रस्तावातील विषयासंदर्भात सरकारला मार्गदर्शन करणारे भाषण आपण करावे अशी आपल्या सारख्या ज्येष्ठ व अनुभवी सन्माननीय सदस्यांकडून मी अपेक्षा करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आक्षेप घेतला की, भाषणात अशा प्रकारे नावे येऊ नयेत. माननीय श्री.नरेंद्र मोदी हे देशाचे पंतप्रधान आहेत, माननीय श्री.नितीन गडकरी केंद्रीय मंत्री आहेत, माननीय श्री.देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री आहेत, त्यांनी दिलेल्या प्रतिक्रिया भाषणाच्या ओघात येतीलच. त्या शिवाय राज्याचा विकास कसा होईल, यामध्ये वेगळे असे काहीही नाही.

-------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (राज्यपालांद्वारे नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 259 अन्वये सभागृहात अंतिम आठवडा प्रस्ताव मांडण्यात आला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावात अनेक महत्वाच्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे. मुंबई शहर जगातील व देशातील लोकांच्या आवडीचे व आकर्षणाचे केंद्र आहे. या शहराची परिस्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. या निमित्ताने मला एक आठवण करुन द्यावयाची आहे की, 10 ते 15 वर्षापूर्वी आपण दिल्ली शहर पाहिले असेल, आता दिल्ली शहराचा पूर्णपणे कायापालट झाला आहे. दिल्ली शहरात वाहतुकीच्या समस्या मोठ्या प्रमाणात होत्या. एसटी बसच्या टपावर माणसे बसून प्रवास करीत होती. त्या बसमधून धूर निघत होता, तेथे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होते. दिल्लीच्या रस्त्यावर खरेदीसाठी फिरला तर सगळीकडे जनरेटर व त्यातून प्रचंड धूर बाहेर येत होता. फटफटी सारख्या ॲटोरिक्षा होत्या, त्यातून नियमित धूर बाहेर सोडला जात होता. दिल्ली शहर प्रदूषण व प्रचंड वाहतुकीची समस्या असलेले होते.

सभापती महोदय, दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री श्रीमती शीला दिक्षीत यांनी खरोखर दहा वर्षात दिल्ली शहराचा कायापालट केला. या शहराचा प्रचंड विकास केला आहे. सिंगापूरच्या धर्तीवर मेट्रो रेल्वे तयार केल्यामुळे वाहतुकीचे समस्या संपली आहे. मुंबई शहराबाबत दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, लोकन ट्रेनच्या प्रवासात दररोज 15 माणसे अपघातग्रस्त होतात. मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मिरा भाईंदर, भिवंडी, कल्याण व अंबरनाथ-बदलापूर अशा 9 महानगरपालिका परिसरात लोकवस्ती वाढलेली आहे, मोठी शहरे विकसित झाली आहे. देशातून व महाराष्ट्रातून अडीच कोटी लोक या शहरात वास्तव्य करीत आहेत. रोजी रोटीसाठी हे लोक लोकल ट्रेनने नियमित प्रवास करतात. पश्चिम रेल्वे, मध्य रेल्वे, हार्बर रेल्वे यामधून प्रवास करतांना अक्षरश: शेळ्या मेंढ्या कोंबत नसतील इतक्या वाईट अवस्थेत लोकांना कामाच्या ठिकाणी जावे लागते. या तिन्ही मार्गावर रोज 15 माणसे अपघातग्रस्त होतात. दरवर्षी 4500 माणसे मुंबई शहरातील लोकल प्रवासात मृत्यू पावतात. अनेक लोक हातपाय गमवितात. हे दूरदर्शनवर आपणाला बघायला मिळते. याबाबत कोणी प्लॅटफार्मची उंची मोजतात, सूचना करतात. श्री.केतन गोराडीया या संवेदनशील इंजिनिअरने आपल्या पूर्ण तंत्रज्ञानाचा उपयोग करुन मुंबई शहरात व परिसरात राहणाऱ्या अडीच

..4..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण..

कोटी लोकांसाठी अत्यंत चांगल्या प्रकारे स्वत:च्या खर्चाने वाहतूक समस्येवर अत्यंत चांगला प्लॅन तयार केला आहे. तो प्लॅन शासनाने राबविला असता तर त्यावेळी 5 हजार कोटी रुपयांत पूर्ण झाला असता. आता त्यासाठी आठ हजार कोटी रुपये लागणार आहेत. या प्लॅनकडे शासन पूर्णपणे दुर्लक्ष करीत आहे. शासन आता बुलेट ट्रेन सुरु करणार आहे. ही बुलेट ट्रेन मुंबईवरुन अहमदाबादला जाणार आहे. या बुलेट ट्रेनची आवश्यकता आहे काय ? मुंबई शहरात 4500 माणसे वर्षाला अपघातग्रस्त होतात. त्या लोकांचा जीव वाचविण्यासाठी एखादा प्रोजेक्ट तयार केला तर तो फायद्याचा ठरेल, याकडे शासन लक्ष देत नाही. सर्वात मोठी वाहतुकीची समस्या मुंबई शहरात निर्माण झाली आहे.

सभापती महोदय, मुंबईतील बीएसटी सेवा मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारित आहे. त्या बीएसटीची अत्यंत दुरावस्था झालेली आहे. मुंबईच्या बीएसटी बसेस खूप चांगल्या आहेत असे आपण म्हणतो. बीएसटीचे दर वाढविण्याचा प्रस्ताव महानगरपालिकेने संमत केला आहे. आता डिझेलचे भाव कमी झाले असताना मुंबई महानगरपालिका बीएसटीचे तिकिट दर वाढवीत आहे. हे दर लोकांना परवडणारे नाहीत. पूर्वी बीएसटीचे तिकिट 10 ते 25 पैसे होते. आज दहा ते 15 रुपये आहेत. तिकिट दरात आणखी वाढ होणार असेल तर सर्व सामान्य माणसाला बीएसटीच्या बसने प्रवास करणे कठीण होणार आहे. मुंबई शहराचे अनेक प्रश्न आहेत. त्यातील महत्वाचे काही विषय मी मांडणार आहे.

सभापती महोदय, एमएमआरडीएवर नेहमी टीका केली जाते. एमएमआरडीए कशाला पाहिजे असे म्हटले जाते. मी स्वत: महानगरपालिकेत काम केले आहे. स्व.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना सन 2006 मध्ये मेट्रो प्रोजेक्ट सुरु करण्याचा निर्णय त्यांनी घेतला होता. मला आठवते की, मेट्रो रेल्वेच्या कोणत्याही प्रकल्पाला महानगरपालिकेने तातडीने परवानगी दिली नाही. मुंबईत मेट्रो सुरु करण्यासाठी महानगरपालिकेकडून मेट्रोच्या रेल्वे स्टेशनसाठी व कारशेडसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत महानगरपालिका नेहमी आडमुठे धोरण स्वीकारीत होती. त्यामुळे मेट्रो रेल्वे सुरु होण्यासाठी 2014 वर्ष उजाडले आहे. परवाच्या दिवशी मी मेट्रो रेल्वेने प्रवास

..5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण..

केला, ही ट्रेन अत्यंत छान आहे. मेट्रो रेल्वे सारखी लोकल व्यवस्था सुरु केली तर त्याचा फायदा होईल, दिल्ली येथे मेट्रो रेल्वे सुरु केली आहे. तशीच मुंबईची लोकल सेवा होऊ शकते. मला दुर्दैवाने सांगावेसे वाटते की, मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबईतून 45 टक्के महसूल केंद्र शासनाला मिळतो. संपूर्ण देशातून जास्त महसूल मुंबई शहर देते. असे असताना दिल्ली शहराला सर्व सोई उपलब्ध करुन देण्यासाठी निधी पुरविला जातो. परंतु केंद्र शासनाकडून मुंबई शहराकडे दुर्लक्ष केले जात आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील झोपडपट्टयांचा विषय अतिशय गंभीर आहे. मुंबईतील धारावी झोपडपट्टी ही संपूर्ण आशिया खंडात सर्वात मोठी आहे. ती अत्यंत नावाजलेली झोपडपट्टी आहे. धारावी सारख्या अनेक झोपडपट्टया आज मुंबई शहरात आपणाला बघायला मिळतात.

या नंतर श्री.मा.शिगम..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. व्ही. खर्चे 20:40

श्रीमती विद्या चव्हाण...

चेंबूर, कुर्ला, मालाड या ठिकाणी असलेल्या झोपडपट्टयातून लोक अत्यंत हलाखीच्या परिस्थितीमध्ये रहात आहेत. या लोकांना असे का रहावे लागत आहे ? कारण आज मुंबई शहरामध्ये मध्यमवर्गीयांना परवडणारी घरे नाहीत. एखादा माणूस मुंबईमध्ये नोकरीच्या निमित्ताने आला आणि त्याला 400 चौ.फुटाचे घर घ्यावयाचे असेल तर त्यासाठी त्याला 40 ते 50 लाख रुपये मोजावे लागतात. एवढे पैसे मध्यमवर्गीय माणूस कोठून आणणार ? मुंबई शहर आणि आसपासच्या परिसरामध्ये मध्यमवर्गीयांना परवडणारी घरे बांधली पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये अनधिकृत बांधकामे मोठ्या प्रमाणावर होत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने रात्री रस्त्यावर राहाणाऱ्या लोकांसाठी शेल्टर उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिलेले आहे. दिल्ली सरकारने गरिबांसाठी शेल्टरची सोय निर्माण केलेली आहे. अनेक कष्टकरी आणि गरीब लोक शहरामध्ये साफसफाईची, कचरा वेचण्याची कामे करीत असतात. हे लोक झोपडपट्टयातून किंवा पदपथावर राहातात. त्यांना शेल्टरची, शौचालयाची, आंघोळीच्या पाण्याची व्यवस्था नसते. मुंबई महानगरपालिकेचे 36 हजार कोटी पर्यंतचे बजेट आहे. 9 राज्याचे बजेट नाही इतके बजेट मुंबई महानगरपालिकेचे आहे. इतके बजेट असताना नागरी सुविधा देण्यामध्ये मुंबई महापालिका कमी पडलेली आहे. आपण असे म्हणतो की, हा युपीवाला आहे, हा बिहारी आहे. हे लोक पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईमध्ये येऊन कष्टाची कामे करीत असतात. मुंबई शहरातील मोठमोठ्या इमारतीच्या बांधकामावर, रस्त्याच्या बांधकामावर आंध्र प्रदेश, ओरीसा इत्यादी राज्यातील लोक काम करीत असतात. मुंबईतील मराठी माणूस अशा प्रकारचे काम करीत नाही. मुंबईतील मराठी टक्का हा दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. मुंबईतील परळ, लालबाग, या गिरणगावात जवळपास 3 ते 4 लाख गिरणी कामगार रहात होते. हे गिरणी कामगार उद्ध्वस्त झालेले आहेत. आघाडी सरकारने 9-10 हजार गिरणी कामगारांना घरे दिली. परंतु सर्वच गिरणी कामगारांना घरे दिली पाहिजेत. मागील अनेक वर्षापासून मुंबई महापालिकेची सत्ता युतीच्या हातामध्ये आहे. परंतु त्यांनी मुंबई शहरामध्ये आवश्यक त्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याकडे दुर्लक्ष केलेले आहे. मुंबई शहरामध्ये घरांचा प्रश्न आहे, पाण्याचा प्रश्न आहे, शैचालयाचा प्रश्न आहे. मुंबई शहरामध्ये पाणीपट्टी आकारली जाते, सिवरेज टॅक्स आकारला जातो. सिव्हरेज

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

टॅक्स आकारला जात असेल तर महानगरपालिकेने शौचालयाची सोय देखील उपलब्ध करुन द्यायला पाहिजे. परंतु ती उपलब्ध करुन दिली जात नाही हे लोकांचे दुर्दैवे आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये के.ई.एम., नायर, कुपर, भगवती अशी नावाजलेली रुग्णालये आहेत. या रुग्णालयांची आता दुर्दशा झालेली आहे. त्या रुग्णालयातून रुग्णांना दाखल करुन घेण्यास जागा उपलब्ध नाही. मुंबई शहरामध्ये 227 वॉर्ड आहेत. प्रत्येक वार्डामध्ये आरोग्य केंद्र आहे. हे आरोग्य केंद्र सुस्थितीत केले, तेथे पॅथालॉजिची सुविधा उपलब्ध करुन दिली तर लोकांना तेथे चांगल्या प्रकारचे उपचार मिळू शकतील. मुंबईमध्ये डेंग्यू, मलेरिया, लेप्टोपायरसीस या सारख्या रोगांची साथ फैलावत असते. लोक अंगावर ताप काढतात आणि परिस्थिती गंभीर झाली की रुग्णालयामध्ये धाव घेतात. झोपडपट्टीमध्ये रहाणारे लोक बोगस डॉक्टरचे उपचार घेतात. मुंबईतील प्रत्येक वार्डातील लोकसंख्या जवळपास 1 लाखाच्या आसपास असते. महिलांना प्रसूतीसाठी जवळ रुग्णालय नाही. या सुविधा आरोग्य केंद्रामध्ये उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक वार्डातील आरोग्य केंद्र सुस्थितीत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, नाले सफाईवर 100-100 कोटी रुपये खर्च केले जातात. परंतु नाल्यातील गाळ काही निघालेला दिसत नाही, नाले साफ झालेले दिसत नाहीत. मुंबईतील मिठी नदीच्या साफसफाईसाठी 900 कोटी रुपये खर्च करण्यात आले. परंतु मिठी नदीला आज देखील गटाराचे स्वरुप प्राप्त झालेले आहे. पवई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानावर कोटयवधी रुपये खर्च केलेले असून देखील ते सुस्थितीत नाही. अशा अनेक गोष्टीवर काम करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये गोरेगाव येथील डेपोच्या ठिकाणी फर्निचरवाल्याची दुकाने पहायला मिळातात. पूर्वी त्या ठिकाणी भंगारवाल्यांची दुकाने होती. भंगारवाल्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण करुन भंगाराची दुकाने थाटलेली आहेत. आज मुंबईतील कष्टकरी माणूस मुंबईमध्ये राहाण्यासाठी साधे घर घेऊ शकत नाही. परंतु भंगारवाल्यांनी मात्र शासनाच्या जागा गिळंकृत केलेल्या आहे. याबाबतीत तक्रारी करुन देखील ही अनधिकृत दुकाने पाडण्यात आलेली

..3..



MSS/ पूर्वी श्री. व्ही. खर्चे 20:40

श्रीमती विद्या चव्हाण...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

नहीत. हप्ते घेऊन त्यांना संरक्षण देण्यात येते आणि मुंबईतील मराठी माणसाला मात्र मुंबई बाहेर हुसकावून लावण्यात येते. मराठी माणसाला मुंबईतून हुसकावून  लावण्याचे काम केले जात आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये जी  कामे केली जातात त्यावर देखरेख करण्यासाठी व्हिजिलन्स कमिटी आहे. 500 कोटी रुपये खड्डे बुजविण्याच्या कामावर खर्च केले जातात. गणेशोत्सव आला की हे खड्डे बुजविण्याचे काम सुरु होते. परंतु हे काम ठेकेदाराने व्यवस्थित केलेले आहे की नाही हे व्हिजिलन्स कमिटी किंवा स्टँडिंग कमिटी पहात नाही.

सभापती महोदय, आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी मुंबईच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांना पत्र दिले आहे. त्यांनी असे सांगितलेले आहे की, मुंबईवर लक्ष देण्यापेक्षा भारतातील अन्य मोठया शहराकडे लक्ष द्यावे. मुंबईकडे लक्ष देण्यास आम्ही समर्थ आहोत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, कॉमरेड डांगे या नेत्यांनी मुंबईसाठी लढा दिला. मुंबई महाराष्ट्रामध्ये यावी यासाठी 106 लोकांनी हौतात्म्य पत्करले आणि मोरारजी देसाईंचा डाव हाणून पाडला. आता ही मुंबई जर कुणी दुसऱ्याच्या घशात घालण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो डाव देखील आम्ही हाणून पाडू एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

----

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे. आतापर्यंत या सभागृहामध्ये प्रत्येक अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा करीत असताना महानगरांच्या प्रश्नाबाबत चर्चा झाली. परंतु महानगरांचे जेवढे प्रश्न आहेत तेवढेच नगरपालिकांचे सुध्दा प्रश्न आहेत. दुर्दैवाने महानगरांच्या प्रश्नाला प्राधान्य मिळते. महापालिकांच्या प्रश्नावर चर्चा होते. परंतु अ, ब, क व ड नगरपालिकांच्या आणि नगर पंचायतीच्या प्रश्नावर चर्चा होत नाही. शहरी भागाचे विस्तारीकरण होत आहे याबद्दल कोणाचे दुमत असणार नाही. जवळजवळ 48 ते 50 टक्के शहरीकरण झाल्याचे आपण मान्य करतो. अर्थसंकल्पाचा विचार केला तर ग्रामीण भागासाठी जेवढी तरतूद केली जाते तेवढी तरतूद शहरी भागासाठी केली जात नाही. शहरी भागांचे एवढे प्रश्न असताना अर्थसंकल्पामध्ये नगरपालिकांसाठी, शहरी भागांसाठी भरीव तरतूद करणे ही काळाची गरज आहे.

सभापती महोदय, महानगरांच्या प्रश्नावर आपण चर्चा केली. नगरपालिकांची परिस्थिती अशी आहे की, रोज किंवा एक दिवसाआड नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याची खुर्ची जप्त करण्याचे आदेश कोर्टाकडून दिले जातात. एवढया मोठया प्रमाणात कोर्ट केसेस सुरु आहेत. कर्मचाऱ्यांची मोठया प्रमाणात कमतरता आहे. आकृतिबंध 15 वर्षापूर्वी मंजूर करण्यात आला होता. गावे वाढली, विस्तार झाला, शहर मोठे झाले परंतु कर्मचारी शहराच्या मानाने अत्यंत कमी आहेत. आज तांत्रिक कर्मचारी पुरेसे नाहीत. महाराष्ट्रामधील 80 टक्के नगरपालिकांमध्ये एक-एक अभियंता कार्यरत आहेत. शहराचा विस्तार पाहता एक अभियंता कशा प्रकारे काम करु शकतो, लोकप्रतिनिधींचे समाधान कशा प्रकारे करु शकतो, प्रशासनाचे काम कसे होऊ शकते? त्यामुळे नगरपालिकेमध्ये आरोप प्रत्यारोप सातत्याने सुरु असतात. या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी नगरपालिकांचा सुध्दा महानगरांसारखा गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. आकृतिबंध जो 15 वर्षापूर्वी मंजूर झाला तो नव्याने मंजूर करण्याची गरज आहे. तज्ज्ञ कर्मचारी वर्ग नगरपालिकेकडे नाही. दुर्दैवाने पदे भरण्याचे अधिकार नगरपालिकांना नाहीत. मध्यंतरीच्या काळात नगरपालिकांनी ठेकेदारी पध्दतीवर पदे भरण्याचा प्रयत्न केला, त्यावर अधिक्षेप आला. त्यामुळे कामकाज ठप्प झाले आहे.

सभापती महोदय, एकीकडे नगरपालिकेला रस्ते अनुदान दिले जाते. दलित वस्ती अनुदान दिले जाते. नागरी आदिवासी वस्ती अनुदान दिले जाते. मुख्यत: रोगराई पसरण्याचे कारण म्हणजे गटारीतून वाहणारे सांडपाणी हे आहे. छोट्या छोट्या गटारी करण्यास नगरपालिकेकडे पैसा नाही. सरकारचे अनुदान येत नाही. नगरपालिकेचे उत्पन्न कमी असल्यामुळे ते गटारी बांधू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकत नाहीत. त्यामुळे सांडपाणी तेथेच किंवा सोस खड्डयामध्ये टाकले जाते. छोटया छोटया गटारी करण्यासाठी प्रत्येक नगरपालिकेला काही ना काही वार्षिक अनुदान शासनाने दिले तर रोगराईला प्रतिबंध करता येईल.

सभापती महोदय, आरक्षणाच्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, फार मोठया प्रमाणात जमिनीचे आरक्षण आहे. प्रत्येक माणूस 10 वर्षाच्या वर आरक्षण झाले असेल तर तो नगरपालिकेला खरेदीच्या संदर्भात नोटीस देतो. नोटीस आल्यानंतर नगरपालिकेने कारवाई केली नाही तर हायकोर्टात जातो. हायकोर्टामध्ये जो माणूस केस दाखल करतो त्याच्या बाजूने निकाल लागतो. कारण आरक्षण ठेवून 10 वर्षे झालेली आहेत. नगरपालिकेने ती जमीन घ्यावयास पाहिजे किंवा नाकारली पाहिजे. आज जमिनीची किंमत कोट्यवधी रुपये झालेली असते. नगरपालिकेच्या अर्थसंकल्पात तेवढी तरतूद नसते, त्यामुळे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी बगिचा केला पाहिजे असे वाटत असूनही जमीन घेता येत नाही. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आरक्षण आहे, ती जमीन घेण्यासाठी शासनाने नगरपालिकांना अनुदान दिले पाहिजे. नगरपालिकांना पर्यायी निधी उपलब्ध करुन देणे ही शासनाची जबाबदारी आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. नगरपालिकांना सरकारने जास्तीत जास्त अनुदान देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, शहरांचे विस्तार वाढत आहेत. शहराच्या रस्त्यांची लांबी विचारात घेतली तर आमच्या नंदूरबार शहरामध्ये 150 कि.मी.चे अंतर्गत रस्ते आहेत. मात्र अनुदान अत्यंत अल्प मिळते. लोकांच्या मागणीप्रमाणे आम्ही रस्ते करु शकत नाही. रस्ते अनुदान सुध्दा शहराच्या भौगोलिक परिस्थितीप्रमाणे देणे ही काळाची गरज आहे. कोण अधिकारी केव्हा बदलतो, काय आदेश काढतो माहिती नाही. सफाई कर्मचारी लावावयाचा असेल तर 1000 लोकसंख्येमागे एक सफाई कर्मचारी मंजूर केला जातो. गावाची 50 हजार लोकसंख्या असेल तर 50 सफाई कर्मचारी मंजूर केले जातात. त्या संपूर्ण गावाची सफाई 50 कर्मचाऱ्यांमार्फत कशी होऊ शकते? लोकसंख्येचा निकष लावून संपूर्ण क्षेत्रात काम करणे शक्य होत नाही. सफाई कर्मचाऱ्यांबाबत सुध्दा नवीन आकृतिबंध तयार करुन प्रत्येक नगरपालिकांना तो लागू केला पाहिजे.

सभापती महोदय, पायाभूत सुविधांसाठी प्रत्येक नगरपालिकांचा आराखडा तयार केला पाहिजे. माझ्या शहराचा मी जागरुक लोकप्रतिनिधी होतो म्हणून मी पहिल्यांदा नंदूरबार शहरामध्ये पिण्याच्या पाण्याची योजना केली. नंतर भूमिगत गटारी तयार केल्या आणि त्यानंतर रस्ते तयार केले. त्यामुळे शहराची अपेक्षा पूर्ण करण्यामध्ये काही प्रमाणात यशस्वी झालो. नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये माझ्या पक्षाचे 37 पैकी 36 नगरसेवक निवडून आले. एवढे मोठे यश आम्हाला

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहराने दिले. शहरी जनतेच्या दृष्टीने नियोजनबध्द आणि दर्जेदार काम व्हावयास पाहिजे. त्या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत.

सभापती महोदय, सर्वच नगरपालिकांमध्ये भ्रष्टाचार सुरु आहे असे नाही. आमची नगरपालिका अबोव्ह टेंडर देत नाही. अंदाजपत्रकीय दरामध्ये काम दिले पाहिजे. आमच्या नगरपालिकेमध्ये 100 टक्के इन कमिंग कॉलची सुविधा असलेले फोन सुरु आहेत. गाडी सुध्दा ठेवलेली नाही. 15 वर्षात आम्ही 15 रुपये सुध्दा भत्ता घेतलेला नाही. नगरपालिकेचा कारभार चालविताना असा अनुभव असतो की, रोज सकाळी माणूस प्रश्न विचारतो, त्याच्या प्रश्नाला उत्तर दिले पाहिजे. नगरपालिकांना सुध्दा महानगरपालिकाचा दृष्टीकोन समोर ठेवून अनुदान दिले पाहिजे. आम्हाला मुंबईबद्दल आदर आहे. मुंबई बघण्यासाठी आमचा ग्रामीण भागातील माणूस येतो. मुंबई बघून तो चक्रावतो. मुंबईचा पोलीस त्याला पाहून त्याची गाडी थांबवितो. तो माणूस मुंबईवर तेवढेच प्रेम करतो. मुंबईच्या प्रश्नाबरोबर आमच्या नगरपालिकेतील प्रश्नाकडे सुध्दा तेवढयाच तत्परतेने बघितले पाहिजे.

सभापती महोदय, माननीय आदिवासी विकास राज्यमंत्री सभागृहात बसलेले आहेत. मंत्री महोदयांकडे मी एक प्रस्ताव दिला आहे. महाराष्ट्रातील आदिवासी क्षेत्रामध्ये शेडयूल्ड एरिया म्हणून राज्यामध्ये 10 नगरपालिका आहेत. त्या ठिकाणी आदिवासी विकास विभागामार्फत अनुदान मंजूर करुन देणे ही सरकारची जबाबदारी आहे. आज परिस्थिती अशी आहे की, कोणतीही योजना असेल, राज्यस्तरीय नागरी उत्थान योजनेमध्ये प्रस्ताव द्यावयाचा असेल आणि ती ब वर्ग नगरपालिका असेल तर 20 टक्के लोकवर्गणी भरावी लागते, क वर्ग नगरपालिका असेल तर 10 टक्के लोकवर्गणी भरावी लागते. आमच्या नंदूरबार जिल्हयामध्ये 3 नगरपालिका आहेत. ज्या आदिवासी क्षेत्रात दरडोई उत्पन्नामध्ये शेवटी आहेत. एवढया मोठया प्रमाणात मॅचिंग ग्रँट कुठून आणणार? उत्पन्न फार कमी आहे. त्यामुळे लोकवर्गणी भरु शकत नाही. म्हणून त्या गावांना योजनांपासून वंचित ठेवले जाते. आदिवासी विकास विभागाने फक्त 10 नगरपालिकांसाठी मॅचिंग ग्रँट उपलब्ध करुन द्यावी. नगरपालिकेला 5 टक्के लोकवर्गणीची सक्ती करावी. आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतीबाबत अट शिथिल केली आहे. नगरपालिकांबाबत पुनर्विचार करुन 5 टक्के अट ठेवावी आणि उर्वरित रक्कम आदिवासी विकास विभागाने द्यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, ई टेंडरिंगचा विषय आहे. आता सरकारने ई टेंडरिंग 3 लाखापेक्षा अधिक कामासाठी सक्तीचे केले आहे. नंदूरबारसारख्या छोट्या शहराच्या ठिकाणी संडासची

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

दुरूस्ती करण्यासाठी ई टेंडरिंग काढले तर कोण पुढे येईल? म्हणून माझी विनंती आहे की, काही वस्तू खरेदी करावयाची असेल तर 3 लाखापर्यंत ई टेंडरिंग करण्यात यावे. परंतु कमी रक्कमेचे काम असेल, सिव्हिल काम असेल तर पूर्वी 10 लाखाची मर्यादा होती.

नंतर 3एल.1...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी .....

तसेच अशा कामाच्या निविदांसाठी 10 लाखाची अट ठेवली तर त्या कामांना चालना देण्यासारखे होईल. अन्यथा 3-3 लाखाचे छोटे छोटे टेंडर्स असतात व त्यासाठी कोणीही पुढे येणार नाहीत म्हणून माझी विनंती आहे शिक्षणासारख्या महत्वाच्या विषयाच्या बाबतीत शासनाकडून 50 रुपयांचेही अनुदान मिळत नाही, पगाराव्यतिरिक्त शासन कोणतेच अनुदान देत नाही. माझी विनंती आहे की, गरिबांच्या मुलांना चांगले शिक्षण द्यावयाचे असेल आणि शिक्षणाचा खरा विकास करावयाचा असेल तर या सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाने नगरपालिकांमध्ये असलेल्या शिक्षण मंडळांनाही अनुदान द्यावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

---------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात मांडलेल्या अंतिम आठवडा प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मुंबई ही राज्याची राजधानी तर आहेच पण देशाची सुध्दा आर्थिक राजधानी आहे. त्याचप्रमाणे राज्यातील नगरपालिका आणि महानगर पालिकांमध्ये येणाऱ्या अडचणींचा समावेश या अंतिम आठवडा प्रस्तावात करण्यात आलेला आहे. प्रामुख्याने मुंबईचा विचार केला तर या शहराची आज झपाट्याने वाढ होत आहे तसेच लगतच्या महानगर पालिका क्षेत्राची देखील विस्कळीतपणे वाढ होत असून त्यामुळे हा पसारा आवरणे आणि त्या समस्यां सोडविणे हे एक प्रकारे जिकीरीचे होत आहे. मुंबई महापालिकेला लागूनच असलेल्या एकूण 7 महानगरपालिका आहेत त्यातील पालघर जिल्हा स्वतंत्र झाल्यामुळे 6 महानगर पालिका आहेत आणि सातवी वसई-विरार महापालिका आहे. उपनगरी रेल्वेने जोडणारा त्यात पश्चिम रेल्वेमार्गावर डहाणूपर्यंत आणि मध्य रेल्वेने कर्जत - कसारा आणि हार्बर रेल्वे मार्गावर पनवेलपर्यंत हा पसारा आहे. विरारनंतर दोन तीन स्टेशन्स सोडले तर पालघर नगरपालिका सुध्दा पर्यायाने मुंबईशी निगडीत अशीच आहे. डहाणूपासून लोकलने दररोज काम धंद्याच्या निमित्ताने लाखोच्या संख्येने लोक मुंबईकडे ये-जा करतात. आज लोकलच्या गर्दीची परिस्थिती अत्यंत भयानक झालेली असून हा संपूर्ण भार देखील मुंबईवरच पडत आहे. तसेच रस्ते व गाड्यांचाही ताण मुंबईवर पडत आहे. तशीच परिस्थिती लोकलने प्रवास करणाऱ्यांची असून डहाणूला बसलेल्या व्यक्तिला शेवटपर्यंत बसायला मिळेल याची खात्री नसते तीच परिस्थिती इतर उपनगरी रेल्वे लाईनवरुन प्रवास करणाऱ्यांची आहे.

महोदय, मुंबई आणि परिसराचा विकास करण्यासाठी शासनाने एमएमआरडीए सारखी स्वतंत्र यंत्रणा उभी केली. त्या माध्यमातून विकासाची कामे करीत असताना मागील आघाडी सरकारने मोनो व मेट्रो रेल सारखे महत्वाचे प्रकल्प हाती घेतले. त्यापूर्वीच्या काळात काही आवश्यक ठिकाणी उड्डाण पुलांची कामे देखील करण्यात आली त्यातून होणारा विकास हा मुंबईच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. वास्तविक एमएमआरडीए व एमएसआरडीसीच्या माध्यमातून जी प्रगती झालेली आहे ती खरे तर 10 वर्षापूर्वीच होणे आवश्यक होते. त्याप्रमाणे 10 वर्षापूर्वी ही कामे झाली असती तर आज मुंबईच्या अशा प्रकारच्या विविध प्रश्नांवर आपल्याला चर्चा करण्याची

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आनंद ठाकूर.........

वेळ आली नसती. या निमित्ताने माझी मागणी आहे की, शासनाने यापूढे नियोजन करताना किमान 25 वर्षाचा दृष्टीकोन विचारात घेऊन ही कामे केली पाहजेत पण सध्या जे काम चालू आहे ते कुर्मगतीने चालू असल्याचे म्हटले तरी चुकीचे होणार नाही. एमएमआरडीएचा निधी या रिजनमधील नगरपालिकांना देण्यात येतो तो निधी डहाणू नगरपालिका देखील मुंबईशी निगडीत असल्याने तसेच दररोज या भागातील जनतेचा मुंबईशी संबंध येत असल्याने या नगरपालिकेचाही एमएमआर रिजनमध्ये समावेश करुन तिच्या विकासासाठी निधी मिळाला पाहिजे अशी माझी मागणी आहे.

महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, संपूर्ण मुंबई शहराला पिण्यासाठी जो पाणी पुरवठा होतो तो प्रामुख्याने पालघर जिल्ह्यातूनच होतो. पाण्याचे पुढील 25-30 वर्षांचे नियोजन करीत असताना 8961 दशलक्ष लिटर अतिरिक्त पाण्याची आवश्यकता भासणार आहे. ही वाढती पाण्याची मागणी लक्षात घेऊन भविष्यातील पाणी पुरवठ्यासाठी आणखी धरणे घेण्याची गरज लागणार आहे. त्याचप्रमाणे सध्या जो पाणी पुरवठा होत आहे त्यातील बहुतांशी म्हणजेच 80 टक्के पाणी वाया जाते म्हणून अशा वाया जाणाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प सुध्दा हाती घेतले पाहिजेत पण याचा कोठेतरी विचार केलेला दिसत नाही.

महोदय, नगरपालिका अथवा महानगर पालिका क्षेत्रात विकासाची कामे करीत असताना मुंबईतील अधिकारी मुंबईबाहेर जाऊ नयेत याकडे देखील कटाक्षाने लक्ष देण्याची गरज आहे. पालघर जिल्ह्यात आघाडी सरकारने सागरी सुरक्षा प्रशिक्षण प्रकल्पासारख्या महत्वाकांक्षी प्रकल्पासाठी 100 एकर जागा दिली होती पण गुजरात मॉडेल आपण स्वीकारलेले असल्याने हा प्रकल्प गुजरातमध्ये गेला आणि पुरोगामी महाराष्ट्र कसा मागासलेला आहे हे या सरकारने दाखवून दिले. त्याचप्रमाणे माझी अशी विनंती आहे की, सागरी मार्गातून होणाऱ्या आक्रमणांचा विचार करता 720 कि.मी. च्या सागरी किनाऱ्या सुरक्षेसाठी सागरी आयुक्तालय आपल्या राज्यात स्थापन करावे, अशी आम्ही गेली अनेक वर्षांपासून मागणी करीत आहोत, त्याचाही शासनाने विचार करावा. पोलीस आणि कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात देखील मला बोलावयाचे होते पण वेळेअभावी बोलता येत नाही. पण मी केलेल्या सूचनांचा शासनाने विचार केला तर फार मोठे काम होणार आहे. एवढे बोलून मी माझे विचार संपवितो.

..4...



PFK/ पूर्वी श्री. भोगले...... 21:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 24 डिसेंबर, 2014 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 ते 12.00 वाजेपर्यंत विशेष बैठक होईल. त्यानंतर दुपारी 12.00 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 9 मिनिटांनी बुधवार, दिनांक 24 डिसेंबर, 2014 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही